# श्री तुकाराममहाराजांचें जीवनरहस्य

भाग पहिला

१८५३

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
स. नं.

१२५०
क१०५



REFBK-0008070

श्री तुकाराम विश्वविद्यालय संघ प्रकाशन, देहू

किंमत ३ रुपये

श्री संत तुकाराम विश्वविद्यालय संघ प्रकाशन



# श्री संत तुकाराम महाराजांचें जीवनरहस्य

अर्थात्

## श्री तुकाराम महाराजांच्या अभंगगाथेचा वाटाड्या

(भाग १) सचित्र


संपादक : प्रा. ना. के. भागवत, एम्. ए., सेंट झेवियर्स कॉलेज, मुंबई
व संचालक 'श्री. तु. वि. संघ, देहू.'

संयोजक : श्री. पुरुषोत्तम हरि गद्रे,
बी. ए., एल्एल्. बी., वकील, नाशिक.



किंमत ३ रुपये

श्रीतुकाराम विश्वविद्यालय संघ, देहू धर्मचक्र कार्यालय, पो. खार—मुंबई २१.

प्रकाशक :
**ना. के. भागवत,**
सुगत निधान, १५ वा रस्ता,
प्लॉट नं. ४६३, खार, मुंबई २१

पृष्ठ संख्या : २५०
अभंग-संख्या : १०००
चित्र-संख्या : ७

मुद्रक :
**वि. पु. भागवत**
मौज प्रिन्टिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबई ४

# नम्रतापूर्वक निवेदन

अमृताचिया सागरीं । जे लाभे सामर्थ्याची थोरी ॥
तेंचि दे अमृत लहरी । चुळीं घेतलिया ॥

**श्री तुकाराम विश्वविद्यालय संघाची** स्थापना संत तुकाराम महाराजांच्या नैतिक तत्त्वज्ञानाचा सर्वांगीण प्रचार व्हावा, या हेतूनें करण्यांत आली आहे. त्या तत्त्वज्ञानाची ओळख होण्यास सबंध गाथेच्या सखोल व दीर्घकालीन अभ्यासाची जरूरी आहे. त्यासाठीं लागणारा वेळ व सध्याच्या बिकट काळांतील दैनंदिन कष्टमय जीवन या व अशाच अनेक अडचणींमुळें, मनाचें आवश्यक असलेले स्थैर्य व शांतता हीं फार थोड्यांना लाभतात.

याशिवाय संतवाङ्मयाची गोडी उत्पन्न होण्यास जरूर असलेली सद्भावना 'दुर्लभ चराचरी' अशी आहे.

गाथारूपी अमृताच्या समुद्रामध्यें ज्यांना अवगाहन करणें शक्य नसेल, त्यांना अमृताच्या लाटेंतील एक चुळकाभर अमृत सेवन करणें शक्य व्हावें, या एकाच हेतूनें ही सध्याची सेवा केली आहे.

**वैकुंठवासी गुरुवर्य श्री विष्णुबोवा जोग महाराजांच्या प्रेरणेचें हें फळ आहे. तें त्यांचे चरणीं अत्यंत नम्रतापूर्वक सद्भावनेनें अर्पण करीत आहें.**

फिटो विवेकाची वाणी । हो काना मनाची जिणी ॥
देखो आवडे तो खाणी । ब्रह्मविद्येची ॥

**पुरुषोत्तम हरि गद्रे**

REFBK-0008070

REFBK-0008070

# जीवन रहस्य

## भाग दुसरा

( सचित्र )

या भागांत संसारासंबंधीं **मर्मभेदक** व **मार्गदर्शक** होणारे **शंभरावर** अभंग असून **खरे** व **ढोंगी** संत, **शरीर**, **वर्णाश्रमधर्म**, **हरिहरभेद**, **खरें ब्रम्हज्ञान**, **हिंसा**, **सोवळेंओवळें** वगैरे विषयांवरील अभंगात्मक विचाराप्रमाणेंच **शेंदोनशें** म्हणविजा **सुभाषितांच्या मनोहर सुगंधानें पुस्तकाचें देवालय दरवळून गेलें आहे.** शिवाय दोन्ही भागांत प्रसिद्ध झालेल्या अभंगांतील **कठिण शब्दांचा कोश**, तुकाराम महाराजांच्या अभंगांवर ज्या ज्या सद्ग्रंथांची छाया पडली आहे त्या सर्व **छायाकृति**, तुकाराम ग्रंथांची **सर्वभाषीय सूची**, **तुकारामचरित्र**, लेखकाची विवेचक **प्रस्तावना** व एका प्रसिद्ध विद्वानाचा **उपोद्घात** असा ह्या दुसऱ्या भागाचा थाट आहे. पहिल्या भागापेक्षां हा भाग थोडा मोठा होऊन त्याची किंमतही अधिक राहील.

पत्ताः—**श्री तुकाराम विश्वविद्यालय संघ**

C/o **धर्मचक्र कार्यालय, पो. खार, मुंबई २१**

# जीवनरहस्याचें दर्शन

श्री क्षेत्र देहू येथें १३ मार्च १९५२ रोजीं '**श्री तुकाराम विश्वविद्यालय संघ**' या संस्थेच्या **प्रतिष्ठापनेच्या** मूळ ठरावांत म्हटल्याप्रमाणें "**कवि, साधु** आणि **महान् नैतिक शिक्षक या त्रिविध भूमिकेंत तळपणाऱ्या** श्रीसंत **तुकाराम महाराजांनीं** सर्व आयुष्यभर मराठी जाणणाऱ्या व मराठीच्या प्रेमी लोकांना स्वतःच्या आचरणानें जी एक **विशिष्ट जीवनाची धारा** आपल्या **अभंगवाणीनें** शिकविली, आणि **सामान्य माणसाचें जीवन सुसह्य, उदार व उदात्त करण्याचा जो प्रयत्न केला** त्या जीवनधारेचें, 'माणसाची मुक्ति ही व्रतवैकल्यादि बाह्य कर्मकांडावर अवलंबून नसून ती त्याच्या अंतःशुद्धीवर अवलंबून आहे' ह्या भारतीय संस्कृतीच्या प्राणभूत तत्त्वाचें आणि महाराष्ट्र कवि सम्राट् मोरोपंत यांनीं म्हटल्याप्रमाणें जडमूढांनाही भगवद्भक्ति करावयास शिकविणाऱ्या महाराजांच्या विश्वव्यापी नि सर्व भूतानुकंपी शिकवणुकीचें यथार्थ ज्ञान त्यांच्याच शब्दांत महाराष्ट्रीय बंधु-भगिनींना व्हावें आणि नित्य पठनानें, श्रवणानें आणि मननानें आत्मनिरीक्षण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें अंतःशुद्धीस प्रवृत्त होऊन आत्मविकास साधावा, हा संघाचा उद्देश अंशतः सफल होण्यासाठीं श्री संत तुकाराम महाराजांचें जीवनरहस्य (भाग १ ला) हे 'श्री संत तुकाराम विश्वविद्यालय संघा'चें **प्रथम प्रकाशन** आम्ही प्रसिद्ध करीत आहों.

२ भारताची भारतीय गरज आणि आत्मविकास या उभयान्वयी दृष्टीनें मानवधर्माचें सर्वांगीण ज्ञान करून घेणें व तें परिस्थित्यनुरूप आचारांत आणणें आज अत्यावश्यक झालें आहे. भ्रांत, अकुशल विचारांचें निर्दाळण करणारा, समता-एकता व बंधुता यांचें स्वारस्य व रहस्य सांगणारा, प्रसाद, प्रतिभा आणि प्रेम यांच्या माधुर्यानें रसाळलेला असा कर्तव्यबोधक, सर्वसुलभ, सरस, स्पष्टवादी आणि लोकप्रिय उपदेशग्रंथ आज तुकाराममहाराजांच्या अभंगगाथेशिवाय महाराष्ट्रसारस्वतांत दुसरा नाहीं, हें कुणालाही मान्य करावेंच लागेल. पण आम्ही जिला मानवधर्माची 'भावार्थदीपिका' म्हणून यथार्थतेनें संबोधतों त्या तुकाराम महाराजांच्या ४५०० अभंग-गाथेचें वाचन-मनन—एकाद्या व्यासंगी विद्वान् व्यक्तीखेरीज—आज **सर्वसामान्य वाचकांना** अशक्य झालें आहे. ही

अडचण दूर व्हावी आणि महाराष्ट्राच्या प्रत्येक साक्षर आणि शिक्षित कुटुंबांत महाराजांच्या अभंगवाणीच्या अमृत-सिंचनानें व्यक्तिगत तसेंच कौटुंबिक जीवनहि उदार, उदात्त, शांत, संयमी, सहानुभूतिसंपन्न व लोकहिततत्पर व्हावें, यासाठीं श्रीतुकाराममहाराजांच्या ४५०० अभंगांचें दीर्घ परिश्रमानें व कौशल्यानें मंथन करून आमचे नाशिक येथील सन्मान्य मित्र, सुप्रसिद्ध पुढारी, व प्रसिद्धिविन्मुख-समाजसेवक व वकील व तुकाराम महाराजांचे एकनिष्ठ भक्त श्री. **पु. ह. गद्रे** यांनीं 'जीवनरहस्या'च्या रूपानें हा अभंगगाथेचा गाभाच वाचकांच्या हातीं दिला आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

३ सांसारिकांना, साधकांना, जिज्ञासूंना, मुमुक्षूंना, भाविकांना व उपदेशकांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या अनेकविध प्रश्नांवरील तुकाराम महाराजांचे विचार त्यांच्याच अभंगवाणींतून आणि तेही शक्य तों वर्णानुक्रमानें 'जीवनरहस्यांत' दिल्यामुळें थोड्या वेळांत महाराजांचे विचार कोणालाही समजून घेतां येतात. संदर्भग्रंथ म्हणून वक्त्यास, प्रवचनकारास, हरिभक्तपरायणास तर हा अमूल्य ठेवाच लाभेल.

४ 'जीवनरहस्या'च्या या पहिल्या भागांत ७०० वर पूर्ण व ३०० वर अभंगांश दिले असून सर्वांच्या सोयीसाठीं अभंग मोठ्या अक्षरांत छापले आहेत. आजपर्यंत प्रकाशित झालेल्या कांहीं गाथ्यांत अभंगविषयांचें स्थूल वर्गीकरण असलें तरी आमच्या या पुस्तकाप्रमाणें तें सूक्ष्म, सर्वस्पर्शी आणि हरघडीच्या जीवनोपयोगी दृष्टीनें केलेलें नाहीं, हें पुस्तकाचीं कांहीं पृष्ठें वरवर चाळलीं तरीसुद्धां समजून येण्यासारखें आहे.

५ या पुस्तकांत आम्ही "पंडित' गाथेचा म्हणजेच 'सरकारी गाथ्या'चा उपयोग केल्यामुळें अभंगाचा क्रमांक हा सरकारी गाथ्यांतील आहे, असें समजावें. जो अभंग सरकारी गाथ्यांत मिळाला नाहीं तो 'निर्णयसागर' गाथेंतून घेतल्यामुळें अभंग क्रमांकापुढें कंसांत 'नि' (नि) असें छापलें आहे. मुख्य विषयाचें नांव **जाड्या** अक्षरांत आणि त्याच्याखालीं अभंग-क्रमांक बारीक आंकड्यानें दर्शविला आहे. एकाच विषयासंबंधीं अनेक अभंगांत प्रसंगानुसार निरनिराळ्या दृष्टींनीं विवरण झालें आहे. अशा अभंगांची संख्याही ध्यानांत यावी म्हणून अभंग क्रमांकाचे डावे बाजूस अनुक्रमांक कांहीं पृष्ठांपर्यंत

उपयोजिले आहेत. या योजनेनें कांहीं विशेष सोय होईल असें वाटलें नाहीं, म्हणूनच अखेरपर्यंत हा क्रम स्वीकारला नाहीं. पुस्तकाच्या मांडणीची कल्पना एवढ्यावरून वाचकांना स्पष्ट होईल, अशी उमेद आहे. पानांवरील कोपऱ्यांतील शीर्षकेंहि उद्बोधक करण्याचा शक्य तों प्रयत्न कसोशीनें केला आहे. शेवटीं सूचिहि जोडली आहे.

६ 'श्री तुकाराम विश्वविद्यालय संघा'तर्फे व्हावयाच्या तुकाराम साहित्य प्रकाशनास केवळ निष्काम बुद्धीनें 'जीवन रहस्य' लिहून देऊन, पुस्तक-निर्माते श्री. काकासाहेब गद्रे यांनीं जें साहाय्य केलें, त्याबद्दल संघचालक, संपादक व प्रकाशक म्हणून व्यक्तिशः आम्ही त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतोंच, पण त्यांचे खरे आभार म्हणजे महाराष्ट्रीय बंधुभगिनींनीं पुस्तकाला आश्रय देऊन हस्तेंपरहस्तें पुस्तकाच्या सार्वत्रिक प्रसाराला अधिकाधिक मदत करणें हेच होत.

७ 'जीवन रहस्या'च्या स्वरूपासंबंधानें व मूलभूत कल्पनेसंबंधानें दोन शब्द येथें लिहिणें अप्रस्तुत होणार नाहीं. संतांची चरित्रात्मक माहिती गोळा करून त्यांचें बाळपण, कुमारावस्था, तारुण्य, मध्यमवय, म्हातारपण, साक्षात्कार वगैरे भाग करून त्यावर स्वतः चरित्रकार आपलें भाष्य लिहून चरित्रनायक 'संत' असा होता, असें निर्णायक मत व्यक्त करून, तो आपण बनविलेलें मत वाचकावर लादण्याचा प्रयत्न करतो व अशा रीतीनें वाचकांच्या चिकित्सक बुद्धीवर दडपण आणून, ते संत कसे होते, **हें वाचक न ठरवितां चरित्रकारच ठरवतो,** व तें चरित्रकाराचें निश्चयात्मक मूल्यमापन वाचकाला स्वीकारण्याशिवाय दुसरा इलाज रहात नाहीं. श्रीसंत तुकाराम महाराजांच्या चरित्राची अशीच गत झाली आहे. म्हणून वाचकांच्या स्वतंत्र बुद्धीवर आक्रमण न करतां, त्यांना आपलें स्वतंत्र मत बनवितां यावें म्हणून या विषयवार अभंग वर्गवारीनें वाचकांना आपलें मत बनविण्यास आवश्यक साधनमात्र आम्ही उत्पन्न करीत आहोंत व त्या साधनसामग्रीवरून श्री तुकाराम महाराजांचें 'जीवनरहस्य' वाचकांनीं उकलून घ्यावें व तें त्यांचें मूल्यमापन हें स्वतंत्र बुद्धीनें केलेलें मूल्यमापन म्हणूनच जास्त श्रेयस्कर होईल. या बाबतींत त्यांना दुसऱ्याहि एका मार्गानें मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला आहे. तो

संत तुकाराम—ज्ञानेश्वर—म. गांधी—भगवान् बुद्धदेव इ. भारतीय महापुरुषांच्या नैतिक तत्त्वज्ञानाचा व सर्वधर्मसमन्वयाचा पुरस्कार व प्रचार करणारें, मुंबई सरकारनें दुय्यम शाळांसाठीं प्रशंसिलेलें मुंबई राज्यांतील एकमेव मानवधर्मवादी

# मराठी—हिंदी मासिक

१५ ऑगस्ट पासून नवें वर्ष सुरू होतें | **धर्मचक्र** | वा. वर्गणी म. ऑ. नें फक्त ४ रु.

## ६ वें वर्ष सुरू झालें

नवीन वर्षापासून महर्षि **अरविंद घोष, रमण महर्षि,** इत्यादिकांच्या सांप्रदायिक माहिती प्रमाणेंच श्री. **भय्याशास्त्री वाटवे** यांनीं 'जीवन रहस्याचा' केलेला हिंदी भावानुवादही क्रमशः प्रसिद्ध होत आहे.

श्री तुकाराम **विश्वविद्यालय संघाची अधिकृत माहिती** व **संघ सभासदांचीं नांवें,** संघास **मिळालेल्या देणग्या वगैरेंची** माहिती धर्मचक्रांत नियमितपणें प्रसिद्ध होते.

संघ **सभासदांस 'धर्मचक्र'** मासिक अवघ्या **३ रुपयांत** (म. ऑ. नें) मिळते आणि ही सवलत फक्त येत्या **तुकाराम बीजेपर्यंतच** (मार्च १९५३ अखेर) आहे.

संघ सभासद होऊन धर्मचक्राला आश्रय देणें व शक्यतेप्रमाणें **धर्मचक्र बुकडेपोला** सहाय्य करणें म्हणजेच पर्यायानें 'तुकाराम विश्वविद्यालय संघा'ला मदत करणें होय.

पत्ता :—**धर्मचक्र कार्यालय**—खार—२१

६०७९ २२५३ १२२४ ७२८ २७१५।८०

# तुकारामांचा भावविकास

(धर्मचक्र—डिसेंबर १९५२ मधून)

"भाव तेथें देव", "एक भाव चित्तीं तरी न लगे कांहीं युक्ति", "येथें भावचि कारण", इत्यादि अनेक वचनांत तुकारामांनीं ईश्वरप्रातीला भावाची किती आवश्यकता आहे, हें स्पष्ट केलें आहे. इतर संतांनींही भावाची अशीच महती गाईली आहे. परंतु, भाव म्हणजे काय याचें सविस्तर विवेचन क्वचितच पहावयास सांपडतें. म्हणून भाव म्हणजे काय याचा विचार करून, तुकारामांच्या भावाचें स्वरूप सुरुवातीला कसें होतें, व नंतर त्याचा विकास कसा कसा झाला याचें विवेचन या लहानशा लेखांत करण्याचें योजिलें आहे.

देवाबद्दल भावाप्रमाणें इतरही अनेक 'भाव' जगांत आपल्या दृष्टीस पडतात. मातेचा पुत्राबद्दल वात्सल्यभाव, पतिपत्नींचा प्रेमभाव, मित्र वा बंधु यांचा बंधुभाव, धर्म, राष्ट्र, समाज, मानवता यांच्याबद्दल भक्तिभाव, नीति व सदाचार यांवरील निष्ठा हीं सर्व भावाचींच उदाहरणें आहेत. यांच्यांत दिसून येणाऱ्या सामान्य लक्षणांचा विचार केल्यास खालील गोष्टी दिसून येतात. मनुष्याला अनेक इच्छा किंवा अपेक्षा असतात, व वर दिलेल्या भावांना आधारभूत अशा, व्यक्ति, संस्था किंवा नीतितत्वें यांच्यापासून विशिष्ट अपेक्षा पूर्ण होतील, असा त्याला भरंवसा वाटतो. भावांच्या वरील आधारांत त्याला कांहीं गुण दिसतात, त्यामुळें असा भरंवसा उत्पन्न होतो, व म्हणून त्या गुणांबद्दल प्रेम, आदर इत्यादि भावना वाटूं लागतात. या भावनांच्या संमिश्र प्रवाहाला भाव असें म्हणतां येईल. अपेक्षा तीव्र, भरंवसा दृढ, भावाच्या आधारांतील गुण सत्य, व त्याबद्दलच्या भावना बलवान् असतील तर त्यापासून दृढ, सत्य, टिकाऊ भाव उत्पन्न होतो, व त्याच्या प्रवृत्तीनें, त्या त्या विशिष्ट अपेक्षापूर्तीला अवश्य असें कार्य मनुष्य करूं लागतो. कार्याला प्रवृत्त न करणारा भावनाप्रवाह, 'भाव' या नांवाला पात्रच नाहीं. ती एक क्षणिक ऊर्मि होय. तिचा जीवनावर कांहींही परिणाम होत नाहीं. अपेक्षा या शब्दांत सर्व उच्च अपेक्षांचा अथवा

ध्येयांचाहि समावेश केला आहे. सुख, कीर्ति, विद्वत्ता, यांपासून तों देशाचें वैभव, मानवतेचें सुख, ईश्वराची प्राप्ति इत्यादि सर्व गोष्टींच्या इच्छेचा 'अपेक्षा' या शब्दांत समावेश आहे. भावाच्या आधारापासून अपेक्षापूर्ति होत आहे असा अनुभव आला तर भाव वाढतो; न आला तर कमी होतो. भाव कमी होण्याला मनाची दुर्बलता हेंही एक कारण आहे; पण त्याचा येथें विचार करावयाचा नाहीं.

गौतमबुद्ध सत्यसुखाचा मार्ग शोधीत होता ही त्याची अपेक्षा अगर भूक होती. तिच्या पूर्ततेसाटीं त्यानें तप, योग इत्यादि साधनांचा आश्रय केला. यांबद्दलही प्रथम त्याच्या मनांत भाव होता, परंतु त्यांचें वैफल्य कळल्यावर तो भाव नष्ट झाला, व एका विशिष्ट मार्गाकडे त्याचा भाव वळला, व अनुभवानें त्या मार्गाबद्दल आदर, प्रेम, पूज्यभाव या भावना स्थिर व दृढ होत गेल्या. त्या मार्गाचें त्यानें अनन्यतेनें 'धर्म' म्हणून आचरण केलें. दुसरें, अगदीं व्यवहारांतील सामान्य असें, मातेच्या वात्सल्यभावाचें उदाहरण घेऊं : आपल्या मुलापासून आपल्या अनेक अपेक्षा पूर्ण होतील अशी निष्ठा मातेला वाटत असते. तो सदाचारी, कीर्तिमान्, मातृभक्त होऊन आपले पांग फेडील या भरवंशानें त्याच्यासंबंधीं प्रेम, करुणा, आदर वगैरे भावना उत्पन्न होतात. त्यांचा वात्सल्य-भाव होतो. मुलगा मोठा होण्यावरही अपेक्षापूर्ति अवलंबून असते; म्हणून त्याला वाढवून शहाणा करण्यासाटीं हाडाचीं काडें ती करते. या उदाहरणांवरून वरील भावाचें विवेचन बरेंच स्पष्ट होईल.

भावासंबंधीं आणखी एक महत्त्वाची गोष्ट ही आहे कीं, भावाचा आधार जर उदात्त, थोर व समर्थ असेल तर त्या आधारांतील उच्च, उच्चतर गुण क्रमानें प्रत्ययाला येतात, व त्यामुळें त्या आधाराचा आश्रय करणाऱ्या व्यक्तींतील उच्च, उच्चत्तर ध्येय क्रमानें जागृत होतें, त्याचीं जीवनाचीं मूल्यें बदलत जातात, व त्या आधारासंबंधीं पहिले सामान्य भाव क्रमानें मागें पडून किंवा पूर्तता पावून नव्या भावाचा उदय होतो. अशा रीतीने भावाच्या आधाराच्या गुणोत्कर्षानें त्याचा आश्रय करणाऱ्या मनुष्याची उन्नति होते.

उदाहरणार्थ, स्वतःच्या सत्यसाक्षात्कारासाटीं शोधून काढलेला धर्म श्रीबुद्धांनीं जगाच्या कल्याणासाटीं जगाला शिकविला. सामान्य माता आपल्या मुलाकडे ज्या

वात्सल्यानें पाहते, त्याच वात्सल्यानें, बहुधा, जिजामातेनें प्रथम शिवाजी महाराजांकडे पाहिलें असेल; परंतु पुढें महाराजांचें असामान्य व्यक्तिमत्व प्रत्ययास आल्यावर हिंदुराष्ट्राचा उद्धारकर्ता या भावानें त्या त्यांच्याकडे पाहूं लागल्या.

तुकारामांच्या भक्तिभावाचाही अशाप्रकारें विकास झाला. त्या विषयाकडे आतां वळूं—

## (१) योगक्षेमाच्या भूमिकेवरील आर्तभक्ताचा भाव

दिवाळें निघून सर्व बाजूंनीं होरपळून गेल्यावर "तुका म्हणे यांचा संग नव्हे भला । शोधीत विठ्ठला जाऊं आतां ।" असा तुकारामांनीं निश्चय केला. हा त्यांचा प्राथमिक भाव, भावाचा अंकुर, होय. त्या वेळीं "आतां काय खावें, कोणीकडे जावें । गावांत राहावें कोण्यारीतीं ॥" असे योगक्षेमाचे अगदीं मूलभूत प्रश्न त्यांना सतावीत होते. या अपेक्षा पूर्ण करणारे जगांत कांहीं दिसेना; त्यावेळीं, आनुवंशिक संस्कारांनीं, वारकरी संप्रदायाच्या व भोंवतालच्या समाजाच्या बद्धमूल संस्कारांमुळें त्यांचा देवावर मुळांतच असलेला विश्वास उज्ज्वल होऊन प्रकाशूं लागला, व आपल्या अपेक्षा तोच पूर्ण करील, या निष्ठेनें देवाबद्दल प्रेम, भक्ति, आदर, भीति इत्यादि भावना त्यांच्यांत उत्पन्न झाल्या व त्यांचा भक्तिभाव बनत गेला. त्यांचा स्वभावच सत्यनिष्ठ व भावनापूर्ण होता; त्यामुळें त्यांचा भाव सुरुवातीलाच इतका दृढ व बलवान् होता कीं, सर्व सोडून त्यांनीं दृढ भक्तिमार्ग आक्रमण्यास निश्चयानें प्रारंभ केला. या वेळीं त्यांचा भाव आर्तभक्ताचा होता, सकाम होता. तेव्हां "देव उदार आहे, कृपाळू आहे, भक्तवत्सल आहे" या देवाच्या गुणांकडे त्यांचें विशेष लक्ष वेधलें, व "तोच विसावा देईल, तहानभूक हरील, तोच सुखाचें सार आहे," या भरंवशानें, "त्याच्याच गांवाला जाऊं, त्यालाच सुखदुःख सांगूं," असा निश्चय त्यांनीं केला. यावरून भक्ताच्या अपेक्षेमुळें तिला उपयुक्त व अनुरूप अशा देवाच्या गुणांकडे त्याचें लक्ष कसें वेधतें, त्या गुणांमुळें प्रेम-पूज्यभावादि भावना कशा उत्पन्न होतात व त्यांच्या समुच्चयानें भक्तिभाव उत्पन्न होऊन तो भक्ति कशी करूं लागतो, हें स्पष्ट होईल. भक्तिमार्गाचा अवलंब ही भावापासून होणारी क्रिया होय. संतसमागमांत सदाचार राखून, प्रेमानें, निश्चयानें, सद्‌गुरूंनीं दिलेल्या नामाचें अखंड चिंतन व संकीर्तन, देवाचें गुणगान, त्याच्यासाठीं शरीर झिजवून त्याची सेवा रकणें—असें अगदीं,

संक्षेपानें, त्या मार्गाचें वर्णन केलें कीं, येथें तें पुरे होईल. या वेळच्या आपल्या वृत्तीचें तुकारामांच्या अभंगांत वर्णन सांपडतें तें असें:—

"जाऊं देवाचीयां गावा । देव देईल विसावा ॥
देवा सांगों सुखःदुःख । देव निवारील भूक ॥
देवासीच घालूं भार । देव सुखाचें सार ॥ "
"उदार, कृपाळ, अनाथांचा नाथ । ऐकसी मात शरणागता ॥ "

परंतु हा भाव स्थिर राहात नाहीं. फळ मिळण्यास उशीर लागतो. संकटें सहन होत नाहींत, मोह भुरळ पाडूं पाहतात व यामुळें मूळच्या भावना नष्ट किंवा दुर्बळ होतात व भावहि नष्ट किंवा दुर्बळ होतो. हे धोके जाणून, भाव दृढ राखण्यासाठीं मनाला सतत जागृति देणें अवश्य असतें. अशी जागृति आपल्या अनेक अभंगांत तुकारामांनीं आपल्या मनाला दिली आहे. देवाचें खरोखर आपल्याकडे लक्ष असेल का, त्याच्या जवळच सर्व कांहीं मागावें, दुसऱ्यांकडे आशेनें पाहूं नये हें खरें का, देव खरोखर दयाळू आहे का, असे संशय प्रक्षुब्ध किंवा दुर्बळ झालेल्या मनाला येतात. त्या वेळीं, खुंटी हालवून बळकट करावी या न्यायानें, मनाला स्थिर व निष्ठावंत राखण्यासाठींच जणूं कांहीं, तुकारामांनीं खालील वचनें लिहिलीं आहेत:—

"माझें सुखदुःख जाणतसे फार । घातलासे भार पांडुरंगा । "
"मागणें तें मागों देवा । करूं भक्ति त्याची सेवा ॥
काय उणें तयापाशीं । ऋद्धि-सिद्धि त्याच्या दासी ॥ "
"बोललों चि बोलों पडपडताळोनी । उपजत मनीं शंका नाहीं ॥
बहुतांची माय बहुत कृपाळ । साहोनी कोल्हाळ बुझावीसी ॥ "

## (२) नैतिक उत्कर्षाच्या भूमिकेवरील भाव

हळू हळू भक्तीच्या मार्गावर पुढें जाऊं लागल्यावर तुकारामांचा भाव विकास पावूं लागला. प्रपंच, बऱ्यावाईट मार्गास लागून पहिलीं संकटें व योगक्षेमाची चिंता थोडीबहुत दूर झालीं असावींत. त्यामुळें व विवेक, नामस्मरण, सत्संगति याहीमुळें, उच्चतर अपेक्षा मनांत तीव्र होऊं लागल्या. चिंता, भय, दुःख, तळमळ, सुखलोलुपता, अस्थिरता इत्यादि विकारापासून मुक्तता व्हावी; निर्भयता, शांति, विश्रांति, वैराग्य, स्थिरता हे सद्गुण अंगीं वाढावे, असें त्यांना वाटूं लागलें.

या सर्वांची प्राप्ति ईश्वरचरणाजवळ आहे, असा भरंवसा वाटून त्याच्याबद्दलच्या प्रेम, आदर, भीति, पूज्यभाव या पहिल्या भावना दृढतर झाल्या व वाढल्या; त्यामुळें भावाची दृढता व अनन्यताही वाढली, व साधन अधिक दक्षतेनें व तळमळीनें होऊं लागलें. ते म्हणतात :—

"अभयाचें स्थळ । तें हें एक अचळ ॥
तरी धरिला विश्वास । ठेलों होऊनियां दास ॥
तुका म्हणे कंठीं नाम । अंगीं भरलेसें प्रेम ॥"

"आमुची विश्रांति । तुमचे चरण, कमळापति ॥
हेंचि एक जाणें । काया वाचा आणि मनें ॥"

"तुजविण कांहीं । स्थिर राहे ऐसें नाहीं ॥
मोकलिली आस । सर्व भावें झालों दास ॥"

## (२) मोक्षप्राप्तीच्या भूमिकेवरील पारमार्थिक भाव

देवाच्या भक्तीच्या योगानें, देवाच्या कृपेनें प्रापंचिक अपेक्षा व नैतिक अपेक्षा पूर्ण होत चालल्याचा अनुभव तुकारामांना येऊं लागला. त्यामुळें भाव आणखी दृढावत गेला, व या अपेक्षांची तीव्रता कमी होऊन, त्याहून उच्च अपेक्षा अंतःकरणाच्या क्षितिजावर उगवू लागल्या. मनुष्याच्या मनांत अपेक्षांचे अनेक थर असतात. त्यांतील कांहीं जागृत तर कांहीं सुप्त असतात. पण आजच्या सुप्त अपेक्षा उद्यां जागृत होऊं शकतात व होतात; जागृत अपेक्षा सुप्त किंवा लुप्त होतात. तुकारामाची भक्ति प्रथम मुख्यत्वें करून सकाम असली तरी तिच्यांत निष्कामतेचें शुद्ध बीज होतेंच. मोक्ष हेंच जीवनाचें ध्येय व निष्काम भक्ति हेंच त्याचें साधन ही त्यांची पूर्ण निष्ठा होती. क्रमानें, परमार्थपथ आक्रमित असतांना मोक्षाची अपेक्षा तीव्र झाली, व पांडुरंगाचे चरण मोक्षाचे साधन आहेत या भावानें ते भक्ति करूं लागले. आदर, प्रेम, पूज्यभाव, शरणागति या पूर्वींच्याच भावना आणखी बलवान् व शुद्ध झाल्या, व भावाची अनन्यता खूपच वाढली. त्यांतील सात्त्विक कामनांचा अंशही कमी होत चालला. ही अनन्यता दृढ करण्याच्या दृष्टीनें त्यांनीं "मोक्षदाता" या देवाच्या गुणाचें चिन्तन केलें. ते म्हणतात :—

"देवाचिये पायीं देई मना बुडी । नको धावों ओढीं इंद्रियांचे ॥
सर्व सुखें तेथें असतीं एकवेळें । न सरतीं काळें कल्पांतींही ॥
जाणें येणें खुंटे, सरे येरझार। न लगे डोंगर उसंतावे ॥"

"जो भक्तांचा विसांवा । उभा पाचोरीतो धावा ॥
भवसिंधु सुखें । उतरी कासे लावोनी ॥"

"तुज ऐसा कोण उदारांची राशी । आपलेंचि देसी पद दासां ॥"

"अनाथा जीवन । आम्हां तुमचे चरण ॥"

"नव्हे निराशेचा ठाव । पोटीं राखलीयां भाव ॥"

तुकारामांच्या अभंगांत त्यांच्या भावविकासाचें फार सूक्ष्म वर्णन केलेलें पाहावयास सांपडतें. त्याच्या अनेक पायऱ्या दाखवितां येतील. परंतु स्थलसंकोचास्तव त्यांतील प्रापंचिक, नैतिक व पारमार्थिक या तीन प्रकारच्या अपेक्षांच्या अनुरोधानेंच वर विचार केला आहे, व या तीन पायऱ्यांनीं त्यांचा भाव कसा शुद्ध व एकविध आणि उदात्त, निष्काम होत गेला हें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

## (४) भावाची पूर्ण अनन्यता

देवाची निष्ठेनें भक्ति केली असतां निश्चित मोक्ष मिळेल, देवपद प्राप्त होईल, अशी खात्री झाल्यावर, तुकारामांचा भाव पूर्णपणें अनन्य झाला. प्रापंचिक भार देव घेतो, निर्भयता, सुख, स्थैर्य, विश्राम तोच देतो; मग क्षुल्लक सखीसहोदरांचा आश्रय कशाला धरावयाचा? असा विचार करून, देवाचें औदार्य व ऐश्वर्य, सामर्थ्य व दयाळुत्व, प्रेम व वात्सल्य अनुभवानें कळल्यावर, तुकारामांनीं अन्य आश्रयांचा त्याग केला व देवाच्या शरणीं ते अनन्य झाले, यांत आश्चर्य तें काय? अशा प्रकारें भाव पूर्णपणें अनन्य व एकविध होतो. या स्थितींत ते सांगतात:—

"आतां सर्वभावें हा माझा निर्धार । न करी विचार आणिकासी ॥

"आम्हां वैष्णवांचा । नेम वाचा मनें साचा ॥
धीर धरूं जीवासाठीं । येऊं नेदूं लाभा तुटी ॥"

"आम्ही पहा कैसीं एकविध झालों । राखणें लागलों वासनेसी ॥
तुम्हावीण कांहीं नावडावें जीवा । केला तोचि देवा दृढ पण ॥"

"माझें मन पाहे कसुन । चित्त न ढळें तुजपासून ॥
कापून देईन शिर । पहा कृपण कीं उदार ॥"

अशा रीतीनें एकदेशी भाव अनन्य होतो, सकाम भक्ति निष्काम होते. पण हें सोपें नाहीं. जीव बळी देऊन भक्त देवाचे चरण धरतो; हा त्याग फार फार कठीण आहे, असें तुकाराम महाराजांनीं सांगितलें आहे. ते म्हणतात, "हा भाव साधण्यासाठीं आम्ही 'माझें–तुझें (म्हणजेच संसार) यावर रुसलों, संसाराचे पाश तोडले, संसार जिंकला. संसाराचा मोह जिंकणें हेंच खरें शौर्य. आम्ही जीवित्वाची आस सोडिली, देह देवावरून ओवाळून टाकिला. हा भाव साधण्याला टाकीचे घाव सोसावे लागतात. ग्रासोग्रासीं विष गिळण्याइतकें मन घट्ट करावें लागतें. युद्धाप्रमाणें भक्तीच्या कथा रम्य आहेत, कृति फार अवघड—" अशा अर्थाचीं त्यांचीं अनेक उद्बोधक स्फूर्तिदायक वचनें आढळतात. परमार्थातील साधकालाच काय, परंतु कोणात्याही उच्च ध्येयाच्या पूर्ततेसाठीं खपणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला तुकाराम महाराजांच्या अनन्यभावाचा हा इतिहास मार्गदर्शन करील, यांत शंका नाहीं.

या खडतर तपाचें तसेंच वैभवशाली, अनुपम आनंदमय फळही त्यांना मिळालें. त्याचें वर्णन त्यांनीं अनेक अभंगांत कृतार्थतेच्या आनंदानें, समाधानानें व अत्यंत उत्साहानें केलें आहे. त्यांतील एकच खालीं देतों. उत्तम हिऱ्यांच्या राशींतून एकच कसा निवडावा ? निवडण्याच्या भानगडींत पडतां, कोणता तरी एक उचलावा हेंच योग्य व शक्य आहे. "याजसाटीं केला होता अटाहास । शेवटाचा दिस गोड व्हावा । आतां निश्चिंतीनें पावलों विसावा । खुंटलिया धांवा तृष्णेचिया । कवतुक वाटे झालीया वेचाचें । नांव मंगळाचें तेणें गुणें ॥ तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी । आतां दिवस चारी खेळीमेळीं ॥"

परंतु 'हें सर्व मीं केलें' असा अभिमान तुकारामांच्या ठिकाणीं लवमात्रही नाहीं. तो असता तर ही स्थिति प्राप्तच झाली नसती. अत्यंत विनम्रपणें व कृतज्ञतेनें ते देवाला सांगतातः—

"तुजे पाय माझे राहियेले चित्तीं ।
ते मज दाविती वर्म देवा ॥
आम्हा अंधा तुझ्या पायाचा आधार ।
जाणसी विचार चालवितां ॥
मन स्थिर ठेलें, इंद्रियें निश्चळ ।
हें तों माझें बळ नाहीं देवा ॥
पापपुण्य भेद नासिलें तिमिर ।
त्रिगुणें शरीर सांडियेलें ॥
तुका म्हणे तुझा प्रताप हा खरा ।
मी जाणे, दातारा, शरणागत ॥ "

आपल्या अनेक लहानथोर अपेक्षांच्या पूर्ततेसाठीं आपण देवाचा आधार घेतला, त्याच्यावर भाव दृढ ठेवून भक्तिमार्गाचें आचरण निष्ठेनें केलें, तर आपल्यालाही, तुकारामांना प्राप्त झालेल्या 'अमुप भांडाराची', अंशमात्रानें तरी प्राप्ति त्या अनंतहस्ताच्या कृपेनें होणार नाहीं का ?

—ग. वि. तुळपुळे

* * *

# श्री संत तुकाराम महाराजांच्या साधनकालांतील विविध अवस्था

( धर्मचक्र—डिसेंबर १९५२ मधून )

महाराजांच्या अभंगांचा विचार करून पाहिल्यास, आपल्या जीवनांत त्यांनीं विचारांत कसकसा पालट घडवून आणला, हें पाहण्यासारखें आहे. तारुण्यातील **श्रीमंती**, त्यानंतर **दुष्काळ** व **आप्तेष्टांचा वियोग**, त्याचबरोबर **दुष्काळानें** हरून नेलेली **संपत्ति** व **अन्नावांचून** स्त्री-पुत्रादिकांना आलेलें **मरण** व त्यामुळें जनांत झालेली **मानहानि**—ही त्यांच्या जीवनांतील **पहिली** अवस्था दिसून येते.

या आपत्तीला तोंड देऊन या संकटांतून तरून जाण्याकरितां मनाशीं केलेला **विचार** व निर्धार विचारपूर्वक केलेला **त्याग**, त्यागांतून उत्पन्न झालेलें **वैराग्य**, ही **दुसरी** पायरी दिसते.

वैराग्यांतून **परमार्थांत** प्रवेश, **साधनांचा** विचार, त्या साधनांच्या साफल्याकरितां केलेली **उपासना**, ही **तिसरी** अवस्था दिसते.

चौथ्या अवस्थेंत साधना, अभ्यास व उपासनांमुळें घडून आलेला सगुण **साक्षात्कार.**

शेवटची अवस्था म्हणजे **निराकार, निर्गुणावस्थेंत त्यांचा प्रवेश.** साधारणपणें त्यांच्या मनाच्या उत्क्रांतीचे वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें टप्पे दिसून येतात.

आतां आपण त्यांच्या पहिल्या अवस्थेचा विचार करूं. संसाराच्या आरंभाला सर्व बाजूंनीं ते सुखसंपन्न होते. पिढ्यान् पिढ्या त्यांच्या घरांत **महाजनकी** होती, जमीनजुमला होता, दोन कुटुंबें व मुलें होतीं. एवंच त्यांच्या संसाराचा आरंभ जसा व्हावा तसाच झाला. क्वचित् हाच थाट त्यांच्या संसारांत टिकून राहिला असता तर त्यांच्या आयुष्याला कोणती दिशा लागली असती, हें सांगणें कठीण आहे.

पण देवाच्या मनांत त्यांचा याच जन्मांत मुक्तीचा सोहोळा घडवून आणावयाचा

होता. पण संसार व परमार्थ यांची गफलत होऊं शकत नाहीं. दोही डगरींवर हात ठेवून अखेर इह ना परते होऊन दोन्हींना मुकावें लागतें. देव भक्ताला संसार करूं देत नाहीं. भाग्याचा लाभ भक्ताला दिल्यास त्याच्या अंगांत ताठा भरण्याचा संभय असतो. मनमिळाऊ, रूपसंपन्न, गुणी भार्या भक्ताला दिली तर तो तिच्या मायाजालांत गुरफटून जाण्याचा फार संभव असतो; म्हणून भक्ताला कर्कशा सहचारिण देव देतो. याची प्रचीति प्रत्यक्ष तुकाराम महाराजांनाच आली होती. किंबहुना सर्व **साधार खूणच अशी दिसते कीं, भक्ताच्या हृदयांत देवाचा वास झाला कीं, त्याच्या संसाराची दुर्दशा होते.** आपणावांचून नातलगाच्या मायापाशांत त्यांनीं गुंतूं नये, म्हणून नातलगांचें वाटोळें होतें. भक्ताला असत्य बोलण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून देव त्याला मौनी करून ठेवतो. 'जिकडे पाहे तिकडे विठ्ठल रखुमाई' अशी त्याची स्थिति होते.

क्वचित् याच मायाजाळांतून सोडवण्याकरतां देवानें तुकाराम महाराजांच्या संसाराची वाताहत केली असावी. ते कांहीं जन्मतः भिकारी नव्हते. संसाराचा जम उत्तम प्रकारानें बसला होता. पण संसार उत्तम तऱ्हेनें चालवून कांहीं मुक्तीचा सोहोळा बघावयास मिळत नाहीं. कोट्यावधि रुपये मिळविणाऱ्यांना अन्न खाण्यास वेळ मिळत नाहीं. देशभक्ति नाहीं, समाजकार्य नाहीं, परमार्थ तर नाहींच नाहीं. एक आकड्याच्या पुढें किती शून्यें वाढवावयाचीं याची त्यांच्या आयुष्याच्या अखेरपर्यंत धडपड सुरू राहते. श्वास संपल्यावर काय विश्रांती त्यांना मिळत असेल ती खरी. या नादांतून विठ्ठलानें महाराजांची सुटका केली.

उच्च कुळांत जन्म दिला असता तर उच्च वर्णांत जन्म घेतल्याचा अभिमान त्याच्या मनाला राहिला असता, म्हणून त्यांचा कुणबी वंशांत जन्म झाला. अगदीं त्यांच्या तारुण्यावस्थेंत मायबापाचे निधनानें मायेची सावली नाहींशी झाली. होतें नव्हतें तेवढें द्रव्य दुष्काळानें नाहींसें केलें. **द्रव्याचा अभाव म्हणजे पदोपदीं अपमानाचा अनुभव.** त्याच्या अभावीं पदोपदीं हाल होणें हें स्वाभाविकच आहे. आपल्या संसारांत आपल्या स्त्रीला अन्नाला मोताद होऊन मृत्यु यावा यापेक्षां दुःखाचा कडेलोट तो कोणता ? या सगळ्या संसाराच्या अशा प्रकारच्या हलाखीनें महाराजांचा जीव या संसारास त्रासला व त्यांची

CR...

खात्री झाली कीं, विठ्ठलावांचून दुसरा सखा कोणी नाहीं. संसाराचें भय त्यांना वाटे, पण संसाराची एकदम ताटातूट करण्याइतकी मनाची खंबीरी साधेना. मग हळूहळू विचारानें त्यांनीं स्वहित केलें व दुःखाचे पर्वत जरी त्यांना ओलांडावे लागले तरी त्यांना कळून चुकलें कीं, खरें हित विठ्ठलाचे चरणीं आहे. साधारणपणें सर्व सांसारिकांना दुःखाचे डोंगर सोसावे लागतात. त्या आघातानें सगळ्यांचीं आयुष्यें उसाच्या चोयट्यासारखीं पिळून निघतात. त्यांतच त्यांचा अंत होतो. या चोहोंकडून पेटलेल्या वणव्यांतून बाहेर पडण्यास पूर्वपुण्याई, या आयुष्यांतील मनाचा खंबीरपणा, दृढ अभ्यास, परमेश्वरावांचून कोणीही सुटका करूं शकत नाहीं, असा निष्काम, विठ्ठलावर निश्चल विश्वास लागतो.

महाराज प्रथम 'जाळोनि संसार मग देवाचे अंगणीं' बसले. देवावर भार घालून ते निश्चिंत राहिले. ते स्वतःच म्हणतात कीं, जिवावर उदार होणेंविषयीं मीं माझ्या मनाचा निर्धार केला, त्याचें कारण म्हणजे संसार—स्थितींतील दुःखानीं पाषाण फुटतील असा त्यांच्या संसाराचा खेळखंडोबा झाला. त्यामुळें संसाराची आठवण झाली कीं, भय चित्तीं काप भरलासे, असें ते म्हणतात. परिस्थितीनें शाहाणीं माणसें वेडीं होतात. ते म्हणतात, 'जातो वेडा असोनि जाणता' म्हणून अनंता आतां तूं पात्र.

## ही त्यांच्या जीवनांतील प्रथमावस्था दिसते

मग संसाराची अशी अवस्था पाहिल्यावर त्यांनीं मनाशीं विचार केला कीं, 'येथें वाचो कैसी कोण्या परी'? सगळ्या सांसारिकाप्रमाणें या दुसऱ्या अवस्थेंत त्यांनाही समजून आलें कीं, 'मन स्थिर नाहीं माझिये हातीं' शिवाय 'इंद्रियें धांवता नावरतीं' 'सकळ खुंटलिया युक्ती' 'शांति निवृत्ति जवळी नाहीं' त्यामुळें परमेश्वरप्राप्तीचा उपाय खुंटल्यासारखा झाला. भाव ठेवायला जावें तर भक्ति नाहीं, धार्मिक वृत्ति धारण करावी तर चित्त ताब्यांत नाहीं. पोटाच्या स्वार्थामुळें भूतदयेला थारा नाहीं. दान करावें तर संसारांतील वित्तानें केव्हांच पळ काढला होता. महाजनकी, व्यापार यामुळें जप, तप, अनुष्ठानाशीं ओळखही झाली नाहीं. मुलें, माणसें यांच्यांत गुरफटल्यामुळें वैराग्याची शीव पाहिली नाहीं. वनसेवनाची जरूरीच भासली नाहीं. आजपर्यंत इंद्रियें व मन सांगतील तिकडे धाव घेतली. असें असतां त्यांचा निग्रह कसा घडणार?

तीर्थाला जावें तर मन सगळें घरादारांत. व्रत करावें तर त्याचे नियम, विधी, निषेध यांची ओळख नाहीं. अशी मनःस्थिति त्यांची झाली.

म्हणून त्यांच्या चित्ताची तळमळ झाली. संसार सुटला, पण परमार्थाची शीव दृष्टीसमोर नव्हती. त्यामुळें त्यांना असें झालें कीं, देह करवतीवर घासावा का अग्निप्रवेश करावा व वनांत जाऊन तेथील शीत, उष्ण, तहान सोसावी का मौन धरून बसावें, का अंगाला भस्म लावून देशोधडीं व्हावें, का अन्न वर्जून जीविताचा नाश करावा असा चित्ताला वेध लागला.

परमार्थाबद्दल त्यांच्या अंतःकरणांत ज्योत उत्पन्न झाली, पण 'तें ध्येय गाठण्याकरतां काय इलाज करावा' असें त्यांचे मनांत चिंतन सुरू झालें. देवभेटीसाठीं कसें ध्यान करावें तें, देवा तूंच सांग' असें ते म्हणतात. ज्या भावबळावर तुझे चरणाची मिठी पडेल त्या भक्तीचें रूप कसें, असें ते देवाला विचारतात. तुझें गुणगान कसें करावें, तुझें स्वरूप कसें लक्षांत आणावें, तें मला सुचव असा देवापुढेंच ते प्रश्न टाकतात. माझ्यासारख्या अजाण माणसानें कोणता उपाय करावा कीं, ज्यामुळें तुझ्यापायीं माझा भाव राहील. तुझा वास माझ्या चित्तांत होईल असें काय केलें असतां घडून येईल? परमात्म्या, असें घडवून आण कीं, ज्यामुळें अखंड चिंतन घडेल. असें तूं केलेंस तरच माझ्यासारख्या पतिताचें रक्षण होईल, अशी देवाजवळ महाराज करुणा भाकतात. पुढें म्हणतात, माझ्यासारख्या शिणलेल्या-भागलेल्यांना विसावा मिळण्याला तुझ्याशिवाय कोणतें स्थान आहे? हें सुखदुःख कोणापाशीं सांगावें? कोण माझी तहानभूक निवारील? या भावसागरांतून पार पडण्याला तुझ्यावांचून कोण तारून नेईल? म्हणून परमात्म्या, तुझ्या चरणांवर मी दंडवत घालतों. जे जे संत-महात्मे महाराजांना भेटत त्यांना महाराज विचारीत कीं, देव माझ्यावर कृपा करील काय? माझी लाज राखील काय? का माझा देवाला विसर पडला? कारण देवाला भक्त पुष्कळ व त्यांचा उद्धाराचा उद्योगही मोटा! म्हणून त्यांना 'याचें कोण उत्तर देईल' म्हणून चिंता वाटे. म्हणून ते अट्टाहासानें पंढरीरायाला म्हणतात कीं, आतां काढा काढी कर; नाहीं तर मी तुझा दास वाया गेलों असें होईल. संसाररूपी दगडाचे नावेंत मी बसलों, त्या दगडाच्या नावेचा गुणधर्मच असा कीं, बसणाराचा जीव घ्यावा. म्हणून महाराज कळवळून म्हणतात कीं, मी करुणा वचनांनीं तुला आवळून

म्हणतों कीं, पांडुरंगा, मला संभाळून ने. बुद्धीचें जरी मला साह्य असलें तरी मनाची बळकटी नसल्यानें माझे नेत्र भरून येतात. हातपाय काम देत नाहींत. अशा स्थितींत माझ्यावर तुझी दया असावी. तूं वेगानें धावून आलास तरच भवनदी मी पार उतरून जाईन. तृष्णेनें मला देशोधडी केलें. भक्ति, भजनभाव यांचा माझे ठिकाणीं मागमूस नाहीं. माझ्या जन्मांतरीच्या पापाची होळी पेटव. इंद्रियें, मन, सैराट धावतात. हात, पाय, कान, मुख, नेत्र, घ्राण इत्यादि जशी सोय दिसेल तशी वाट धरतात. मी आवरायला पहातों, पण माझें कांहींच चालत नाहीं. ज्या योगानें माझा घातपात होऊन माझा समूळ नाश होईल, असे सर्व प्रकार पुत्र, पत्नी, बंधू इतरेजन, लोकपाळ, मित्र, सोयरे करतात. म्हणून कोणत्या तरी उपायानें माझें रक्षण कर.

हा सगळा विचार करून महाराज म्हणतात कीं, मी आजपर्यंत संसाराच्या हातांत सापडलों होतों; पण चित्तातें आतां असें उमजतें कीं, तुला शरण जावें, म्हणजे दीन असलेल्या माझा तूं अंगीकार करशील. नाहीं तर महाराज म्हणतात कीं, 'मी कांहीं शास्त्रज्ञ अगर पंडित नाहीं, उच्चवर्णांत जन्म नाहीं, तुझे गुण गाऊं लागलों तर कलियुगांतील लोक माझा छळ करतील. म्हणून माझ्या जिवाला धीर तूंच दे.'

## ही त्यांच्या जीवन विकासांतील दुसरी अवस्था दिसते.

यापुढील अवस्थेंत त्यांना समाधानाला एकच जागा सांपडली. ती म्हणजे कटी कर ठेवून उभा असलेल्या देवाच्या रूपाचा आकार. त्यामुळें त्याच्या चित्ताला समाधान झालें व चरणापासून दूर होऊं नये, असें वाटलें. एवढ्याकरितां मुखानें त्यांनीं गीत गाइलें, हातांनीं टाळी वाजविली. नामापुढें इतर साधनें तुच्छ असल्याबद्दल त्यांची खात्री झाली. मुख्य उपासना सगुणभक्ति असून त्यामुळें सगळ्या दशा साधतात. हृदयांतील मूर्ति प्रकट होते. ज्यामुळें जन्म, जरा, व्याधि तुटतील व ज्या योगानें भवरोग नाहींसा होईल व कामक्रोधादि षड्रिपूंचा वध करतां येईल—तो उपाय म्हणजे सावळें रूप डोळ्यांपुढें आणावें व मुखानें विष्णु-सहस्रनामाचा जप करावा. फार बडबड टाकून द्यावी व इतरांचा संग वर्जावा. विठ्ठल या नांवाचा तीन अक्षरी मंत्र जपल्यास व त्याचें चिंतन केल्यास आणखी दुसरें साधन तें कोणतें? ते म्हणतात कीं, मी एवढ्यासाठींच अट्टाहास केला होता

कीं, शेवटचा दिवस गोड व्हावा. तृष्णेची धाव खुंटली व निश्चितीनें विसावा मिळाला. ते म्हणतात कीं, मी प्रतिज्ञापूर्वक सांगतों कीं, नामचिंतनानें माझा स्वामी तुम्हाला भवतापापासून सोडवील. नामसंकल्पानें चक्रपाणी अवश्य वश होतो, व प्रपंच कडू वाटावयास लागून, अंगावर रोमांच येऊन प्रेमानें कंठ दाटून येतो. सर्व धर्मांचें वर्म विठोबाचें नांव आहे; पण नाममंत्र जपणारांनीं चित्त शुद्ध करून बुद्धि स्थिर ठेवली पाहिजे. मनाला ओढ लागेल त्या मार्गानें जाण्यानें नाश होईल. संतांच्या वचनावर विश्वास ठेवला पाहिजे. विठ्ठल हातीं सांपडण्याकरतां भावाचें बळ नसेल तर व्याकुळ अंतःकरणानें त्याची करुणा भाकावी. महाराजांना त्यांची स्वहिताची खूण कळून चुकली. ते म्हणतात, 'पंढरीचा राणा मनामाजीं स्मरावा. स्मरण केल्यास भवसिंधु सहज तरून जातां येईल. काळावर सत्ता चालेल, मायाजाळ तुटेल. ऋद्धिसिद्धि प्राप्त होतील.' हें साधन सकळ शास्त्रांचें सार असून, वेद व पुराणें यांतील सार बीज आहे. महाराज म्हणतात, 'मी अनुभवानें सांगतों. नाम घेतलें तर जिभेवर अमृत स्रवतें, मन प्रशांत होतें, लाभाचे शकुन होतात.' निष्ठावंत भाव हाच आमचा स्वधर्म आहे, हें ते जाणत होते. त्यांचा निष्काम व निश्चल असा विश्वास विठ्ठलावर होता. त्यामुळें आणिकांच्या कृपेची वासना त्यांनीं सोडून दिली. नाम घेतल्यास मोक्ष नाहीं असें जर कोणी म्हणत असेल तर आपले कान वचनाचे ठिकाणीं बधिर ठेवावे. ते म्हणतात, 'विठ्ठलावर विश्वास ठेवून त्याचे पायीं मी निश्चित राहिलों. तो माझें सर्व सुखदुःख जाणतो' म्हणून त्याच्या चरणावर भार टाकला. विठ्ठल आपल्या हातांत काठी घेऊन इंद्रियें व मन यांना सैरावैरा धावूं देत नाहीं. त्यांनीं निर्धार केला कीं, 'तुझें रूपाचे ध्यान करीन, तुझें नाम गाईन, जिव्हेला दुसरें काम सांगणार नाहीं, तुझे पायावर डोई ठेवीन, तुझे गुणवाद ऐकेन.' महाराज म्हणतात, 'फार काय सांगूं? माझा जीव तुझ्या पायीं ठेविला.'

ही सगळीं मानसिक बैठक साधण्यापूर्वी महाराजांनीं त्यांच्या पूर्वजांनीं श्री विठ्ठलाचें देऊळ, जें मोडकळीला आलें होतें, त्याचा जीर्णोद्धार केला. एकादशीव्रत पत्करलें. कीर्तन करण्याला प्रारंभ केला. परंतु या नवीन मार्गांत त्यांचें प्रथम प्रथम मन रमेना. सर्व साधकांना याचा पावलोपावलीं प्रत्यय येतो. वाटेल तो आहार व वाटेल तो विहार करून मोकाट सोडलेलीं इंद्रियें सावरून आणावयाचीं हें इतकें कठीण आहे कीं, एखाद्या विधवा स्त्रीच्या पोटीं आलेलें एक-

लतें एक पुत्ररत्न काळानें ओढून नेतांना, त्या माउलीच्या अंतःकरणास जसा पीळ पडतो तशीच साधकाची अवस्था होते. आपण पापाचरण करून आपल्या हातानें आपला नाश करून घेतों, हें अत्यंत पापांत पार बुडालेल्यालासुद्धां समजतें; पण the Spirit is willing but the flesh is weak असेंच त्याचें होतें. त्याप्रमाणेंच महाराजांची ही अवस्था झाली असावी. पण सामान्य जीव यापासून परावृत्त न होतां पतंगाप्रमाणें झडप घालून नाश पावतात. परंतु साधुसंत कापराच्या ज्योतीप्रमाणें तपश्चर्येनें पापांची होळी करून जळलेल्या कापराप्रमाणें मागें कांहीं उरूं देत नाहींत.

महाराजांनीं कीर्तन करण्यास अवश्य सामुग्री म्हणजे संत वाङ्मयाचा अभ्यास केला. त्यांच्या अभंगांचा परिचय असलेल्यांना असें दिसेल कीं, वेद, शास्त्र, पुराणें हीं त्यांच्या अवलोकनांत होतीं. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवताची छाया त्यांच्या अभंगावर पडलेली दिसते. भर्तृहरीच्या श्लोकांचें बरोबर रूपांतर कित्येक अभंगांत आढळून येतें. पण एखाद्या पठिकाप्रमाणें नुसतें पठण न करतां त्यांनीं ग्रंथांच्या वचनावर विश्वास ठेवला. प्रथम प्रथम जुन्या कीर्तनकारांचे मागें उभें राहून त्यांनीं सद्भावनेनें ध्रुवपदें धरावीं. मनांत लाज न येऊं देतां त्यांचें चरणतीर्थग्रहण करावें. असलेल्या बिकट आर्थिक परिस्थितींतसुद्धां शक्य तों परोपकार करून त्या सेवेंत होणारे शारीरिक कष्ट त्यांनीं सोसले. पुन्हा पुन्हा संसारांत गुंतविण्यासाटीं सर्व इष्टमित्र खटपट करीत असतात. सामान्य जीव पुन्हा त्यांच्या जाळ्यांत सांपडतात. महाराजांनीं संसाराला आग लावली. मग पुन्हा तिकडे ढुंकून पाहिलें नाहीं. कारण दारिद्र्यानें, आप्तेष्टांच्या वियोगानें समूळ प्रपंचाचा त्यांना वीट आला होता. साधनांत निमग्न असतां श्री बाबाजी सद्गुरूंनीं जो स्वप्नांत उपदेश केला, तो शिरोधारण केला व विश्वासपूर्वक नामोच्चारणमंत्राचा ध्यास त्यांनीं घेतला. मी करतों हें बरोबर आहे किंवा नाहीं याची चार-चौघांत चर्चा करून आपल्या साधनेची रूपरेषा न ठरवितां गुरुवचनावर विश्वास ठेवून मार्ग दृढ केला.

इतकें साधन झाल्यावर परमेश्वरानें त्यांना कवित्वाची स्फूर्ति दिली. नामदेवानें स्वप्नांत आदेश दिला. नामदेवरायाबरोबर श्री पांडुरंगही होते. त्यांनीं सांगितलें कीं, बाकीची बडबड टाक व कवित्व कर. माथ्यावर हात ठेवून

आशीर्वाद दिले व चित्ताचें समाधान केलें. महाराजांनीं कवित्व केलें तें वर्णधर्मानें ताठरलेल्या पंडितांना सहन न होऊन कवित्वाचे ग्रंथ बुडविण्याचा त्यांनीं आदेश दिला. ती आज्ञा प्रमाण मानून त्यांनीं वह्या इंद्रायणीला समर्पण केल्या; पण त्यामुळें महाराजांचें चित्त दुखावलें. पण 'देव तारी त्याला कोण मारी' म्हणतात त्याप्रमाणें देवानें स्वहस्तानें महाराजांच्या वह्या जशाच्या तशा स्वाधीन केल्या.

या सगळ्या साधनांचा सिद्धांत महाराज आपल्या अमृततुल्य वाणीनें सांगतात. तो असा कीं, 'भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा' इतकेंच नव्हे तर 'कृपावंत ऐसें कळों आलें.'

## येथें तिसरी अवस्था संपते.

चौथ्या अवस्थेंत महाराजांना सगुण साक्षात्कार झाला हें त्यांच्य ठिकठिकाणच्या वचनांवरून स्पष्ट होतें. संसाराची होळी करून चोवीस तास विठ्ठलाचें ध्यान केल्यावर व ध्यास घेतल्यावर सगुण साक्षात्कार न झाला तरच नवल. त्यांच्या सर्व हालचाली पांडुरंगाच्या प्रेरणेनें होत.

जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती । चालविसी हातीं धरूनिया ।
चालो वाटे आम्ही तुझाचि आधार । चालविसी भार सवें माझा ।
बोलों जातां बरळ करिसी तें नीट । नेली लाज धीट केलों देवा ।
अवघे जन मज जाले लोक पाळ । सोइरे सकळ प्राण सखे ।
तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें । जाले तुझें सुख अंतर्बाहीं ।

प्रत्येक शब्द, प्रत्येक पाऊल, किंबहुना सर्व कृति पांडुरंगच करवीत आहे, अशी ते खात्री देतात. 'आम्हा ऐसा भरंवसा । विठ्ठल सहसा चालतसे ।' याचप्रमाणें सर्व कवित्व पांडुरंगच करवीत आहे, अशी ग्वाही ते देतात. ते म्हणतात, 'नव्हती माझे बोल । अवघा करितो विठ्ठल ।' पुढें ते म्हणतात :—

माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव । आपणचि देव होय गुरु ।
पढिये देहभावे पुरवितो वासना । अंतीं ते आपणापाशीं न्यावे ।
मागेंपुढें उभा राहे सांभाळित । आलिया आघात निवारावे ।
योगक्षेम त्याचे जाणे जडभारी । वाट दावी करीं धरूनियां ।

सर्व संकटापासून पांडुरंगानें त्यांचें रक्षण केलें.

देव राखे तया मारील कोण । न मोडे कांटा हिंडतां वन ।
न जळे, न बुडे, नव्हे कांहीं । विष तेंही अमृत पाहीं ।
न चुके वाट न पडे फंदी । नव्हे कधीं यमबाधा ।
तुका म्हणे नारायण । येता गोळ्या वारी बाण ।

ते म्हणतात, 'माझा सर्व भार विठ्ठलानें घेतलेला असून आतां माझें अंतःकरण ब्रह्मरूप झालें आहे.' गीतेंतील अकराव्या अध्यायांत अर्जुनाच्या इच्छेनुरूप भगवंतांनीं विश्वरूप दर्शन त्यास दिलें; पण अर्जुनाला चतुर्भुज सावळें स्वरूप पाहण्याची संवय असल्यानें विश्वरूप पाहून तो भ्याला व पुन्हां तुझें चतुर्भुज सावळें स्वरूप मला दाखव असा आग्रह धरला. श्री भगवंतांनीं त्याला सांगून पाहिलें कीं, 'न वेद यज्ञाध्ययनैर्न दानैर्नच क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः' असें कोणाला जें रूप मीं दाखवलें नाहीं तें तुला दाखवलें व तूं माझ्या सावलीच्या रूपाचा आग्रह धरतोस, हा वेडेपणा आहे.' पण तें अर्जुनाला रुचलें नाहीं. म्हणून भगवंतांनीं चतुर्भुज रूप पुन्हा धारण करून त्या स्वरूपांत अर्जुनाला दर्शन दिलें. त्याचप्रमाणें सगुण स्वरूपांत महाराजांना विठ्ठलानें दर्शन दिलें. ते स्वमुखानें सांगतात :—

तूं कृपाळू माउली । आम्हा दीनांची साउली ।
न संवरीत आली । बाळवेशें जवळी ।
माझें केलें समाधान । रूप गोजिरें सगुण ।
निववीलें मन । आलिंगन देऊनी ।

देव आपला केला, असें अनुभवपूर्वक सांगतात. सगुण भेटीचें आणखी प्रमाण पहा :—

होतों सांपडलों वेठी । जातां भेटी संसारा ।
तो या वाटे कृपा केली । भेटी झाली विठोबासी ।

आणखी म्हणतात :

सांपडला देव । तुका म्हणे गेला भेव ।
उभा पांडुरंग । मागें पुढें ।

शेवटचें सगुण साक्षात्काराचें प्रमाण

तुका म्हणे मी तों सगळाच विरालों । विठ्ठलचि झालों दर्शनानें ।

येथें **चौथी अवस्था** संपली असें म्हणावयास हरकत नाहीं.

**शेवटची अवस्था** म्हणजे निर्गुण, निराकार स्वरूपाचा साक्षात्कार त्यांना झाला. त्याचें वर्णन त्याच्याच शब्दांत वर्णिलेलें बरें.

पंधरा दिवसांमाजी **साक्षात्कार जाला** । विठोबा **भेटला निराकार** ।
भांबगिरी पाठारी वस्ति जाण केली । वृत्ति **थिरावली परब्रह्मीं** ।
निर्वाण जाणोनी आसन घातलें । ध्यान आरंभिलें देवाजीचें ।
सर्प, विंचु, व्याघ्र, आंगासि झोंबले । पीडूं जे लागले सकळिक ।
दीप की कर्पूर कैसा तो विराला । तैसा देह जाला तुका म्हणे ।

आणखी म्हणतात :

तुज मज ऐसी परी । जैसे तरंग सागरी ॥ दोहीमाजी एक जाणा ।
विठ्ठल पंढरीचा राणा ॥ देव भक्त ऐसी बोली । जंव भ्रांती नाहीं गेली ॥
तंतु पट जे कीं एक । तैसा विश्वेसीं व्यापक ॥

पुढील प्रमाण पहा :

स्थिरावली वृत्ति पांगुळला प्राण । अंतरींची खुण पावोनिया ।
पुंजाळले नेत्र जाले अर्धोन्मीलित । कंठ सद्‌गदित रोमांच आले ।
चित्त चाले स्वरूपा माझारी । न निघे बाहेरी सुखावलों ।
सुनीळ प्रकाश उदैजला दिन । अमृताचें पान जीवन कळा ।
शशिसूर्या जासी जीवें ओवाळणी । आनंदा दाटणी आनंदाची ।
तुका म्हणे सुखें प्रेमासी डुल्लत । वीरालों निश्चित निश्चितीनें ।

आणखी पुरावा आढळतो :

पांडुरंगें सत्य केला अनुग्रह । निरसोनि संदेह बुद्धिभेद ।
जीवशिवा सेज रचिली आनंदें । आउठावे पदीं आरोहण ।
निजीं निजरूपीं निजविला तुका । अनुहातें बाळका हलरु गाती ।

हाच अनुभव पुढें सांगतात :

अज्ञान हा देह स्वरूपीं मीनला । सर्व वोसावला देहपात ।
ज्ञानस्वरूपाची सांगड मिळाली । अंतरीं पाहिली ज्ञानज्योती ।
तुका म्हणे चित्त स्वरूपीं राहिलें । देह विसावले तुझ्या पायीं ।

या सगळ्या विवेचनावरून असें दिसून येईल कीं, ज्या हेतूनें त्यांनीं परमार्थात प्रवेश केला तो त्यांचा हेतु पूर्णपणें सिद्धीस गेला. खालील पूर्णोद्गार त्यांच्या आयुष्याचें स्वारस्य दर्शविणारे आहेत. ते म्हणतात:

"कृतकृत्य झालों । इच्छा केली ते पावलों ।"

आयुष्याच्या अखेरीला फक्त संतशिरोमणि श्री तुकाराम महाराजच असे आनंदाचे उद्गार काढूं शकले !

—पु. ह. गद्रे

* * *

# श्री संत शिरोमणि तुकाराम महाराजांचीं मानवधर्मसूत्रें

(धर्मचक्र, ऑक्टोबर १९५२ मधून)

काय विधिघटना असेल ती असो, परंतु शतकानुशतकें ज्या ज्या संत महात्म्यांनीं मानवधर्म प्रसृत करण्याचा यत्न केला, त्यांपैकीं बहुतेकांचा अमानुष छळ झाला. जीजस क्राइस्टला तर खिळे ठोकून मारलें; पण त्या महात्म्यानें आपल्या मनाचें स्थैर्य, शांति, क्षमा यत्किंचित्ही ढळूं दिली नाहीं. उलट ज्यांनीं खिळे ठोकले त्यांच्यावर दया करण्याबद्दल त्यानें देवाची करुणा भाकली! ज्यांनीं ज्यांनीं नवमताचा प्रसार केला त्या सॉक्रेटीस, ॲरिस्टॉटल, मार्टिन ल्यूथर यांनाही अग्निदिव्यांतून जावें लागलें.

आपल्या भारतवर्षांत सर्व धर्मांचें रहस्य संस्कृत ग्रंथांतून असल्यानें आपला बहुजनसमाज धर्माच्या मूल तत्त्वाला मुकला. त्या जड जीवांना तारण्याचा प्रयत्न प्रथम श्री ज्ञानेश्वरांनीं केला. त्यांनीं "तीरे संस्कृतांची गहनें । तोडोनि मऱ्हाठिया सोपानें । रचिलीं धर्मनिधानें". कारण अज्ञानाच्या घोर निद्रेंतून जागें करण्याचा हा एकमेव उपाय त्यांना दिसला. तोंपर्यंत वेदांच्या अभ्यासाचा अधिकार फक्त त्रैवर्णिकांना असल्यानें, स्त्रिया, वैश्य, शूद्र यांना थाराच नव्हता. तो वेदाचा कृपणपणा ज्ञानेश्वरांनीं 'भावार्थ-दीपिका' लिहून घालविला. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात 'वेदु संपन्न होय ठाईं । परी कृपणु ऐसा आनु नाहीं । जे कानीं लागला तिहीं । वर्णांच्याचि ।'

श्री तुकाराम महाराजांनीं तोच उपाय शोधला. ते म्हणतात, 'सर्व शास्त्रांचें सार । हें वेदांचें गव्हर । पाहतां विचार । हाचि करिती पुराणें ।' तो विचार कोणता तर 'ब्राह्मण, क्षत्री, शूद्र, वैश्य । चांडाळाही अधिकार । काळे नारी नर । आदि करोनि वेश्याही ।' या सगळ्यांना अज्ञानांधकारांतून मुक्त करून माधवधर्माची दिव्य दृष्टि त्यांनीं दिली.

किंबहुना, श्रीतुकाराम महाराज स्वतःच म्हणतात कीं, याच जन्मांत काय, पण जन्मोजन्मी केवळ जडजीवांना त्यांचा तरणोपाय सांगावा याकरितां त्यांनीं अनेक

जन्म पत्करले. 'धर्म रक्षावयासाठीं । करणें आटी आम्हासी ।' नुसतेंच धर्म-रक्षण नव्हे, तर पाखंडखंडणहि ते करीत. जमिनींतील तण काढून टाकल्या-शिवाय पिकाला जोर येत नाहीं. त्याप्रमाणें पाखंडखंडणाशिवाय, धर्माचीं तत्त्वें निःसंदिग्धपणें पटत नाहींत. मानवधर्माचा प्रसार 'बहुतां जन्मी हेंच करीत आलों आम्ही' असें ते स्वमुखानें सांगतात. ते म्हणतातः जो मार्ग जगाच्या तारणाचा व आपल्याला माहीत असेल तो भल्या माणसानें सांगावा. 'भल्यानें कारण सांगावें स्वहित, जैसी कळे नीत आपणासी'; कारण त्यावांचून जड जीवांचा उद्धार कसा व्हावा? ते म्हणतातः 'अवतार तुम्हा धराया कारण। उद्धरावे जन जड जीव।' केवळ परोपकाराकरितांच त्यांचा अवतार होता, असें ते सांगतात **'तुका म्हणे आतां उरलों उपकारापुरता !'**

सर्व परमार्थाकडे वळलेले सामान्य जीव आत्म-मोक्षप्राप्तीच्या उपायाचीं साधनें करतात. पण जगाच्या उद्धाराविषयीं ते उदास असतात.

तुकाराम महाराजांचें मन अत्यंत हळवें असून आईला जसें बाळाचें दुःख पाहवत नाहीं, तद्वत् लोकांकरतां त्यांची तळमळ होतीः—'उपकारासाठीं बोलों हे उपाय। येणेंविण काय आम्हा चाड। बुडता जन हे न देखवे डोळा। येतो कळवळा म्हणउनि। बोलिले ते कांहीं तुमचिया हिता। वचन नेणता क्षमा कीजे। वाट दावी लया न लगे रुसावे। अतित्याई जीवे नाश पावे। निंब देता रोग तुटाया अंतरीं। पोभाळिता वरी आत चरे। तुका म्हणे हित देख-ण्यासि कळे। पडती आंधळे कूपामाजी।'

आतां त्यांनीं मानवधर्माचीं सूत्रें कोणतीं सांगितलीं तीं पाहूंः—

(१) आजतागायत जात जन्मावर समजली जाऊन, मनुष्य कितीही आचार-भ्रष्ट असला तरी त्याच्या उच्च जातींतून त्याला खालच्या वर्गात कधींही लेखलें जात नसे. ही रूढी गीतेचे शिकवणीविरुद्ध असली तरी ती प्रचारांत अजूनही आहे. तुकाराममहाराजांनीं जात गुणावर आधारलेली आहे. जातीवर भर न देतां गुणावर भर देण्याचा आदेश महाराजांनीं दिला.

(२) युक्त व्यवहार करून त्याचा खर्च उदासीन विचारानें करावा. दुसऱ्यावर नेहमीं उपकार करावा. दुसऱ्याची निंदा करण्याचा विचार सुद्धां स्वतःस शिवूं देऊं नये. परस्त्रिया आपल्या आईबहिणीसारख्या मानाव्या. सर्व भूतांचे ठिकाणीं

दया करून पशूंचें पालन करावें. वृत्ति शांत ठेवावी. या वागण्यानें स्वार्थ व परमार्थाची उत्तम सांगड घातली जाते. हें मानव धर्माचें दुसरें सूत्र समजण्यास कांहींच हरकत नाहीं.

(३) महाराजांनीं पापपुण्याचीं सूत्रें गोविलीं आहेत. पाप हें बाह्य आचारावर, खाण्यापिण्यावर लेखलें न जातां त्या माणसाच्या वृत्तीवर तें त्यांनीं आधारलें.

(अ) **खरें पाप** म्हणजे परपीडा.

(१) ज्यांच्या अंतःकरणाला दुसऱ्याच्या घातानें समाधान होतें; ते खरे पापी समजावे.

(२) धार्मिक, राजकीय, सामाजिक नैतिक आचारांत सारखी संशयी वृत्ति असणें हें पाप.

(३) आपल्या भोंवतीं अनेक उपाधि उत्पन्न करून त्यांतच चरफडत राहाणें हें पाप.

(४) नीतीचें आचरण सोडून भलत्याच गोष्टी उन्मत्तपणानें करणें हें पाप.

(आ) आतां ते **पुण्य** कशाला समजतात तें पाहूं :—

(१) परोपकार हेंच पुण्य.

(२) मनामध्यें शुद्ध वासना बाळगणें हें पुण्य.

(३) आर्तभूतांना अन्न देणें हें पुण्य.

पुण्यपापाचा घालून दिलेला हा धडा, सध्याच्या पुण्यपापाच्या कल्पनांशीं ताडून पहातां, महाराजांनीं पापपुण्याच्या कल्पनांत मानवतेला एक तऱ्हेचा नवीन संदेश दिल्यासारखें दिसेल.

(४) देवांशीं संबंध असला म्हणजे संपूर्ण विश्वाशीं त्याचा सोईरसंबंध जडतो. कारण सर्वान्तर्यामीं देव असल्यामुळें, साहजिकच एकमेकांच्या प्रेमसूत्राची ओढ एकमेकांना लागते. दुसऱ्याला झालेलें सुखदुःख याच्या अंतःकरणामध्यें येतें. त्याच न्यायानें याला झालेलें सुखदुःख इतर सर्वांना होतें.

(५) पांचवें सूत्र म्हणजे संसारी माणसानें त्याच्या त्याच्या परिस्थितीप्रमाणें काहीं तरी परोपकार करावा. गरीबांना फार मोलाचें देतां येत नसेल तर निदान ताक देऊन तरी उपकार करा. तुम्ही अन्न कोणाला देत नसाल तर नका

देऊं. पण फुकाचें पाणी तरी पाजा.

(६) सर्व प्राणिमात्राविषयीं निर्वैर होणें, हें सर्व साधनांचें मूळ कारण आहे. ढोंगाचा कोणताही व्यवहार निभत नाहीं. अखेरीस खऱ्या-खोटयाचा निवाडा होतो.

(७) सर्व दुःखांतून तरून जाण्याचा उपाय म्हणजे मुक्तीचा आहार व नीतीचा व्यवहार असावा.

(८) जर पशूंचा वध करून कोणी उल्हासानें मांस खाईल तर त्यानें ते वैरी जोडून ठेवले. आपल्या जीवाप्रमाणें दुसऱ्यांचा जीव जे जाणत नाहींत, त्यं दुष्टांची दया कोणास येईल? दुसऱ्याचा वध करण्यास शस्त्राला धार लावतो ते वेळीं आपल्या करंगुळीस देखील धक्का लागूं देत नाहीं. दुसऱ्याचीं हाडें कुटून जे पीठ करतील ते पुढें—त्यांना दुःख झालें म्हणजे—रडतील.

आपल्या जीवासारखा दुसऱ्यांचा जीव जाणत नाहीं, असा पातकी दुसऱ्याचें नरडें छाटावयास पाहतो. सर्वांच्या हृदयांत नारायण जीवरूपानें आहे. तो पशू-मध्येंही आहे, हें त्याला समजूं नये काय? गळा कापते वेळीं त्याच्या देखत पशू ओरडतो, पण त्या निष्ठुराचे हात त्यावर कसे चालतात? म्हणून तुकाराम महाराज म्हणतात, ' त्या चांडाळाला अधोगतीला जाऊन अनेक महान् दुःखें भोगावीं लागतील. '

(९) विश्वामध्यें विश्वंभर देव व्यापक आहे. सर्व जगामध्यें जगाचा स्वामी वसत आहे. नारायणांनीं सर्व विश्व व्यापलें आहे.

सर्व जगत् विष्णुरूप जाणणें, हाच वैष्णवांचा धर्म आहे. भेदाभेद, दुष्टविचार हा केवळ अमंगळ भ्रम आहे. कोणाच्याही जीवाचा मत्सर करूं नये, हेंच सर्वेश्वरपूजनाचें सार आहे.

(१०) देहामध्येंच देव पहाण्यास शिकावें. देहामध्यें देव असतांना व्यर्थ तीर्थग्रामीं कशाला हिंडावें? तुकाराममहाराज अज्ञ लोकांना म्हणतातः देहीं देव का पाहा ना?

याप्रमाणें तुकाराम महाराजांचा सर्व जडजीवांना सूत्रवत् उपदेश आहे.

—पु. ह. गद्रे

★ ★ ★

# श्रीसंत तुकाराम महाराजांचें जीवनरहस्य

(जीवनरहस्याच्या आरंभीची संपादकीय टिप्पणी—
धर्मचक्र, फेब्रुवारी १९५३ मधून)

● धर्मचक्राच्या जानेवारीच्या अंकांत सूचित केल्याप्रमाणें '**संत तुकाराम-महाराजांचें जीवनरहस्य**' ह्या **अभंगात्मक** पुस्तकाचा प्रथम भाग आम्ही फेब्रुवारी अंकापासून सुरू करीत आहों. दर अंकीं १६ पृष्ठें याप्रमाणें ५ अंकांत प्रथम भाग पुरा करून, ह्या उपक्रमाचें स्वागत आश्रयदात्यांकडून कसें काय होतें त्यावर पुढील भागाचे क्रमशः प्रसिद्धीकरण व्हावयाचें आहे. भारताची **राष्ट्रीय गरज** आणि **आत्मविकास** या उभयान्वयी दृष्टीनें मानवधर्माचें सर्वांगीण ज्ञान करून घेणें आज अत्यावश्यक झालें आहे. भ्रांत विचारांचें निर्दाळण करणारा, समता, एकता आणि बंधुता यांचें रहस्य व स्वारस्य सांगणारा, प्रसाद, प्रतिभा आणि प्रेम यांच्या माधुर्यानें रसाळलेला कर्तव्यबोधक, सुलभ, स्पष्टवादी आणि लोकप्रिय उपदेशग्रंथ आज तुकाराम महाराजांच्या अभंगगाथेशिवाय महाराष्ट्र-सारस्वतांत दुसरा नाहीं.

● मानवधर्माची **भावार्थदीपिका** असें जिला सत्यार्थानें म्हणतां येईल त्या तुकाराम महाराजांच्या ४५०० अभंगांचें वाचन, मनन—एखाद्या व्यासंगी विद्वान् व्यक्तीखेरीज—आज सर्वसामान्य वाचकांना अशक्य झालें आहे. प्रत्येक साक्षर आणि शिक्षित कुटुंबांत तुकाराम महाराजांच्या हृदयवीणेचा झंकार निनादित व्हावा आणि त्याच्या अभंगवाणीच्या अमृतवर्षावानें व्यक्तिजीवन उदार, उदात्त, शांत, सहानुभूतिसंपन्न व लोकहिततत्पर व्हावें, याच शुद्ध भावनेनें प्रेरित होऊन आम्ही हें 'तुकाराम महाराजांचें जीवनरहस्य' म्हणजेच महाराजांच्या अभंग-गाथेचा गाभा वाचकांच्या हातीं देत आहों. आमचे नाशिक येथील विद्वान मित्र, सुप्रसिद्ध वकील व तुकाराम महाराजांचे एकनिष्ठ भक्त श्री. पु. ह. गद्रे यांनीं महा-राजांच्या गाथ्याचें दीर्घ परिश्रमानें व कौशल्यानें मंथन करून सांसारिक, सामा-जिक, नैतिक व पारमार्थिक विषयांत अंतर्भूत होणाऱ्या जीवनोपयोगी सर्व महत्त्वाच्या प्रश्नांवरील विचार वर्णानुक्रमानें 'जीवनरहस्यांत' एकत्रित केल्यामुळें तुकाराममहाराजांचे विचार झटकन् समजून घेणें या ग्रंथांत सुकर झालें आहेच,

पण तुकाराम महाराजांसारख्या ‘समजले आणि वर्तले’ या कोटींतल्या महापुरुषानें ‘याचि जन्में येणेंचि काळें’ नराचा नारायण बनून मानवतेची जी क्रांतिकारक शिल्पकारी केली तिचें उत्क्रांतिमय अभंग आत्मचरित्र, शेंकडों सुभाषितांची पखरण, बहारदार कोटिक्रम, मार्मिक व्याख्या, सिद्धांतवचनें वगैरेंचा संग्रह यांत असल्यानें आपण प्रत्यक्ष तुकाराम महाराजांच्या सान्निध्यांत आहों याची प्रचीति श्रद्धामय अंतःकरणाला येऊन आनंदाचे एकसारखे कढ येतात आणि हीच या ग्रंथाची अलौकिकता होय.

● आजपर्यंत प्रकाशित झालेल्या कांहीं गाथ्यांत अभंग विषयाचें स्थूल वर्गीकरण असलें तरी तें या पुस्तकाप्रमाणें सूक्ष्म, सर्वस्पर्शी आणि जीवनोपयोगी दृष्टीचें नाहीं, हें पुस्तकाचीं कांहीं पृष्ठें वर वर चाळलीं तरीसुद्धां समजून येण्यासारखें आहे.

● या पुस्तकांत आम्हीं सरकारी गाथ्याचा उपयोग केल्यामुळें अभंगाचा क्रमांक हा सरकारी गाथ्यांतील आहे असें वाचकांनीं समजावें. जो अभंग सरकारी गाथ्यांत सांपडला नाहीं तो ‘निर्णयसागर’ गाथेंतून घेतल्यामुळें अभंग-क्रमांकापुढें कंसांत ‘नि’ (नि) असें छापलें आहे. मुख्य विषयाचें नांव जाड्या अक्षरांत आणि त्याच्या खालीं अभंगक्रमांक बारीक आंकड्यानें दर्शविला आहे. एकाच विषयासंबंधीं अनेक अभंगांत निरनिराळ्या दृष्टींनीं विवरण झालें आहे. अशा अभंगांची संख्याहि ध्यानांत यावी म्हणून अभंगक्रमांकाचे डावे बाजूस अनुक्रमांक उपयोजिले आहेत. उदाहरणार्थ, पहिल्याच पानावरील ‘अवतार, अहंता, अविश्वास’ या विषयावरील अभंग पहावेत; म्हणजे ग्रंथाच्या मांडणीची बरोबर कल्पना होईल.

● शेवटीं सर्वांच्या उपयोगासाठीं केलेल्या या प्रयत्नाचें चीज वाचकांनीं मनःपूर्वक करून वाङ्मयरूपानें होत असलेल्या या मानवधर्माच्या उपासनेस भरीव उत्तेजन द्यावें हीच प्रार्थना.

महाराष्ट्र ... ठाणे
१०७०

—संपादक

* * *

# धर्मदीप ग्रंथमाला

## उद्देश

भारतीय व विदेशीय संतांच्या मानवधर्मीय शिकवणुकीची सर्वांगीण माहिती देऊन महापुरुषांचें जीवनरहस्य विशद करणारीं प्रेरक व उद्बोधक पुस्तकें प्रसिद्ध करणें हा धर्मदीपग्रंथमालेचा उद्देश आहे.

## नियम

१ मालेचीं पुस्तकें वर्षातून कमींतकमी २ तरी प्रसिद्ध होतील.

२ मालेची वार्षिक वर्गणी ५ रु. अगाऊ भरणाऱ्या आश्रयदात्यांस मालेच्या पहिल्या पुस्तकाप्रमाणेंच दुसरें पुस्तकही पोस्टल सर्टिफिकेट घेऊन घरपोंच पाठविलें जाईल.

३ प्रवेश फी म्हणून १ रु. अगाऊ पाठविणाऱ्या आश्रयदात्यांस मालेचीं पुस्तकें पाऊणपट किंमतीस.

४ पुस्तकांची किंमत म. ऑर्डरनें पाठवावयाची आहे. व्ही. पी. पद्धत बंद.

५ मालेचा वर्षारंभ सप्टेंबर असून वार्षिक वर्गणीदारांनीं आपली वर्गणी ५ रु. दिसेंबरचे आंत पाठविण्याची कृपा करावी.

६ मालेचें पहिलें पुस्तक 'संत तुकाराम महाराजांचें जीवनरहस्य' (भाग १ सचित्र) किं. ३ रु. हें मालेच्या नियमानुसार सप्टेंबर महिन्यांत प्रसिद्ध झालें असून तें आश्रयदात्यांकडे रवाना होऊं लागलें आहे.

७ दुसऱ्या पुस्तकाचा प्रकाशन दिनांक व त्या संबंधींचा आवश्यक खुलासा आमच्या 'धर्मचक्र' मासिकांत प्रसिद्ध होतांच तो आश्रयदात्यांना कळविण्यांत येईल.

## सवलत

मालेच्या आश्रयदात्यांस 'धर्मचक्र' मासिक अवघ्या २ रुपयांत वर्षभर मिळेल.

पत्ता : व्यवस्थापक '**धर्मदीपग्रंथमाला**'

धर्मचक्र कार्यालय, पो. खार–मुंबई २१



जुन्या कागदपत्रांत सांपडलेलें
महाराजांचें चित्र

# श्रीसंत तुकाराममहाराजांचें जीवनरहस्य

## अवतार

१—४५२६

भक्तिकाजें देवें केला अवतार। पृथिवीचा भार फेडावया॥
स्वहित दासांचें करावया लागीं। अव्यक्त हें जगीं व्यक्तीं आले॥

२—८३४

आम्हां हें कौतुक जगा द्यावी नीत। करावे फजित चुकती ते॥

३—२६४

तुका म्हणे धर्म रक्षावयासाठीं। देवासही आटी जन्म घेणें॥

## अहंता

१—४५६३

मीपणें हा देव न कळेचि त्यासी। अभिमानें रासि गर्वाचिया॥
अभिमानरासि जयाचिये ठायीं। तुका म्हणे तईं देव दुरी॥

२—४५०

जिंकाल तरी जिंका रे अभिमान। दवडाल तरी दवडा लज्जा आणि मान। धराल ते धरा शंभूचे चरण।

३—१५३६

ज्ञानियांचे घरीं चोजवितां देव। तेथें अहंभाव पाठी लागे॥
म्हणोनियां ऐसे सांडिले उपाय। धरियेले पाय दृढ तूझे॥
वेदपरायण पंडित वाचक। न मिळती एक एकामधीं॥
पाहों गेलों भाव कैसी आत्मनिष्ठा। तेथें देखे चेष्टा विपरीत॥
आपुलिया नाहीं निवाले जे अंगें। एकी करती रागें गुरगुरु॥
तुका म्हणे मज कोणाचा पांगिला। नको बा विठ्ठला करूं आतां॥

४—३०७४

थोर ती गळाली पाहिजे अहंता । उपदेश घेतां सुख वाटे ॥
व्यर्थ भराभर केलें पाठांतर । जोंवरी अंतर शुद्ध नाहीं ॥
घोडें काय थोडें वागवितें ओझें । भावेंविण तैसें पाठांतर ॥
तुका म्हणे धरा निष्ठावंत भाव । जरी पंढरीराव पाहिजे तो ॥

५—२४४०

वचन तें नाहीं तोडीत शरीरा । भेदत अंतरा वज्रा ऐसे ॥
कांहीं न सहावें काशाही कारणें । संदेह निधान देह बळी ॥
नाहीं शब्द मुखीं लागत तिखट । नाहीं जड होत पोट तेणें ॥
तुका म्हणे जरी गिळे अहंकार । तरी वसे घर नारायण ॥

## अधोगति

१०२७

गति तेचि मुखीं नामाचें स्मरण । अधोगति जाण विन्मुखता ॥

## अविश्वास

१—२३३६

अविश्वासीयाचें शरीर सुतकी । विटाळ पातकी मेद वाही ॥
काय त्याचा वेल जाईल मांडवा । होता तैसा ठेवा आला पुढें ॥
मातेचा संकल्प व्हावा राजबिंडा । कपाळींचा धोंडा उभा ठाके ॥
तुका म्हणे जैसा कुच राचा दाणा । परिपाकीं अन्ना न मिळे जैसा ॥

२—४३६६

म्हणे विठ्ठल पाषाण । त्याच्या तोंडावरी वाहाण ॥
नको नको दर्शन त्याचें । गलितकुष्ठ भरो वाचे ॥
शालिग्रामासि म्हणे धोंडा । किडे पडोत त्याच्या तोंडा ॥
भावी सद्‌गुरु मनुष्य । त्याचें खंडो कां आयुष्य ॥
हरिभक्तांच्या करी चेष्टा । त्याचे तोंडीं पडो विष्ठा ॥
तुका म्हणे किती ऐकों । कोठवरी मर्यादा राखों ॥

## अज्ञानी

२३८

भ्यालीं जिवा चुकलीं देवा। नाहीं ठावा जवळी तो ॥

## अनुताप

१—२५०२

जाली होती काया। बहु मळिन देवराया ॥
तुमच्या उजळिलीं नामें। चित्त प्रक्षाळिलें प्रेमें ॥
अनुतापें झाला झाडा। प्रारब्धाचा केला तोडा ॥
तुका म्हणे देह पायीं। ठेवुनि झालों उतराई ॥

२—२५७

गंधर्व अग्नि सोम भोगिती कुमारी। कोणें चराचरीं त्याग केला ॥
गायत्री स्वमुखें भक्षीतसे मळ। मिळाल्या ओहळ गंगाओघ ॥
कागाचिये विष्टे जन्म पिंपळासी। पांडवकुळासी पाहतां दोष ॥
शकुंतलासूत कर्ण श्रृंगी व्यास। यांच्या नामें नाश पातकांसी ॥
गणिका अजामेळ कुब्जा तो विदूर। पाहातां विचार पिंगळेचा ॥
वाल्हा विश्वामित्र वसिष्ठ नारद। यांचें पूर्व शुद्ध काय आहे ॥
न व्हावीं तीं जालीं कर्में नरनारी। अनुतापें हरी स्मरतां मुक्त ॥
तुका म्हणे पूर्व नाठवी श्रीहरी। मूळ जो उच्चारी नरक त्यासी ॥

## अपमान

१—३८०६

करी आणिकांचा अपमान। खळ छळवादी ब्राह्मण।
तया देतां दान। नरका जाती उभयतां ॥

२—२३१२

अपमानी तो अधररसस्वाद चाखे ॥

३—१४४६

आशा तृष्णा माया अपमानाचें बीज। नासिलिया पूज्य होइजेतें ॥

## अनाचारी

२३१२

अनाचारी करी भोजन ग्वाही नसतां संग ॥

## अनहित

२३१२

अनहित तयाचें जाले रे आणी अहंभाव ॥

## अनेकत्वीं एकत्व

४३५३

पय, दधि, घृत आणि नवनीत । तैसें दृश्यजात एकपणें ॥
कनकाचे पाहीं अलंकार केले । कनकत्वा आले एकपणें ॥
मृत्तिकेचे घट जाले नानापरी । मृत्तिका अवधारीं एकपणें ॥
तुका म्हणे एक एक ते अनेक । अनेकत्वीं एक एकपणा ॥

## अधमासी अधम

४३७८

पायां जाला नारू । तेथें बांधला कापुरु ।
तेथें विबव्याचें काम । अधमासी तों अधम ॥
रुसला गुलाम । धणी करीतो सलाम ।
तेथें चाकराचें काम । अधमासी तों अधम ॥
रुसली घरची दासी । धणी समजावी तियेसी ।
तेथें बटकीचें काम । अधमासी तों अधम ॥
देव्हाऱ्यावरि विंचू आला । देवपूजा नावडे त्याला ।
तेथें पैजारेचें काम । अधमासी तों अधम ॥
तुका म्हणे जाती । जातीसाठीं खाती माती ॥

## अभ्यास

१—२९८

साधूनी बचनाग खाती तोळा तोळा । आणिकातें डोळां न पाहवे ॥
साधूनी भुजंग धरितील हातीं । आणिकें कांपती देखोनियां ॥
असाध्य तें साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ॥.

२—१४००

ओलें मूळ भेदी खडकाचें अंग। अभ्यासासी सांग कार्यसिद्धि॥
नव्हे ऐसें कांहीं नाहीं अवघड। नाहीं कईवाड तोंच वरि॥
दोरें चिरा कापे पडिला कांचणी। अभ्यासें सेवनीं विष पडे॥
तुका म्हणे कैंचा बैसण्यासी ठाव। जठरीं बाळा वाव एकाएकीं॥

## अनुभव

३१२८

नका दंतकथा येथें सांगों कोणी। कोरडे ते मानी बोल कोण॥
अनुभव येथें व्हावा शिष्टाचार। न चलती चार आम्हां पुढें॥
निवडी वेगळें क्षीर आणि पाणी। राजहंस दोन्ही वेगळाली॥
तुका म्हणे येथें पाहिजे जातीचें। येरा गाबाळाचें काय काम॥

## अंधळेपणा

३४९०

हित नाहीं ठावें जननी जनका। दाविला लौकिकाचार तिहीं॥
अंधळ्याचे काठी लागले अंधळे। घात एका वेळे पुढें मागे॥

## अधीर-धीर

१४४६

अधीरासी नाहीं चालों जातां मान। दुर्लभ दर्शन धीर त्याचें॥

## अभागी

१—२४८

सर्प विंचू दिसे। धन अभाग्या कोळसे॥
आला डोळ्यांसी कवळ। तेणें मळलें उजळ॥
अंगाचे भोंवडी। भोय झाड फिरतीं धोंडीं॥
तुका म्हणे नाड। पाप ठाके हिता आड॥

२—२२८६

हागिल्याचे सिंके वोणवाचि राहे। अपशकुन पाहे वेडगळ॥
अत्यंत समय नेणतां अवकळा। येऊं नये बळा सिंक धरी॥
भोजनसमयीं ओकाचा आठव। ठकोनियां जीव कष्टी करी॥
तुका म्हणे किती सांगों उगवून। अभाग्याचे गुण अनावर॥

## अद्वैत

११२

न करी संग राहे रे निश्चळ । लागो नेदी मळ ममतेचा ॥
या नांवें अद्वैत खरे ब्रह्मज्ञान । अनुभवावांचून वडबड ते ॥
इंद्रियांचा जय वासनेचा क्षय । संकल्पा ही न ये वरी मन ॥
तुका म्हणे न ये जाणीव अंतरा । अंतरीं या थारा आनंदाचा ॥

## अंतरंग

२२९०

शुद्ध कसूनि पहावे वरि रंगा न भुलावे ।

## आशाबद्ध

१—४५१९

आशाबद्धा देव असोनि जवळी । नेणती ते काळी स्वार्थामुळें ॥
मुळें याच देव न कळे तयासी । चित्त आशापाशीं गोवियेले ॥
नेदी भाव राहो लोभिकांचे चित्तीं । जाणताचि होती अंधळी तीं ॥
अंधळीं तीं तुका म्हणे संवसारीं । जिहीं नाहीं हरी ओळखिला ॥

२—४५३४

यांचे मी जवळी देव तो नेणती । लटिकें मानिती साच खरें ॥
लटिकें तें साच साच तें लटिकें । नेणती लोभिकें आशाबद्ध ॥

३—४५३८

जाणतियां सवें येऊं नेदी हरि । तर्कवादी दुरी दुराविले ॥
वादियासि भेद निंदा अहंकार । देऊनियां दूर दुराविले ॥
दुराविले दूर आशाबद्ध देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥
चित्तीं द्रव्य दारा पुत्रादि संपत्ती । समान ते होती पशु नर ॥
नरक साधिले विसरोनि देवा । बुडाले ते भवानदीमाजी ॥
जिहीं हरिसंग केला संवसारीं । तुका म्हणे खरी खेप त्यांची ॥

४—४५५७

लोभ दावूनियां आपला विसर । पाडितो कुमर धन आशा ॥
आशेचे बांधले तुका म्हणे जन । काय नारायण ऐसा जाणे ॥

५—४५६०

मागुती पडती चिंतेचिये डोहीं । जयाची हे नाहीं बुद्धि स्थिर ॥
बुद्धि स्थिर होऊं नेदी नारायण । आशाबद्ध जन लोभिकांची ॥
लोभिकां न साहे देवाचें करणें । तुका म्हणे तेणें दुःखी होती ॥

६—४५६१

दुःखी होती लोभें करावें तें काई ॥

७—२१

सांगतों तें तुम्हीं आईकावें कानीं । आमुचे नाचणीं नाचूं नका ॥
जोंवरी या तुम्हां मागिलांची आस । तोंवरी उदास होऊं नका ॥
तुका म्हणे काय वायांविण धिंद । पति ना गोविंद दोन्ही नाहीं ॥

८—११७५

लोभीके चिंत धन बैठे । कामीन चित काम ।
माताके चित पुत बैठें । तुकाके मन राम

९—१२२४

निरोधाचें मज न साहे वचन । बहु होतें मन कासावीस ॥
म्हणऊनि जीवा न साहे संगति । बैसतां एकांतीं गोड वाटे ॥
देहाची भावना वासनेचा संग । नावडे उबग आला यांचा ॥
तुका म्हणे देव अंतरे यामुळें । आशा मोहजाळें दुःख वाटे ॥

१०—१४३६

आशा हे समूळ खाणोनि काढावी। तेव्हांचि गोसावी व्हावें तेणें।
नाहीं तरि सुखें असावे संसारी । फजिती दुसरी करूं नये ॥
आशा मारूनियां जयवंत व्हावे । तेव्हांचि निघावें सर्वांतूनी ॥
तुका म्हणे जरी योगाचि तांतडी । आशेची बीबुडी करी आधीं ॥

११—२०८४

चित्तीं नाहीं आस । त्याचा पांडुरंग दास ॥
असे भक्तांचिये घरीं । काम न सांगतां करी ॥
अनाथाचा बंधु । असे अंगीं हा संबंधु ॥
तुका म्हणे भावें । देवा सत्ता राबवावें ॥

१२—१४९४

आशाबद्ध तो जगाचा दास। पूज्य तो उदास सर्वजना॥
आहे तें अधीन आपुले हातीं। आणिकां ठेविती काय बोल॥
जाणतिया पाठी लागली उपाधी। नेणता तो सिद्ध भोजनासी॥
तुका म्हणे भय बांधलेसे गांठी। चोर लागे पाठीं दुम तया॥

१३—१४०७

आशा ते करविते बुद्धीचा लोप। संदेह तें पाप कैसे नव्हे॥
आपला आपण करावा विचार। प्रसन्न तें सार मन ग्वाही॥
नांवें रूपें अंगीं लाविला विटाळ। होतें त्या निर्मळ शुद्ध बुद्ध॥
अंधळ्यानें नये देखण्याची चाली। चालों ऐसी बोली तुका बोले॥

१४—१९४७

आस वाढविते बुद्धीचे तरंग। मनाचेही वेग वावडती॥

१५—२३७७

वासनेची बुंथी। तेथें कैची ब्रह्मस्थिती॥

१६—६९

आशाबद्ध जन। काय जाणे नारायण॥
करी इंद्रियांची सेवा। पाहे आवडीचा हेवा॥
भ्रमले चावळे। तैसें उचित न कळे॥
तुका म्हणे विषें। अन्न नाशियेलें जैसें॥

## आत्मसमर्पण

१—२५०१

उदारा कृपाळा अगा देवांच्या देवा।
तुजसवें पण आतां आमुचा दावा॥
कैसा जासी सांग आतां मजपासूनी।
केलें वाताहात दिलें संसारा पाणी॥
अवघी आवरूनी तुझे लाविली पाठीं।
आतां त्या विसर सोहंकोहंच्या गोष्टी॥

तुका म्हणे आतां चरणीं घातली मिठी ।
पडिली ते पडो तुम्हां आम्हांसीं तुटी ॥

२—२५

परपुरुषाचें सुख भोगे तरी । उतरोनि करीं घ्यावें सीस ॥
संवसारा आगीं आपुलेनि हातें । लावूनी मागुतें पाहूं नये ॥
तुका म्हणे व्हावें तयापरी धीट । पतंग हा नीट दीपावरी ॥

३—११८३

तुका दास तिनका रे । राम भजन निरास ।
क्या बिचारे पंडित करो रे । हात पसारे आस ॥

११८४

तुका प्रीत रामसूं । तैसी मीठी राख ।
पतंग जाय दीपपरे रे । करे तनकी खाक ॥

४—३५१२

करूनी चिंतन खेळों भोवतालें । चित्त येथें आलें पायांपाशीं ॥
येथें नाहीं खोटा चालत परिहार । जाणसी अंतर पांडुरंगा ॥
सुखदुःखें तुज देऊनी सकळ । नाहीं ऐसा काळ केला आम्ही ॥
तुका म्हणे जाला देहाचा विसर । नाहीं आतां पर आप दोन्ही ॥

५—३१४७

तैसे नव्हों आम्ही विठ्ठलाचे दास । यावें आणिकांस काकुलती ॥
अंकिताचा असे अभिमान देवा । समर्पूनि हेवा असों पायीं ॥

६—२२३६

सांगा दास नव्हे तुमचा मी कैसा । ऐसें पंढरीशा विचारूनी ॥
कोणासाठीं केली प्रपंचाची होळी । या पायांवेगळी मायबापा ॥

७—१९१३

तुका म्हणे जीव गेला तरी जाव । धरिला तो देव भावसिद्धी ॥

८—४०७५

संकल्पिला तूज सकळही भाव । कोण एक ठाव उरला तेथें ॥
इंद्रियव्यापार जें जें कांहीं कर्म । करितों ते धर्म सकळ तुझे ॥

माझें हित फार लागला विचार । तुज सर्व भार चालवणें ॥
जो कांहीं लौकिक करिसी तो तुझा । अपमान पूजा कांहीं तरी ॥
तुका म्हणे मी तों राहिलों निश्चिंत । तुज कळे हित तैसें करी ॥

९—४३९०

नाहीं संसाराची चाड । गाऊं हरिचें नाम गोड ॥
हो का प्राणाचाही घात । परि हा न सोडी अनंत ॥
जन्मोजन्मीं हाचि धंदा । संतसंग राहो सदा ॥
तुका म्हणे भाव । तो हा जाणा पंढरिराव ॥

१०—४१२७

माझा घातपात अथवा हित फार । अवघा विचार तुझ्या हातीं ॥
ठेवुनि जीव भाव तुझ्या ठायीं चित्त । राहिलों निवांत पांडुरंगा ॥
चित्ताचा चाळक बुद्धीचा जनिता । काय नाहीं सत्ता तुझे हातीं ॥
तुका म्हणे काय करिसी तें पाहीन । ठेविसी राहीन सुखें तेथें ॥

## आत्मविश्वास

१—२८

बहुतांच्या आम्ही न मिळों मतासी । कोणी कैसी कैसी भावनेच्या ॥
विचार करितां वायां जाय काळ । लटकेंचि मूळ फजितीचें ॥
तुका म्हणे तुम्ही करा घटापटा । नका जाऊं वाटा आमुच्चिया ॥

२—१४४८

मोक्षाचें आम्हांसी नाहीं अवघड । तो असे उघड गांठोळीस ॥
भक्तीचे सोहळे होतील जीवासी । नवल तेविशीं पुरवितां ॥
ज्याचें त्यासी देणें कोण तें उचित । मानूनियां हित घेतों सुखें ॥
तुका म्हणे सुखें देई संवसार । आवडीसी थार करीं माझे ॥

३—२२६६

वेदाचा तो अर्थ आम्हांसीच ठावा । येरांनीं वाहावा भार माथां ॥
खादल्याची गोडी देखिलयासी नाहीं । भार धन वाही मजुरीचें ॥
उत्पत्तिपाळण संहाराचें निज । जेणें नेलें बीज त्याचे हातीं ॥
तुका म्हणे आलें आपणचि फळ । हातोहातीं मूळ सांपडलें ॥

अनुक्रम ९.५.१९१७ २
दिनांक २/१०/५४
क्रमांक १२२८
नं. २०७४७
शाखा

## आंधळा

१—४२५

देखत होतों आधीं मागें पुढें सकळ ।
मग हे दृष्टि गेली वरी आलें पडळ ।
तिमिर कोंदलेसें वाढे वाढतां प्रबळ ।
भीति मी झालों देवा काय ज्याल्याचें फळ ॥
आतां मज दृष्टी देई । पांडुरंगा मायबापा ।
शरण आलों आतां । निवारूनियां पापा ।
अंजन लेववूनी । करी मारग सोपा ।
जाईन सिद्धपंथें । अवघ्या चुकती खेपा ॥
होतसे खेद चित्ता । कांहीं नाठवे विचार ।
जात होतों जनामागें । तोहि सांडिला आधार ।
हा ना तोसा ठाव झाला । अवघा पडिला अंधार ।
फिरलीं माझीं मज । कोणी न देती आधार ॥
जोंवरी चळण गा । तोंवरी म्हणती माझा ।
मानिती लहान थोर । देहसुखाच्या काजा ।
इंद्रियें मावळलीं । आला बागुल आजा ।
कैसा विपरीत जाला । तोचि देह नव्हे दुजा ॥
गुंतलों या संवसारें । कैसा झालोंसे अंध ।
मी माझें वाढवूनी । माया तृष्णेचा बाध ।
स्वहित न दिसेचि । केला आपुला वध ।
लागले काळ पाठीं । सवें काम हे क्रोध ॥
लागती चालतां गा । गुणदोषांच्या ठेंसा ।
सांडिली वाट मग । झालों निराळा कैसा ।
पाहतों वास तुझी । थोर करूनि आशा ।
तुका म्हणे वैद्यराजा । पंढरीच्या निवासा ॥

२—४२६

सहज मी आंधळा गा । निज निराकारपंथें ।
वृत्ति हे निवृत्ति झाली । जन न दिसे तेथें ।

मी माझें हारपलें। ठायीं जेथींच्या तेथें।
अदृश्य तेंचि जालें। कांहीं दृश्य जें होतें॥
सुखी मी निजलों गा। शून्य सारूनी तेथें।
त्रिकूट शिखरीं गा। दान मिळे आइतें॥
टाकिली पात्र झोळी। धर्म अधर्म आशा।
कोल्हाळ चुकविला। त्रिगुणांचा वोळसा।
न मागें मी भीक आतां। हाचि झाला भरंवसा।
वोळली सत्रावी गा। तिणें पुरविली इच्छा॥
ऊर्ध्वमुखें आळविला। सोहं शब्दाचा नाद।
अरूप जागविला। दाता घेऊनी छंद।
घेऊनी आला दान। निजतत्व निजबोध।
स्वरूपीं मेळविलें। नांव ठेविला भेद॥
शब्द हा बहुसार। उपकाराची राशी।
म्हणोनि चालविला। मागें येतील त्यांसी।
मागोनी आली वाट। सिद्ध ओळीची तैसी।
तरले तरले गा। आणिकही विश्वासी॥
वर्म तें एक आहे। दृढ धरावा भाव।
जाणीव नागवण। लागों नेदी ते ठाव।
म्हणोनि संग टाकी सेवी अद्वैत भाव।
तुका म्हणे हाचि संतीं। मागें केला उपाव॥

३—४२७

आंधळ्यां पांगळ्यांचा। एक विठोबा दाता।
प्रसवला विश्व तोचि। सर्व होय जाणता।
घडी मोडी हेळामात्रें। पाप पुण्य संचिता।
भवदुःख कोण वारी। तुजवांचुनी चिंता॥
धर्म गा जागो तुझा। तूंचि कृपाळू राजा।
जाणसी जीवींचें गा। न सांगतां सहजा॥
घातली लोळणी गा। पुंडलीकें वाळवंटीं।
पंढरी पुण्य ठाव। नीरे भींवरे तटीं।

न देखें दुसरें गा । झाली अदृश्य दृष्टि ।
बोळला प्रेमदाता । केली अमृतवृष्टि ॥
आणीक उपमन्यु । एक बाळ धाकुटें ।
न देखे न चलवे । जना चालते वाटे ।
घातली लोळणी गा । हरिनाम बोभाटें ।
पावला त्या कारणें । धांव घातली नेटें ॥
बैसोनी खोळी शुक । राहे गर्भी आंधळा ।
शीणला येरझारीं । दुःख आठवी वेळा ।
मागील सोसलें तें । ना भी म्हणे गोपाळा ।
पावला त्याकारणें । लाज राखिली कळा ॥
न देखे जो या जना । तया दावी आपणा ।
वेगळा सुखदुःखा । मोहो नाठवी धना ।
आपपर तेंही नाहीं । बंधुवर्ग सज्जना ।
तुकया तेची परी । जाली पावें नारायणा ॥

४—४२८

भगवंता तुजकारणें । मेलों जीताचि कैसी ।
निष्काम बुद्धि ठेली । चळण नाहीं तयासी ।
न चलती हातपाय । दृष्टि फिरली कैसी ।
जाणतां न देखों गा । क्षर आणि अक्षरासी ॥
विठोबा दान दे गा । तुझ्यासारिखें नामा ।
कीर्ति हे वाखाणिली । थोर वाढविली सीमा ॥
भुक्तिमुक्ति तूंचि एक । होसी सिद्धीचा दाता ।
म्हणोनि सांडवली । शोक भय लज्जा चिंता
सर्वस्वें त्याग केला । धांव घातली आतां ।
कृपादान देई देवा । येउनि सामोरा आतां ॥
संसारसागरु गा । भवदुःखाचें मूळ ।
जनवाद अंथरुण । माजी केले इंगळ ।
इंद्रियें वज्रघातें । तपे उष्ण वरी जाळ ।
सोसिलें काय करूं । दुर्भर हे चांडाळ ॥

तिहीं लोकीं तुझें नाम । वृक्ष पल्लव शाखा ।
वेंधलों वरि खोडा । भाव धरूनी टेंका ।
जाणवी नरनारी । जागो धरम लोकां ।
पावती पुण्यवंत । सोई आमुचिये हाका ॥
नाठवे आप पर । आतां काय बा करूं ।
सारिखा दोहीसवा । हारपला विचारु ।
घातला योगक्षेम । तुज आपुला भारु ।
तुकया शरणागता । देई अभय करु ॥

## आचारी

२३१२

आचारी अन्न काढी रे गाई अतितभाग ॥

## ओंगळ

२३१२

ओंगळ मळीन अंतरीं वाणी वाहे दुर्गंध ॥

## आत्मस्थिति

१—१०५८

जन मानवलें वरी बाह्यात्कारीं । तैसा मी अंतरीं नाहीं झालों ॥
म्हणुनी पंढरीनाथा वाटतसे चिंता । प्रगट बोलतां लाज वाटे ॥
संतां ब्रह्मरूप जाले अवघे जन । ते माझे अवगुण न देखती ॥
तुका म्हणे मी तों आपणांसी ठावा । आहे बरा देवा जैसा तैसा ॥

२—३१३५

म्हणवितों दास न करितां सेवा । लंडपणें देवा पोट भरी ॥
खोटें कोठें सरे तुझे पायांपाशीं । अंतर जाणसी पांडुरंगा ॥
आचरण खोटें आपणासी ठावें । लटिकें बोलावें दुसरें तें ॥
तुका म्हणे ऐसा आहे अपराधी । असो कृपानिधी तुम्हां ठावां ॥

३—८०३

पाखांड्यांनीं पाठी पुरविला दुमाला । तेथें मी विठ्ठला काय बोलों ॥
कांद्याचा खाणार चोजवी कस्तूरी । आपण भिकारी अर्थ नेणें ॥

न कळे तें मज पुसती छळूनी । लागतां चरणीं न सोडिती ॥
तुझ्या पायांविण दुजें नेणें कांहीं । तूंचि सर्वांठायीं एक मज ॥
तुका म्हणे खीळ पडो त्यांच्या तोंडा । किती बोलों भांडा वादकाशीं ॥

४—३८९७

आइक नारायणा वचन माझें खरें । सांगतों निर्धारें तुजपासीं ॥
नाहीं भाव मज पडिली लोकलाज । राहिलेसें काज तुझे पायीं ॥
जरी तुज कांहीं करणें उचित । तारी तूं पतित तुका म्हणे ॥

५—२१५६

भला म्हणे जन । परी नाहीं समाधान ॥ १ ॥

६—१४४८

मोक्षाचे आम्हासी नाहीं अवघड । तो असे उघड गांठोळीस ॥

७—२३४९

माझे लेखीं देव मेला । असो त्याला असेल ॥

८—३८५६

तुका म्हणे आलों सोसीत संकटें । मी माझें वोखटें आहे देवा ॥

९—२१६५

पोटीं शूळ अंगीं उटी चंदनाची । आवडी सुखाची कोण तया ॥
तैसे मज कां गा केले पंढरिराया । लौकिक हा वायां वाढविला ॥
ज्वरिलियापुढें वाढिलीं मिष्टान्नें । काय चवी त्याणें घ्यावी त्यांची ॥
तुका म्हणे मढें श्रृंगारिलें वरी । तेचि झाली परी मज देवा ॥

१०—१८७३

संत मानितील मज । तेणें वाटतसे लाज ॥
तुम्ही कृपा केली नाहीं । चित्त माझें मज ग्वाही ॥
गोविलों थोरिवा । दुःख वाटतसे जीवा ॥
तुका म्हणे माया । आवरा हे पंढरिराया ॥

११—५९८

तुका म्हणे दावी वेश । तैसा अंतरीं नाहीं लेश ॥

१२—२८२३

करी धंदा परि आवडती पाय । प्रीती सांगों काय नेणां देवा ॥
रूप डोळां देखे सदा सर्वकाळ । संपादितों आळ प्रपंचाचा ॥
नेमून ठेविली काया हे कारणीं । आमुचिये वाणी गुण वदे ॥
मनासी उत्कंठा दर्शनाचा हेवा । नाहीं लोभ जीवा धन धान्य ॥
उसंतितों पंथ वेठीच्चिया परी । जीवनसूत्र दोरीपाशीं ओढ ॥
तुका म्हणे ऐसें करितो निर्वाण । जीव तुम्हां भिन्न नाहीं माझा ॥

१३—१९०२

खावें ल्यावें द्यावें । जमाखर्च तुझ्या नांवें ॥
आतां चुकली खटपट । झाड्यापाड्याचा बोभाट ॥
आहे नाहीं त्याचें । आम्हां काम सांगायाचें ॥
तुका म्हणे चिंता । भार वाही त्याचे माथां ॥

१४—३८५२

माझा तो स्वभाव आहे अनावर । तुजह देतां भार कांहीं नव्हे ॥
ऐसें कळों आलें मज नारायणा । जागृती स्वपना ताळ नाहीं ॥
संपादिला तो हा अवघा बाह्य रंग । तुझा नाहीं संग अभ्यंतरीं ॥
तुका म्हणे सत्या नाहीं पाठी पोट । असोनि निघोट काय जाती ॥

१५—८६७

म्हणवितों दास ते नाहीं करणी । आंत वरी दोन्ही भिन्न भाव ॥

१६—१७५२

लाज वाटे मज मानिती हे लोक । हें तों नाहीं एक माझे अंगीं ॥

१७—१७७९

वाचेच्या चापल्यें बहु जालों कुशळ । नाहीं बीजमूळ हाता आलें ॥

१८—१०१७

वायांविण वाढविला हा लौकिक । आणिला लटिक वाद दोघां ॥

१९—२७६६

शूद्रवंशीं जन्मलों । म्हणोनि दंभें मोकलिलों ॥

२०—२२१२

आपुला तो देह आम्हां उपेक्षीत । कोठें जाऊं हित सांगों कोणा ॥
कोण नाहीं दक्ष करतां संसार । आम्ही हा विचार वमन केला ॥
नाहीं या धरीत जीवित्वाची चाड । कोठें करूं कोड आणिकांचें ॥
तुका म्हणे असो चिंतोनिया देवा । मी माझें हा हेवा सारोनीयां ॥

२१—२०३६

कासया गुणदोष पाहों आणिकांचे । मज काय त्यांचें उणें असे ॥
काय पापपुण्य पाहों आणिकांचें । मज काय त्यांचें उणें असे ॥
नग्नदुग्नपण कवणांचे वाणूं । तयाहून अणू अधिक माझें ॥
कुचर खोटा मज कोण असे आगळा । तो मी पाहो डोळां आपुलिये ॥
तुका म्हणे मी भांडवले पुरता । तुजसी पंढरीनाथा लावियेलें ॥

२२—८६६

बळें बाह्यात्कारें संपादिलें सोंग । नाहीं जाला त्याग अंतरींचा ॥
ऐसें येतें नित्य माझ्या अनुभवा । मनासी हा ठावा समाचार ॥
जागृतीचा नाहीं अनुभव स्वप्नीं । जातों विसरूनि सकळ हें ॥
प्रपंचाबाहेरी नाहीं आलें चित्त । केलें करी नित्य वेवसाय ॥
तुका म्हणे मज भोरप्याची परी । झालें सोंग वरी आंत तैसें ॥

२३—१८७

मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास । कठिण वज्रास भेदूं ऐसे ॥
मेले जित असो निजोनिया जागे । जो जो जें जें मागे तें तें देऊं ॥
भले तरि देऊं गांडीची लंगोटी । नाठ्याळाचे काठी देऊं माथां ।
मायबापाहूनि बहु मायावंत । करूं घातपात शत्रूहूनी ॥
अमृत तें काय गोड आम्हांपुढें । विष तें बापुडें कडू किती ॥
तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड । जया पुरे कोड त्याचे परी ॥

२४—१९०५ (नि.)

शिकविला तैसा पढो जाणें पुंसा । कैंची साच दशा तैसी अंगीं ॥
स्वप्नींचिया सुखें नाहीं होत राजा । तैसा दिसे माझा अनुभव ।
कासया हा केला जिव्हे अलंकार । पायासी अंतर दिसतसे ॥

दर्पणींचें धन हातीं ना पदरीं । डोळा दिसे परी सत्याचिये ॥
आस केली तरी लाळचि घोटावी । ठकाठकी तेवीं दिसतसे ॥
कवित्वें रसाळ वदविली वाणी । साक्षही पुराणीं घडे ऐसी ॥
तुका म्हणे गुरें राखोनि गोवारी । माझी म्हणे परि लाभ नाहीं ॥

२५—४८

निंदी कोणी मारी । वंदी कोणी पूजा करी ॥
मज हेंही तेंही नाहीं । वेगळा दोहींपासूनी ॥

२६—११३

तुका म्हणे आतां उरलों उपकारापुरता ॥

२७—४३११

कोणी निंदा कोणी वंदा । आम्हां स्वहिताचा धंदा ॥
काय तुम्हांसी गरज । आम्ही भजूं पंढरीराज ॥
तुम्हांसारिखें चालावें । तेव्हां स्वहिता मुकावें ॥
तुका म्हणे हो कां कांहीं । गळा दिला विठ्ठलपायीं ॥

## आत्मविचार

१—१२३

कोणाच्या आधारें करूं मी विचार । कोण देईल धीर माझ्या जीवा ॥
शास्त्रज्ञ पंडित नव्हे मी वाचक । यातिशुद्ध एक ठाव नाहीं ॥
कलियुगीं बहु कुशळ हे जन । छळितील गुण तुझे गातां ॥
मज हा संदेह झाला दोहीं सवा । भजन करूं देवा किंवा नको ॥
तुका म्हणे आतां दुरावितां जन । किंवा हें मरण भलें दोन्ही ॥

२—३८२६

बोल नाहीं तुझ्या दातृत्वपणासी । आम्ही अविश्वासी सर्वभावें ॥
दंभें करी भक्ती सोंग दावी जना । अंतरीं भावना वेगळिया ॥
तुका म्हणे देवा तूं काय करिसी । कर्मा दुस्तरासी आमुचिया ॥

४—११६

आपुल्या विचार करीन जीवाशीं । काय या जनाशीं चाड मज ॥
आपुलें स्वहित जाणती सकळें । निरोधितां बळें दुःख वाटे ॥
आइको नाइको कथा कोणी तरी । जाऊनियां घरीं निजो सुखें ॥
माझी कोण वोज जाला हा शेवट । देखोनियां वाट आणिकां लावूं ॥
तुका म्हणे भाकूं आपुली करुणा । जयाची वासना तया फळे ॥

## आई

१—१३२३

न लगे मायेसी वाळें निरवावें । आपुल्या स्वभावें ओढे त्यासी ॥
मज कां लागला करणें विचार । ज्याचा जार भार त्याचे माथां ॥
गोड धड त्यासी ठेवी न मागता । समाधान खातां नेदी मना ॥
खेळतां गुंतलें उमगूनी आणी । बैसोनियां स्तनीं लावी बळें ॥
त्याच्या दुःखेपणें आपण खापरीं । लाही तळीं वरी होय जैसी ॥
तुका म्हणे देह विसरे आपुला । आघात तो त्याला लागों नेदी ॥

२—२१४८

पुढिलिया सुखें निंब देतां भले । बहुत वारलें होय दुःख ॥
हें तों वर्म असे माउलीचे हातीं । हाणी मारी प्रीती हितासाठीं ॥
खेळतां विसरे भूक तान घर । धरूनियां कर आणी बळें ॥
तुका म्हणे पाळी तोंडींचिया घासें । उदार सर्वस्वें सर्वकाळ ॥

३—९७७

काय आतां आम्ही पोटचि भरावें । जग चाळवावें भक्त म्हूण ॥
ऐसा तरी एक सांगा जी विचार । बहु होतों फार कासावीस ॥
काय कवित्वाची घालूनिया रूढी । करूं जोडाजोडी अक्षरांची ॥
तुका म्हणे काय गुंपोनि दुकाना । राहों नारायणा करुनी घात ॥

३—८१९

जननी हें जाणे वाळकाचें वर्म । सुखदुःख धर्म जें जें कांहीं ॥
तुका म्हणे जीव विठ्ठलाचे हातीं । दिला त्याची गति तोचि जाणे

४—२४१४

बाळ काय जाणे जीवनउपाय । मायबाप वाहे सर्व चिंता ॥
आइतें भोजन खेळणें अंतरीं । अंकिताचे शिरीं भार नाहीं ॥
आपुलें शरीर रक्षितां न कळे । सांभाळूनि लळे पाळी माय ॥
तुका म्हणे माझा विठ्ठल जनिता । आमुची ते सत्ता तयावरी ॥

५—१७३९

जिचें पीडे बाळ । प्राण तियेचा विकळ ॥
ऐसा मातेचा स्वभाव । सूत्र दोरी एकजीव ॥
सुखाची विश्रांति । उमटे मातेचिये चित्तीं ॥
तुका म्हणे संत । तुम्ही बहु कृपावंत ॥

६—२७७६

मातेचिये चित्तीं । अवघी बाळकाची व्याप्ति ॥
देह विसरे आपुला । जवळी घेतां सीण गेला ॥
दावी प्रेमभातें । आणि अंगावरि चढतें ॥
तुका संतापुढें । पायीं झोंबे लाडें कोडें ॥

७—३०६१

जैसें तैसें बाळ मातेसी आवडे । बोलतां बोबडे शब्द गोड ॥
आपुले आवडी लेववी खाववी । पाहोनियां जीवीं सुख वाटे ।
तुका म्हणे काय देऊं परिहार । काय तें साचार जाणतसे ॥

८—२८३४

काय नाहीं माता गौरवीत बाळा । काय नाहीं लळा पाळीत तें ॥
काय नाहीं त्याची करीत ते सेवा । काय नाहीं जीवा गोमटें तें ॥
अमंगळपणें कांटाळा न धरी । उचलोनि करीं कंठीं लावी ॥
लेववी आपुले अंगें अळंकार । संतोषाये फार देखोनियां ॥
तुका म्हणे स्तुति योग्य नाहीं परी । तुम्हां लाज थोरी अंकिताची ॥

९—२९०६

मायबापें केवळ काशी । तेणें न वजात्रें तीर्थासी ॥
पुंडलीकें काय केलें । परब्रह्म उभें ठेलें ॥
तैसा होई सावधान । हृदयीं धरीं नारायण ॥
तुका म्हणे मायबापें । अवघीं देवाचीं स्वरूपें ॥

# ओव्या

४५०५

पांडुरंगा करूं प्रथम नमना । दुसरें चरणा संतांचिया ॥
याच्या कृपादानें कथेचा विस्तारु । बाबाजी सद्गुरुदास तुका ॥
काय माझी वाणी मानेल संतांसी । रंजवूं चित्तासी आपुलिया ॥
या मनासि लागो हरिनामाचा छंद । आवडी गोविंद गावयासी ॥
सीण जाला मज संसारसंभ्रमें । सीतळ या नामें जाली काया ॥
या सुखा उपमा नाहीं द्यावयासी । आलें आकारासी निर्विकार ॥
नित्य धांवे तेथें नामाचा गजर । घोष जयजयकार आइकतां ॥
तांतडी ते काय हरिगुण गाय । आणीक उपाय दुःखमूळ ॥
मूळ नरकाचें राज्य मदें माते । अंतरे बहुत देव दुरी ॥
दुरी अंतरला नामनिंदकासी । जैसें गोचिडासी क्षीर राहे ॥
हे वाट गोमटी वैकुंठासी जातां । रामकृष्णकथा दिंडी ध्वजा ।
जाणते तयांनीं सांगितलें करा । अंतरासी वारा आडूनियां ॥
यांसी आहे ठावें परि अंध होती । विषयाची खंती वाटे जना ॥
नाहीं त्या सुटलीं द्रव्य लोभ माया । भस्म दंड छाया तरुवराची ॥
चित्त ज्याचें पुत्रपत्नीबंधूवरी । सुटेल हा परि कैसें जाणा ॥
जाणते नेणते करा हरिकथा । तराल सर्वथा भाक माझी ।
माझी मज असे घडली प्रचित । नसेल पतित ऐसा कोणी ॥
कोणी तरी कांहीं केलें आचरण । मज या कीर्तनेंविण नाहीं ॥
नाहीं भय भक्ता तराया पोटाचें । देवासी तयाचें करणें लागे ॥
लागे पाठो वाटी पाहे पायांकडे । पीतांबरें खडे वाट झाडी ॥
डिंकोनियां कां रे राहिले हे लोक । हेंचि कवतुक वाटे मज ॥
जयानें तारिले पाषाण सागरीं । तो घ्यारे अंतरीं स्वामी माझा ॥
माझिया जीवाची केली सोडवण । ऐसा नारायण कृपाळु हा ॥
हाचि माझा नेम हाचि माझा धर्म । नित्य वाचें नाम विठोबाचें ॥
चेतवला अग्नि तापत्रय ज्वाळ । तो करी शीतळ रामनाम ॥
मना धीर करी दृढ चित्तीं धरी । तारील श्रीहरि मायबाप ॥
बाप हा कृपाळु भक्तां भाविकांसी । घरीं होय दासी कामारी त्या ॥

त्याचा भार माथां चालवी आपुला । जिहीं त्या दिधला सर्वभाव ॥
भावेंवीण जाणा नाहीं त्याची प्राप्ति । पुराणें बोलती ऐसी मात ॥
मात त्याची जया आवडे जीवासी । तया गर्भवासीं नाहीं येणें ॥
यावें गर्भवासीं तरीच विष्णुदासीं । उद्धार लोकांसी पूज्य होती ॥
होती आवडते जीवाचे ताइत । त्यां घडी अच्युत न विसंभे ॥
भेदाभेद नाहीं चिंता दुःख कांहीं । वैकुंठ त्या ठायीं सदा वसे ॥
वसे तेथें देव सदा सर्वकाळ । करिती निर्मळ नामघोष ॥
संपदा तयांची न सरे कल्पांतीं । मेळविला भक्तीं देवलाभ ॥
लाभ तयां जाला संसारा येऊनी । भगवंत ऋणी भक्तीं केला ॥
लागलेसें पिसें काय मूढ जनां । काय नारायणा विसरलीं ॥
विसरलीं तयां थोर जाली हाणी । पचविल्या खाणी चौऱ्यासीच्या ॥
शिकविलें तरी नाहीं कोणा लाज । लागलीसे भाज धन गोड ॥
गोड एक आहे अविट गोविंद । आणीक तो छंद नासिवंत ॥
तळमळ त्याची कांहीं तरी करा । कां रे निदसुरा बुडावया ॥
या जनासी भय यमाचें कां नाहीं । सांडियेलीं तिहीं एक राज्यें ॥
जेणें अग्निमाजी घातलासे पाव । नेणता तो राव जनक होता ॥
तानभूक जिहीं साहिले आघात । तया पाय हात काय नाहीं ॥
नाहीं ऐसा तिहीं केला संवसार । दुःखाचे डोंगर तोडावया ॥
याच जन्में घडे देवाचें भजन । आणीक हें ज्ञान नाहीं कोठें ॥
कोठें पुढें नाहीं ध्यावया विसांवा । फिरोनि या गांवा आल्याविण ॥
विनवितां दिवस बहुत लागती । म्हणउनि चित्तीं देव धरा ॥
धरा पाय तुम्ही संतांचे जीवासी । वियोग तयांसी देवा नाहीं ॥
नाहीं चाड देवा आणीक सुखाची । आवडी नामाची त्याच्या तया ॥
त्याचीच उच्छिष्ट बोलतों उत्तरें । सांगितलें खरें व्यासादिकीं ॥
व्यासें सांगितलें भक्ति हेंचि सार । भवसिंधु पार तरावया ॥
तरावया जना केलें भागवत । गोवळ गोपी भक्त मातापिता ॥
तारुनियां खरे नेली एक्यासरें । निमित्तें उत्तरें ऋषीचिया ॥
यासी वर्म ठावें भक्तां तरावया । जननी बाळ माया राखे तान्हें ॥
तान्हेलें भुकेलें म्हणे वेळोवेळां । न मगतां लळा जाणोनिया ॥

जाणोनियां वर्म देठ लावियेला । द्रौपदीच्या बोलासवें धांवे ॥
धांवे सरवता धेनु जैसी वत्सा । भक्तालागीं तैसा नारायण ॥
नारायण व्हावा हांव ज्याच्या जीवा । धन्य त्याच्या दैवा पार नाहीं ॥
पार नाहीं सुखा तें दिलें तयासी । अखंड वाचेसी रामनाम ॥
रामनाम दोनी उत्तम अक्षरें । भवानी शंकरें उपदेशिलीं ॥
उपदेश करी विश्वनाथ कानीं । वाराणसी प्राणी मध्यें मरे ॥
मरणाचे अंतीं राम म्हणे जरी । न लगे यमपुरीं जावें तया ॥
तयासी उत्तम वास वयकुंठीं । वसे नाम चित्तीं सर्वकाळ ॥
सर्वकाळ वसे वैष्णवांच्या घरीं । नसे क्षणभरी स्थिर कोठें ॥
कोठें नका पाहों करा हरिकथा । तेथें अवचिता सांपडेल ॥
सांपडे हा देव भाविकांचे हातीं । शहाणे मरती तरी नाहीं ॥
नाहीं भलें भक्ती केलियावांचूनि । अहंता पापिणी नागवण ॥
नागवलों म्हणे देव मी आपुला । लाभ जना दिला ठकलों तो ॥
तोचि देव येर नव्हे ऐसें कांहीं । जनार्दन ठायीं चहूं खाणी ॥
खाणी भरूनियां राहिलासे आंत । बोलावया मात ठाव नाहीं ॥
ठाव नाहीं रिता कोणी देवाविण । ऐसी ते सज्जन संतवाणी ॥
वाणी बोलूनियां गेली एक पुढें । तयासी वांकुडें जातां ठके ।
ठका नाहीं अर्थ ठाऊका वेदांचा । होऊनि भेदाचा दास ठेला ॥
दास ठेला पोट अर्थ दंभासाठीं । म्हणउनि तुटी देवासवें ॥
सवें देव द्विजातीही दुरावला । आणिकांचा आला कोण पाड ॥
पाड करूनियां नागविलीं फार । पंडित वेव्हार खळवादी ॥
वादका निंदका देवाचें दर्शन । नव्हे जाला पूर्ण षडकर्मी ॥
षडकर्मी हीन रामनाम कंठीं । तयासवें भेटी सवें देवा ॥
देवासी आवडे भाविक जो भोळा । शुद्ध त्या चांडाळा करूनि मानी ॥
मानियेला नाहीं विश्वास या बोला । नाम घेतां मला युक्ति थोडी ॥
युक्ति थोडी मज दुर्बळाची वाचा । प्रताप नामाचा बोलावया ॥
बोलतां पांगल्या श्रुति नेति नेति । खुंटलिया युक्ति पुढें त्यांच्या ॥
पुढें पार त्याचा न कळेंचि जातां । पाउलें देखतां ब्रह्मादिकां ॥
काय भक्ति पिसें लागलें देवासी । इच्छा ज्याची जैसी तैसा होय ॥

होय हा सगुण निर्गुण आवडी । भक्ति प्रिय गोडी फेडावया ॥
या बापासी बाळ बोले लाडें कोडें । करूनि वांकुडें मुख तैसें ॥
तैसे याचकाचें समाधान दाता । होय हा राखता सत्त्वकाळीं ॥
सत्त्वकाळीं कामा न येती आयुधें । बळ हा संबंध सैन्यलोक ॥
सैन्यलोक तया दाखवी प्रताप । लोटला हा कोप कोपावरी ॥
कोपा मरण नाहीं शांत होय त्यासी । प्रमाण भल्यासी सत्त्वगुणीं ॥
सत्त्वरजतम आपण नासती । करितां हे भक्ती विठोबाची ॥
चित्त रंगलिया चैतन्यचि होय । तेथें उणें काय निज सुखा ॥
सुखाचा सागरु आहे विटेवरी । कृपादान करी तोचि एक ॥
एक चित्त धरूं विठोबाचे पायीं । तेथें उणे कांहीं एक आम्हां ॥
आम्हांसी विश्वास याचिया नामाचा । म्हणउनि वाचा घोष करूं ॥
करूं हरिकथा सुखाची समाधि । आणिकाची बुद्धि दुष्ट नासे ॥
नासे संवसार लोकमोहो माया । शरण जा रे तया विठोबासी ॥
सिकविलें मज मूढा संतजनीं । दृढ या वचनीं राहिलोसे ॥
राहिलोंसे दृढ विठोबाचे पायीं । तुका म्हणे कांहीं न लगे आतां ॥

४५०६

गाईन ओंविया पंढरिचा देव । आमुचा तो जीव पांडुरंग ॥
रंगलें हें चित्त माझें तया पायीं ॥ म्हणउनि घेई हाचि लाहो ॥
लाहो करीन मी हाचि संवसारीं । रामकृष्ण हरी नारायण ॥
नारायण नाम घालितां तुकासी । न येती या रासी तपतीर्थें ॥
तीर्थें रज माथां वंदिती संतांचे । जे गाती हरिचे गुणवाद ॥
गुणवाद ज्याचे गातां पूज्य जाले । बडिवार बोले कोण त्यांचा ॥
त्याचा नाहीं पार कळला वेदांसी । आणीक ही ऋषि विचारितां ॥
विचारितां तैसा होय त्यांच्या भावें । निजसुख ठावें नाहीं कोणा ॥
कोणा कवतुक न कळे हे माव । निजलिया जीव करी धंदा ॥
करूनि कवतुक खेळे हाचि लीळा । व्यापूनि वेगळा पाहा तसे ॥
सेवटीं आपण एकलाचि खरा । सोंग हा पसारा नट केला ॥
लावियेलें चाळा मीपणें हें जन । भोग तया कोण भोगविशी ॥
विषयीं गुंतलीं विसरलीं तुज । कन्यापुत्र भाज धन लोभें ॥

लोभें गिळी फांसा आमिषाच्या आशा । सांपडोनि मासा तळमळी ॥
तळमळ याची तरी शम होईल । जरी हा विठ्ठल आठविती ॥
आठवे हा तरी संतांच्या सांगातें । किंवा हें संचित जन्मांतर ॥
जन्मांतरें तीन भोगितां कळती । केलें ते पावती करितां पुढें ॥
पुढें जाणोनियां करावें संचित । पुजावे अतीत देव द्विज ॥
जन्म तुटे ऐसें नव्हे तुम्हां जना । पुढिल्या पावना धर्म करा ॥
करा जप तप अनुष्ठान याग । संतीं हा मारग स्थापियेला ॥
लावियेलीं कर्में शुद्ध आचरणें । कोणा एका तेणें काळे पावे ॥
पावला सत्वर निष्काम उदार । जिंकिली अपार वासना हे ॥
वासनेचें मूळ छेदिल्यावांचून । तरलोंसे कोणी न म्हणावें ॥
न म्हणावे जाला पंडित वाचक । करो मंत्रघोष अक्षरांचा ॥
चाळविलीं एकें तेचि आवडीनें । लोक दंभमानें देहसुखें ॥
सुख तरीच घडे भजनाचें सार । वाचे निरंतर रामनाम ॥
राम हा उच्चार तरीच वसे वाचे । अनंता जन्माचें पुण्य होय ॥
पुण्य ऐसे काय रामनामापुढें । काय ते बापुडे यागयज्ञ ॥
यागयज्ञ तप संसार दायकें । न तुटती एकें नामेंविण ॥
नामेंविण भवसिंधु पावे पार । अइसा विचार नाहीं दुजा ॥
जाणती हे भक्तराज महामुनि । नाम सुखधणी अमृताची ॥
अमृताचें सार निजतत्व बीज । गुह्याचें तें गुज रामनाम ॥
नामें असंख्यात तारिले अपार । पुराणीं हें सार प्रसिद्ध हे ॥
हेंचि सुख आम्ही घेऊं सर्वकाळ । करुनि निर्मळ हरिकथा ॥
कथाकाळीं लागे सकळा समाधी । तात्काळ हे बुद्धि दुष्ट नासे ॥
नासे लोभ मोहो आशा तृष्णा माया । गातां गुण तया विठोबाचे ॥
विठोबाचे गुण मज आवडती । आणीक हे चित्तीं न लगे कांहीं ॥
कांहीं कोणी नका सांगो हे उपाव । माझ्या मनीं भाव नाहीं दुजा ॥
जाणोनियां आम्ही दिला जीवभाव । दृढ याचे पाव धरियेले ॥
धरियेले आतां न सोडी जीवेंसी । केला येच विशीं निरधार ॥
निरधार आतां राहिलों ये नेटीं । संवसारतुटीं करूनियां ॥
येणें अंगिकार केला पांडुरंगें । रंगविलों रंगें आपुलिया ॥

आपुली पाखर घालुनिया वरि । आम्हांसी तो करी यत्न देव ॥
देव राखे तया आणिकांचे काय । करितां उपाय चाले तेथें ॥
तेथें नाहीं रिघ कळिकाळासी जातां । दास म्हणवितां विठोबाचें ॥
विठोबाचे आम्ही लाडिके डिंगर । कांपति असुर काळ धाके ॥
धाक तिहीं लोकीं जयाचा दरारा । स्मरण हें करा त्याचें तुम्ही ॥
तुम्ही निदसुर नका राहूं कोणी । चुकावया खाणी गर्भवास ॥
गर्भवासदुःख यमाचें दंडण । थोर होय शीण येतां जातां ॥
तान भूक पीडा जीतां ते आघात । मेल्या यमदूत जाच करिती ॥
जाच करिती हे कोणा आहे ठावें । नरकीं कौरवें बुडी दिली ॥
बुडी दिली कुंभपाकीं दुर्योधनें । दाविना लाजेनें मुख धर्मा ॥
धर्म हा कृपाळू आलासे जवळी । बैसला पाताळीं वरि नये ॥
नये वरि कांहीं करितां उपाव । भोगवितो देव ज्याचें त्यासी ॥
त्यांसी अभिमान गर्व या देहाचा । नुच्चारिती वाचा नारायणा ॥
नारायण विसरलीं संवसारीं । तयासी अघोरी वास सत्य ॥
सत्य मानूनियां संतांच्या वचना । जारे नारायणा शरण तुम्ही ॥
तुम्ही नका मानूं कोणी विसवास । पुत्र पत्नि आस धन वित्त ॥
धन वित्त लोभ माया मोहपाश । मांडियले फांसे यमदूतीं ॥
दूतीं याच्या मुखा केलेसे कुडण । वाचे नारायण येऊं नेदी ॥
नेदी शुद्ध बुद्धि आतळों चित्तासी । नाना कर्मे त्यासी दुरावती ॥
दुराविलीं एकें जाणतींच फार । निंदा अहंकार वाद भेद ॥
वाद भेद निंदा हे फंद काळाचे । गोवितील वाचे रिकामिकें ॥
रिकामिक देवा होय नव्हे मना । चिंतेचिये घाणा जुंपिजेसि ॥
सेवटीं हे गळा लावुनियां दोरी । सांभाळ ये करीं वासनेचा ॥
वासनेचा संग होय अंतकाळीं । तरी तपोबळी जन्म धरी ॥
धरूनियां देव राहतील चित्तीं । आधींचिया गती आठवाया ॥
आठवावा देव मरणाचे काळीं । म्हणउनि बळी जीव दिले ॥
दिले टाकूनिया भोग ऋषेश्वरी । खाती वनांतरीं कंदमूळें ॥
मुळें सुखाचिया देव अंतरला । अल्पासाटीं नेला अधोगती ॥
गति हे उत्तम व्हावया उपाव । आहे धरा पाय विठोबाचे ॥

विठोबाचे पायीं राहिलिया भावें । न लगे कोठें जावें वनांतरा ॥
तरती दुबळीं विठोबाच्या नांवें । संचित ज्या सर्वे नाहीं शुद्ध ॥
शुद्ध तरे याचें काय तें नवल । म्हणतां विठ्ठल वेळोवेळां ॥
वेळा कांहीं नाहीं कवणाचे हातीं । न कळे हे गति भविष्याची ॥
भविष्य न सुटे भोगिल्यावांचूनी ॥ संचित जाणोनि शुद्ध करा ॥
करावे सायास आपुल्या हिताचे । येथें आलियाचें मनुष्यपण ॥
मनुष्यपण तरी साधी नारायण । नाहींतरी हीन पशुहूनी ॥
पशु पापपुण्य काय तें जाणती । मनुष्या या गति ठाउकिया ॥
ठाउकें हें असे पापपुण्य लोका । देखती ते एकां भोगितिया ॥
भोगतील एक दुःख संवसारीं । काय सांगों परी वेगळाल्या ॥
ल्यावें खावें वरें असावे सदैव । हेंचि करी हांव संवसारीं ॥
संवसारें जन गिळिले सकळ । भोगवितो फळ गर्भवासा ॥
वासनेचें मूळ छेदल्यावांचून । नव्हे या खंडण गर्भवासा ॥
सायास केलियावांचूनि तें कांहीं । भोगावरी पाहीं घालूं नये ।
नये बळें धड घालूं कांट्यावरि । जाये जीवें धरी सर्प हातीं ॥
हातीं आहे हित करिल तयासी । म्हणउनि ऋषीं सांगीतलं ॥
सांगती या लोका फजित करूनि । आपण जे कोणी तरले ते ॥
तेणें वाळवंटीं उभारिले कर । कृपेचा सागर पांडुरंग ॥
गंगाचरणीं करी पातकांची धुनी । पाउलें तीं मनीं चिंतिलिया ॥
चिंतनें जयाच्या तारिले पाषाण । उद्धरी चरण लावूनिया ॥
लावूनिया टाळी नलगे वैसावें । प्रेमसुख घ्यावें संतसंगें ॥
संतसंगें कथा करावें कीर्तन । सुखाचें साधन रामराम ॥
मग कोठें देव जाऊं न सके दुरी । बैसोनि भीतरी राहे कंठीं ॥
राहे व्यापुनियां सकळ शरीर । आपुला विसर पडों नेदी ॥
नेदी दुःख देवों आपुलिया दासा । वारी गर्भवासा यमदूतां ॥
तानभूक त्यासी वाहो नेदी चिंता । दुश्चित हे घेतां नाम होती ॥
होती जीव त्यांचे सकळ ही जंत । परि ते अंकित संचिताचे ॥
चेवले जे कोणी देह अभिमानें । त्यांसी नारायणें कृपा केली ॥
कृपाळू हा देव अनाथा कोंवसा । आम्ही त्याच्या आशा लागलोंसो ।
लावियेलें कांसे येणें पांडुरंगें । तुका म्हणे संगें संतांचिया ॥

# आत्मचरित्र

## १ अवतारकारण

२६०

धर्म रक्षावयासाठीं । करणें आटी आम्हांसी ॥
वाचा बोलों वेदनीती । करूं संतीं केलें तें ॥
न वाणतां स्थिति अंगीं । कर्म त्यागी लंड तो ॥
तुका म्हणे अधम त्यासी । भक्ति दूषी हरीची ॥

२—२१३६

धर्माचें पाळण । करणें पाषांड खंडण ॥
हेंचि आम्हां करणें काम । बीज वाढवावें नाम ॥
तीक्षण उत्तरें । हातीं घेउनि वाण फिरे ॥
नाहीं भीड भार । तुका म्हणे साना थोर ॥

३—२३०२

मागें बहुतां जन्मीं । हेंचि करित आलों आम्ही ॥
भवतापश्रमी दुःखें । पीडिलीं निववूं त्यां ॥
गर्जों हरिचे पवाडे । मिळों वैष्णव बागडे ॥
पाझर रोकडे । काढूं पाषाणामध्यें ॥
भाव शुद्ध नामावळी । हर्षें नाचों पिटूं टाळी ॥
घालूं पायांतळीं कळिकाळ त्याबळें ॥
कामक्रोध बंद खाणी । तुका म्हणे दिले दोन्ही ।
इंद्रियांचे धणी आम्ही जालों गोसावी ॥

## जन्मभूमीचें वर्णन

७८९

धन्य देहू गांव पुण्यभूमि ठाव । तेथें नांदे देव पांडुरंग ॥
धन्य क्षेत्रवासी लोक ते दैवाचे । उच्चारिती वाचे नामघोष ॥
कर कटी उभा विश्वाचा जनिता । वामांगी ते माता रखुमादेवी ॥
गरुड पारीं उभा जोडूनियां कर । अश्वत्थ समोर उत्तरामुख ॥
दक्षिणे शंकर लिंग हरेश्वर । शोभे गंगातीर इंद्रायणी ॥

लक्ष्मीनारायण बल्लाळाचें बन । तेथें अधिष्ठान सिद्धेश्वर ॥
विघ्नराज द्वारीं बहिरव बाहेरी । हनुमंत शेजारी सहित दोघे ॥
तेथें दास तुका करितो कीर्तन । हृदयीं चरण विठोबाचे ॥

## संसाराची दुर्दशा

१—१३३३

याती शूद्र वंश केला वेवसाव । आदि तो हा देव कुळपूज्य ॥
नये बोलों परि पाळिलें वचन । केलियाचा प्रश्न तुम्ही संतीं ॥
संवसारें जालों अति दुःखेंदुखी । मायबाप सेखीं क्रमिलिया ॥
दुष्काळें आटिलें द्रव्यें नेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली ॥
लज्जा वाटे जीवा त्रासलों या दुःखें । वेवसाय देखे तुटी येतां ॥
देवाचें देऊळ होतें तें भंगलें । चित्तासी जें आलें करावेसें ॥
आरंभीं कीर्तन करी एकादशी । नव्हतें अभ्यासीं चित्त आधीं ॥
कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें । विश्वासें आदरें करूनियां ॥
गाती पुढें त्यांचें धरावें ध्रुपद । भावें चित्त शुद्ध करोनियां ॥
संतांचें सेविलें तीर्थ पायवणी । लाज नाहीं मनीं येऊं दिली ॥
टाकला तो कांहीं केला उपकार । केलें हें शरीर कष्टवूनि ॥
वचन मानलें नाहीं सुहृदाचें । समूळ प्रपंचें वीट आला ॥
सत्य असत्यासी मन केलें ग्वाही । मानियेलें नाहीं बहुमतां ॥
मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं ॥
यावरि या जाली कवित्वाची स्फूर्ति । पाय धरिले चित्तीं विठोबाचे ॥
निषेधाचा कांहीं पडिला आघात । तेणें मध्यें चित्त दुखविलें ॥
बुडविल्या वह्या बैसलों धरणें । केलें नारायणें समाधान ॥
विस्तारीं सांगतां बहुत प्रकार । होईल उशीर आतां पुरे ॥
आतां आहे तैसा दिसतो विचार । पुढील प्रकार देव जाणे ॥
भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा । कृपावंत ऐसा कळों आलें ॥
तुका म्हणे माझें सर्व भांडवल । बोलविले बोल पांडुरंगें ॥

२—१६५५ (नि.)

बाप मेला न कळतां । नव्हती संसाराची चिंता ॥
विठो तुझें माझें राज्य । नाहीं दुसऱ्याचें काज ॥

बाईल मेली मुक्त झाली । देवें माया सोडविली ॥
पोरें मेलीं बरें झालें । देवें मायाविरहित केलें ॥
माता मेली मज देखतां । तुका म्हणे हरली चिंता ॥

३—३८८१

आतां काय खावें कोणीकडे जावें । गावांत रहावें कोण्या बळें ॥
कोपला पाटील ये गावींच्या लोकां । आतां मज भिका कोण घाली ॥
आतां येणें चवी सांडिली म्हणती । निवाडा करिती दिवाणांत ॥
भल्या लोकीं यासी सांगितली मात । केला माझा घात दुर्बळाचा ॥
तुका म्हणे याचा संग नव्हे भला । शोधीत विठ्ठला जाऊं आतां ॥

४—१९८५

काय करूं आतां माझिया संचिता । तेणें जीव चित्ता साटी केली ॥
न म्हणावें कोणी माझें हें करणें । हुकुम तो येणें देवें केला ॥
करूनि मोकळा सोडिलों भिकारी । पुरविली तरी पाठी माझी ॥
पाणिया भोंपळा जेवावया पानें । लाविलीं वो येणें देवें आम्हां ॥
तुका म्हणे यासी नाहीं वो करुणा । आहे नागवणा ठावा मज ॥

## समाजानें केलेला छळ

१—२१३३

न वजतां घरा । आम्ही कोणाच्या दातारा ॥
कां हे छळूं येती लोक । दाट बळेंचि कंटक ॥
नाहीं आम्ही खात । कांहीं कोणाचें लागत ॥
कळे तैसी सेवा । तुका म्हणे करूं देवा ॥

२—१७४२

आम्हां गांजी जन । तरि कां मेला नारायण ॥
झालों पोरटीं निढळे । ठाव नाहीं बुड आलें ॥
आम्ही जना भ्यावें । तरि कां न लाजिजे देवें ॥
तुका म्हणे देश । झाला देवाविण ओस ॥

३—४१७७

गावलोकिकांहीं लावियेलें पिसें । काय सांगों ऐसें तुजपाशीं ॥

तोंड काळें केलें फिरविलें मज । नाहीं धरिली लाज पांडुरंगा ॥
काय तुजपासीं सांगों हें गाऱ्हाणें । मग काय जिणें तुझें माझें ॥
कोणासाटीं आतां करावा संसार । केली वाराबार आपणचि ॥
तुका म्हणे आम्ही मोडिला घरचार । धरियेला धीर तुझ्या पायीं ॥

## छळामुळें प्रपंचाचा वीट

५२२

मृत्युलोकीं आम्हां आवडती परी । नाहीं एका हरिनामें वीण ॥
विटलें हें चित्त प्रपंचापासूनि । वमन हें मनीं बैसलेसें ॥
सोनें रूपें आम्हां मृत्तिकेसमान । माणिकें पाषाण खडे तैसे ॥
तुका म्हणे तैशा दिसतील नारी । रिसाचिया परी आम्हांपुढें ॥

## छळाचा परिणाम—वैराग्य

१—१३३४

ऐका वचन हे संत । मी तों आगळा पतित ।
काय काजें प्रीत । करीतसां आदरें ॥
माझें चित्त मज ग्वाही । सत्य तरलों मी नाहीं ।
एकांचिये वाहीं । एक देखीं मानिती ॥
बहु पीडिलों संसारें । मोडीं पुसें पिटी ढोरें ।
न पडतां पुरे । या विचारें राहिलों ॥
सहज सरल होतें कांहीं । द्रव्य थोडें बहु तेंही ।
त्याग केला नाहीं । दिलें द्विजां याचकां ॥
प्रिया पुत्र बंधु । यांचा तोडिला संबंधु ।
सहज जालों मंदु । भाग्यहीन करंटा ॥
तोंड न दाखवे जना । शिरें सांदी भरें राणां ।
एकांत तो जाणां । तयासाठीं लागला ॥
पोटें पिटिलों काहारें । दया नाहीं या विचारें ।
बोलावितां बरें । सहज म्हणे यासाठीं ॥
सहज वडिलां होती सेवा । म्हणोनि पूजितों या देवा ॥
तुका म्हणे भावा । साठीं झणी घ्या कोणी ॥

२—१३३५

बरें झालें देवा निघालें दिवाळें । बरी या दुष्काळें पीडा केली ॥
अनुतापें तुझें राहिलें चिंतन । जाला हा वमन संवसार ॥
बरें ज़ालें देवा बाईल कर्कशा । बरी हे दुर्दशा जनामध्यें ॥
बरें जालें जगीं पावलों अपमान । बरें गेलें धन ढोरें गुरें ॥
बरें जालें नाहीं धरिली लोकलाज । बरा आलों तुज शरण देवा ॥
बरें जालें तुझें केलें देवाईल । लेंकरें बाईल उपेक्षिलीं ॥
तुका म्हणे बरें व्रत एकादशी । केलें उपवासी जागरण ॥

## मंत्रप्राप्ति

१—३२७४

नाहीं म्यां वंचिला मंत्र कोणापाशीं । राहिलों जीवासीं धरूनि तो ॥
विटेवरी भावें ठेवियेलें मन । पाउलें समान चिंतीतसे ॥
पावविलों पार धरिला विश्वास । घालूनियां कास बळकट ॥
तुका म्हणे मागें पावले उद्धार । तिहीं हा आधार ठेविलासे ॥

२—३६८

सद्‌गुरुरायें कृपा मज केली । परी नाहीं घडली सेवा कांहीं ॥
सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना । मस्तकीं तो जाणा ठेविला कर ॥
भोजना मागती तूप पावशेर । पडिला विसर स्वप्नामाजी ॥
कांहीं कळे उपजला अंतराय । म्हणोनि या काय त्वरा जाली ॥
राघव चैतन्य केशव चैतन्य । सांगितली खुण माळिकेची ॥
बाबाजी आपलें सांगितलें नाम । मंत्र दिला रामकृष्ण हरि ॥
माघ शुद्ध दशमी पाहुनि गुरुवार । केला अंगीकार तुका म्हणे ॥

३—३६९

माझिये मनींचा जाणोनियां भाव । तो करी उपाव गुरु राजा ॥
आवडीचा मंत्र सांगितला सोपा । जेणें नव्हे गुंपा कांहीं कोठें ॥
जाती पुढें एक उतरले पार । हा भवसागर साधुसंत ॥
जाणत्या नेणत्या ज्या जैसी आवडी । उतार सांगडी तापे पेटीं ॥
तुका म्हणे मज दावियेला तारू । कृपेचा सागरु पांडुरंग ॥

## कवित्व करणेविषयीं दृष्टांत

१३२०

नामदेवें केलें स्वप्नामाजी जागें । सवें पांडुरंगें येऊनियां ॥
सांगितलें काम करावें कवित्व । वाउगें निमित्य बोलों नको ॥
माप टाकी सळ धरिलीं विठ्ठलें । थापटोनि केलें सावधान ॥
प्रमाणाची संख्या सांगे शतकोटी । उरले शेवटीं लावी तुका ॥

## उदकीं वह्या राखिल्या

१—२२४१

थोर अन्याय केला तुझा अंत म्यां पाहिला ।
जनाचिया बोलासाठीं चित्त क्षोभविलें ॥
भागविलासी केला सीण अधम मी यातिहीन ।
झांकूनि लोचन दिवस तेरा राहिलों ॥
अवघें घालूनियां कोडें तानभुकेचें सांकडें ।
योगक्षेम पुढें तुज करणें लागेल ॥
उदकीं राखिले कागद चुकविला जनवाद ।
तुका म्हणे ब्रीद साच केलें आपुलें ॥

२—२४९३

तेरा दिवस जाले निश्चक्र करितां । न पवसी अनंता मायबापा ॥
पाषाणांची खोळ घेउनि बैसलासी । काय हृषीकेशी जालें तुज ॥
तुजवरी आतां प्राण मी त्यजीन । हत्या मी घालीन पांडुरंगा ॥
फार विठाबाई धरिली तुझी आस । करीन जीवा नास पांडुरंगा ॥
तुका म्हणे आतां मांडिलें निर्वाण । प्राण हा सांडीन चंद्रभागे ॥

३—२२४५

नव्हती आली सीसा सुरी अथवा घाय पाठीवरी ।
तो म्यां केला हरी एवढा तुम्हां आकांत ॥
वांटिलासी दोहीं ठायीं मजपाशीं आणि डोहीं ।
लागों दिला नाहीं येथें तेथें आघात ॥
जीव घेती मायबापें थोड्या अन्यायाच्या कोपें ॥

हें तों नव्हे सोपें साहो तोंचि जाणीतलें ॥
तुका म्हणे कृपावंता तुज ऐसा नाहीं दाता ।
काय वाणूं आतां वाणी माझी कुंटली ॥

४—२२४३

कापो कोणी माझी मान सुखें पीडोत दुर्जन ।
तुज होय सीण तें मी न करीं सर्वथा ॥
चुकी झाली एक वेळा मजपासूनि चांडाळा ।
उभे करोनियां जळामाजी वह्या राखिल्या ॥
नाहीं केला हा विचार माझा कोण अधिकार ।
समर्थासी भार न कळे कैसा घालावा ॥
गेलें होऊनियां मागें नये बोलों तें वाउगें ।
पुढिलिया प्रसंगें तुका म्हणे जाणावें ॥

## ज्ञानेश्वरस्तवन

१—२३४०

जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ । अंगीं ऐसें बळ रेडा बोले ॥
करील तें काय नव्हे महाराज । परि पाहे बीज शुद्ध अंगीं ॥
जेणें हे घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ॥
तुका म्हणे तेथें सुखा काय उणें । राहे समाधानें चित्ताचिया ॥

२—२३३३

ज्ञानियांचा गुरु राजा महाराव । म्हणती ज्ञानदेव ऐसें तुम्हां ॥
मज पामरा हें काय थोरपण । पायींची वाहाण पायीं बरी ॥
ब्रम्हादिक जेथें तुम्हा वोळगणें । इतर तुळणें काय पुरे ॥
तुका म्हणे नेणें युक्तीची ती खोली । म्हणोनि ठेविली पायीं डोई ॥

३—४३९९ (नि.)

संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥
ज्ञानदेवें घातिला पाया । रचियेलें देवालया ॥
नामा तयाचा किंकर । तेणें केला हा विस्तार ॥

जनार्दन एकनाथ । ध्वज उभारिला भागवत ॥
भजन करा सावकाश । तुका झालासे कळस ॥

४—४३३९

चला आळंदीला जाऊं । ज्ञानदेवा डोळां पाहूं ॥
होतिल संताचिया भेटी । सुखाचिया सांगों गोष्टी ॥
ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर । मुखीं म्हणतां चुकती फेर ॥
तुम्हां जन्म नाहीं एक । तुका म्हणे माझी भाक ॥

## धरणेकरी ब्राह्मणास उपदेश

२३२४

नको कांहीं पडों ग्रंथाचिये भरीं । शीघ्र व्रत करीं हेंचि एक ॥
देवाचिये चाडे आळवावें देवा । ओस देहभावा पाडोनिया ॥
साधनें घालिती काळाचिये मुखीं । गर्भवास सेखीं न चुकती ॥
उधाराचा मोक्ष होय नव्हे ऐसा । पतनासी इच्छा आवश्यक ॥
रोकडी पातली अंगसंगें जरा । आतां उजगरा कोठवरि ॥
तुका म्हणे घालीं नामासाटीं उडी । पांडुरंग थडी पाववील ॥

## महाराजांना पाहून पक्षी उडाले

१५०८

अवघीं भूतें साम्या आलीं । देखिलीं म्यां कैं होतीं ॥
विश्वास तो खरा मग । पांडुरंग कृपेचा ॥
माझी कोणी न धरो शंका । हो कां लोकां निर्द्वंद्व ॥
तुका म्हणे जें जें भेटे । तें तें वाटे मी ऐसें ॥

## लोहगांवीं कीर्तनांत मेलेलें मूल जिवंत होणेविषयीं प्रार्थना

२३१५

अशक्य तों तुम्हां नाहीं नारायणा । निर्जीवा चेतना आणावया ॥
मागें काय जाणों स्वामीचे पवाडे । आतां का रोकडे दावूं नये ॥
थोर भाग्य आम्ही समर्थाचे कासे । म्हणवितों दास काय थोडें ॥
तुका म्हणे माझे निववावे डोळे । दावूनि सोहळे सामर्थ्याचे ॥

## लोहगांवीं महाराजांचे अंगावर ऊन पाणी घातलें

१३१८

जळे माझी काया लागला वोणवा । धांव रे केशवा मायबापा ॥
पेटली सकळ कांति रोमावळी । नावरे हे होळी दहन जालें ॥
फुटोनियां दोन्ही भाग होऊं पाहे । पाहातोसि काय हृदय माझें ॥
घेऊनि जीवन धांवे लवलाहीं । कवणाचें कांहीं न चले येथें ॥
तुका म्हणे माझी तूं होसी जननी । आणीक निर्वाणीं कोण राखे ॥

## जिजाईचें कठोर भाषण

१—५६६

मजचि भोंवता केला येणें जोग । काय याचा भोग अंतरला ॥
चालोनियां घरा सर्व सुखें येती । माझी तों फजीती चुकेचिना ॥
कोणाची वाईल होऊनियां वोढूं । संवसारीं काढूं आपदा किती ॥
काय तरी देऊं तोंडितील पोरें । मरती तरी वरें होतें आतां ॥
कांहीं नेदी वांचों धोवियेलें घर । सारवावया ढोर शेण नाहीं ॥
तुका म्हणे रांड न करितां विचार । वाहुनियां भार कुंथे माथां ॥

२—५६७

काय नेणों होता दावेदार मेला । वैर तो साधिला होउनि गोहो ॥
किती सर्व काळ सोसावें हें दुःख । किती लोकां मुख वासूं तरी ॥
झवे आपुली आई काय माझें केलें । धड या विठ्ठलें संसाराचें ॥
तुका म्हणे येती वाईले असडे । फुंदोनियां रडे हांसे कांहीं ॥

३—५६८

गोणी आली घरा । दाणे खाऊं नेदी पोरा ॥
भरी लोकांची पांटोरी । मेला चोरटा खाणोरी ॥
खवळली पिसी । हाता झोंबे जैसी लांसी ॥
तुका म्हणे खोटा । रांडे संचिताचा सांटा ॥

४—५६९

आतां पोरा काय खासी । गोहो जाला देवलसी ॥
डोचकें तिंबी घातल्या माळा । उद्माचा सांडी चाळा ॥

आपल्या पोटा केली थार । आमचा नाहीं येसपार ॥
हातीं टाळ तोंड वासी । गाय देउळीं देवापासीं ॥
आतां आम्ही करूं काय । न बसे घरीं राणा जाय ॥
तुका म्हणे आतां धीरी । आझुनि नाहीं जालें तरी ॥

५—५७०

बरें जालें गेलें । आजी अवघे मिळाले ॥
आतां खाईन पोटभरी । ओल्या कोरड्या भाकरी ॥
किती तरी तोंड । याशीं वाजवूं मी रांड ॥
तुका वाइले मानवला । चीथू करूनिया बोला ॥

६—३२८७

निजों नेदी सकाळवेळीं । राती काळी चिनचिनी ॥
वोंगळानें घेतली पाठी । केली आटी जीवासी ॥
मेळऊनि सर्वें जन । चिंता नेणें देवळींच ॥
तुका म्हणे आलों घरा । तोंडा घोरा बाइलेच्या ॥

७—५७१

न करवे धंदा । आइता तोंडीं पडे लोंदा ॥
उठितें तें कुटितें टाळ । अवघा मांडिला कोल्हाळ ॥
जिवंतचि मेले । लाजा वाटुनियां प्याले ॥
संसाराकडे । न पाहाती ओस पडे ॥
तळमळती यांच्या रांडा । घालिती जीवा नांवें धोंडा ॥
तुका म्हणे बरें जालें । घे गे बाइले लीहिलें ॥

## महाराजांचा जिजाईस उपदेश

१—१९८१

पिकल्या सेताचा आम्हां देतो वांटा । चौधरी गोमटा पांडुरंग ॥
सत्तर टके बाकी उरली मागे तो हा । मागें झडले दाहा आजिवरी ॥
हांडा भांडीं गुरें दाखवी ऐवज । माजघरीं बाजे बैसलासे ॥
मज यासी भांडतां जाब नेदी वळें । म्हणे एका वेळे घ्याल वांटा ॥
तुका म्हणे स्त्रिये काय वो करावें । नेदितां लपावें काय कोठें ॥

२—५७२

कोण घरा येतें आमुच्या काशाला। काय ज्याचा त्याला नाहीं धंदा ॥
देवासाठीं जालें ब्रम्हांड सोइरें। कोमळ्या उत्तरें काय वेचे ॥
मानें पाचारितां नव्हे आराणुक। ऐसे येती लोक प्रीतीसाठीं ॥
तुका म्हणे रांडे नावडे भूषण। कांतेलेंसें श्वान लागे पाठीं ॥

३—१९८६

नको धरूं आस व्हावें या बाळांस। निर्माण तें त्यांस त्यांचें आहे ॥
आपुला तूं गळा घेई उगवूनि। चुकवीं जाचणी गर्भवास ॥
ऐवज देखोनि बांधितील गळा। म्हणोनि निराळा पळतसे ॥
देखोनियां त्यांचा अवघड मार। कांपे थरथर जीव माझा ॥
तुका म्हणे जरी आहे माझी चाड। तरी करी वाड चित्त आतां ॥

४—१९८७

भले लोक तुज बहु मानवती। वाढेल या कीर्ति जगामाजी ॥
म्हणे मेलीं गुरें भांडीं नेलीं चोरें। नाहींत लेंकुरें जालीं मज ॥
आस निरसूनि कठिण हें मन। करीं वो समान वज्र तैसें ॥
किंचित हें सुख टाकीं वो थुंकोनि। पावसील धनी परमानंद ॥
तुका म्हणे थोर चुकती सायास। भवबंधपाश तुटोनियां ॥

५—१९८८

ऐक हें सुख होईल दोघांसी। सोहळा हे ऋषि करिती देव ॥
जडित विमानें बैसविती मानें। गंधर्वांचें गाणें नामघोष ॥
संत महंत सिद्ध येतील सामोरे। सर्वसुखा पुरे कोड तेथें ॥
आलिंगूनि लोळों त्यांच्या पायांवरी। जाऊं तेथवरी मायबापें ॥
तुका म्हणे तया सुखा वर्णूं काय। जेव्हां बापमाय देखे डोळां ॥

६—१९८९

देव पाहावया करी वो सायास। न धरीं हे आस नाशिवंत ॥
दिन शुद्ध सोम सकाळीं पातला। द्वादशी घडला पर्वकाळ ॥
द्विजां पाचारूनि शुद्ध करी मन। देई वो हें दान यथाविध ॥
नको चिंता करूं वस्त्रा या पोटाची। माउली आमुची पांडुरंग ॥
तुका म्हणे दुरी सांगतों पाल्हाळीं। परी तो जवळी आहे आम्हां ॥

७—११९०

सुख हें नावडे आम्हां कोणा बळें । नेणसी अंधळे जालीशी तूं ॥
भूक तान कैसी राहिली निश्चळ । खुंटलें चपळ मन ठायीं ॥
द्रव्य जीवाहूनि आवडे या जना । आम्हांसी पाषाणाहूनि हीन ॥
सोयरे सज्जन जन आणि वन । अवघें समान काय गुणें ॥
तुका म्हणे आम्हां जवळीच आहे । सुख दुःख साहे पांडुरंग ॥

८—११९१

गुरुरूपें मज बोलविलें देवें । होईल हें घ्यावें हित कांहीं ॥
सत्य देवें माझा केला अंगीकार । आणीक विचार नाहीं आतां ॥
होई वळकट घालूनिया कास । हाचि उपदेश तुज आतां ॥
सडा संमार्जन तुळसी वृंदावन । अतीत पूजन ब्राह्मणाचें ॥
वैष्णवांची दासी होई सर्वभावें । मुखीं नाम घ्यावें विठोबाचें ॥
पूर्णबोध स्त्रीभ्रतारसंवाद । धन्य जिहीं वाद आइकिला ॥
तुका म्हणे आहे पांडुरंगकथा । तरेल जो चित्ता धरील कोणी ॥

## शिवाजीस पत्र

१— १८८६

विरंचीनें केलें ब्रह्मांड सकळ । तयामाजी खेळ नाना युक्ति ॥
युक्तीचा बाळक ब्रह्मनिष्ठ ज्ञानी । गुरुभक्ति मनीं विश्वासेंसी ॥
ऐसा तुझा प्रेमा कळे कांहीं एक । पाहूनियां लेख पत्रिकींचे ॥
शिव तुझें नाम ठेविलें पवित्र । छत्रपति सूत्र विश्वाचें कीं ॥
व्रत नेम तप ध्यानयोग कळा । करूनि मोकळा जालासी तूं ॥
हहेता लागला आमुच्चिये भेटी । पत्रामाजी गोष्टी हेचि थोर ॥
याचें हें उत्तर ऐक गा भूपती । लिहिली विनंती हेताची हे ॥
अरण्यवासी आम्ही फिरों उदासीन । दर्शनही हीन अमंगळ ॥
वस्त्राविण काया जालीसे मळीन । अन्नरहित हीन फळाहारी ॥
रोडके हात पाय दिसे अवकळा । काय तो सोहळा दर्शनाचा ॥
तुका म्हणे माझी विनंती सलगीची । वार्ता हे भेटीची करूं नका ॥

२—१८८८

तुम्हांपाशीं आम्ही येऊनियां काय । वृथा सीण आहे चालण्याचा ॥
मागावें हें अन्न तरी भिक्षा थोर । वस्त्रासी हे थार चिंध्या विदी ॥
निद्रेसी आसन उत्तम पाषाण । वरी आवरण आकाशाचें ॥
तेथें काय करणें कवणाची आस । वायां होय नाश आयुष्याचा ॥
राजगृहा यावें मानाचिये आसे । तेथें काय वसे समाधान ॥
रायाचिये घरीं भाग्यवंता मान । इतरां सामान्यां मान नाहीं ॥
देखोनिया वस्त्रें भूषणांचें जन । तात्काळ मरण येतें मज ॥
ऐकोनियां मानाल उदासता जरी । तरी आम्हां हरि उपेक्षीना ॥
आतां हेंचि तुम्हां सांगणें कौतुक । भिक्षे ऐसें सुख नाहीं नाहीं ॥
तप व्रत याग महां भले जन । आशाबद्ध हीन वर्तताती ॥
तुका म्हणे तुम्ही श्रीमंत मानाचे । पूर्वींच दैवांचे हरिभक्त ॥

३—१८८७

ऐसी माझी वाणी दीनरूप पाहे । हे त्या करुणा आहे हृदयस्थाची ॥
न हों कीविलवाणें नाहीं आम्ही दीन । सर्वदा शरण पांडुरंगीं ॥
पांडुरंग आम्हां पाळिता पोसिता । आणिकांची कथा काय तेथें ॥
तुझी भेट घेणें काय हें मागणें । आशेचें हें शून्य केलें आम्ही ॥
निराशेचा गांव दिधला आम्हांसी । प्रवृत्तिभागासी सांडियेलें ॥
पतिव्रतेचें हें मन पति भेटों । तैसे आम्ही विठोमाजी नांदों ॥
विश्व हें विठ्ठल नाहीं दुजें कांहीं । देखणें तुझेंही तयामाजी ॥
तुज ही विठ्ठल ऐसेंचि वाटलें । परि एक आलें आडवें हें ॥
सद्गुरु श्रीरामदासाचें भूषण । तेथें घाली मन चळों नको ॥
बहुतां ठायीं वृत्ति चावळली जेव्हां । रामदास्य तेव्हां घडे कैसें ॥
तुका म्हणे बापा चातुर्यसागरा । भक्तिभाव तारा भाविकांसी ॥

४—१८८९

आतां एक योग साधावा हा नीट । भल्याचा तों वीट मानूं नये ॥
जेणें योगें तुम्हां घडो पाहे दोष । ऐसा हा सायास करूं नये ॥
निंदक दुर्जन संग्रहीं असती । त्यांची युक्ती चित्तीं आणूं नका ॥

परीक्षावे कोण राज्याचे रक्षक । विवेकाविवेक पाहोनियां ॥
सांगणें न लगे सर्वज्ञ तूं राजा । अनाथांच्या काजा साह्य व्हावें ॥
हेंचि ऐकोनियां चित्त समाधान । आणीक दर्शनें चाड नाहीं ॥
घेऊनियां भेटी कोण हा संतोष । आयुष्याचे दिस गेले गेले ॥
एकदोनी कर्मैं जाणोनियां वर्मैं । आपुलिया भ्रमें राहूं आतां ॥
कल्याणकारक अर्थ याचा एक। सर्वांभूतीं देख एक आत्मा॥
आत्मारामीं मन ठेवूनियां राहें । रामदासीं पाहें आपणेयां ॥
तुका म्हणे राया धन्य जन्म क्षितीं । त्रैलोकीं हे ख्याति कीर्ति तुझी ॥

५—१८९०

आतां हे बिनवणी प्रधानअष्टक । प्रभूसी विवेक समजावा ॥
प्रतिनिधि मानरक्षक चतुर । सात्विकाचें घर तुम्हांपाशीं ॥
मजुमुचे धणी लेखनकारक । पत्रींचा विवेक समजावा ॥
पेशवे सुरनिस चिटनिस डबीर । राजाज्ञा सुमंत सेनापति ॥
भूपण पंडितराय विद्याधन । वैद्यराजा नमन माझें असे ॥
पत्राचा हा अर्थ अंतरीं जाणोनि । विवंचोनि श्रवणीं घाला तया ॥
सात्विक प्रेमळ दृष्टांताच्या मतें । बोलिलों बहुत कळावया ॥
यथास्थित निरोप सांगणें हा राया । अर्थ पहा वायां जाऊं नेदा ॥
भिडेसाटीं बोला गाळूनि अर्थातें । अनर्थकारी तुमतें होइल तेणें ॥
तुका म्हणे तुम्हां नमन अधिकाऱ्या । सांगणें तें राया पत्र माझें ॥

## कीर्तनप्रसंगीं पडलेला परचक्राचा वेढा

१—५५७

न देखवे डोळां ऐसा हा आकांत । परपीडे चित्त दुःखी होतें ॥
काय तुम्ही येथें नसालसें जालें । आम्ही न देखिलें पाहिजे हें ॥
परचक्र कोठें हरिदासांच्या वासें । न देखिजेत देशों राहातिया ॥
तुका म्हणे माजी लाजविली सेवा । हीनपणें देवा जिणें जालें ॥

२—५५८

काय म्यां मानावें हरिकथेचें फळ । तरिजे सकळ जनीं ऐसें ॥
उच्छेद तो असे हा गे आरंभला । रोकडें विठ्ठला परचक्र ॥

पापाविण नाहीं पाप येत पुढें । साक्षीसी रोकडें साक्ष आलें ॥
तुका म्हणे जेथें वसतील दास । तेथें तुझा वास कैसा आतां ॥

३—५५९

भीत नाहीं आतां आपुल्या मरणा । दुःखी होतां जना न देखवे ॥
आमची तो जाती ऐसी परंपरा । कां तुम्ही दातारा नेणा ऐसें ॥
भजनीं विक्षेप तेंचि पैं मरण । न वजवा क्षण एक वायां ॥
तुका म्हणे नाहीं आघाताचा वारा । ते ते स्थळीं दातारा ठाव मागें ॥

४—२४४८

न करावी चिंता । भय न धरावें सर्वथा ॥
दासां साहे नारायण । होय रक्षिता आपण ॥
न लगे परिहार । कांहीं योजावें उत्तर ॥
न धरावी शंका । नये बोलों म्हणे तुका ॥

## देवानें अंगिकार केला

१—१२१९

याती मतिहीन रूपें लीन दीन । आणीक अवगुण जाणोनियां ॥
केला त्या विठ्ठलें माझा अंगीकार । ऐसा हा विचार जाणोनियां ॥
जें कांहीं करितो तें माझें स्वहित । आली हे प्रचित कळों चित्ता ॥
जालें सुख जीवा आनंद अपार । परमानंदें भार घेतला माझा ॥
तुका म्हणे यासी नांवाचा अभिमान । म्हणोनि शरण तारी बळें ॥

२—१६०६

आम्ही जातों तुम्ही कृपा असों द्यावी । सकळां सांगावी विनंती माझी ॥
वाढवेळ जाला उभा पांडुरंग । वैकुंठा श्रीरंग बोलावितो ॥
अंतकाळीं विठो आम्हांसी पावला । कुडीसहित जाला गुप्त तुका ॥

३—३११०

माझा पहा अनुभव । केला देव आपुला ॥
बोलविलें तेंचि द्यावें । उत्तर व्हावें ते काळीं ॥
सोडिलिया जग निंद्य । मग गोविंद म्हणियारा ॥
तुका म्हणे धीर केला । तेणें याला गोविलें ॥

## महाराज कृतकृत्य झाले

१५११

जन्मा आलों त्याचें । आजि फळ जालें साचें ॥
तुम्ही सांभाळिलों संतीं । भय निवारली खंती ॥
कृतकृत्य जालों । इच्छा केली ते पावलों ॥
तुका म्हणे काळ । आतां करूं न शके बळ ॥

## सगुण साक्षात्कार

२४४४

बोलाल या आतां आपुल्यापुरतें । मज या अनंतें गोवियेलें ॥
झाडिला न सोडी हातींचा पालव । वेधी वेधें जीव वेधियेला ॥
तुमचे ते शब्द कोरडिया गोष्टी । मज सर्वे मीठी अंगसंगें ॥
तुका म्हणे तुम्हां होईल हे परी । अनुभव वरी येईल मग ॥

२२४२

तूं कृपाळू माउली आम्हां दीनांची साउली ।
न संरित आली बाळवेशें जवळी ॥
माझें केलें समाधान रूप गोजिरें सगुण ।
निववलें मन आलिंगन देउनि ॥
कृपा केली जनाहातीं पायीं ठाव दिला संतीं ।
कळो नये चित्तीं दुःख कैसें आहे तें ॥
तुका म्हणे मी अन्यायी क्षमा करी वो माझे आई ।
आतां पुढें काई तुज घालूं सांकडें ॥

३२७९

होतों सांपडलों वेठी । जातां भेटी संसारा ॥
तों या वाटे कृपा केली । भेटी जाली विठोबासी ॥
होता भार माथां माझे । बहु ओझें अमुप ॥
तुका म्हणे केली चिंता । कोण दाता भेटेल ॥

३४३३

रुसलों संसारा । आम्ही आणीक व्यापारा ॥
म्हणऊनी केली सांडी । देउनि पडलों मुरकंडी ॥

परते चि ना मागें । मोहो निष्ठुर जालों अंगें ॥
सांपडला देव । तुका म्हणे गेला भेव ॥

४१६७

आतां वाटो नेदीं आपलें हें मन । न सोडी चरण विठोबाचे ॥
दुजियाचा संग लागो नेदीं वारा । आपुल्या शरीरावरूनियां ॥
यावें जावें आम्ही देवाचसांगातें । मागूनी करीत हेंचि आलों ॥
काय वायां गेलों तो करूं उद्वेग । उभा पांडुरंग मागें पुढें ॥
तुका म्हणे प्रेम मागतों आगळें । येथें भोगूं फळें वैकुंठींची ॥

## निराकार विठोबा भेटला

४३५४

पंधरा दिवसांमाजीं साक्षात्कार जाला । विठोबा भेटला निराकार ॥
भांवगिरिपाठारीं वस्ति जाण केली । वृत्ति थिरावली परब्रह्मीं ॥
निर्वाण जाणोनि आसन घातलें । ध्यान आरंभिलें देवाजीचें ॥
सर्प विंचू व्याघ्र आंगासी झोंबले । पीडूं जे लागले सकळिक ॥
दीपकीं कर्पूर कैसा तो विराला । तैसा देह झाला तुका म्हणे ॥

३९९९

तुज मज ऐसी परी । जैसे तरंग सागरीं ॥
दोहींमाजी एक जाणा । विठ्ठल पंढरीचा राणा ॥
देव भक्त ऐसी बोली । जंव भ्रांति नाहीं गेली ॥
तंतु पट जेंवी एक । तैसा विश्वेंसी व्यापक ॥

४१५९

स्थिरावली वृत्ति पांगुळला प्राण । अंतरींची खूण पावूनियां ॥
पुंजाळले नेत्र जाले अर्धोन्मीलित । कंठ सद्‌गदित रोमांच आले ॥
चित्त चाकाटलें स्वरूपा माझारीं । न निघे बाहेरी सुखावलों ॥
सुनीळ प्रकाश उदैजला दिन । अमृताचें पान जीवनकळा ॥
शशिसूर्या जाली जीवें ओवाळणी । आनंदा दाटणी आनंदाची ॥
तुका म्हणे सुखें प्रेमासी डुलत । वीरालों निश्चित निश्चितीनें ॥

४३२७

पांडुरंगें सत्य केला अनुग्रह । निरसोनि संदेह बुद्धिभेद ॥
जीवशिवा सेज रचिली आनंदें । आउठावे पदीं आरोहण ॥
निजीं निजरूपीं निजविला तुका । अनुहातें बाळका हलरु गाती॥

## शेवटची विनंति

४४०५

शेवटींची विनंती । ऐका ऐका कमळापती ॥
काया वाचा मन । चरणीं असे समर्पण ॥
जीव परमात्मा ऐक्यासी । सदा वसो हृदयेंसी ॥
तुका म्हणे देवा । कंठीं वसावे केशवा ॥

## महाराजांचें प्रयाण

१५९६

पैल आले हरि । शंखचक्र शोभे करीं ॥
गरुड येतो फडत्कारें । ना भी ना भी म्हणे खरे ॥
मुगुट कुंडलांच्या दीप्ति । तेजें लोपला गभस्ति ॥
मेघश्यामवर्ण हरि । मूर्ति डोळस साजिरी ॥
चतुर्भुज वैजयंती । गळां माळ हे रुळती ।
पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा ॥
तुका जालासे संतुष्ट । घरा आलें वैकुंठपीठ ॥

१५९७

शंख चक्र गदा पद्म । पैल आला पुरुषोत्तम ॥
ना भी ना भी भक्तराया । वेगीं पावलों सखया ॥
दुरुनि येतां दिसे दृष्टी । धाकें दोष पळती सृष्टी ॥
तुका देखोनि एकला । वैकुंठीहूनि हरि आला ॥

१५९८

पैल दिसतील भार । दिंडी पताका अपार ॥
आला पंढरीचा राणा । दिसतील त्याच्या खुणा ॥
सुख वाटे मना । डोळे बाह्या स्फुरती ॥

उठिले गजर नामाचे । दळभार वैष्णवांचे ॥
तुका करी रिता ठाव । त्यांसी बैसावया वाव ॥

१५९९

चला जाऊं रे सामोरे । पुढें भेटों विठ्ठल धुरे ॥
तुका आनंदला मनीं । कैसा जातो लोटांगणीं ॥
फेडावया धणी प्रेमसुखाची आजि ॥
पुढें आले कृपावंत । मायबाप साधुसंत ॥
तुका आळंगिला नाहीं । ठेविला विठोबाचे पायीं ॥

१६०३

सकळही माझी बोळवण करा । परतोनि घरा जावें तुम्ही ॥
कर्मधर्में तुम्हां असावें कल्याण । घ्या माझें वचन आशीर्वाद ॥
वाढवूनि दिलों एकाचिये हातीं । सकळ निश्चिती जाली तेथें ॥
आतां मज जाणें प्राणेश्वरासवें । माझिया भावें अनुसरलों ॥
वाढवितां लोभ होईल उसीर । अवघींच स्थिर करा ठायीं ॥
धर्म अर्थ काम ज़ाला एके ठायीं । मेळविला जिहीं हाताहात ॥
तुका म्हणे आतां जाली हेचि भेटी । उरल्या त्या गोष्टी बोलावया ॥

१६०९

वाराणसीपर्यंत असों सुखरूप । सांगावा निरोप संतांसी हा ॥
येथूनियां जाणे आम्हां निजधामा । सवें असे अम्हां गरुड हा ॥
कृपा असों द्यावी मज दीनावरी । जातसों माहेरी तुका म्हणे ॥

१६०६

आम्ही जातों तुम्ही कृपा असों द्यावी । सकळा सांगावी विनंती माझी ॥
वाढवेळ जाला उभा पांडुरंग । वैकुंठा श्रीरंग बोलावितो ॥
अंतकाळी विठो आम्हांसी पावला । कुडीसहित जाला गुप्त तुका ॥

४४७१

आम्ही जातों आपुल्या गांवा । आमुचा रामराम घ्यावा ॥
तुमची आमची हेचि भेटी । येथुनियां जन्मतुटी ॥
आतां असों द्यावी दया । तुमच्या लागतसें पायां ॥
येतां निजधामीं कोणी । विठ्ठल विठ्ठल बोला वाणी ॥
रामकृष्ण मुखीं बोला । तुका जातो वैकुंठाला ॥

## आश्रमी

१४८४

आश्रमीं विचार षट्कर्मं ॥

## आत्महत्या

४४६३

अतित्यांई देतां जीव । नये कींव देवासि ॥
थोड्यासाठीं राग आला । जीव दिला गंगेंत ॥
त्यासि परलोकीं नाहीं मुक्ति । अधोगति चुकेना ॥
तुका म्हणे कृष्णराम । स्मरतां श्रम वारती ॥

## आरती

५०८

करूनि आरती । आतां ओवाळूं श्रीपती ॥
आजि पुरले नवस । धन्य जाला हा दिवस ॥
पाहा वो सकळा । पुण्यवंता तुम्ही बाळा ॥
तुका वाहे टाळी । होता सन्निध जवळी ॥

## आचाराचें बंधन

३९२५

शिखासूत्र तुझा गुंतला जमान । तंववर तूं जाण श्रुतिदास ॥
त्याची तुज कांहीं चुकतांचि नीत । होसील पतित नरकवासी ॥
बहुत जालासी चतुर शहाणा । शुद्ध आचरणा चुकों नको ॥
शिखासूत्र याचा तोडी तूं संबंध । मग तुज बाध नाहीं नाहीं ॥
तुका म्हणे तरि वर्त्तूनि निराळा । उमटती कळा ब्रम्हींच्या ॥

## आयुष्याची इतिकर्तव्यता

५२०

आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी ।
बोलिले जे ऋषी । साच भावें वर्तावया ॥
सांडूं संतांचे मारग । आडरानें भरलें जग ।

उच्छिष्टाचा भाग । शेष उरलें तें सेवूं ॥
अर्थें लोपलीं पुराणें । नाश केला शब्दज्ञानें ।
विषयलोभी मन । साधनें बुडविलीं ॥
पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।
तुका म्हणे करा । जयजयकार आनंदें ॥

## ईश्वराचें वास्तव्य

४५

दुजें खंडे तरी । उरला तो अवघा हरि ॥
आपणा बाहेरी । नलगे ठाव धुंडावा ॥
इतुलें जाणावया जाणा । कोण्डे तरी मनें मना ॥
पारधीच्या खुणा । जाणतेंचि साधावें ॥
देह आधीं काय खरा । देह संबंध पसारा ॥
बुजगावणें चोरा । रक्षणसें भासतें ॥
तुका करी जागा । नको वासपूं वाउगा ॥
आहेसी तूं आगा । अंगीं डोळे उघडी ॥

४४८२

देहीं असोनिया देव । वृथा फिरतो निर्दैव ॥
देव आहे अंतर्यामीं । व्यर्थ हिंडे तीर्थग्रामीं ॥
नाभी मृगाचे कस्तुरी । व्यर्थ हिंडे वनांतरीं ॥
साखरेचें मूळ ऊंस । तैसा देहीं देव दिसे ॥
दुधीं असतां नवनीत । नेणें तयाचें मथित ॥
तुका सांगे मूढ जना । देहीं देव कां पाहाना ॥

## उदार

२३१२

उदार तो जीव-भाव रे ठेवी देवाचे पायीं ॥

## उथळ

२३१२

उथळ धीर नाहीं अंगीं रे म्हणे होईल कैसें ॥

## उपाधी

८०

उपाधीच्या नांवें घेतला सिंतोडा । नेदूं आतां पीडा आतळों ते ॥
काशासाठीं हात भरूनि धुवावे । चालतिया गोवे मारगासि ॥
काय नाहीं देवें करूनि ठेविलें । असे तें आपुलें ते ते ठायीं ॥
तुका म्हणे जेव्हां गेला अहंकार । तेव्हां आपपर बोळविले ॥

## उपदेश व अनुभव यांतील भेद

१३७०

न संगावें वर्म । जनीं असों द्यावा भ्रम ॥
उगीच लागतील पाठीं । होतीं रितींच हिंपुटीं ॥
सिकविल्या गोष्टी । शिकोन न धरिती पोटीं ॥
तुका म्हणे सीण । होईल अनुभवाविण ॥

३१२८

नका दंतकथा येथें सांगों कोणी । कोरडे ते मानी बोल कोण ॥
अनुभव येथें व्हावा शिष्टाचार । न चलती चार आम्हांपुढें ॥
निवडी वेगळें क्षीर आणि पाणी । राजहंस दोन्ही वेगळालीं ॥
तुका म्हणे येथें पाहिजे जातीचे । येरा गावाळाचें काय काम ॥

## उपदेश

२३१३

करावा कैवाड । नाहीं तरी आला नाड ॥
स्मरा पंढरीचा देव । मनीं धरोनिया भाव ॥
खचविलें काळें । उगवा लवलाहें जाळें ॥
गजर नामाचा । करा लवलाहे वाचा ॥
घरटी चक्रफेरा । जन्ममृत्याचा भोंवरा ॥
नाना हव्यासांची जोडी । तृष्णा करी देशधडी ॥
चरणीं ठेवा चित्त । म्हणवा देवाचे अंकित ॥
छंद नाना परी । कळा न पविजे हरि ॥
जगाचा जनिता । भुक्तिमुक्तींचाही दाता ॥

उच्छिष्टाचा भाग । शेष उरलें तें सेवूं ॥
अर्थें लोपलीं पुराणें । नाश केला शब्दज्ञानें ।
विषयलोभी मन । साधनें बुडविलीं ॥
पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।
तुका म्हणे करा । जयजयकार आनंदें ॥

## ईश्वराचें वास्तव्य

४५

दुजें खंडे तरी । उरला तो अवघा हरि ॥
आपणा बाहेरी । नलगे ठाव धुंडावा ॥
इतुलें जाणावया जाणा । कोण्डे तरी मनें मना ॥
पारधीच्या खुणा । जाणतेंचि साधावें ॥
देह आधीं काय खरा । देह संबंध पसारा ॥
बुजगावणें चोरा । रक्षणसें भासतें ॥
तुका करी जागा । नको वासपूं वाउगा ॥
आहेसी तूं आगा । अंगीं डोळे उघडी ॥

४४८२

देहीं असोनिया देव । वृथा फिरतो निर्दैव ॥
देव आहे अंतर्यामीं । व्यर्थ हिंडे तीर्थग्रामीं ॥
नाभी मृगाचे कस्तुरी । व्यर्थ हिंडे वनांतरीं ॥
साखरेचें मूळ ऊंस । तैसा देहीं देव दिसे ॥
दुधीं असतां नवनीत । नेणें तयाचें मथित ॥
तुका सांगे मूढ जना । देहीं देव कां पाहाना ॥

## उदार

२३१२

उदार तो जीव-भाव रे ठेवी देवाचे पायीं ॥

## उथळ

२३१२

उथळ धीर नाहीं अंगीं रे म्हणे होईल कैसें ॥

## उपाधी

८०

उपाधीच्या नांवें घेतला सिंतोडा । नेदूं आतां पीडा आतळों ते ॥
काशासाठीं हात भरूनि धुवावे । चालतिया गोवे मारगासि ॥
काय नाहीं देवें करूनि ठेविलें । असे तें आपुलें ते ते ठायीं ॥
तुका म्हणे जेव्हां गेला अहंकार । तेव्हां आपपर बोळविले ॥

## उपदेश व अनुभव यांतील भेद

१३७०

न संगावें वर्म । जनीं असों द्यावा भ्रम ॥
उगीच लागतील पाठीं । होतीं रितींच हिंपुटीं ॥
सिकविल्या गोष्टी । शिकोन न धरिती पोटीं ॥
तुका म्हणे सीण । होईल अनुभवाविण ॥

३१२८

नका दंतकथा येथें सांगों कोणी । कोरडे ते मानी बोल कोण ॥
अनुभव येथें व्हावा शिष्टाचार । न चलती चार आम्हांपुढें ॥
निवडी वेगळें क्षीर आणि पाणी । राजहंस दोन्ही वेगळालीं ॥
तुका म्हणे येथें पाहिजे जातीचे । येरा गाबाळाचें काय काम ॥

## उपदेश

२३१३

करावा कैवाड । नाहीं तरी आला नाड ॥
स्मरा पंढरीचा देव । मनीं धरोनिया भाव ॥
खचविलें काळें । उगवा लवलाहें जाळें ॥
गजर नामाचा । करा लवलाहे वाचा ॥
घरटी चक्रफेरा । जन्ममृत्याचा भोंवरा ॥
नाना हव्यासांची जोडी । तृष्णा करी देशधडी ॥
चरणीं ठेवा चित्त । म्हणवा देवाचे अंकित ॥
छंद नाना परी । कळा न पविजे हरि ॥
जगाचा जनिता । भुक्तिमुक्तींचाही दाता ॥

झणी माझें माझें । भार वागविसी ओझें ॥
यांची कां रे गेली बुद्धि । नाहीं तरायाची शुद्धि ॥
टणक धाकुलीं । अवघीं सरती विठ्ठलीं ॥
ठसा त्रिभुवनीं । उदार हा शिरोमणी ॥
डगमगी तो वायां जाय । धीर नाहीं गोता खाय ॥
ढळों नये जरी । लाभ घरिचिया घरीं ॥
नाहीं ऐसें राहे । कांहीं नासिवंत देहे ॥
तरणा भाग्यवंत । नटे हरिकीर्तनांत ॥
थडी टाकी पैलतीर । वाहे ठोके होय वीर ॥
दया तिचें नांव । अहंकार जाय जंव ॥
धनधान्य हेवा । नाडें कुटुंबाची सेवा ॥
नाम गोविंदाचें । घ्या रे हेंचि भाग्य साचें ॥
पर उपकारा । वेचा शक्ति निंदा वारा ॥
फळ भोग इच्छा । देव आहे जयां तैसा ॥
बरवा ऐसा छंद । वाचे गोविंद गोविंद ॥
भविष्याचे माथां । भजन न द्यावें सर्वथा ॥
माग लागला न संडीं । अळसें माती घाली तोंडीं ॥
यश कीर्ति मान । तरी जोडे नारायण ॥
रवि लोपे तेजें । जरी हारपे हें दुजें ॥
ळकार लाविला । असतां नसतांचि उगला ॥
वासनेची धाडी । बंद खोड्या नाड्या बेडी ॥
सरतें न कळे । काय झांकियेले डोळे ॥
खंती ते न धरा । होणें गाढव कुतरा ॥
सायासाच्या जोडी । पिके काढियेल्या पेडी ॥
हातीं हित आहे । परि न करिसी पाहें ॥
अलंकार लेणें । ल्या रे तुळसी मुद्राभूषणें ॥
ख्याती केली विष्णुदासीं । तुका म्हणे पाहा कैसी ॥

६६१

इतुलें करीं भलत्या परी । परद्रव्य परनारी ॥
सांडुनि अभिलाष अंतरीं । वर्ते वेव्हारीं सुखरूप ॥

न करीं दंभाचा सायास । शांती राहें बहुवस ॥
जिव्हे सेवीं सुगंधरस । न करीं आळस रामनामीं ॥
जनमित्र होई सकळांचा । अशुभ न बोलावी वाचा ॥
संग न धरावा दुर्जनाचा । करी संतांचा सायास ॥
करिसी देवाविण आस । अवघी होईल निरास ॥
तृष्णा वाढविसी बहुवस । कधीं सुखास न पवसी ॥
धरूनि विश्वास करी धीर । करितां देव हाचि निर्धार ॥
तयाचा वाहे योगक्षेमभार । नाहीं अंतर तुका म्हणे ॥

६२३

आले हो संसारा तुम्ही एक करा । मुक्तिमारग हळूचि धरा ॥
काळदंड कुंभयातना थोरा । कां रे अघोरा दचकसी ना ॥
नाहीं त्या यमासि करुणा । बाहेर काढितां कुडी प्राणा ॥
ओढाळ सांपडे जें धान्या । चोर यातना धरिजेतां ॥
नाहीं दिलें पावेल कैसा । चालतां पंथ तेणें वळसा ॥
नसेल ठाउकें ऐकतो कैसा । नेती बंद जैसा धरोनियां ॥
क्षण एक नागीवा पायीं । न चलवे तया करितां कांहीं ॥
ओढिती कांटवणा सोई । अग्निस्तंभीं बाही कवटाळविती ॥
देखोनि अंगें कांपती । तये नदीमाजी चालविती ॥
लागे ठाव न लगे बुडविती । वरि मारिती यमदंड ॥
तानभूक न साहावे वेळ । तो राखिती कितीएक काळ ॥
पिंड पाळूनि कैसा सीतळ । तो तप्तभूमीं ज्वाळ लोळविती ॥
म्हणउनि करा कांहीं सायास । व्हावेल तर व्हारे उदास ॥
करवेल तर करा नामघोष । सेवा भक्तिरस तुका म्हणे ॥

६४५

अवघ्या दशा येणें साधती । मुख्य उपासना सगुण भक्ति ।
प्रगटे हृदयींची मूर्ति । भावशुद्धि जाणोनियां ॥
बीज आणि फळ हरीचें नाम । सकळ पुण्य सकळ धर्म ।
सकळां कळांचें हें वर्म । निवारी श्रम सकळही ॥
जेथें कीर्तन हें नामघोष । करिती निर्लज्ज हरीचे दास ।

सकळ वोथंवले रस । तुटती पाश भवबंधाचे ॥
येती अंगा वसती लक्षणें । अंतरीं देवें धरिलें ठाणें ।
आपणचि येती तयाचे गुण । जाणेंयेणें खुंटे वस्तीचें ॥
न लगे सांडावा आश्रम । उपजले कुळींचे धर्म ।
आणीक न करावे श्रम । एक पुरे नाम विठोबाचें ॥
वेद्पुरुष नारायण । योगियांचें ब्रह्म शून्य ।
मुक्ता आत्मा परिपूर्ण । तुका म्हणे सगुण भोळ्या आम्हां ॥

६५०

हेंचि भवरोगाचें औषध । जन्म जरा तुटे व्याध ।
आणीक कांहीं नव्हे बाध । करील वध षड्वर्गा ॥
सांवळें रूप ल्यावें डोळां । सा चौ अठरांचा गोळा ।
पदर लागों नेदी खळा । नाममंत्रमाळा विष्णुसहस्र ॥
भोजना न द्यावें अन्न । जेणें चुके अनुपान ।
तरीच घेतल्याचा गुण । होईल जाण सत्य भाव ॥
नये निघों आपुलिया घरा । बाहेर लागों नये वारा ।
बहु बोलणें तें सारा । संग दुसरा वर्जावा ॥
पास तें एक द्यावें वरी । नवनीताची होईल परी ।
होईल गुसळिलें तें निवारी । सार भीतरी नाहीं तया ॥
न्हायें अनुतापीं पांघरें दिशा । स्वेद निघों दे अवघी आशा ।
होसिल मागें होतासी तैसा । तुका म्हणे दशा भोगीं वैराग्य ॥

२६१८

जग ऐसें बहुनांवें । बहुभावें भावना ॥
पाहों बोलों बहु नये । सत्य काय सांभाळा ॥
कारियासी जें कारण । तें जतन करावें ॥
तुका म्हणे संतजनीं । हेंचि मनीं धरावें ॥

२८६४

जोडोनियां धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेच करी ॥
उत्तमची गति तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ॥
परउपकारी नेणें परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ॥

भूतदया गाईपशूंचें पालन । तान्हेल्या जीवन वनामाजीं ॥
शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचें ॥
तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ । परमपद बळ वैराग्याचें ॥

६१

पराविया नारी माउलीसमान । मानिलिया धन काय वेचे ॥
न करितां परनिंदा परद्रव्य अभिलाष । काय तुमचें यास वेचे सांगा ॥
बैसलिये ठायीं म्हणतां रामराम । काय होय श्रम ऐसें सांगा ॥
संताचे वचनीं मानितां विश्वास । काय तुमचें यास वेचे सांगा ॥
खरें बोलतां कोण लागती सायास । काय वेचे यास ऐसें सांगा ॥
तुका म्हणे देव जोडे याचसाठीं । आणीक ते आटी नलगे कांहीं ॥

३९४९

आलिया संसारा उठा वेग करा । शरण जा उदारा पांडुरंगा ॥
देह हें देवाचें धन कुबेराचें । तेथें मनुष्याचें काय आहे ॥
देता देवविता नेता नेवविता । येथें याची सत्ता काय आहे ॥
निमित्याचा धनी केला असे प्राणी । माझें माझें म्हणोनि व्यर्थ गेला ॥
तुका म्हणे का रे नाशवंतासाठीं । देवासवें आटी पाडितोसी ॥

३८१२

सांगतों तरि तुम्ही भजा रे विठ्ठला । नाहीं तरि गेला जन्म वांया ॥
करितां भरोवरी दुरावसी दुरी । भवाचिये पुरीं वाहावसी ॥
कांहीं न लगे एक भावचि कारण । तुका म्हणे आण विठ्ठलाची ॥

१२०९

अरे गिळिलें हो संसारें । कांहीं तरि राखा खरें ।
दिला रुणाकरें । मनुष्यदेह सत्संग ॥
येथें न घलीं न घलीं आड । संचितसा शब्द नाड ।
उठाउठीं गोड । बीजें बीज वाढवा ॥
केलें तें क्रियमाण । जालें तें संचित म्हण ।
प्रारब्ध जाण । उरवरित उरलें तें ॥
चित्त खोटें चालीवरि । रोग भोगाचे अंतरीं ।
रसने अनावरी । तुका म्हणे ढुंग वाहे ॥

३९१५

मोलाचें आयुष्य वेचुनियां जाय । पूर्वपुण्यें होय लाभ याचा ॥
अनंत जन्मींचे शेवट पाहतां । नरदेह हातां आला तुझ्या ॥
कराल ते जोडी येईल कार्यासी । ध्यावें विठ्ठलासी सुखालागीं ॥
सांचलिया धन होईल ठेवणें । तैसा नारायण जोडी करा ॥
करा हरिभक्ती परलोकीं ये कामा । सोडवील यमापासोनियां ॥
तुका म्हणे करा आयुष्याचें मोल । नका वेचूं बोल नामेंविण ॥

१११

आतां उघडीं डोळे । जरी अद्यापि न कळे ॥
तरी मातेचिये खोळे । दगड आला पोटासि ॥
मनुष्य देहा ऐसा निध । साधिली ते साधे सिद्ध ॥
करूनि प्रबोध । संत पार उतरले ॥
नाव चंद्रभागे तीरीं । उभी पुंडलीकाचे द्वारीं ॥
कट धरूनियां करीं । उभा उभी पालवी ॥
तुका म्हणे फुकासाठीं । पायीं घातली या मिठी ॥
होतो उठाउठी । लवकरीच उतार ॥

२३१०

कां रे नाठविसी कृपाळु देवासी । पोसितो जनासी एकला तो ॥
बाळा दुधा कोण करितें उत्पत्ती । वाढवी श्रीपती सवें दोन्ही ॥
फुटती तरुवर उष्णकाळमासीं । जीवन तयांसी कोण घाली ॥
तेणें तुझी काय नाहीं केली चिंता । राहे त्या अनंता आठवूनि ॥
तुका म्हणे ज्याचें नाम विश्वंभर । त्याचें निरंतर ध्यान करीं ॥

९११

दुःखाचे डोंगर लागती सोसावे । ऐसें तंव ठावें सकळांसी ॥
कांहीं न करिती विचार हिताचा । न करिती वाचा नामघोष ॥
भोग कळों येतो मागिल ते जन्म । उत्तम मध्यम कनिष्ठ ते ॥
तुका म्हणे येथें झांकतील डोळे । भोग देतेवेळे येइल कळों ॥

१२८६

म्हणतां हरिदास कां रे नाहीं लाज । दीनास महाराज म्हणसी हीना ॥

काय ऐसें पोट न भरे तें गेलें । हालविसी कुले सभेमाजी ॥
तुका म्हणे पोटें केली विटंबना । दीन जाला जना कींव भाकी ॥

३८८९

नित्य उठोनियां खायाचीच चिंता । आपुल्या तूं हिता नाठवीसी ॥
जननीचे पोटीं उपजलासी जेव्हां । चिंता तुझी तेव्हां केली तेणें ॥
चातका लागूनि मेघ नित्य वर्षे । तो तुज उदास करील कैंवी ॥
पक्षी वनचरें आहेत भूमी वरि । तयांलागीं हरि उपेक्षीना ॥
तुका म्हणे भाव धरुन राहे चित्तीं । तरि तो श्रीपति उपेक्षीना ॥

३८८६

भक्तिभावें करी बैसोनि निश्चित । नको गोवूं चित्त प्रपंचासी ॥
एका दृढ करी पंढरीचा राव । मग तुज उपाव पुढिल सुचे ॥
नको करूं कांहीं देवतापूजन । जपतप ध्यान तेंही नको ॥
मानिसील म्हणी आपलिक कांहीं । येरझार पाहीं न चुके कदा ॥
ऐसे जन्म किती पावलासी देहीं । अझूनि कां नाहीं कळली सोय ॥
सोय धरी आतां होय पां सावध । अनुभव आनंद आहे कैसा ॥
सहज कैसें आहे तेथीचें तें गुज । अनुभवें निज पाहे तुकीं ॥
तुका म्हणे आतां होई तूं सावध । तोडी भवबंध एका जन्में ॥

९४९

आठवे देव तो करावा उपाव । येर तजीं वाव खटपटा ॥
होई बा जागा होई बा जागा । वाउगा कां गा सिणसील ॥
जाणिवेच्या भारें भवाचिये डोहीं । बुडसी तों कांहीं निघेसि ना ॥
तुका म्हणे देवा पावसील भावें । जाणतां तें ठावें कांहीं नव्हे ॥

३४२

अन्नाच्या परिमळें जरि जाय भूक । तरि कां हे पाक घरोघरीं ॥
आपुलालें तुम्ही करा रे स्वहित । वाचे स्मरा नित्य राम राम ॥
देखोनि जीवन जरि जाय तान । तरि कां सांठवण घरोघरीं ॥
देखोनियां छाया सुख न पवीजे । जंव न बैसीजे तया तळीं ॥
हित तरी होय गातां आईकतां । जरि राहे चित्ता दृढ भाव ॥
तुका म्हणे होसी भावेंचि तूं मुक्त । काय करिसी युक्त जाणिवेची ॥

१४९६

वाटे या जनाचें थोर वा आश्चर्य । न करिती विचार कां हिताचा ॥
कोण दम ऐसा आहे यांचे पोटीं । येईल शेवटीं कोण कामा ॥
काय मानुनियां राहिले निश्चिंती । काय जाव देती यमदूतां ॥
कां हीं विसरलीं मरण बापुडीं । काय यांसी गोडी लागलीसे ॥
काय हातीं नाहीं करील तयासी । काय जालें यांसी काय जाणों ॥
कां हीं नाठविती देवकीनंदना । सुटाया बंधनापासूनियां ॥
काय मोल यासी लागे धन वित्त । कां हें यांचें चित्त घेत नाहीं ॥
तुका म्हणे कांहीं भोगितील खाणी । कां त्या चक्रपाणी विसरलीं ॥

३४८९

पडिली हे रूढि जगा परिचार । चालविती वेव्हार सत्य म्हूण ॥
मरणाची कां रे नाहीं आठवण । संचिताचा धन लोभ हेवा ॥
देहाचें भय तें काळाचें भातुकें । ग्रासूनि तें एकें ठेविलेसें ॥
तुका म्हणे कांहीं उघडा रे डोळे । जाणोनि अंधळे होऊं नका ॥

१७८३

म्हणसी होऊनी निश्चिंता । हरूनिया अवघी चिंता ॥
मग जाऊं एकांता । भजन करूं ॥
संसार संभ्रमें आशा लागे पाठी । तेणें जीवासाटी होईल तुझ्या ॥
सेकीं नाडसील नाडसील । विषयसंगें अवघा नाडसील ॥
मागुता पडसील भवडोहीं ॥
शरीर सकळ मायेचा बांधा । यासी नाहीं कधीं अराणूक ॥
करिती तडतोडी आंत बाह्यात्कारी । ऐसे जाती चारी दिवस वेगीं ॥
मोलाची घडी जाते वांयाबीण । न मिळे मोल धन देतां कोडी ॥
जागा होई करी हिताचा उपाय । तुका म्हणे हाय करिसी मग ॥

१०१

आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥
सकळांच्या पायां माझे दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥
हित तें करावें देवाचें चिंतन । करूनियां मन एकविध ॥
तुका म्हणे लाभ होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥

११४२

ऐके रे जना तुझ्या स्वहिताच्या खुणा ।
पंढरीचा राणा मनामाजीं स्मरावा ॥
मग कैंचे रे बंधन वाचे गातां नारायण ।
भवसिंधु तो जाण ये च्चि तीरीं सरेल ॥
दास्य करील कळिकाळ बंद तुटेल मायाजाळ ।
होतील सकळ रिद्धिसिद्धी म्हणियारीं ॥
सकळ शास्त्रांचें सार हें वेदांचें गव्हर ।
पाहातां विचार हाचि करिती पुराणें ॥
ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र चांडाळां आहे अधिकार ।
बाळें नारीनर आदि करोनि वेश्या ही ॥
तुका म्हणे अनुभवें आम्हीं पाडियलें ठावें ।
आणीक ही दैवें सुख घेती भाविकें ॥

२८४६

साधकाची दशा उदास असावी । उपाधी नसावी अंतर्बाही ॥
लोलुपता काय निद्रेतें जिणावें । भोजन करावें परमित ॥
एकांतीं लोकांतीं स्त्रियांशीं वचन । प्राण गेल्या जाण बोलों नये ॥
संग सज्जनाचा उच्चार नामाचा । घोष कीर्तनाचा अहर्निशीं ॥
तुका म्हणे ऐशा साधनीं जो राहे । तोचि ज्ञान लाहे गुरु कृपा ॥

१४८६

निर्वाहापुरतें अन्न आच्छादन । आश्रमासी स्थान कोंपी गुहा ॥
कोठें ही चित्तासी नसावें बंधन । हृदयीं नारायण साठवावा ॥
नये बोलों फार बैसों जनामधीं । सावधान बुद्धी इंद्रियें दमी ॥
तुका म्हणे घडी घडीनें साधावी । त्रिगुणांची गोवी उगवूनि ॥

१६९४

हित व्हावें तरी दंभ दुरी ठेवा । चित्तशुद्धि सेवा देवाची हे ॥
आवडी विठ्ठल गाईजे एकांतीं । अलभ्य ते येती लाभ घरा ॥
आणीकां अंतरीं न द्यावी वसति । करावी हे शांती वासनेची ॥
तुका म्हणे वाण हाचि निर्वाणींचा । वाउगी हे वाचा वेचूं नये ॥

१७३३

बैसोनि निवांत शुद्ध करी चित्त । तया सुखा अंतपार नाहीं ॥
येऊनि अंतरीं राहील गोपाळ । सायासाचें फळ बैसलिया ॥
रामकृष्ण हरि मुकुन्द मुरारि । मंत्र हा उच्चारी वेळोवेळां ॥
तुका म्हणे ऐसें देईन मी दिव्य । जरी होइल भाव एकविध ॥

२८६६

नये वांटूं मन । कांहीं न देखावें भिन्न ॥
पाय विठोबाचे चित्तीं । असों द्यावे दिवसराती ॥
नये काकुळती । कोणा यावें हरिभक्ति ॥
तुका म्हणे साई । करील कृपेची विठाई ॥

१४१६

न लगे देशकाळ । मंत्रविधानें सकळ ।
मनेंचि निश्चळ । करुनि करुणा भाकावी ॥
येतो बैसलिया ठाया । आसनें व्यापी देवराया ।
निर्मळ ते काया । अधिष्ठान तयाचें ॥
कल्पनेचा साक्षी । तरि आदरेंचि लक्षी ।
आवडीनें भक्षी । कोरडें धान्य मटमटां ॥
घेणें तरी भाव । लक्षी दासांचा उपाव ।
तुका म्हणे जीव । जीवीं मेळविल अनंत ॥

३६३६

सत्य आठवितां देव । जातो भेव पळोनि ॥
न लगे कांहीं करणें चिंता । धरी सत्ता सर्व तो ॥
भावें भाव राहे पायीं । देव तैं संनिध ॥
तुका म्हणे कृष्णनामें । शीतळ प्रेम सर्वांसी ॥

३९७३

कठिण नारळाचें अंग । बाहेरी भीतरी तें चांग ॥
तैसा करी कां विचार । शुद्ध कारण अंतर ॥
वरि कांटे फणसफळा । माजि अंतरीं जिव्हाळा ॥
ऊंस बाहेरी कठिण काळा । माजी रसाचा जिव्हाळा ॥
मिठें रुचविलें अन्न । नये सतंत कारण ॥

२७५७

चुकलिया ताळा । वाती घालुनि बैसे डोळां ॥
तैसें जागे करी चित्ता । कांहीं आपुलिया हिता ॥
निक्षेपिलें धन । तेथें गुंतलेंसे मन ॥
नाशिवंतासाठीं । तुका म्हणे करिसी आटी ॥

९०६

उचित जाणावें मुख्य धर्म आधीं । चितशुद्ध बुद्धी ठायीं स्थीर ।
न घलावी धांव मनाचिये ओढी । वचन आवडी संताचिये ॥
अंतरीं या राहे वचनाचा विश्वास । न लगे उपदेश तुका म्हणे ॥

१०८

जेणें घडे नारायणीं अंतराय । होत बाप माय वर्जावीं तीं ॥
येर प्रिया पुत्र धना कोण लेखा । करिती तीं दुःखा पात्र शत्रू ॥
प्रल्हादें जनक बिभीषणें बंधु । राज्यमाता निंदु भरतें केली ॥
तुका म्हणे सर्व धर्म हरिचे पाय । आणीक उपाय दुःखमूळ ॥

१२०८

न मनावें तैसें गुरूचें वचन । जेणें नारायण अंतरे तें ॥
देव जोडे तरी करावा अधर्म । अंतरे तें कर्म नाचरावें ॥

७६७

एका बीजा केला नास । मग भोगलें कणीस ॥
कळे सकळां हा भाव । लहान थोरांवरी जीव ॥
लाभ नाहीं फुकासाठीं । केल्याविण जीवासाठीं ॥
तुका म्हणे रणीं । जीव देतां लाभ दुणी ॥

२०९६

लय लक्षूनिया जालों म्हणती देव । तोही नव्हे भाव सत्य जाणा ॥
जालों बहुश्रुत न लगे आतां कांहीं । नको राहूं तेही निश्चितीनें ॥
तपें दानें काय मानिसी विश्वास । बीज फळ त्यास आहे पुढें ॥
कर्म आचरण यातीचा स्वगुण । विशेष तो गुण काय तेथें ॥
तुका म्हणे जरी होईल निष्काम । तरिच होय राम देखे डोळां ॥

४११२

देखीचें तें ज्ञान करावें तें काई । अनुभव नाहीं आपणासी ॥
इंद्रियांचे गोडीं ठकलीं बहुतें । सोडितां मागुतें आवरेना ॥
युक्तीचा आहार नीतीचा वेव्हार । वैराग्य तें सार तरावया ॥
नाव रेवाळितां घाला घाली वारा । तैसा तो पसारा अहंतेचा ॥
तुका म्हणे बुद्धि आपुले आधीन । करी नारायण आतुडे तों ॥

२४७८

ब्रम्हज्ञान जरी एके दिवशीं कळे । तत्काळ हा गळे अभिमान ॥
अभिमान लागे शुकाचिये पाठी । व्यासें उपराटी दृष्टी केली ॥
जनक भेटीसी पाठविला तेणें । अभिमान नाणें खोटें केलें ॥
खोटें करूनियां लाविला अभ्यासीं । मेरु शिखरासी शुक गेला ॥
जाऊनीयां तेणें साधिली समाधी । तुका म्हणे तधीं होतों आम्ही ॥

१७९४

लापनिक शब्दें नातुडे हा देव । मनिंचे गुह्य भाव शुद्ध बोला ॥
अंतरिंचा भेद जाणे परमानंद । जयासी संवाद करणें लागे ॥
तुका म्हणे जरी आपुलें स्वहित । तरी करी चित्त शुद्ध भावें ॥

३४४

मनाचे संकल्प पाववील सिद्धी । तरी राहे बुद्धी याचे पायीं ॥

१७३२

जाऊनियां तीर्था काय तुवां केलें । चर्म प्रक्षाळिलें वरी वरी ॥
अंतरीचें शुद्ध कासयानें जालें । भूषण त्वां केलें आपण या ॥
वृंदावन फळ घोळिलें साकरा । भीतरील थारा मोडेचि ना ॥
तुका म्हणे नाहीं शांति क्षमा दया । तोंवरी कासया फुंदां तुम्ही ॥

१५०७

सोंगें छंदें कांहीं । देव जोडे ऐसे नाहीं ॥
सारा अवघें गावाळ । डोळ्या आडील पडळ ॥
शुद्ध भावाविण । जो जो केला तो तो सीण ॥
तुका म्हणे कळे । परि होताती अंधळे ॥

९४८

उपकारासाठीं बोलों हे उपाय । येणेंविण काय आम्हां चाड ॥
बुडतां हे जन न देखवे डोळां । येतो कळवळा म्हणऊनि ॥
तुका म्हणे माझे देखतिल डोळे । भोग देते वेळे येईल कळों ॥

२४४

उपदेश तो भलत्या हातीं । जाला चित्तीं धरावा ॥
नये जाऊं पात्रावरी । कवडी सारी नारळें ॥
स्त्रीपुत्र बंदीजन । नारायण स्मरविती ॥
तुका म्हणे रत्नसार । परि उपकार चिंधीचे ॥

१३१

बोलिलों तें कांहीं तुमचिया हिता । वचन नेणतां क्षमा कीजे ॥
वाट दावी तया न लगे रुसावें । अतित्याई जीवें नाश पावे ॥
निब दिला रोग तुटाया अंतरीं । पोभाळित वरि आंत चरे ॥
तुका म्हणे हित देखण्यासि कळे । पडती आंधळे कूपामाजी ॥

१२२

कांहीं नित्य नेमाविण । अन्न खाय तोचि श्वान ॥
वायां मनुष्यपण । भार वाहे तो वृषभ ॥
त्याचा होय भूमी भार । नेणे यातीचा आचार ॥
जाला दावेदार । भोगवी अघोर पितरांसि ॥
अखंड अशुभ वाणी । खरें न बोलेंचि स्वप्नीं ॥
पापी तयाहुनी । आणीक नाहीं दुसरा ॥
पोट पोसी एकला । भूतीं दया नाहीं ज्याला ॥
पाठीं लागे आल्या । अतिताचे दाराशीं ॥
कांहीं संतांचें पूजन । न घडे तीर्थांचें भ्रमण ॥
यमाचा आंदण । सीण थोर पावेल ॥
तुका म्हणे त्यांनीं । मनुष्यपणा केली हानी ॥
देवा विसरूनी । गेलीं म्हणतां मी माझें ॥

२९५८

देव अवघें प्रतिपादी । वंदी सकळां एका निंदी ॥
तेथें अवघे गेलें वांया । विष घास एके ठायां ॥

सर्वांग कुरवाळी । उपटी एक रोमावळी ॥
तुका म्हणे चित्त । नाहीं जयाचें अंकित ॥

२९३२ (नि.)

पाठवील ठाया । पांडुरंग चिंतिलिया ॥
त्यासी चिंतिलिया मनीं । चिंता करी गंवसणी ॥
पावावया कळा । अंगीं असावें हें बळ ॥
तुका म्हणे तईं । सिद्धि वोळंगती पायीं ॥

३८८४

मधुरा उत्तरासवें नाहीं चाड । अंतरंगीं वाड भाव असो ॥
प्राणावेगळा न करी नारायण । मग नसो ज्ञान मूर्ख बरा ॥
जननिंदा होय तो बरा विचार । थोरवीचा भार कामा नये ॥
तुका म्हणे चित्तीं भाव निष्ठावंत । दया क्षमा शांत सर्वांभूतीं ॥

२०८४

चित्तीं नाहीं आस । त्याचा पांडुरंग दास ॥
असे भक्तांचिये घरीं । काम न सांगतां करी ॥
अनाथाचा बंधु । असे अंगीं संबंधु ॥

२८६२

वर्णावी ते थोरी एका विठ्ठलाची । कीर्ती मानवाची सांगों नये ॥
उदंडचि जाले जन्मोनियां मेले । होऊनिया गेले राव रंक ॥
त्यांचें नाम कोणी नेवे चराचरीं । साही वेद चारी वर्णिताती ॥
अक्षय अढळ चळेना ढळेना । तया नारायणा ध्यात जावें ॥
तुका म्हणे तुम्ही विठ्ठल चित्तीं ध्यातां । जन्ममरण व्यथा दूर होती ॥

८२६

देवाच्या संबंधें विश्वचि सोयरें । सूत्र ओढे दोरें एका एक ।
आहाच हें नव्हे विटायासारिखें । जीव जीवनीं देखें सामावलें ॥
आणिकांचें सुखदुःख उमटे अंतरीं । एथील इतरीं तेणें न्यायें ॥
तुका म्हणे ठसावलें शुद्ध जाती । शोभाचि पुढती विशेषता ॥

७८५

धन्य भावशीळ । ज्याचें हृदय निर्मळ ॥

३११०

क्षणक्षणा हाचि करावा विचार । तरावया पार भवसिंधु ॥
नाशिवंत देह जाणार सकळ । आयुष्य खातो काळ सावधान ॥
संतसमागमीं धरूनि आवडी । करावी तांतडी परमार्थी ॥
तुका म्हणे यह लोकींच्या वेव्हारें । नये डोळे धुरे भरूनि राहों ॥

१३५४

पोटापुरतें काम । परि अगत्य तो राम ॥
कारण तें हेंचि करीं । चित्तीं पांडुरंग धरी ॥
प्रारब्धीं हेवा । जोडी देवाची ते सेवा ॥
तुका म्हणे बळ । बुद्धी वेंचूनि सकळ ॥

४३०४

येऊनि नरदेहा विचारावें सार । धरावा पैं धीर भजनमार्गी ॥
चंचल चित्तासी ठेवूनियां ठायीं । संतांचिये पायीं लीन व्हावें ॥
भावाचा पैं हात धरावा निश्चयें । तेणें भवभय देशधडी ॥
नामापरतें जगीं साधन सोपें नाहीं । आवडीनें गाई सर्वकाळ ॥
तुका म्हणे धन्य वंश त्या नराचा । ऐसा निश्चयाचा मेरु झाला ॥

२४९१

सांडुनियां सर्व लौकिकाची लाज । आळवा यदुराज भक्तिभावें ॥
पाहूनियां झाडें वरडूनि पाला । खाऊनि विठ्ठला आळवावें ॥
वेंचुनियां चिंध्या भरूनियां धागा । गुंडाळुनी ढुंगा आळवावें ॥
तुका म्हणे ऐसें मांडिल्या निर्वाण । तया नारायण उपेक्षीना ॥

२३९६

आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूं नये ॥
मग तो कृपासिंधु निवारी सांकडें । येर तें बापुडें काय रंक ॥
भयाचिये पोटीं दुःखाचिया रासी । शरण देवासी जातां भलें ॥
तुका म्हणे नव्हे काय त्या करितां । चिंताचा तो आतां विश्वंभर ॥

२४९८

तरिच जन्मा यावें । दास विठ्ठलाचें व्हावें ॥
नाहीं तरि काय थोडीं । श्वानशूकरें बापुडीं

२३५३

कथनी पठणी करूनि काय । वांचुनि रहणी वांया जाय ॥

२६३१

देह तंव असे भोगाचे अधीन । याचें सुख सीण क्षणभंगुर ।
अविनाश जोडी देवापायीं भाव । कल्याणाचा ठाव सकळही ॥
क्षणभंगुर हा येथील पसारा । आलिया आकारा अवघें नासे ॥
तुका म्हणे येथें सकळ विश्रांति । आठवावा चित्तीं नारायण ॥

२२९०

मेघवृष्टीनें करावा उपदेश परि गुरुनें न करावा शिष्य ।
वांटा लाभे त्यास केल्या अर्धकर्मांचा ॥
द्रव्य वेंचावें अन्न-छत्रीं भूतीं द्यावे सर्वत्र ।
नेदावा हा पुत्र उत्तम याति पोसणा ॥
बीज न पेरावें खडकीं ओल नाहीं ज्याचे बुडखीं ।
थीतां ठके सेखीं पाठी लागे दिवाण ॥
गुज बोलावें संतांशीं पत्नी राखावी जैसी दासी ।
लाड देतां तियेसी वांटा पावे कर्मांचा ॥
शुद्ध कसूनि पहावें वरि रंगा न भुलावें ।
तुका म्हणे घ्यावें जया नये तुटीं तें ॥

२२८५

पर उपकारें कायावाचा मन । वेचे सुदर्शन रक्षी तया ॥
याजसाटीं असे योजिलें श्रीपति । संकल्पाचे हातीं सर्व जोडी ॥
परपीडे ज्याची जिव्हा मुंडताळे । यमदूत डाळे करिती पूजा ॥
तुका म्हणे अंबरूपी दुर्योधना । काय झालें नेणां दुर्वासया ॥

१३६८

नको सांडूं अन्न नको सेवूं वन । चिंती नारायण सर्व भोगीं ॥
मातेचिये खांदीं बाळ नेणे सीण । भावना त्या भिन्न मुंडाविया ॥
नको गुंपों भोगीं नको पडों त्यागीं । लावुनि सरे अंगीं देवाचिया ।
तुका म्हणे नको पुसो वेळोवेळां । उपदेश वेगळा उरला नाहीं ॥

१४३७

निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म । निर्धार हें वर्म चुकों नये ॥
निष्काम निश्चळ विठ्ठलीं विश्वास । पाहों नये वास आणिकांची ॥
तुका म्हणे ऐसा कोणें उपेक्षिला । नाहीं ऐकिला ऐसा कोणीं ॥

१४४९

चिंतनासी न लगे वेळ । सर्वकाळ करावें ॥
सदा वाचे नारायण । तें वदन मंगळ ॥
पढिये सर्वोत्तम भाव । येथें वाव पसारा ॥
ऐसें उपदेशी तुका । अवघ्या लोकां सकळां ॥

४०९८

प्रपंच परमार्थ संपादोनि दोन्ही । एक ही निदानीं न घडे त्यासी ॥
दोहीं पेवावरी ठेवूं जातां हात । शेवटीं अपघात शरीराचा ॥
तुका म्हणे तया दोहींकडे धका । शेवटीं तो नरकामाजी पडे ॥

९८६

काळ सारावा चिंतनें । एकांतवासीं गंगास्नानें ।
देवाचें पूजन । प्रदक्षणा तुळसीच्या ॥
युक्त आहार विहार । नेम इंद्रियांचा सार ।
नसावी वासर । निद्रा बहु भाषण ॥
परमार्थ महाधन । जोडी देवाचे चरण ।
व्हावया जतन । हे उपाय लाभाचे ॥
देह समर्पिजे देवा । भार कांहींच न घ्यावा ॥
होईल आघवा । तुका म्हणे आनंद ॥

३७२

देव सखा जरी । जग अवघें कृपा करी ॥
ऐसा असोनि अनुभव । कासाविस होती जीव ॥
देवाची जतन । तया बाधू न शके अग्न ॥
तुका म्हणे हरी । प्रल्हादासी यत्न करी ॥

५३८

अधिकार तैसा दावियेले मार्ग । चालतां हें मग कळों येतें ॥
जाळूं नये नाव पावलेनि पार । मागील आधार बहुतांचा ॥
तुका म्हणे रोग वैद्याचे अंगीं । नाहीं करी जगीं उपकार ॥

१३७०

न सांगावें वर्म । जनीं असो द्यावा भ्रम ॥
उगींच लागतील पाठीं । होतीं रितींच हिंपुटी ॥
सिकविल्या गोष्टी । शिकोन न धरिती पोटीं ॥
तुका म्हणे सीण । होइल अनुभवावीण ॥

१७५०

नसावें ओशाळ । मग मानिती सकळ ॥
जाय तेथें पावे मान । चाले बोलिलें वचन ॥
राहों नेदी बाकी । दान ज्याचें त्यासी टाकी ॥
होवा वाटे जना । तुका म्हणे साटीं गुणां ॥

१७५४

तुका म्हणे तोचि हिरा । घनघायें निवडे पुरा ॥

८८८

न करावी आतां पोटासाटीं चिंता । आहे त्या संचिता माप लावूं ॥
दृष्टि ते घालावी परमार्थाठायीं । क्षुल्लका उपायीं सीण जाला ॥
येथें तंव नाहीं घेईजेसें सवें । कांहीं नये जीवें वेचों मिथ्या ॥
खंडणेंचि नव्हे उद्वेग वेरझारीं । बापुडे संसारीं सदा असों ॥
शेवटा पाववी नावेचें बैसणें । भुजाबळें कोणें कष्टी व्हावें ॥
तुका म्हणे आतां सकळांचें सार । करावा व्यापार तरी ऐसा ॥

२७९३

कांहीं न मागे कोणासी । तोचि आवडे देवासी ॥
देव तयासी म्हणावें । त्याचे चरणीं लीन व्हावें ॥
भूतदया ज्याचे मनीं । त्याचे घरीं चक्रपाणी ॥
नाहीं नाहीं त्यासमान । तुका म्हणे मी जमान ॥

२५७

न व्हावी तीं झालीं कर्मं नरनारी । अनुतापें हरी स्मरतां मुक्त ॥

३०५५

सर्वांभूतीं द्यावें अन्न । द्रव्य पात्र विचारोन ।
उपतिष्ठे कारण । तेथें बीज पेरीजे ॥

पुण्य करितां होय पाप । दुग्ध पाजोनि पोशिला साप ।
करोनि अघोर जप । दुःख विकत घेतलें ॥
भूमी पाहातां नाहीं वेगळी । माळ बरड एक काळी ।
उत्तम निराळी । मध्यम कनिष्ठ ॥
म्हणोनि विवेकें । कांहीं करणें निकें ।
तुका म्हणे फिकें । रुची नेदी मिष्टान्न ॥

४१०४

आणिकांच्या घातें मानितां संतोष । सुखदुःखदोष अंगीं लागे ॥
ऐसें मनीं वाहू नयेती संकल्प । करूं नये पाप भांडवल ॥
क्लेशाची हे चित्तीं राहाते कांचणी । अग्नींत टाकोनी ठाव जाळी ॥
तुका म्हणे येणें घडे पुण्यक्षय । होणार तें होय प्रारब्धें चि ॥

३८६१

आम्हां देणं धरा सांगतों तें कानीं । चिंता पाय मनीं विठोबाचे ॥
तेणें माझें चित्त होय समाधान । विलास मिष्टान्न न लगे सोनें ॥
व्रत एकादशी दारी वृंदावन । कंठीं ल्या रे लेणें तुळसीमाळा ॥
तुका म्हणे त्याचे घरींची उष्टावळी । मज ते दिवाळी दसरा सण ॥

३३७५

निवडे जेवण सेवटींच्या घांसें । होय त्याच्या ऐसें सकळ ही ॥
न पाहिजे जाला बुद्धीचा पालट । केली खटपट जाय वांया ॥
संपादिलें होय धरिलें तें सोंग । विटंबणा व्यंग पडिलिया ॥
तुका म्हणे वर्म नेणतां जो रांधी । पाववी ते बुद्धि अवकळा ॥

३३९९

देहबुद्धि वसे जयाचिये अंगीं । पूज्यता ते जगीं सुख मानी ॥
थोर असे दगा जाला त्यासी हाटीं । सोडोनियां गांठी चोरीं नेली ॥
गांठीचें जाऊनि नव्हे तो मोकळा । बांधिलासे गळा दंभ लोभें ॥

३४०३

ढेकणाचे संगें हिरा जो भंगला । कुसंगें नाडला तैसा साधु ॥
ओढाळाच्या संगें सात्विक नासलीं । क्षण एक नाडलीं समागमें ॥
डांकाचे संगतीं सोनें हीन जालें । मोल तें तुटलें लक्ष कोडी ॥

१३७०

न संगावें वर्म । जनीं असो द्यावा भ्रम ॥
उगींच लागतील पाठीं । होतीं रितींच हिंपुटी ॥
सिकविल्या गोष्टी । शिकोन न धरिती पोटीं ॥
तुका म्हणे सीण । होइल अनुभवावीण ॥

१७५०

नसावें ओशाळ । मग मानिती सकळ ॥
जाय तेथें पावे मान । चाले बोलिलें वचन ॥
राहों नेदी बाकी । दान ज्याचें त्यासी टाकी ॥
होवा वाटे जना । तुका म्हणे साटीं गुणां ॥

१७५४

तुका म्हणे तोचि हिरा । घनघायें निवडे पुरा ॥

८८८

न करावी आतां पोटासाटीं चिंता । आहे त्या संचिता माप लावूं ॥
दृष्टि ते घालावी परमार्थाठायीं । क्षुल्लका उपायीं सीण जाला ॥
येथें तंव नाहीं घेईजेसें सवें । कांहीं नये जीवें वेचों मिथ्या ॥
खंडणेंचि नव्हे उद्वेग वेरझारीं । बापुडे संसारीं सदा असों ॥
शेवटा पाववी नावेचें बैसणें । भुजाबळें कोणें कष्टी व्हावें ॥
तुका म्हणे आतां सकळांचें सार । करावा व्यापार तरी ऐसा ॥

२७९३

कांहीं न मागे कोणासी । तोचि आवडे देवासी ॥
देव तयासी म्हणावें । त्याचे चरणीं लीन व्हावें ॥
भूतदया ज्याचे मनीं । त्याचे घरीं चक्रपाणी ॥
नाहीं नाहीं त्यासमान । तुका म्हणे मी जमान ॥

२५७

न व्हावी तीं झालीं कर्में नरनारी । अनुतापें हरी स्मरतां मुक्त ॥

३०५५

सर्वांभूतीं द्यावें अन्न । द्रव्य पात्र विचारोन ।
उपतिष्ठे कारण । तेथें बीज पेरीजे ॥

पुण्य करितां होय पाप । दुग्ध पाजोनि पोशिला साप ।
करोनि अघोर जप । दुःख विकत घेतलें ॥
भूमी पाहातां नाहीं वेगळी । माळ बरड एक काळी ।
उत्तम निराळी । मध्यम कनिष्ठ ॥
म्हणोनि विवेकें । कांहीं करणें निकें ।
तुका म्हणे फिकें । रुची नेदी मिष्टान्न ॥

४१०४

आणिकांच्या घातें मानितां संतोष । सुखदुःखदोष अंगीं लागे ॥
ऐसें मनीं वाहू नयेती संकल्प । करूं नये पाप भांडवल ॥
क्लेशाची हे चित्तीं राहाते कांचणी । अग्नींत टाकोनी ठाव जाळी ॥
तुका म्हणे येणें घडे पुण्यक्षय । होणार तें होय प्रारब्धें चि ॥

३८६१

आम्हां देणें धरा सांगतों तें कानीं । चिंता पाय मनीं विठोबाचे ॥
तेणें माझें चित्त होय समाधान । विलास मिष्टान्न न लगे सोनें ॥
व्रत एकादशी दारी वृंदावन । कंठीं ल्या रे लेणें तुळसीमाळा ॥
तुका म्हणे त्याचे घरींची उष्टावळी । मज ते दिवाळी दसरा सण ॥

३३७५

निवडे जेवण सेवटींच्या घांसें । होय त्याच्या ऐसें सकळ ही ॥
न पाहिजे जाला बुद्धीचा पालट । केली खटपट जाय वांया ॥
संपादिलें होय धरिलें तें सोंग । विटंबणा व्यंग पडिलिया ॥
तुका म्हणे वर्म नेणतां जो रांधी । पाववी ते बुद्धि अवकळा ॥

३३९९

देहबुद्धि वसे जयाचिये अंगीं । पूज्यता ते जगीं सुख मानी ॥
थोर असे दगा जाला त्यासी हाटीं । सोडोनियां गांठी चोरीं नेली ॥
गांठीचें जाऊनि नव्हे तो मोकळा । बांधिलासे गळा दंभ लोभें ॥

३४०३

ढेकणाचे संगें हिरा जो भंगला । कुसंगें नाडला तैसा साधु ॥
ओढाळाच्या संगें सात्विक नासलीं । क्षण एक नाडलीं समागमें ॥
डांकाचे संगतीं सोनें हीन जालें । मोल तें तुटलें लक्ष कोडी ॥

विषानें पक्वान्नें गोड कडू जालीं । कुसंगानें केली तैसी परी ॥
भावें तुका म्हणे सत्संग हा बरा । कुसंग हा फेरा चौऱ्याशींचा ॥

१०७८

जन देव तरी पायांचि पडावें । त्याचिया स्वभावें चाड नाहीं ॥
अग्नीचें सौजन्य शीत निवारण । पालवीं बांधोनि नेतां नये ॥
तुका म्हणे विंचु सर्प नारायण । वंदावें दुरोन शिवों नये ॥

८८४

गंगेचिया अंताविण काय चाड । आपुलें तें कोड तृषेपाशीं ॥
विठ्ठल हे मूर्ति साजिरी सुंदर । घालीं निरंतर हृदयपुटीं ॥
कारण तें असे नवनीतापाशीं । गबाळ तें सोसी इतर कोण ॥
बाळाचे सोईतें ग्रास घाली माता । अट्टाहास चिंता नाहीं तया ॥
गाऊं नाचों करूं आनंदसोहाळा । भावचि आगळा नाहीं हातां ॥
तुका म्हणे अवघें जालें एकमय । परलोकींची काय चाड आतां ॥

४५०१

श्वासोश्वासीं भाव । तरी देहिंच जेवी देव ॥
धरीं स्मरण तें सार । नाहीं दुरी तें अंतर ॥
भोगितां तूं भावें । देव जेऊं वैसे सवें ॥
तुज पावो देवा । भावें अंतरींची सेवा ॥
गुंतला साधनीं । देव नाहीं त्रिभुवनीं ॥
तुका म्हणे हातीं । न धरितां गमाविती ॥

२०९०

सारावीं लिगाडें धरावा सुपंथ । जावें उसंतीत हळू हळू ॥
पुढें जातियाचे उमटले माग । भांबावलें जग आडरानें ॥
वेचल्याचा पाहे बराबरि झाडा । बळाचा निधडा पुढिलिया ॥
तुका म्हणे जैसी दाखवावी वाणी । ते घ्यावी भरोनि शेवट तों ॥

७२०

करावें चिंतन । तेंचि बरें न भेटून ॥
बरवा अंगीं राहे भाव । तग तोचि जाणा देव ॥
दर्शनाची उरी । अवस्थाचि अंग धरी ॥
तुका म्हणे मन । तेथें सकळ कारण ॥

३९८२

साधनाचे कष्ट मोठे । भय वाटे थोर हें ॥
मुखें गावें भावें गीत । सर्व हित बैसलिया ॥
दासा नव्हे कर्म दान । तन मन निश्चळ ॥
तुका म्हणे आत्मनिष्ठा । भागे चेष्टा मनाची ॥

३१६

विधीनें सेवन । विषयत्यागातें समान ॥
मुख्य धर्म देव चित्तीं । आदि अवसान अंतीं ॥
वहु अतिशय खोटा । तर्कें होती बहु वाटा ॥
तुका म्हणे भावें । कृपा करीजेते देवें ॥

२९१२

एका म्हणे भलें । आणिका सहजचि निंदिलें ॥
कांहीं न करितां आयास । सहज घडले ते दोष ॥
वरें वाइटाचे । नाहीं मज कांहीं साचें ॥
तुका म्हणे वाणी । खंडोनि राहावें चिंतनीं ॥

३३९१ नि.

असंत संगतीं न करावा वास । एखादे गुण दोष अंगा येती ॥
मग तया दोषा नाहीं परिहार । होय अपहार सुकृताचा ॥
तुका म्हणे नमस्कारावें दुरून । अंतरीं धरून राहे रूप ॥

४१०३

आपुली कसोटी शुद्ध राखी कारण । आगीनें भूषण अधिक पुट ॥
नाहीं कोणासवें बोलणें लागत । निश्चितीनें चित्तसमाधान ॥
लपविलें तेंही ढेंकरें उमटे । खोटियाचें खोटें उर फोडी ॥
तुका म्हणे निंदा स्तुति दोन्ही वाव । आपुलाला भाव फळा येतो ॥

२३४१

बहुतां छंदाचें वहु वसे जन । नये वाटूं मन त्यांच्या संगें ॥
करावा जतन आपुला विश्वास । अंगीं आला रस आवडीचा ॥
सुखाची समाधि हरिकथा माउली । विश्रांति साउली सिणलियांची ॥
तुका म्हणे वुडे बांधोनि दगड । तेथें काय कोड धांवायाचें ॥

१३३८

जग अवघें देव । मुख्य उपदेशाची ठेव ॥
आधीं आपणयां नासी । तरि उतरे ये कसीं ॥
ब्रम्हज्ञानाचें कोठार । तें हें निश्चयें उत्तर ॥
तुका म्हणे ते उन्मनी । नास कराया कारणीं ॥

५५४

भुंकती तीं द्यावीं भुंकों । आपण त्यांचे नये शिकों ॥
भाविकांनीं दुर्जनाचें । मानूं नये कांहीं साचें ॥
होइल तैसें बळ । फजीत करावे ते खळ ॥
तुका म्हणे त्यांचें । पाप नाहीं ताडणाचें ॥

५५५

जप करितां राग । आला जवळी तो मांग ॥
नको भोंवताले जगीं । पाहों जवळी राख अंगीं ॥
कुड्याची संगती । सदा भोजन पंगती ॥
तुका म्हणे ब्रह्म । सांधी विरहित कर्म ॥

५५३

पोटाचे ते नट पाहों नये छंद । विषयांचे भेद विषयरूप ॥
अर्थी परमार्थ कैसा घडों सके । चित्त लोभी भीके सोंग वायां ॥
देवाचीं चरित्रें दाखविती ळीळा । लाघवाच्या कळा मोहावया ॥
तुका म्हणे चित्तीं राहे अभिळास । दोघां नरकवास सारिखा चि ॥

७५६

घेईं माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ॥
तुम्ही घ्यारे डोळे सुख । पाहा विठोबाचें मुख ॥
तुम्ही ऐका रे कान । माझ्या विठोबाचे गुण ॥
मना तेथें धांव घेईं । राहे विठोबाचे पायीं ॥
तुका म्हणे जीवा । नको सोडूं या केशवा ॥

१८९७

आम्ही तेणें सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखीं ॥
तुमचें येर वित्त धन । तें मज मृत्तिकेसमान ॥
कंठीं मिरवा तुळसी । व्रत करा एकादशी ॥
म्हणवा हरिचे दास। तुका म्हणे मज हे आस ॥

१३३६

वोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल । करावा विठ्ठल जीवभाव ॥
येणें सोसें मन जालें हांवभरी । परती माघारी घेत नाहीं ॥
वंधनापासूनि उकलली गांठी । देतां आली मिठी सावकाशें ॥
तुका म्हणे देह भारिला विठ्ठलें । कामक्रोधें केलें घर रितें ॥

५४९

जरी माझी कोणी कापितील मान । तरी नको आन वदों जिव्हे ॥
सकळां इंद्रियां हे माझी विनंती । नका होऊं परतीं पांडुरंगा ॥
आणिकांची मात नाइकावी कानीं । आणीक नयनीं न पाहावें ॥
चित्ता तुवां पायीं रहावें अखंडित । होउनी निश्चित एकविध ॥
चला पाय हात हेंचि काम करा । माझ्या नमस्कारा विठोबाच्या ॥
तुका म्हणे तुम्हां भय काय करी । आमुचा कैवारी नारायण ॥

३१४९

आपला तो एक देव करुनि घ्यावा । तेणेंविण जीवा सुख नव्हे ॥
येर ती माइकें दुःखाचीं जनितीं । नाहीं आदि अंतीं अवसान ॥
अविनाश करी आपुलिया ऐसें । लावीं मना पिसें गोविंदाच्या ॥
तुका म्हणे एका मरणेंचि सरे । उत्तमेंचि उरे कीर्ति मागें ॥

११०

थोडें आहे थोडें आहे । चित्त साहे जालिया ॥
हर्षामर्ष नाहीं अंगीं । पांडुरंगीं सरलें तें ॥
अवघ्या साधनांचें सार । न लगे फार शोधावें ॥
तुका म्हणे लटिकें पाहें । सांडी देह अभिमान ॥

१०९

मान अपमान गोवें । अवघे गुंडूनी ठेवावे ॥
हेंचि देवाचें दर्शन । सदा राहे समाधान ॥
शांतीची वसती । तेथें खुंटे काळगती ॥
आली ऊर्मी साहे । तुका म्हणे थोडें आहे ॥

३९२९

चाले हें शरीर कोणाचिये सत्ते । कोण बोलवितें हरीविण ॥
देखवी दाखवी एक नारायण । तयाचें भजन चुकों नका ॥

मानसाची देव चालवी अहंता । मीचि एक कर्ता म्हणोनियां ॥
वृक्षाचें ही पान हाले त्याची सत्ता । राहिली अहंता मग कोठें ॥
तुका म्हणे विठो भरला सबाहीं । तया उणें कांहीं चराचरीं ॥

३९२५

शिखा सूत्र तुझा गुंतला जमान । तंववरि तूं जाण श्रुतिदास ॥
त्याची तुज कांहीं चुकतांचि नीत । होसील पतित नरकवासी ॥
बहुत जालासी चतुर शाहाणा । शुद्ध आचरणा चुकों नको ॥
शिखा सूत्र याचा तोडीं तूं संबंध । मग तुज बाध नाहीं नाहीं ।
तुका म्हणे तरि वर्तूनि निराळा । उमटती कळा ब्रम्हीचिया ॥

२६८८

साधावा तो देव सर्वस्वाचे साटीं । प्रारब्ध तुटी क्रियमाण ॥
मग कासयानें पुन्हा संवसार । बीजाचे अंकुर दग्ध होती ॥
जिणें दिल्हे त्यासी द्यावें पिंडदान । उत्तीर्ण चरण धरूनि व्हावें ॥
तुका म्हणे निज भोगईल निजता । नाहीं होइल सत्ता दुजियाची ॥

१६३५

भोग भोगावरी द्यावा । संचिताचा करुनी ठेवा ॥
शांती धरणें जिवासाटीं । दशा उत्तम गोमटी ॥
देह लेखावें असार । सत्य पर उपकार ॥
तुका म्हणे हे मिरासी । बुंडी द्यावी ब्रह्मरसीं ।

३१२१

आहार निद्रे न लगे आदर । आपण सादर तें चि होय ॥
परिमितीविणें बोलणें तें वांयां । फार थोडे काया पिंड पीडी ॥
समाधान त्याचें तोचि एक जाणे । आपुलिये खुणे पावोनियां ॥
तुका म्हणे होय पीडा तें न करीं । मग राहे परी भलतिये ॥

३१२२

जीव अवघे देव । खोटा नागवी संदेह ॥

४३९७

कां रे दाटोन होतां वेडे । देव आहे तुम्हांपुढें ॥
ज्यासि पाठ नाहीं पोट । करी त्रैलोक्याचा घोंट ॥

४३४५

लटिका प्रपंच वांझेची संतति। तत्त्वज्ञा हे भ्रांति बाधूं नेणें ॥

३४४८

न करावी चिंता। भय न धरावें सर्वथा ॥
दासां साहे नारायण। होय रक्षिता आपण ॥
न लगे परिहार। कांहीं योजावें उत्तर ॥
न धरावी शंका। नये बोलों म्हणे तुका ॥

४१७३

वैभव तें राज्य संपत्ती टाकावी। उदरार्थ मागावी माधोकरी ॥
आपुलें तें आधीं करावें स्वहित। ऐसी आहे नीत स्वधर्माची ॥
वर्ण कुळ जाति याचा अभिमान। त्यजावा सन्मान लौकिकाचा ॥
तुका म्हणे राहे एकाकी निःशंक। देउनिया हांक कंठी काळ ॥

४२१२

अर्थेंविण पाठांतर कासया करावें। व्यर्थचि मरावें घोकूनियां ॥
घोकूनियां काय वेगीं अर्थ पाहे। अर्थरूप राहे होऊनियां ॥
तुका म्हणे ज्याला अर्थी आहे भेटीं। नाहीं तरी गोष्टी बोलों नका ॥

४१२०

भ्रतार अंगसंगें सुखाची वेवस्था। आधीं तो सांगतां नये कोणा
तथापि सांगणें कुमारिकेपाशीं। ते काय मानसीं सुख मानी ॥

४०२९

स्त्रिया धन बा हें खोटें। नागवले मोठे मोठे ॥
म्हणोनि सांडा दोनी। सुख पावाल निदानीं ॥
सर्व दुःखासी कारण। हींच दोन्हीचीं प्रमाण ॥
आशा सर्वस्वें सांडावी। तेणें निजपदवी पावावी ॥
देह लोभें नाडला। घाला यमाचा पडला ॥
तुका म्हणे निरापेक्षा। कांहीं न धरावी अपेक्षा ॥

## एकरूपता

४५२४

नाइकती बोल आणिकांचे कानीं। हरि चित्तीं मनीं बैसलासे ॥

४५७३

समाधान त्यांचीं इंद्रियें सकळ। जयां तो गोपाळ समागमें ॥
गोविंदाचा जाला प्रकाश भीतरी। मग त्यां वाहेरी काय काज ॥
काज काम त्यांचे सरले व्यापार। नाहीं आपपर माझें तुझें ॥
माया सकळांची सकळां ही वरी। विषम तें हरि दिसों नेदी ॥
दिसे तया आप परावें सारिखें। तुका म्हणे सुखें कृष्णाचिया ॥

४५८०

भावना भेदाची जाय उठाउठी। तुका म्हणे भेटी गोविंदाचे ॥

९४२

पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण। आम्हां नारायण तैशा परी ॥
तुका म्हणे एकविध जालें मन। विठ्ठलावांचून नेणें दुजें ॥

१४६३

न पूजीं आणिकां देवां न करी त्यांची सेवा। न मनीं या केशवाविण दुजें ॥
काय उणें जालें मज तयापायीं। तें मी मागों काई कवणासी ॥
आणिकाची कीर्ती नाइकें न बोलें। चाड या विठ्ठलेविणं नाहीं ॥
न पाहे लोचनीं श्रीमुखावांचूनि। पंढरी सांडूनि न वजे कोठें ॥
न करी कांहीं आस मुक्तीचे सायास। न भें संसारास येतां जातां ॥
तुका म्हणे कांहीं व्हावें ऐसे जीवा। नाहीं या केशवाविण दुजे ॥

३२४२

कोणाचिया न पडों छंदा। गोविंदासी आळवूं ॥
बहुतांचीं बहुमतें। अवघे रिते पोकळ ॥
घटापटा ढवळी मन। होय सीण न करूं तें ॥
तुका म्हणे पांडुरंग। भरूं भाग आला तो ॥

२५४१

सवे संगीं विट आला। तूं एकला आवडसी ॥
दिली आतां पायीं मिठी। जगजेठी न सोडीं ॥

१८३०

। विश्व अवघें कोंदाटलें ॥
रूप गुणनाम अवघा मेघश्याम। वेगळें तें काय उरलें ॥
जातां लोटांगणीं अवघीच मेदिनी। सकळ देव पाट जालें ॥

सदा पर्वकाळ सुदिन सुवेळ । चित्त प्रेमें असें धालें ॥
अवघा आम्हा तूंच जालासी देवा । संसार हेवा कामधंदा ॥
न लगे जाणें कोठें कांहींच करणें । मुखीं नाम ध्यान सदा ॥
वाचा बोले ते तुझेचि गुणवाद । मंत्रजप कथा स्तुति ॥
भोजन सारूं ठायीं फल तांबोल कांहीं । पूजा नैवेद्य तुज होती ॥
चालतां प्रदक्षिण निद्रा लोटांगण । दंडवत तुजप्रति ॥
देखोन दृष्टी परस्परें गोष्टी । अवघ्या तुझ्या मूर्ति ॥
जाल्या तीर्थरूप बावी नदी कूप । अवघें गंगाजळ जालें ॥
महाल मंदिरें माड्या तनघरें । झोपड्या अवघीं देव देवाइलें ॥
ऐके कानीं त्या हरिनाम ध्वनी । नाना शब्द होत जाले ॥
तुका म्हणे या विठोबाचे दास । सदा प्रेमसुखें धाले ॥

२९२०

भूतीं देव म्हणोनि भेटतों या जना । नाहीं हे भावना नरनारी ॥
जाणे भाव पांडुरंग अंतरींचा । न लगे द्यावा साचा परिहार ॥
दयेसाठीं केला उपाधिपसारा । जडजीवा तारा नाव कथा ॥
तुका म्हणे नाहीं पडत उपवास । फिरतसे आस धरोनियां ॥

३८४८

मज नाहीं कोठें उरला दुर्जन । मायबापाविण ब्रम्हांडीं ही ॥

९९३

अणुरणीयां थोकडा । तुका आकाशाएवढा ॥

४३५५

अज्ञान हा देह स्वरूपीं मीनला । सर्व वोसावला देहपात ॥
ज्ञानस्वरूपाची सांगड मिळाली । अंतरीं पाहिली ज्ञानज्योती ॥
तुका म्हणे चित्त स्वरूपीं राहिलें । देह विसावलें तुझ्या पायीं ॥

८२६

देवाच्या संबंधें विश्वचि सोयरें । सूत्र ओढे दोरें एकाएक ॥
आहाच हें नव्हे विटायासारिखें । जीव जीवनीं देखें सामावलें ॥
आणिकांचें सुखदुःख उमटे अंतरीं । एथील इतरीं तेणें न्यायें ॥
तुका म्हणे ठसावलें शुद्ध जाती । शोभाचि पुढती विशेषता ॥

१५०८

अवघीं भूतें साम्या आलीं । देखिलीं म्यां कैं होतीं ॥
विश्वास तो खरा मग । पांडुरंगकृपेचा ॥
माझी कोणी न धरो शंका । हो कां लोकां निर्द्वंद्व ॥
तुका म्हणे जें जें भेटे । तें तें वाटे मी ऐसें ॥

४३१७

पाण्या निघाली गुजरी । मन ठेविलें दो घागरीं ॥
चाले मोकळ्या पदरीं । परी लक्ष तेथें ॥
वावडी उडाली अंबरीं । हातीं धरोनियां दोरी ॥
दिसे दुरिच्या दुरी । परी लक्ष तेथें ॥
चोर चोरी करी । ठेवी वनांतरीं ॥
वर्ततसे चराचरीं । परी लक्ष तेथें ॥
व्यभिचारिणी नारी । घरा श्रम करी ॥
परपुरुष जिव्हारीं । परी लक्ष तेथें ॥
णे असो भलतिये व्यापारीं । लक्ष सर्वेश्वरीं चुकों नेदी ॥

## एकादशी–सोमवार

४५०

व्रत करा एकादशी सोमवार ।

७२

एकादशीव्रत सोमवार न करिती । कोण त्यांची गति होइल नेणों ॥

३१२

एकादशीस अन्नपान । जे नर करिती भोजन ।
श्वानविष्ठेसमान । अधम जन तो एक ॥
ऐका व्रताचें महिमान । नेमें आचरती जन ॥
गाती ऐकती हरिकीर्तन । ते समान विष्णूशीं ॥
अशुद्ध विटाळसीचे खळ । विडा भक्षिती तांबूल ।
सापडे सबळ । काळा हातीं न सुटे ॥

सेज वाज विलास भोग । करी कामिनीशीं संग ।
तया जोडे क्षयरोग । जन्मव्याधी बळिवंत ॥
आपण न वजे हरिकीर्तना । अणिकां वारी जातां कोणा ।
त्याच्या पापें जाणा । ठेंगणा महामेरु ॥
तया दंडी यमदूत । जाले तयाचे अंकित ।
तुका म्हणे व्रत । एकादशी चुकलीया ॥

२११०

पंधरा दिवसां एक एकादशी । कां रे न करिसी व्रतसार ॥
काय तुझा जीव जातो एका दिसें । फराळाच्या मिसें धणी घेसी ।

२८९१

ज्यासी नावडे एकादशी । तो जिताचि नरकवासी ॥
ज्यासी नावडे हें व्रत । त्यासी नरक तो ही भीत ॥
ज्यासी मान्य एकादशी । तो जिता चि मुक्तवासी ॥
ज्यासी घडे एकादशी । जाणें लागे विष्णूपाशीं ॥
तुका म्हणे पुण्यराशी । तोचि करी एकादशी ॥

## एकाविण एक कामा नये

२१८८

उदक अग्नि धान्य जाल्या घडे पाक । एकाविण एक कामा नये ॥
तुका म्हणे मज कळे ते व्रांचणी । वडबडीची वाणी अथवा सत्य ॥

## एकासी एक कामा नये

४१२५

रोगिया मिष्टान्न मर्कटा चंदन । कागासी लेपन कर्पूराचें ॥
निर्नासिका जैसा नावडे आरिसा । मूर्खालागीं तैसा शास्त्रबोध ॥
दास तुका म्हणे विठ्ठल उदारें । अज्ञान अंधारें दूरी केलें ॥

१३७४

नटनाट्य तुम्ही केलें याचसाटीं । कवतुकें दृष्टी निववावी ॥
नाहीं तरि काय कळलेंचि आहे । वाघ आणि गाय लाकडाची ॥

३५४

जीवशिवाचें भातुकें । केलें क्रीडाया कौतुकें ।
कैची येथें लोकें । हा आभास अनित्य ॥

विष्णुमय खरें जग। येथें लागतसे लाग।
वांटिले विभाग। वर्णधर्म हा खेळ तयाचा ॥
अवघी एकाचीच वीण। तेथें कैंचें भिन्नाभिन्न।
वेदपुरुष नारायण। तेणें केला निवाडा ॥

५४८

पिंड पोसावे हें अधमाचें ज्ञान। विलास मिष्टान्न करूनियां ॥
शरीर रक्षावें हा धर्म बोलती। काय असे हातीं तयाचिया ॥
क्षणभंगुर हें जाय न कळतां। ग्रास गिळी सत्ता नाहीं हातीं ॥
कर्वतिलीं देहें कांपियेलें मांस। गेले वनवासा शुकादिक ॥
तुका म्हणे राज्य करितां जनक। अग्नीमाजी एक पाय जळे ॥

## कृपण

२३१२

कृपण तयासी बोलिजे पडे उपाधिडाई ॥

## कडू

२३१२

कडु तो संसार रे लक्षचौऱ्यार्शीं जन्म ॥

## कर्म

२३१२

कर्म तयासी जोडे रे भीत नाहीं लाज ॥

## कलियुग

२९७२

ऐका कलीचें हें फळ। पुढें होइल ब्रम्हगोळ ॥
चारी वर्ण अठरा याती। भोजन करिती एके पंक्ती ॥
पूजिती असुरा रांडा। मद्य प्राशितील पेंढा ॥
वामकवळ मार्जन। जन जाईल अधःपतन ॥
तुका हरिभक्ति करी। शक्ति पाणी वाहे घरीं ॥

८०४

कलियुगीं कवित्व करिती पाषांड। कुशळ हे भांड बहु जाले ॥
द्रव्य दारा चित्तीं प्रजांची आवडी। मुखें बडबडी कोरडाचि ॥

दंभ करी सोंग मानावया जग । मुखें बोले त्याग मनीं नाहीं ॥
वेदाज्ञे करोनि न करिती स्वहित । नव्हती अलिप्त देहाहुनी ॥
तुका म्हणे दंड साहील यमाचे । न करी जो वाचे बोले तैसें ॥

१२१४

साधक जाले कळी । गुरुगुडीची लांब नळी ॥
पचीं पडे मद्यपान । भांगभुकी हें साधन ॥
अभेदाचें पाठांतर । अति विषयीं पडिभर ॥
चेल्यांचा सुकाळ । पिंड दंड भंगपाळ ॥
सेवा मानधन । वरे इच्छेनें संपन्न ॥
सोंगाच्या नरकाडी । तुका बोलोनियां सोडी ॥

११२९

कलिधर्म मागें सांगितलें संतीं । आचार सांडिती द्विजलोक ॥
तेचि कळों आतां येतसे प्रचिती । अधर्मा टेंकती धर्म नव्हे ॥
तप व्रत करितां लागती सायास । पाळितां पिंडास गोड वाटे ॥
देव म्हणऊनी न येती देऊळा । संस्मरा वेगळा तरी कां नव्हे ॥
तुका म्हणे मज धरितां गुमान । ऐसे कोणी जन नरका जाती ॥

९०४

मागें संतीं होतें जें जें सांगितलें । तें येऊं लागलें अनुभवा ॥
आचारभ्रष्ट होती लोक कळी । पुण्य क्षीण बळी जालें पाप ॥
वर्णधर्म कोणी न धरी विटाळ । घालिती गोंधळ एके ठायीं ॥
वेदाचे पाठक सेवितील मद्य । न देखती भेद विषयीं भांड ॥
तुका म्हणे किती करावे फजित । तेचि छंद नित्य बहु होती ॥

३९२२

अंगीं ब्रह्मक्रिया खिस्तीचा व्यापार । हिंडे घरोघर चांडाळाचे ॥
अंत्यजा खिचडी घेताती मागून । गाळियाप्रदान मायबहिणी ॥
उत्तम कुळीं जन्म क्रिया अमंगळ । बुडविलें कुळ उभयतां ॥
तुका म्हणे ऐसी कलियुगाची चाली । स्वार्थं बुडविलीं आचरणें ॥

३९२१

खिस्तीचा उदीम ब्राह्मण कलयुगीं । महारवाडीं मांगीं हिंडतसें ॥
वेवसाव करितां पर्वत मांगासी । ते पैं विटाळासी न मनिती ॥

मांगिणीशीं नित्य करीतसे लेखा । तोंडावरि थुंका पडतसे ॥
आशा माया रांडा नांव हें कागदीं। आठवीना कधीं नारायण ॥
तुका म्हणे देह जाला पराधीन । पांडुरंगाविण गति नाहीं ॥

८२३

मढें झांकुनियां करिती पेरणी । कुणबियाचे वाणी लवलाहें ॥
तयापरि करीं स्वहित आपुलें । जयासीं फावले नरदेह ॥

४०३२

तुम्हा सांगतों कलयुगा फळ । पुढें होइल ब्रम्हगोळ ॥
आम्हां म्हणतिल कंटक । ऐसा पाडिती दंडक ॥
स्त्रिया पूजुनि सरे देती । भलते स्त्रियेसि भलते जाती ।
श्रेष्ठ वर्ण वेदविद्वांस । अंगीकारी मद्यमांस ॥
चारी वर्ण अठरा याती। कवळ करिती एक पंक्ती ॥
म्हणती अंबेचा क्रीडाकल्लोळ। शिवरूप प्राणी सकळ ॥
ऐसें होइल शकुन देतों। अगोदर सांगून जातों ॥
तुका सद्गुरु दास्य करी। सिद्धि पाणी वाहे घरीं ॥

४१२१

कलयुगामाजी थोर जालें बंड । नष्ट लोक लंड जाले फार ॥
न धरिती सोय न पुसती कोणा । येतें जैसें मना तैसें चाले ॥
सज्जनाचा वारा टेकों नेदी द्वारा । ऐसिया पामरा तारी कोण ।
विश्वास तयाचा बैसेना कोठेंही। स्तुति निंदा पाहीं जीवीं धरी ॥
तुका म्हणे कैसें केलें नारायणें । जाणावें हें कोणें तयाविण ॥

४४५३

बरें जालीयाचे अवघे सांगाती । वाइटाचे अंतीं कोणी नाहीं ॥
नोहे मातापिता नोहे कांतासुत । इतरांची मात काय सांगों ॥
तुका म्हणे जन दुतोंडी सावज । सांपडे सहज तिकडे धरी ॥


## कथा

४५०


आळस तो न करा येथें अहो सांगतों । कथा पूजन हरि जागर ॥



विठ्ठल-रखुमाईच्या मूर्ती : स्थापना तुकोबांचे आठवे पूर्वज विश्वंभरबाबा यांनी करून त्यावर मंदिर बांधलें.




विठ्ठल मंदिरांतील तुकाराम महाराजांचें छोटें देऊळ महाराजांच्या पादुका या ठिकाणी ठेवण्यांत आल्या आहेत. पाठीमागे जी शिला दिसत आहे ती शिला डोहावर सांपड-लेली आहे. त्या शिळेवर बसूनच महाराजांनी वह्या बुडविल्या असतां तेरा दिवस देवाचा धावा केला.



श्री क्षेत्र देहू येथील विठ्ठलमंदिर. या मंदिरांतच श्री तुकाराम महाराज कथा-कीर्तन करून पांडुरंगाची भक्ति करीत.

महाराज वैकुंठाला गेल्याचें ठिकाण. गोपाळपुरा येथें असलेल्या या ठिकाणीं गेलीं ३०३ वर्षे फाल्गुन वद्य द्वितीयेला (तुकाराम बीज) मोठी यात्रा भरते. महाराष्ट्र, कर्नाटक निजाम हद्द-वऱ्हाड आदि ठिकाणांहून लाखों लोक दर वर्षी महाराजांच्या दर्शनासाठी येत असतात.



६४५

सकळ पुण्य सकळ धर्म । सकळां कळांचें हें वर्म ।
निवारी श्रम सकळही । जेथें कीर्तन नामघोष ॥
करिती निर्लज्ज हरीचे दास । सकळ वोथंवले रस ।
तुटती पाश भवबंधाचे । येती अंगां वसती लक्षणें ॥
अंतरीं देवें धरिलें ठाणें । आपणचि येती तयाचे गुण ।
जाणें येणें खुंटे वस्तीचें ।

४०८८

मोल घेऊनियां कथा जरी करीं । तरी भंगो हरि देह माझा ॥
माझी कथा करा ऐसें म्हणे कोणा । तरी झडो जाणा जिव्हा माझी ॥
साह्य तूं जालासी काय उणें तुपें । आणीक भूतांपें काय मागों ॥
तुका म्हणे सर्व सिद्धि तुझे पायीं । तूं माझा गोसावी पांडुरंगा ॥

२८४४

कां न वजावें बैसोनि कथे । पांडुरंग तेथें उभा असे तिष्ठत ।
कथे कांहीं अणुमात्र । न बोलावें हा वृत्तांत ॥

१४७०

कथा करोनियां द्रव्य घेती देती । तयां अधोगति नरकवास ॥

१४७८

कथा करोनियां मोल ज्याचें घेती । तेही दोघे जाती नरकामध्यें ॥

३०६५

गायत्री विकोन पोट जे जाळिती । तया होय गति यमलोकीं ॥
कन्येचा जे नर करिती विकरा । ते जाती अघोरा नरकपाता ॥
नाम गाऊनियां द्रव्य जे मागती । नेणों तयां गति कैसी होय ॥

३०८४

जेथें कीर्तन करावें । तेथें अन्न न सेवावें ॥
बुका लावूं नये भाळा । माळ घालूं नये गळा ॥
तटावृषभासी दाणा । तृण मागों नये जाणा ॥
तुका म्हणे द्रव्य घेती । देती तेही नरका जाती ॥

२३५५

कथाकाळींची मर्यादा सांगतों ते भावे वंदा ॥
प्रीतीनें गोविंदा हेंचि एक आवडे ॥
टाळ वाद्य गीत नृत्य अंतःकरणें प्रेमभरित ।
वाणिता तो कीर्त तद्भावनें लेखावा ॥
नये अळसें मोडूं अंग कथे कानवडे ढुंग ॥
हेळणेचा रंग दावी तो चांडाळ ॥
तोंडी विडा माने ताठा थोरपणें घाली गेंठा ।
चित्त नेदी नामपाठा गोष्टी लावी तो चांडाळ ॥
कथे इच्छी मान दावूनियां थोरपण ।
रजा संकोच न लुगडी सांवरी तो चांडाळ ॥
आपण बैसे बाजेवरी सामान्य हरिच्या दासा घरी ।
तरि तो सुळावरी वाहिजे निश्चयेंसी ॥
येतां न करी नमस्कार कर जोडोनियां नम्र ।
न म्हणतां थोर आणिकां खेटी तो चांडाळ ॥
तुका विनवी जना कथे नाणावें अवगुणा ।
करा नारायणा ऋणी समर्पक भावें ॥

२३५६

कथा देवाचें ध्यान कथा साधना मंडण ।
कथे ऐसें पुण्य आणीक नाहीं सर्वथा ॥

२१५४

कथा दुःख हरी कथा मुक्त करी । कथा याची बरी विठोबाची ॥
कथा पाप नासी उद्धरिले दोषी । समाधि कथेसी मूढजना ॥
कथा तप ध्यान कथा अनुष्ठान । अमृत हें पान हरिकथा ॥
कथा मंत्रजप कथा हरी ताप । कथाकाळीं कांप कळिकाळासी ॥
तुका म्हणे कथा देवाचेंही ध्यान । समाधि लागोन उभा तेथें ॥

३९९७

पानें जो खाईल बैसोनि कथेसी । घडेल तयासी गोहत्या ॥
तमाखू ओढोनि काढील जो धूर । बुडेल तें घर तेणें पापें ॥

कीर्तनी बडबड करील जो कोणी । बेडुक होउनी येइल जन्मा ॥
जयाचिये मनीं कथेचा कंटाळा । होतीं त्या चांडाळा बहु जाच ॥
जाच होती पाठी उडती यमदंड । त्याचें काळें तोंड तुका म्हणे ॥

४३३८

साता दिवसांचा जरी जाला उपवासी । तरी कीर्तनासीं टाकूं नये ॥
फुटो हा मस्तक तुटो हें शरीर । नामाचा गजर सोडूं नये ॥
शरीराचे होत दोनी तेही भाग । परि कीर्तनाचा रंग सोडों नये ॥
तुका म्हणे ऐसा नामीं ज्या निर्धार । तेथें निरंतर देव असे ॥

९९

कलियुगामाजीं करावे कीर्तन । तेथें नारायण देईल भेटी ॥

२०४३

कथे उभा अंग राखेल जो कोणी । ऐसा कोण गणी तया पापा ॥
येथें तो पातकी न येता च भला । रणी कुचराला काय चाले ॥
कथे बैसोनी आणीक चर्चा । धिग त्याची वाचा कुंभपाक ॥
तुका म्हणे ऐल पैल ते थडीचे । बुडतील साच मध्यभागीं ॥

२०४४

नावडे ज्या कथा उठोनिया जाती । ते यमा फावती बरे वोजा ॥
तो असे जवळीं गोचिडाच्या न्यायें । देशत्यागें ठाय तया दुरीं ॥
तुका म्हणे तया करावें तें काई । पाषाण कां नाहीं जळामध्यें ॥

१२३

कन्या गो करी कथेचा विकरा । चांडाळ तो खरा तया नांवें ॥
गुण अवगुण हे दोन्ही प्रमाण । यातिशीं कारण नाहीं देवा ॥
आशाबद्ध नये करूं ते करिती । तुका म्हणे जाती नरकामधीं ॥

११६

देखोनि पुराणिकांची दाढी । रडे फुंदे नाक ओढी ॥
प्रेम खरें दिसे जना । भिन्न अंतरीं भावना ॥
आवरितां नावरे । खुर आठवी नेवरे ॥
बोलो नये मुखावाटां । म्हणे होता ब्यांचा तोटा ॥
दोन्ही सिंगें चारी पाय । खुणा दावी म्हणे होय ॥
मना आणितां बोकड । मेला त्याची चरफड ॥

होता भाव पोटीं । मुखा आलासे शेवटीं ॥
तुका म्हणे कुडें । कळो येतें तें रोकडें ॥

९५३

तुका म्हणे जों जों भजनासी वळे । अंग तों तों कळे सन्निधता ॥

२३२९

पाहुनियां ग्रंथ करावें कीर्तन । तेव्हां आलें जाण फळ त्याचें ॥
नाहींतरि वांधा केली तोंडपिटी । उरी ते शेवटीं उरलीसे ॥
पढोनियां वेद हरिगुण गावे । ठावें ते जाणावें तेव्हां जालें ॥
तपतीर्थाटणें तेव्हां कार्यसिद्धि । स्थिर राहे बुद्धि हरिच्या नामीं ॥
यागयज्ञादिक काय दानधर्म । तरि फळ नाम कंठीं राहे ॥
तुका म्हणे नको काबाडाचे भरी । पडों सार धरीं हेचि एक ॥

१५२२

कथेचा उलंघ तो अधमां अधम । नावडे ज्या नाम ओळखा तो ॥
कासया जीऊन जाला भूमी भार । अनउपकार माते कुंसी ॥
निद्रेचा आदर जागरणीं वीट । त्याचे पोटीं कीट कुपथ्याचें ॥
तुका म्हणे दोन्ही बुडविलीं कुळें । ज्याचें तोंड काळें कथेमाजी ॥

३४६४

कथे बैसोनि सादरें । सुखचर्चा परस्परें ।
नवल काय तो उद्धरे । आणीक तरे सुगंधें ॥
पुण्य घेई रे फुकाचें । पाप दुष्ट वासनेचें ।
पेरिल्या बीजाचें । फळ घेई शेवटीं ॥
सज्जन चंदनाचिये परी । दुर्जन देशत्यागें दुरी ।
राहो म्हणे हरि । विनंती करी तुका हे ॥

४१३०

करावें कीर्तन । मुखीं गावे हरिचे गुण ॥
मग कांहीं नव्हे बाधा । काम दुर्जनाच्या क्रोधा ॥
शांतिखड्ग हातीं । काळासी ते नागविती ॥
तुका म्हणे दाता सखा । ऐसा अनंतासारिखा ॥

१४०४

कीर्तन चांग कीर्तन चांग । होय अंग हरिरूप ॥
प्रेमाछंदें नाचे डोले । हारपला देहभाव ॥
एकदेशीं जीव कळा । हा सकळां सोयरा ॥
तुका म्हणे उरला देव । गेला भेव त्या काळें.॥

३९१७

कीर्तनाच्या सुखें सुखी होय देव । पंढरींचा राव संगीं आहे ॥

४०५९

खोंकरी आधण होय पाकसिद्धि । हें तों घडों कधीं शकेचिना ॥
खापराचे अंगीं घासितां परीस । न पालटे कीस काढिलिया ॥
पालथे घागरी रिचवितां जळ । तुका म्हणे खळ तैसे कथे ॥

११३८

धीर तो कारण साह्य होतो नारायण ।
नेदी होऊं शीण वाहो चिंता दासासी ॥
सुखें करावें कीर्तन हर्षें गावे हरिचे गुण ।
वारी सुदर्शन आपणचि कळिकाळ ॥
जीव वेची माता बाळा जडभारी होतां ।
तो तों नव्हे दाता प्राकृतां यांसारिखा ॥
हे तों माझ्या अनुभवें अनुभवां आलें जीवें ।
तुका म्हणे सत्य व्हावें आहाच नये कारणा ॥

१०२८

न वजे वांयां कांहीं ऐकतां हरिकथा । आपण करितां वायां न वजे
न वजे वांयां कांहीं देवळासी जातां । देवासी पूजितां वांयां न वजे ।
न वजे वांयां कांहीं केलिया तीर्थ । अथवा कां व्रत वांयां न वजे ॥
न वजे वांयां जालें संतांचें दर्शन । शुद्ध आचरण वांयां न वजे ॥
तुका म्हणे भाव असतां नसतां । सायास करितां वांयां न वजे ॥

२३८०

मुंगीचिया घरा कोण जाय मूळ । देखोनियां गूळ धाव घाली ॥
याचकाविण काय खोळंबला दाता । तोचि धांवेहिता आपुलिया ॥

उदक अन्न काये म्हणे मज खाये । भुकेला तो जाये चोजवीत ॥
व्याधी पिडिला धांवे वैद्याचिया घरा । दुःखाच्या परिहारा आपुलिया ॥
तुका म्हणे जया आपुलें स्वहित । करणें तोच्चि प्रीत धरी कथे ॥

२१२५

विठ्ठल मुक्तिदाता । नव्हे मरो हें बोलतां ॥
मज न साहावें कानीं । विष उत्तर लागे कानीं ॥
हरीकथेतें धिक्कारी । शत्रु माझा तो वैरी ॥
सुना काळतोंडा । जो या देवा म्हणे धोंडा ॥
अहं म्हणे ब्रम्ह । नेणें भक्तीचें तें वर्म ॥
तुका म्हणे क्षण । नको तयाचें दर्षण ॥

१—१८८

## कामक्रोध

कामें पीडिलों माया । बहु मारी नाहीं दया ॥

२—२८५

काम घातला बांदोडी । काळ केला देशधडी ॥
तया माझें दंडवत । कपिकुळीं हनूमंत ॥

३

कामक्रोध आम्ही वाहिले विठ्ठलीं । आवडी धरिली पायांसवें ॥
आतां कोण पाहे मागे परतूनी । गेले हारपोनि देहभाव ॥

४—३४४०

कामक्रोध माझे लावियेले पाठीं । बहुत हिंपुटी जालों देवा ॥
आवरितां तुझे तुज नावरती । थोर वाटे चित्तीं आश्चर्य हें ॥
तुझिया विनोदें आम्हां प्राणसाटी । भयभीत पोटीं सदा दुःखी ॥
तुका म्हणे माझ्या कपाळाचा गुण । तुला हांसे कोण समर्थासी ॥

५—१०५९

कामक्रोध माझे जीताती शरीरीं । कोवळें तें वरी बोलतसे ॥

६—४२४९

आजि शिवला मांग । माझें विटाळलें आंग ॥
यासी घेऊं प्रायश्चित्त । विठ्ठल विठ्ठल हृदयांत ॥

जाली क्रोधासी भेटी। तोंडावाटें नर्क लोटी॥
अनुतापीं न्हाऊं तुका म्हणे रवी पाहूं॥

७—४२४५

कामाचा अंकित कांतेतें प्रार्थित। तूं कां हो दुश्चित्तनिरंतर॥
माझीं मायबापें बंधु हो बहिण। तुज करी सीण त्यागीन मी॥

८—५५

महारासी सिवे। कोपें ब्राम्हण तो नव्हे॥
तया प्रायश्चित्त कांहीं। देहत्याग करितां नाहीं॥

९—८४०

कामातुर चवी सांडी। बरळ तोंडी बरळे॥

१०—१८२७

कामातुरा भय लाज ना विचार। शरीर असार तृण तुल्य॥

११—१२५६

कामें नेलें चित्त नेदीं अवलोकूं मुख। बहु वाटे दुःख फुटो पाहे॥

१२—२५१

कुटुंबाचा केला त्याग। नाहीं राग जंव गेला॥
भजन तें वोंगळवाणें। नरका जाणें चुके ना॥

१३—४४२१

कामक्रोध आड पडले पर्वत। राहिला अनंत पलीकडे॥
नुलंघवे मज न सांपडे वाट। दुस्तर हा घाट वैरियांचा॥
आतां कैंचा मज सखा नारायण। गेला अंतरोन पांडुरंग॥
तुका म्हणे व्यर्थ मोलाचें शरीर। गेलें हा विचार कळों आला॥

१४—३०२५

काम क्रोध अहंकार नको देहीं। आशा तृष्णा माया लज्जाचिंता कांहीं।
वास पंढरीचा जन्म सदा देईं। आणिक दुजें मागणें तुज नाहीं॥

## कूट अभंग

२५४३

गोदे कांठीं होता आड। करूनि कोड कवतुकें॥
देखण्यांनीं एक केलें। आइत्या नेलें जिवनापें॥

राखोनिया ठाव । अल्प जीव लावूनि ॥
तुका म्हणे फिटे धनी । विश्रांती हे सज्जनीं ॥

## गुज

२२९०

गुज बोलावें संतांशीं पत्नी राखावी जैसी दासी ॥

## गुरु शिष्य

२२९०

मेघवृष्टीनें कराव्या उपदेश । परि गुरुनें न करावा शिष्य ।
वांटा लाभे त्यास केल्या अर्ध कर्माचा ॥

## गोड

२३१२

गोड तें च्चि एक आहे रे सार विठ्ठल नाम ।

## गोडी

१२९८

उपाधि तें अवघे पाप । गोड निरसतां संकल्प ॥

## घातपात

४१०४

आणिकांच्या घातें मानितां संतोष । सुखदुःख दोष अंगीं लागे ।
ऐसे मनीं वाहूं नयेती संकल्प । करूं नये पाप भांडवल ॥
क्लेशाची हे चित्तीं राहाते कांचणी । अग्नींत टाकोनी ठाव जाळी ॥
तुका म्हणें येणें घडे पुण्य क्षय । होणार तें होय प्रारब्धेंचि ॥

## चांगलेपण

२३१२

चांगलेंपण तेंचि रे ज्याचें अंतर शुद्ध ॥

## चिंतन

९९९

नसो बळ देह असो पराधीन । परि हें चिंतन टाकों नको ॥

# चोरटा मुलगा

१—७७

देखोनि हरखली अंड । पुत्र जाला म्हणे रांड ॥
तंव तो जाला भांड । चाहाड चोर शिंदळ ॥
जाय तिकडे पीडी लोकां । जोडी भांडवल थुंका ॥
थोर जाला चुका । वर कां नाहीं घातली ॥
भूमि कांपे त्याच्या भारें । कुंभपाकाचीं शरीरें ॥
निष्ठुर उत्तरें । पापदृष्टि मळिण चित्त ॥
दुराचारी तो चांडाळ । पाप सांगातें विटाळ ॥
तुका म्हणे खळ । म्हणोनियां निषिद्ध तो ॥

२—३१७४

पुत्र जाला चोर । मायबापा हर्ष थोर ॥
आतां काशासाटीं जोडी । हाट घाटे गुंडगे घडी ॥
ऐसे अपाहार । आणूनियां भरी घर ॥
मानिली निश्चिती । नरका जावया उभयतीं ॥
झोडा झोडगीचे पोटीं । फळें बीजें तीं करंटी ॥
तुका म्हणे बेट्या । भांडवल नलगे खट्या ॥

३—१२६२

ऐसें कुळीं पुत्र होती । बुडविती पूर्वजा ॥
चाहाडी चोरी भांडवला । वांटा आला भागासी ॥
त्याचियानें दुःखी मही । भार तेही न साहे ॥
तुका म्हणे ग्रामपशु । केला नाशु आयुष्याचा ॥

४—७५

अहाकटा त्याचे करिती पितर । वंशी दुराचार पुत्र झाला ॥
गळेचि ना गर्भ नव्हेचि कां वांज । माता त्याची लाज लावी पापी ॥
परपीडे परद्वारीं सावधान । सादरचि मन अभाग्याचें ॥
न मिळतां निंदा चाहडी उपवास । संग्रहावे दोष सकळही ॥
पर उपकार पुण्य त्या वावडे । विषाचे ते किडे दुर्गंधीं मरे ॥
तुका म्हणे विटाळाचीच तो मूर्ति । दया क्षमा शांति नातळे त्या ॥

## जनहिताची तळमळ

१३०३

जग तरि आम्हां देव । परि हें निंदितों स्वभाव ॥
येतो हिताचा कळवळा । पडती हातीं म्हून काळा ॥

९०१

तुका म्हणे पुढें दिसतसे घात । करितो फजित म्हणऊनि ॥

## जन्मसाफल्य

२३१२

धन्य जन्मा तेचि आले रे एक हरीचे दास ।

६३३

बरवें झालें आलों जन्मासी । जोड जोडिली मनुष्य देहा ऐसी ॥
महालाभाची उत्तम रासी । जेणें सुखासी पात्र होइजे ॥
दिलीं इंद्रियें हातपाय कान । डोळे मुख बोलावया वचन ॥
जेणें तूं जोडसी नारायण । नासे जीवपण भवरोग ॥
तिळें तीळ पुण्य सांचा पडे । तरि हें बहुतां जन्मीं जोडे ॥
नाम तुझें वाचेसी आतुडे । समागम घडे संतांचा ॥
ऐसिये पावविलों ठायीं । आतां मी काई होऊं उतराई ॥
येवढा जीव ठेवीन पायीं । तूं माझे आई पांडुरंगे ॥
फेडियेला डोळियांचा कवळ । धुतला गुणदोषांचा मळ ॥
लावूनि स्तनीं केलों सीतळ । निजविलों बाळ निजस्थानीं ॥
नाहीं या आनंदासी जोडा । सांगतां गोष्टी लागती गोडा ॥
आला आकारा आमुच्या चाडा । तुका म्हणे भिडा भक्तीचिया ॥

६४०

बरें जालें आजिवरी । नाहीं पडिलों मृत्याचे आहारीं ।
वांचोन आलों एथवरी । उरलें तें हरी तुम्हां समर्पण ॥
दिला या काळें अवकाश । नाहीं पावलें आयुष्य नाश ।
कार्याकारण उरलें शेष । गेलें तें भूस जावो परतें ॥
बुडणें खोटें पावतां थडी । स्वप्नीं जाली ओढाओढी ।
नासली जागृतीची घडी । साच जोडी शेवटीं गोड घास ॥

तुम्हांसि पावविली हाक । तेणें निरसिला धाक ।
तुमचें भातें हें कवतुक । शरणागत लोक रक्षावे ॥
रवीच्या नांवें निशीचा नाश । उदय होतांचि प्रकाश ।
अतां कैचा आम्हां दोष । तूं जगदीश कैवारी ॥
आतां जळो देहसुख दंभमान । न करीं याचें साधन ।
तूं जगदादि नारायण । आलों शरण तुका म्हणे ॥

६५१

मागुता हाचि जन्म पावसी । भोगिलें सुखदुःख जाणसी ।
हें तो न घडे रे सायासीं । कां रे अंध होसी जाणोनियां ॥
लक्ष चौऱ्याशी न चुके फेरा । गर्भवासीं यातना थोरा ।
येउनि पडसी संदेहपुरा । वोळसा थोरा मायाजाळीं ॥
पशु काय पापपुण्य जाणती । उत्तम मध्यम भोग भोगिती ।
कांहीं एक उपजतां मरती । बहिरीं अंध होतीं पांगुळ मुकीं ॥
नरदेह विधान लागलें हातीं । उत्तम सार उत्तम गती ।
होइन देव चि म्हणती ते होती । तरि कां चित्तीं न धरावें ॥
क्षण एक मन स्थिर करूनी । सावध होई डोळे उघडोनी ।
पाहे वेद बोलिलें पुराणीं । तुका विनवणी करितसे ॥

११८१

राम कहे सो मुख भला रे । खाये खीर् खांड ।
हरिबिन मुखमो धूल परी रे । कया जनि उस रांड ॥

४३०४

येऊनि नरदेहा विचारावें सार । धरावा पै धीर भजनमार्गीं ॥
चंचळ चित्तासी ठेवूनिया ठायीं । संतांचिये पायीं लीन व्हावे ॥
भावाचा पै हात धरावा निश्चयें । तेणें भवभय देशधडी ॥
नामापरतें जगीं साधन सोपें नाहीं । आवडीनें गाई सर्वकाळ ॥
तुका म्हणे धन्य वंश त्या नराचा । ऐसा निश्चयाचा मेरु जाला ॥

१३५४

पोटापुरतें काम । परि अगत्य तो राम ॥
कारण तें हेंचि करीं । चित्तीं पांडुरंग धरी ॥

४४३०

पाहावा नयनीं विठ्ठलचि एक । कांहीं तरी सार्थक संसाराचें ॥

## जनरीत

४५३४

यांचे मी जवळी देव तो नेणती । लटिकें मानिती साच खरें ॥
लटिकें तें साच-साच तें लटिकें । नेणती लोभिकें आशाबद्ध ॥

१०५५

समर्थाचें बाळ कीविलवाणें दिसे । तरी कोणा हांसे जन देवा ॥
अवगुणी जरी जालें तें वोंगळ । करावा सांभाळ लागे त्याचा ॥
तुका म्हणे तैसा मी एक पतित । परि मुद्रांकित जालों तुझा ॥

३९४२

स्त्रिया पुत्र कळत्र हें तंव मायावंत । शेवटींचा अंत नाहीं कोणी ॥
यमाचिये हातीं बांधोनिया देती । भूषणें हीं घेती काढोनिया ॥
ऐसिया चोरांचा कैसा हा विश्वास । धरिली तुझी कास तुका म्हणे ॥

२१६४

खादलेंचि वाटे । खावें भेटलेंचि भेटे ॥

१७८७

माझें ऐसें तया न म्हणती कोणी । असे रानीं वनीं भलते ठायीं ॥
प्रातःस्नान करी विभूति चर्चन । देखोनियां जन निंदा करी ॥
कंठीं तुळसीमाळा बैसोनि निराळा । म्हणती या चांडाळा काय जालें ॥
गातां शंका नाहीं बैसे भलते ठायीं । शिव्या देती आई बाप भाऊ ॥
घरीं वाइल म्हणे कोठें व्याली रांड । वरें होते पंढ मरतां तरी ॥
जन्मोनि जाला अवघियां वेगळा । म्हणोनि गोपाळा दुर्लभ तो ॥
तुका म्हणे जो संसारा रुसला । तेणेंचि टाकिला सिद्धपंथ ॥

४१६४

क्षुधा तृषा कांहीं सर्वथा नावडे । पहावया धांवे कोल्हांटासी ॥
कथेसी साक्षेपें पाचारिला जरी । म्हणे माझ्या घरीं कोणी नाहीं ॥
बलात्कारें जरी आणिला कथेसी । निद्रा वे लोडेंसी टेकूनीयां ॥
तुका म्हणे थुंका त्याच्या तोंडावरी । जातो यमपुरीं भोगावया ॥

३४८९

पडिली हे रूढि जगा परिचार । चालविती वेव्हार साथ म्हूण ॥
मरणाची कां रे नाहीं आठवण । संचिताचा धन लोभ हेवा ॥
देहाचें भय तें काळाचें भातुकें । ग्रासूनि तें एकें ठेविलेसें ॥
तुका म्हणे कांहीं उघडा रे डोळे । जाणोनि अंधळे होऊं नका ॥

३८२९

सोइऱ्यासी करी पाहुणचार बरा । कांडितो ठोंबरा संतालागीं ॥
गाईसी देखोनी वद्बदा मारी । घोड्याची चाकरी गोड वाटे ॥
पान फुल नेतो वेश्येसी उद्दंड । ब्राम्हणासी खांड देऊं नेदी ॥
पर्वकाळीं धर्म न करी नासरी । वेची राजद्वारीं उदंडचि ॥
कीर्तना जावया होतसे हींपुष्टी ॥ खेळतो सोंकटीं रात्रंदिवस ॥
बाइलेच्या गोता आवडीनें पोसी । मातापितियासी दवडितो ॥
तुका म्हणे त्याच्या थुंका तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ॥

३०६२

देवाचिया वस्त्रा स्वप्नीं ही नाठवी । स्त्रियेसी पाठवी उंच साडी ॥
गाईचें पाळण नयेचि विचारा । अश्वासी खरारा करी अंगें ॥
लेकराची रास स्वयें धांवे क्षाळूं । न म्हणे प्रक्षाळूं द्विजपायां ॥
तुका म्हणे त्याच्या तोंडावरी थुंका । जातो यमलोका भोगावया ॥

६७७

संत मागे पाणी नेदी एक चूळ । दासीस आंघोळ ठेवी पाणी ॥
संतासी देखोनी होय पाठमोरा । दासीचिया पोरा चुंबन देतो ॥
संतासी देखोनि करितो टवाळ्या । भावें धुतो चोळ्या दासीचिया ॥
तुका म्हणे त्याच्या तोंडावरी थुंका । जातो यमलोका भोगावया ॥

३९०७

पापिया चांडाळा हरिकथा नावडे । विषयालागी आवडे गाणें त्याला ॥
ब्राह्मणा दक्षणा देतां रडे रुका । विषयालागीं फुका लुटीतसे ॥
वीतभरि लंगोटी नेदी अतीताला । खीरम्या देतो शाला भोरप्यासी ॥
तुका म्हणे त्याच्या थुंका तोंडावरी । जातो यमपुरीं भोगावया ॥

३७५३

देवाचें चरित्र नाठवे सर्वथा । विनोदार्थ कथा गोड वाटे ॥
हातावरि हात हासोनि आफळी । वाजवितां टाळी लाज वाटे ॥
तुका म्हणे थुंका त्याच्या तोंडावरि । जातो यमपुरीं भोगावया ॥

३०६६

साधूच्या दर्शना लाजशी गव्हारा । वेश्येचिया घरा पुष्पें नेसी ॥
वेश्या दासी मुरळी जगाची वोंवळी । ते तुज सोंवळी वाटे कशी ॥
तुका म्हणे आतां लाज धरी वुच्या । टांचराच्या कुच्या मारा वेगी ॥

३०६३

उरा लावी उर आळंगितां कांता । संतासी भेटतां अंग चोरी ॥
अतीत देखोनि होय पाठमोरा । व्याह्यासी सामोरा जाय वेगीं ॥
द्विजा नमस्कारा मनीं भाव कैंचा । तुर्कांचे दासीचा लेंक होय ॥
तुका म्हणे तुम्ही क्रोधासी न यावें । स्वभावा करावें काय कोणी ॥

३५७०

दगडाच्या देवा बगाड नवस । बाईल कथेस जाऊं नेदी ॥
वेची धनराशी बांधलें स्मशान । दारीं वृंदावन द्वाड मानी ॥
चोरें नागविला न करी त्याची खंती । परी द्विजा हातीं नेदी रुका ॥
करी पाहुणेर व्याह्या जावयासी । आल्या अतीतासी पाठमोरा ॥
तुका म्हणे जळो धिग त्याचें जिणें । भार वाही सीण वर्म नेणें ॥

३०६७

राउळासी जातां त्रास मानी मोठा । बैसतो चोहोटां आदरेसी ॥
न करी स्नान संध्या म्हणे रामराम । गुरुगुडीचें प्रेम अहर्निशी ॥
देवा ब्राह्मणासी जाईना शरण । दासीचें चरण वंदी भावें ॥
सुगंध चंदन सांडोनियां माशी । बसे दुर्गंधीशीं अति आदरें ॥
तुका म्हणे अरे ऐक भाग्यहीना । कां रे रामराणा विसरसी ॥

५९९

द्रव्य असतां धर्म न करी । नागविला राजद्वारीं ॥
माय त्यासी व्याली जेव्हां । रांड सटवी नव्हती तेव्हां ॥
कथा काळीं निद्रा लागे । कामीं श्वानापरी जागे ॥

भोग स्त्रियेसि देतां लाजे । वस्त्र दासीचें घेउनि निजे ॥
तुका म्हणे जाण । नर गाढवाहुनी हीन ॥

४२८१

संत देखोनियां स्वयें दृष्टी टाळी । आदरें न्याहाळी परस्त्रीसी ॥
वीट ये कर्णासी संत वाक्यामृता । स्त्रीशब्द ऐकतां निवे कर्ण ॥
कथेमाजी निज वाटे नित्य क्षणीं । स्त्रियेचे कीर्तनीं प्रेमें जागे ॥
तुका म्हणे तुम्ही क्रोधासी न यावें । स्वभावा करावें काय कोणी ॥

२९५८

देव अवघें प्रतिपादी । वंदी सकळां एका निंदी ॥
तेथें अवघें गेलें वांया । विष घास एके ठायां ॥
सर्वांग कुरवाळी । उपटी एक रोमावळी ॥
तुका म्हणे चित्त । नाहीं जयाचें अंकित ॥

१६२०

तोंडे खाये फार । पादे बोचा करी मार ॥
एक ऐसे ते शहाणे । आपुले अधीन तें नेणें ॥
कुले घालूनि उघडे । रागें पाहे लोकांकडे ॥
खेळे द्यूत कर्म । मग बोंबली जुलूम ॥
निजतां आला मोहो । वीतां म्हणे मेला गोहो ॥
तुका म्हणे त्यांनीं । मनुष्यपणा केली हानी ॥

८४

दानें कांपे हात । नावडे तेविशीं मात ॥
कथी चावटीचे बोल । हिंग क्षीरीं मिथ्या फोल ॥
न वजती पाय । तीर्थां म्हणे वेचूं काय ॥
तुका म्हणे मनीं नाहीं । नये आकारातें कांहीं ॥

३२७२

संतां नाहीं मान । देव मानी मुसलमान ॥
ऐसे पोटाचे मारिले । देवा आशा विटंबिले ॥

२६८३

ऐसा कोणी नाहीं हें जया नावडे । कन्या पुत्र घोडे दारा धन ॥
निंब घेतें रोगी कवणिया सुखें । हरावया दुःखें व्याधि पीडा ॥
तुका म्हणे तरी सांपडे निधान । द्यावा ओंवाळून जीव बळी ॥

२९१७

धनवंतालागीं । सर्वमान्यता आहे जगीं ॥
माता पिता बंधुजन । सर्व मानिती वचन ॥
जंव मोठा चाले धंदा । तंव बहिण म्हणे दादा ॥
सदा शृंगार भूषणें । कांता लवे बहुमानें ॥
तुका म्हणे धन । भाग्य अशाश्वत जाण ॥

१७५३

बोलविसी माझें मुख । परी या जना वाटे दुःख ॥
जया जयाची आवडी । तया लागीं तें चरफडी ॥
कठिण देता काढा । जल्पे रोगी मेळवी दाढा ॥
खाऊं नये तेंचि मागे । निवारितां रडो लागे ॥
वैद्या भीड काय । अतित्याई जीवें जाय ॥
नये भिडा सांगो आन । पथ्य औषधा कारण ॥
धन माया पुत्र दारा । हे तों आवडी नरका थारा ॥
तुका म्हणे यांत । आवडे ते करा मात ॥

## जनवैचित्र्य

७२५

एकांचीं उत्तरें । गोड अमृत मधुरें ॥
ऐशा देवाच्या विभूति । भिन्न प्रारब्धाची गति ॥
एकांचीं वचनें । कडु अत्यंत तीक्ष्णें ॥
प्रकाराचे तीन । तुका म्हणे केले जन ॥

४३५०

कोटि जन्म पुण्यसाधन साधिलें । तेणें हातां आलें हरिदास्य ॥
रात्रीं दिवस ध्यान हरीचें भजन । काया वाचा मन भगवंतीं ॥
ऐसिया प्रेमळा म्हणताती वेडा । संसार रोकडा बुडविला ॥
एकवीस कुळें जेणें उद्धरिलीं । हे तों न कळे खोली भाग्यमंदा ॥
तुका म्हणे त्याची पायधुळी मिळे । भवभय पळे वंदितांचि ॥

३९९३

सोइरे धाइरे दिल्या घेतल्याचे । अंत हें काळींचें नाहीं कोणी ॥
सख्या गोत्र वहिणी सुखाचे संगती ॥ मोकलुनी देती अंतकाळीं ॥

आपुलें शरीर आपणा पारिखें । परावी होतील नवल काई ॥
तुका म्हणे आतां सोड यांची आस । धरी रे या कास पांडुरंगा ॥

२५९

ऐसा हा लौकिक कदा राखवेना । पतितपावना देवराया ॥
संसार करितां म्हणती हा दोषी । टाकितां आळसी पोटपोसा ॥
आचार करितां म्हणती हा पसारा । न करितां नरा निंदिताती ॥
संतसंग करितां म्हणती हा उपदेशी । येरा अभाग्यासी ज्ञान नाहीं ॥
धन नाहीं त्यासि ठायींचा करंटा । समर्थासि ताठा लाविताती ॥
वहु वोलों जातां म्हणति हा वाचाळ । न बोलतां सकळ म्हणती गर्वी ॥
भेटिसि न वजातां म्हणती हा निष्ठुर । येतां जातां घर वुडविलें ॥
लग्न करूं जातां म्हणती हा मातला । न करितां जाला नपुंसक ॥
निपुत्रिका म्हणती पहा हो चांडाळ । पातकाचें मूळ पोरवडा ॥
लोक जैसा ओक धरितां धरवे ना । अभक्ता जिरे ना संतसंग ॥
तुका म्हणे आतां ऐकावें वचन । त्यजुनियां जन भक्ति करा ॥

२९६६

जन हें सुखाचें दिल्या घेतल्याचें । अंत हें काळींचें नाहीं कोणी ॥
जाल्या हीन शक्ति नाकडोळे गळती । सांडोनि पळती रांडापोरें ॥
वाइल म्हणे खर मरता तरी वरें । नासिलें हें घर थुंकोनिया ॥
तुका म्हणे माझी नव्हतील कोणी । तुज चक्रपाणी वांचूनियां ॥

४१३७

संगें वाढे सीण न घडे भजन । त्रिविध हें जन वहु देवा ॥
याचिमुळें आला संगाचा कांटाळा । दिसताती डोळां नाना छंद ॥
एकविध भाव राहावया ठाव । नेदी हा संदेह राहों चित्तीं ॥
शब्दज्ञानी हित नेणती आपुलें । आणीक देखिले नावडे त्या ॥
तुका म्हणे आतां एकलेंचि भलें । वैसोनि उगलें राहावें तें ॥

३९५९

आवडे सकळां मिष्टान्न । रोग्या विष त्या समान ॥
दर्पण नावडे तया एका । ठाव नाहीं ज्याच्या नाका ॥
तुका म्हणे तैशा खळा । उपदेशाचा कांटाळा ॥

२३४१

बहुता छंदाचे बहु वसे जन । नये वाटूं मन त्यांच्या संगें ॥

३१२१

आहार निद्रे न लगे आदर । आपण सादर तेंचि होय ॥

४४५३

बरें जालीयाचे अवघे सांगाती । वाइटाचे अंतीं कोणी नाहीं ॥
नोहे मातापिता नोहे कांतासुत । इतरांची मात काय सांगों ॥
तुका म्हणे जन दुतोंडी सावज । सांपडे सहज तिकडे धरी ॥

## जाणता

२३१२

जाणता तयासी बोलिजे जाणे समाधान ॥

## तुटीचा व्यापार

१७०९

मुदलामध्यें पडे तोटा । ऐसा खोटा उदीम ॥

## तामसदान

३८०६

करी आणिकांचा अपमान । खळ छळवादी ब्राह्मण ॥
तया देतां दान । नरका जाती उभयतां ॥
तैसे जालें दोघांजणां । मागतिया यजमाना ॥
जाळिथेलें वनां । आपणांसहित कांचणी ॥

## त्याग

१४

क्षणभरी आम्हीं सोसिलें वाईट । साधलें अवीट निजसुख ॥
सांडी मांडी मागे केल्या भरोवरी । अधिकचि परी दुःखाचिया ॥
तुका म्हणे येणें जाणें नाहीं आतां । राहिलों अनंताचिये पायीं ॥

२१

सांगतों ते तुम्हीं आइकावें कानीं । आमुचे नाचणीं नाचूं नका ।
जोंवरी या तुम्हां मागिलांची आस । तोंवरी उदास होऊं नका ॥
तुका म्हणे काय वांयाविण धिंद । पति ना गोविंद दोन्ही नाहीं ॥

२४

मरणाही आधीं राहिलों मरोनी । मग केलें मनीं होतें तैसें ॥

२५

परपुरुषाचें सुख भोगे तरी । उतरोनि करीं घ्यावें सीस ॥
संवसारा आगीं आपुलेनि हातें । लावूनि मागुतें पाहू नीट ॥
तुका म्हणे व्हावें तयापरी धीट । पतंग हा नये दीपासोई ॥

३९०९

स्वामीसी संकट पडे जे गोष्टीचें । काय त्या प्रेमाचें सुख मज ॥
दुःखवीना चित्त तुझें नारायणा । कांहींच मागेना तुजपासीं ॥
रिद्धि सिद्धि मोक्ष संपत्ति विलास । सोडियेली आस याची जीवें ॥
तुका म्हणे एके वेळे देईं भेटी । वोरसोनि पोटीं आलिंगावें ॥

२०११

तुका म्हणे नेम प्राणांसवें साटीं । तरीच या गोष्टी विठोबाची ॥

२४९४

लोक फार वाखा अमंगळ जाला । त्याचा त्याग केला पांडुरंगा ॥
विषयां वंचलों मीपणा मुकलों । शरण तुज आलो पांडुरंगा ॥
घरदार अवघीं त्यजिलीं नारायणा । जीवींच्या जीवना पांडुरंगा ॥
तुका म्हणे पडिलों पुंडलिकापाशीं । धांव हृषीकेशी आळिंगी मज ॥

२६९९

मज तो अत्यंत दर्शनाची आस । जाला तरी हो नाश जीवित्वाचा ॥

२२९६

आगी लागो तया सुखा । जेणें हरि नये मुखा ॥
मज होत कां विपत्ति । पांडुरंग राहो चित्तीं ॥
जळो तें समूळ । धन संपत्ति उत्तम कुळ ॥
तुका म्हणे देवा । जेणें घडे तुझी सेवा ॥

१८०४

तुजविण देवा । कोणा म्हणे माझी जिव्हा ॥
तरि हे हो का शतखंड । पडो झडोनिया रांड ॥
कांहीं इच्छेसाठीं । करिल वळवळ करंटी ॥
तुका म्हणे कर । कटीं तयाचा विसर ।

१७३१

तुझें म्हणवितां काय नास जाला । ऐके बा विठ्ठला कीर्ती तुझी ॥
परी तुज नाहीं आमचे उपकार । नामरूपा थार केलियाचे ॥
समूळीं संसार केला देशधडी । सांडिली आवडी ममतेची ॥
लोभ दंभ काम क्रोध अहंकार । यांसी नाहीं थार ऐसें केलें ॥
मृत्तिका पाषाण तैसें केलें धन । आपले ते कोण पर नेणों ॥
तुका म्हणे जालों देहासी उदार । आणीक विचार काय तेथें ॥

३४३९

आतां तुझें नाम गात असे गीतीं । म्हणोनी मानिती लोक मज ॥
अन्नवस्त्र चिंता नाहीं या पोटाची । वारिली देहाची थोर पीडा ॥
सज्जन संबंधीं तुटली उपाधी । रोकडी या वंदी सुटलोंसे ॥
घ्यावा द्यावा कोणें करावा सायास । गेले आशापाश वारोनियां ॥
तुका म्हणे तुज कळेल तें आतां । करा जी अनंता मायबापा ॥

१४२८

त्यागा नांव तरी निर्विषय वासना । कार्य कारणांपुरते विधि ॥

७६७

एका बीजा केला नास । मग भोगलें कणीस ॥
लाभ नाहीं फुकासाठीं । केल्याविण जीवासाठीं ॥
तुका म्हणे रणीं । जीव देतां लाभ दुणी ॥

२६८८

साधावा तो देव सर्वस्वाचे साटीं । प्रारब्ध तुटी क्रियमाण ॥
मग कासयानें पुन्हा संवसार । बीजाचे अंकुर दग्ध होती ॥
जिणें दिल्हे त्यासी द्यावें पिंडदान । उत्तीर्ण चरण धरूनि व्हावें ॥
तुका म्हणे निज भोगईल निजता । नाहीं होइल सत्ता दुजियाची ॥

३९५५

सर्वस्वाची साटी । तरिच देवासवें गांठी ॥
नाहीं तरी जया तैसा । भोग भोगवील इच्छा ॥

२७७५

त्याग तरी ऐसा करा । अहंकारा दवडावें ॥

२२२६

सांगा दास नव्हे तुमचा मी कैसा । ऐसें पंढरीशा विचारूनी ॥
कोणासाटीं केली प्रपंचाची होळी । या पायां वेगळी मायबापा ॥
नसेल तो द्यावा सत्यत्वासी धीर । नये भाजूं हीर उफराटे ॥
तुका म्हणे आम्हां आहिक्य परत्रीं । नाहीं कुळगोत्रीं दुजें कांहीं ॥

२२३२

कांहीं मागणें हें आम्हां अनुचित । वडिलांची रीत जाणतसों ॥
देह तुच्छ जालें सकळ उपाधी । सेवेपाशीं बुद्धि राहिलीसे ॥
शब्द तो उपाधि अचळ निश्चय । अनुभव हा काय नाहीं अंगीं ॥
तुका म्हणे देह फांकिला विभागीं । उपकार अंगीं उरविला ॥

४४३६

कोण तो उपाव करूं भेटावया । जाळावी हे काया ऐसे वाटे ॥
सोडोनियां गांव जाऊं वनांतरा । रकुमादेवीवरा पहावया ॥
करूं उपवास शोधूं हें शरीर । न धरवे धीर नारायणा ॥
जाती आयुष्याचे दिवस हे चारी । मग केव्हां हरी भेटशील ॥
तुका म्हणे कांहीं सांगा विचारोनी । विठो तुझें मनीं असेल तें ॥

३९५४

जरि न भरे पोट । तरि सेवूं दर कूट ॥
परि न घालूं तुज भार । हाचि आमुचा निर्धार ॥
तुझें नाम अमोलिक । नेणती हे ब्रह्मादिक ॥
ऐसें नाम तुझें खरें । तुका म्हणे भासे पुरें ॥

४१७३

वैभव तें राज्य संपत्ती टाकावी । उदरार्थ मागावी माधोकरी ॥
आपुलें तें आधी करावें स्वहित । ऐसी आहे नीत स्वधर्माची ॥
वर्ण कुळ जाति याचा अभिमान । त्यजावा सन्मान लौकिकाचा ॥
तुका म्हणे राहे एकाकी निःशंक । देउनियां हाक कंठीं काळ ॥

९५०

माझ्या मुखावाटा नयो हें वचन । व्हावें हें संतान द्रव्य कोणा ॥
फुकाचा विभाग पतन दुःखासी । दोहींमुळें त्यासी तेचि साधें ॥

नाइकावी निंदा स्तुति माझ्या कानें । सादर या मनें होऊनियां ॥
तुका म्हणे देव असाध्य यामुळें । आशा मोहजाळें गुंतलिया ॥

## तेथें देवाची वसति

४६०५

आहे साच भावें सकळ व्यापक । नाहीं अभाविक लोकां कोठें ॥

४७८

विश्वासाची धन्य जाती । तेथें वस्ती देवाची ॥

४३४

जनीं वनीं हा अवघा देव । वासनेचा हा पुसावा ठाव ॥
मग वोळगती वासुदेव । ऐसा मनीं वसूं द्यावा भाव गा ॥

३८७९

उत्तम चांडाळ नरनारीबाळ । अवघेचि सकळ चतुर्भुज ॥
अवघा विठ्ठल तेथें दुजा नाहीं । भरला अंतर्बाही सदोदीत ॥

## दया

२६४

दया तिचें नांव भूतांचें पाळण । अणीक निर्दळण कंटकाचें ॥

## दंभ

४३३२

काय वा करिसी सोवळे ओवळे । मन नाहीं निर्मळ वाउगेंची ॥
काय वा करिसी पुस्तकांची मोट । घोकितां हृदय स्फोट हातां नये ॥
काय वा करीसी टाळ आणि मृदंग । जेथें पांडुरंग रंगला नाहीं ॥
काय वा करीसी ज्ञानाचिया गोष्टी । करणी नाहीं पोटीं बोलण्याची ॥
काय वा करिसी दंभ लौकिकातें । हित नाहीं मातें तुका म्हणे ॥

६०३

बोली मैंदाची वरवी असे । वाटे अंतरीं घालावे फांसे ॥
कैसा वरिवरि दिसताहे चांग । नव्हे भाविक केवळ मांग ॥
टिळा टोपी माळा कंठीं । अंधारीं नेउनि चेंपी घांटी ॥
तुका म्हणे तो केवळ पुंड । त्यावरि वाजती यमदंड ॥

४०२१

मुखें सांगे ब्रम्हज्ञान । जन लोकाची कापितो मान ॥
ज्ञान सांगतो जनासी । नाहीं अनुभव आपणासी ॥
कथा करितो देवाची । अंतरीं आशा बहु लोभाची ॥
तुका म्हणे तोचि वेडा । त्याचें हाणूनि थोबाड फोडा ॥

२९६९

ज्यासी विषयाचें ध्यान । त्यासी कैंचा नारायण ॥

४४९१

नाहीं संतांशीं शरण । काय वाचोनि पुराण ॥
म्हणे विठ्ठलाचा दास । देखोनि परनारीस हासे ॥
करिती विठोबाची भक्ती । दयाधर्म नाहीं चित्तीं ॥
तेथें नाहीं माझा देव । व्यर्थ श्रमवी हा जीव ॥
अंगीं नाहीं क्षमा दया । म्हणती भेट पंढरिराया ॥
नाहीं धर्माची वासना । काय करोनि प्रदक्षिणा ॥
ऐसें नव्हे भक्तिवर्म । तेथें नाहीं माझा राम ॥
नये कृपा कांहीं केल्या । नये धाम जीव गेल्या ॥
जैसी खड्गाची धार । विठ्ठल चरणीं तुका शूर ॥

४२१२

अर्थेवीण पाठांतर कासया करावें । व्यर्थचि मरावें घोकूनियां ॥
घोकूनियां काय वेगीं अर्थ पाहे । अर्थरूप राहे होऊनियां ॥
तुका म्हणे ज्याला अर्थी आहे भेटीं । नाहीं तरी गोष्टी बोलों नका ॥

## दाता

२३१६

दाता तो एक जाणा । नारायणा स्मरवी ॥

## दुःख

२३१२

दुःख ते जाणारे भाईनो सम तेथें विषम ।

१४६०

दुःखी तो लोकांत दंभ करी ।

४०२९

स्त्रिया धन बा हें खोटें । नागवले मोठे मोठे ॥
म्हणोनी सांडा दोनी । सुख पावाल निदानीं ॥
सर्व दुःखासी कारण । हींच दोन्हींची प्रमाण ॥
आशा सर्वस्वें सांडावी । तेणें निजपदवी पावावी ॥
देह लोभें नाडला । घाला यमाचा पडला ॥
तुका म्हणे निरापेक्षा । कांहीं न धरावी अपेक्षा ॥

४१९७

यासाठीं करितों निष्ठुर भाषण । आहेसी तूं जाण सर्वदाता ॥
ऐसें दुःख कोण आहे निवारिता । तों मी जाऊं आतां शरण त्यासी ॥

## दुर्लभ पाय विठोबाचे

२०३२

सोन्याचे पर्वत करवती पाषाण । अवघे रानोरान कल्पतरु ॥
परि या दुर्लभ विठोबाचे पाय । तेथें हे उपाय न सरती ॥
अमृतें सागर भरवती गंगा । म्हणवेल उगा राहे काळा ॥
भूत भविष्य कळों येईल वर्तमान । करवती प्रसन्न रिद्धि सिद्धी ॥
स्थान मान कळों येती योगमुद्रा । नेववेल वारा ब्रह्मांडासी ॥
तुका म्हणे मोक्ष राहे आलीकडे । इतर बापुडें काय तेथें ॥

## द्रव्यव्यय

१७५३ (नि.)

द्रव्य वेचावें अन्न छत्री । भूतीं द्यावे सर्वत्र ॥

## दुष्ट लोक

४५३

आहा रे भाई । तयावरी माझी ब्रीदावळी । भ्रष्ट ये कळी क्रियाहीन ॥
थुंका थुंका रे त्याच्या तोंडावरी । वाणिली ते थोरी दवडा वांया बाहेरी ॥
बाइलेचा दास पित्रांस उदास । भीक भिकाऱ्यास नये दारा ॥
विद्याबळें वाद सांगोनियां छळी । आणिकांसि फळी मांडोनिया ॥
गांविचिया देवा नाहीं दंडवत । ब्राम्हण अतीत घडेचिना ॥
सदा सर्वकाळ करितोचि निंदा । स्वप्नीं ही गोविंदा आठवीना ॥

खासेमध्यें धन पोटासी बंधन । नेणें ऐसा दानधर्म कांहीं ॥
तुका म्हणे नटे दावुनिया सोंग । लवों नेदी अंग भक्तिभावें ॥

५७३

भाव धरी तया तारील पाषाण । दुर्जना सज्जन काय करी ॥
करितां नव्हे नीट श्वानाचें हें पुच्छ । खापरा परीस काय करी ॥
काय करिल तया साखरेचें आळें । बीज तैसीं फळें येती तया ॥
तुका म्हणे वज्र भंगे एक वेळ । कठीण हा खळ तयाहूनी ॥

८१४

शूकरासी विष्ठा माने सावकास । मिष्टान्नाची त्यास काय गोडी ॥
तेवी अभक्तांसी आवडे पाखांड । न लगे त्यां गोड परमार्थ ॥
श्वानासी भोजन दिलें पंचामृत । तरी त्याचें चित्त हाडावरी ॥
तुका म्हणे सर्पा पाजिलिया क्षीर । वमितां विखार विष झालें ॥

११८

अतिवादी नव्हे शुद्ध या बीजाचा । ओळखा जातीचा अंत्यज तो ॥
वेद श्रुति नाहीं ग्रंथ ज्या प्रमाण । श्रेष्ठाचें वचन न मानी जो ॥
तुका म्हणे मद्यपानाचें मिष्टान्न । तैसा तो दुर्जन शिवों नये ॥

३०२

आंधळ्यांसि जन अवघेचि आंधळे । आपणासि डोळे दृष्टि नाहीं ॥
रोग्या विषतुल्य लागे हें मिष्टान्न । तोंडासि कारण चवी नाहीं ॥
तुका म्हणे शुद्ध नाहीं जो आपण । तया त्रिभुवन अवघें खोटें ॥

१२२

कांहीं नित्य नेमाविण । अन्न खाय तोचि श्वान ॥
वांयां मनुष्यपण । भार वाहे तो वृषभ ॥
त्याचा होय भूमी भार । नेणें यातीचा आचार ॥
जाला दावेदार । भोगवी अघोर पितरांसि ॥
अखंड अशुभ वाणी । खरें न बोलेचि स्वप्नीं ।
पापी तयाहुनी । आणीक नाहीं दुसरा ॥
पोट पोसी एकला । भूतीं दया नाहीं ज्याला ।
पाठीं लागे आल्या । अतिताचे दाराशीं ॥

कांहीं संतांचें पूजन । न घडे तीर्थांचें भ्रमण ॥
यमाचा आंदण । सीण थोर पावेल ॥
तुका म्हणे त्यांनीं । मनुष्यपणा केली हानी ॥
देवा विसरूनी । गेलीं म्हणतां मी माझें ॥

३७३०

नेदावी सलगी न करावा संग । करी चित्ता भंग वेळोवेळा ॥
सर्प शांतिरूप न म्हणावा भला । झोंबे खवळीला तात्काळ तो ॥
तुका म्हणे दुरी राखावा दुर्जन । करावें वचन न घडे तें ॥

२४०२

कावळियासी नाहीं दया उपकार । काळिमा अंतर विटाळसें ॥
तैसें कुधनाचें जिणें अमंगळ । घाणेरी वोंगळ वंदे वाणी ॥
कडु भोपळ्याचा उपचारें पाक । सेविल्या तिडीक कपाळासी ॥
तुका म्हणे विष सांडूं नये साप । आदरें तें पाप त्याचे ठायीं ॥

२२१७

दुर्जनाची जोडी । सज्जनाचे खेटर तोडी ॥
पाहे निमित्य तें उणें । धांवे छळावया सुनें ॥
न म्हणे रामराम । मनें वाचे हेंचि काम ॥
तुका म्हणे भागा । आली निंदा करी मागा ।

६६

दुर्जनासि करी साहे । तोही लाहे दंड हे ॥
शिंदळीच्या कुंटणी वाटा । संग खोटा खोट्याचा ॥
येर येरा कांचणी भेटे । आगी उठे तेथोनी ॥
तुका म्हणे कापूं नाकें । पुढें आणिकें शिकविती ॥

२१९७

दुर्जनाचें अंग अवघेंचि सरळ । नर्काचा कोथळ सांटवण ॥
खाय अमंगळ बोले अमंगळ । उठवी कपाळ संघष्णें ॥
सर्पा मंत्र चाले धरावया हातीं । खळाची ते जाती निखळचि ॥
तुका म्हणे कांहीं न साहे उपमा । आणीक अधमा बोखट्याची ॥

२१३८

दुर्जनाचा मान । सुखें करावा खंडण ॥
लात हाणोनिया वारी । गुंड वाट शुद्ध करी ॥
वहुतां पीडी खळ । त्याचा धरावा विटाळ ॥
तुका म्हणे नखें ! कादुनि टाकिजेती सुखें ॥

१९८०

सापें ज्यासी खावें । तेणें प्राणासी मुकावें ॥
काय लाधला दुर्जन । तोंडावरि थुंकी जन ॥
विंचु हाणी नांगी । अग्न लावी आणिकां अंगीं ॥
तुका म्हणे जाती । नरका पाउलीं चालती ॥

१७१५

काय ढोरापुढें घालूनि मिष्टान्न । खरा विलेपन चंदनाचें ॥
नको नको देवा खळाची संगति । रस ज्या पंगती नाहीं कथे ॥
काय सेज बाज माकडा विलास । अलंकारा नास करुनि टाकी ॥
तुका म्हणे काय पाजूनि नवनीत । सर्पा विष थीत अमृताचें ॥

१७२८

दुष्टाचें चित्त न भिने अंतरीं । जरी जन्मवरी उपदेशिला ॥
पालथे घागरी घातलें जीवन । न धरीच जाण तेंही त्याला ॥
जन्मा येउनि तेणें पतनचि साधिलें । तमोगुणें व्यापिलें जया नरा ॥
जळो जळो हें त्याचें ज्यालेपण । कासया हें आलें संवसारा ॥
पाषाण जीवनीं असतां कल्पवरी । पाहातां अंतरीं कोरडा तो ॥
कुचर मुग नयेचि पाका । पाहातां सारिखा होता तैसा ॥
तुका म्हणे असे उपाय सकळां । न चले या खळा प्रयत्न कांहीं ।
म्हणऊनि संग न करितां भला । धरितां अबोला सर्व हित ॥

११७

दुर्जनाची गंधी विष्ठेचिया परी । देखोनियां दुरी व्हावें तया ॥
अइका हो तुम्ही मात हे सज्जन । करूं संघट्टन नये बोलों ॥
दुर्जनाचे अंगीं अखंड विटाळ । वाणी रजस्वला स्रवे तैशी ॥
दुर्जनाचें भय धरावें त्यापरी । पिसाळलेवरी धांवे श्वान ॥
दुर्जनाचा भला नव्हे अंगसंग । बोलिलासे त्याग देशाचा त्या ॥
तुका म्हणे किती सांगावे पृथक । अंग कुंभीपाक दुर्जनाचें ॥

४०५०

आड पडे काडी । तरि ते बहुत पाणी खोडी ॥
दुर्जनाचे संगती । बहुतांचे घात होती ॥
एक पडे मासी । तरी ते वहु अन्न नासी ॥
तुका म्हणे रांड । ऐसी कां ते व्याली भांड ॥

४०७१

धिग तो दुर्जन नाहीं भूतदया । व्यर्थ तया माय प्रसवली ॥
कठिण हृदय तया चांडाळाचें । जो नेणें पराचें दुःख कांहीं ॥
आपुला हा प्राण तैसे सकळ लोक । न करी विवेक पशु जैसा ॥
तुका म्हणे सुखें कापीतसे गळे । आपुलिया वेळे रडतसे ॥

८१५

रासभ धुतला महातीर्थांमाजी । नव्हे जैसा तेजी शामकर्ण ॥
तेवीं खळा काय केला उपदेश । नव्हेचि मानस शुद्ध त्याचें ॥
सर्पासी पाजीलें शर्करापीयुष । अंतरींचें विष जाऊं नेणें ॥
तुका म्हणे श्वाना क्षिरीचें भोजन । सवेंचि वमन जेंवी तया ॥

४२७९

अधमाचें चित्त अहंकारी मन । उपदेश शीण तया केला ॥
पापियाचे मन न करी आचार । विधवे श्रृंगार व्यर्थ केला ॥
अधमाचें चित्त दुश्चित ऐकेना । वांया सीण मना करूं काय ॥
गद्भासी दिली चंदनाची उटी । केशर लल्हाटीं शुकराच्या ॥
पतिवचकेसी सांगतां उदंड । परि ते पाषांड तिचे मनीं ॥
तुका म्हणे तैसें अभाविका सांगतां । वाउगाचि चित्ता सीण होय ॥

१७९८

तोडुनि पुष्पवटिका फळवृक्षयाती । बाभळा राखती करूनि सार ।
कोण हित तेणें देखिलें आपुलें । आणीक पाहिलें सुख काई ॥
धान्यें बीजें जेणें जाळिलीं सकळें । पेरितो काळें जिरें बीज ।
मोडोनिया वाटा पुढिलांची सोय । आडरानें जाय घेउनि लोकां ॥
विषाचें अमृत ठेवूनियां नाम । करितो अधम ब्रम्हहत्त्या ॥
तुका म्हणे त्यास नाइकें सांगतां । तया हाल करितां पाप नाहीं ॥

# देवापाशीं मागणें

३

सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती । रखुमाईच्या पती सोयरिया ॥
गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देई मज प्रेम सर्वकाळ ॥
विठो माउलिये हाचि वर देई । संचरोनि राही हृदयामाजीं ॥
तुका म्हणे कांहीं न मागे आणीक । तुझे पायीं सुख सर्व आहे ॥

८१८

नाम आठवितां सद्गदित कंठीं । प्रेम वाढे पोटीं ऐसें करी ॥
रोमांच जीवन आनंदाश्रु नेत्रीं । अष्टांगही गात्रीं प्रेम तुझें ॥
सर्व ही शरीर वेचो या कीर्तनीं । गाऊं निशिदिनीं नाम तुझें ।
तुका म्हणे दुजें न करी कल्पांतीं । सर्वदा विश्रांति संतां पाईं ॥

३९९०

तुका म्हणे तुझा न पडावा विसर । दुःखाचे डोंगर जाले तरी ॥

२९३०

नाहीं तुज कांहीं मागत संपत्ती । आठवण चित्तीं असो द्यावी ॥

३६५५

जेणें माझें चित्त राहे तुझ्या पायीं । अखंड तें देई प्रेमसुख ॥
देहभाव राख दीन करूनियां । जनाचारी वांया जाय तैसा ॥
द्रव्य दारा नको मानाची आवडी । कवणेविशी गोडी प्रपंचाची ॥
तुझें नाम माझें धरूनियां चित्त । एकांत लोकांत सदा राहो ॥
तुका म्हणे तुझे जडोनियां पायीं । जालों उतराई पांडुरंगा ॥

१७८०

आतां काढाकाढी करि बा पंढरिराया । नाहीं तरी वांया गेलों दास ॥
जाणतां बैसलों दगडाचे नावे । तिचा धर्म घ्यावे प्राण हाचि ॥
मनाचा स्वभाव इंद्रियांचे ओढी । पतनाचे जोडी वरी हांव ॥
तुका म्हणे जाली अंधळ्याची परी । आतां मज हरी वाट दावी ॥

४०४२

आम्हा वैष्णवांचा कुळधर्म कुळींचा । विश्वास नामाचा एका भावें ॥
तरीच हरिचे दास म्हणवितां श्लाघिजे । निर्वासना कीजे चित्त आधी ॥

नाचूं गाऊं प्रेमें आनंदें कीर्तनीं । भुक्ति मुक्ति दोन्ही न मगों तुज ॥
तुका म्हणे देवा ऐसी यांची सेवा । द्यावी जी केशवा जन्मोजन्मीं ॥

२८६३

नको देऊं देवा पोटीं हें संतान । मायाजाळें जाण नाठवीसी ॥
नको देऊं देवा द्रव्य आणि भाग्य । तो एक उद्वेग होय जीवा ॥
तुका म्हणे करी फकिराचे परी । रात्रदिवस हरि येइल घरा ॥

३४४४

नको मज ताठा नको अभिमान । तुजवांचूनि क्षीण होतो जीव ॥
दुर्धर हे माया न होय सुटका । वैकुंठनायका सोडवीं मज ॥
तुका म्हणे तुझें जालिया दर्पण । मग निवारण होइल सर्व ॥

१५८५

मागणें तें एक तुजप्रति आहे । देशी तरि पाहे पांडुरंगा ॥
या संतांसी निरवी हेंचि मज देई । आणिक दुजें कांहीं न मागे तुज ॥
तुका म्हणे आतां उदार तूं होई । मज ठेवी पायीं संतांचिया ॥

२४३४

येणें मुखें तुझे वर्णी गुण नाम । तेंचि मज प्रेम देई देवा ॥
डोळे भरूनियां पाहे तुझें मुख । तेंचि मज सुख देई देवा ॥
कान भरोनियां ऐके तुझी कीर्ति । ते मज विश्रांती देई देवा ॥
वाहे रंगीं टाळी नाचे न उदास । हें देई हातास पायां बळ ॥
तुका म्हणे माझा सकळ देहभार ।आणीक नको ठाव चिंतूं यासी ॥

३२८४

आतां केशीराजा हेंचि विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसे ॥
देह असो माझा भलतिये ठायीं । चित्त तुझ्या पायीं असों द्यावें ॥
काळाचें खंडण घडावें चिंतन । धनमानजनविन्मुख तो ॥
कफवात पित्त देह अवसानीं । ठेवावी वारूनि दुरितें हीं ॥
सावध तों माझीं इंद्रियें सकळें । दिली एका वेळें हाक आधीं ॥
तुका म्हणे तूं या सकळांचा जनिता । येथें ऐकतां सकळांसी ॥

१९९६

देवा आतां ऐसा करी उपकार । देहाचा विसर पाडी मज ॥

२६३९

नरस्तुति आणि कथेचा विकरा । हे नको दातारा घडो देऊं ॥
ऐसिये कृपेची भाकितों करुणा । आहेसि तूं राणा उदाराचा ॥
पराविया नारी आणि परधना । नको देऊं मनावरी येऊं ॥
भूतांचा मत्सर आणि संतनिंदा । हें नको गोविंदा घडो देऊं ॥
देह अभिमान नको देऊं शरीरीं । चढों कांहीं परी एक देऊं ॥
तुका म्हणे तुझ्या पायांचा विसर । नको वारंवार पडो देऊं ॥

१७८२

तुझें नाम मुखीं न घेतां आवडी । जिव्हा तेचि घडी झडो माझी ॥
हें मज देईं हें मज देईं । आणिक दुजें कांहीं न मगे तुज ॥
बहिर कान तुझी कीर्ती नाइकतां । पाय न देखतां जात डोळे ॥
मना तुझें ध्यान नाहीं नित्य काळ । धिग तें चांडाळ जळो जळो ॥
हातपाय तेणें पंथें न चलतां । जावे ते अनंता गळोनियां ॥
तुजविण जिणें नाहीं मज चाड । तुका म्हणे गोड नाम तुझें ॥

३०६८

दुर्बुद्धि ते मना । कदा नुपजो नारायणा ॥
आतां ऐसे करी । तुझे पाय चित्तीं धरी ॥
उपजला भावो । तुमचे कृपे सिद्धी जावो ॥
तुका म्हणे आतां । लाभ नाहीं गा परता ॥

२८१५

माझे पाय तुझी डोई । ऐसें करि गा भाक देई ॥
पाहतां तंव उफराटें । घडे तरी भाग्य मोठें ॥

७२२

नसे तरी मनीं नसो । परी वाचे तरी वसो ॥
देह पडो या चिंतनें । विठ्ठलनाम संकीर्तनें ॥
दंभ स्थिति भलत्या भावें ॥ मज हरिजन म्हणावें ॥
तुका म्हणे काळें तरी । मज सांभाळील हरी ॥

२३०६

हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥

न लगे मुक्ति आणि संपदा ॥ संत संग देई सदा ॥
तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हासी ॥

४०६७

जन्मोजन्मीं दास । व्हावें हेचि माझी आस ॥
पंढरीचा वारकरी । वारी चुको नेदी हरी ॥
संत समागम । अंगीं स्थिरावलें प्रेम ॥
स्नान चंद्रभागे । तुका म्हणे हेंचि मागें ॥

२०८१

आतां माझ्या भावा । अंतराय नको देवा ॥
आलें भागा तें करितों । तुझें नाम उच्चारितों ॥
दृढ माझें मन । येथें राखावें बांधोन ॥
तुका म्हणे वाटे । नको फुटो देऊं फांटे ॥

## देवभेटीची तळमळ

८५७

पाप फार किंवा जालासी दुर्बळ । मागिल तें बळ नाहीं आतां ॥
काय जालें देणें निघालें दिवाळें । कीं बांधलासि वळें ऋणेंपायीं ॥

१६२६

काय तुझे वेंचे मज भेटी देतां । वचन बोलतां एक दोन ॥
काय तुझें रूप घेतों मी चोरोनि । त्या भेणें लपोनि राहिलासी ॥

३९०९

स्वामीसी संकट पडे जे गोष्टीचें । काय त्या प्रेमाच सुख मज ॥
दुखवीना चित्त तुझें नारायणा । कांहींच मागेना तुजपासीं ॥
रिद्धिसिद्धि मोक्ष संपत्ति विलास । सोडियेली आस याची जीवें ॥
तुका म्हणे एके वेळे देई भेटी । वोरसोनि पोटीं आलिंगावे ॥

१७६३

लोकमान देहसुख । संपत्ति उपभोग अनेक ।
विटंवना दुःख । तुझिये भेटीवांचूनि ॥
तरी मज ये भेट ये भेट । काय ठाकलासी नीट ।
थोर पुण्यें वीट । तुज दैवेंचि लाधली ॥

काय ब्रह्मज्ञान करूं कोरडें । रितें मावेचें मापाडें ।
भेटीवीण कुडें । तुझिये अवघें मज वाटे ॥
आत्मस्थितीचा विचार । काय करूं हा उद्धार ।
न देखतां धीर । चतुर्भुज मज नाहीं ॥
रिद्धिसिद्धी काय करूं । अथवा अगम्य विचारू ।
भेटीविण भारु । तुझिये वाटे मज यांचा ॥
तुजवांचूनि कांहीं व्हावें । ऐसें नको माझिया जीवें ।
तुका म्हणे द्यावें । दरुषण पायांचें ॥

८५९

दंभें कीर्ती पोट भरे मानी जन । स्वहित कारण नव्हे कांहीं ॥
अंतरती तुझे पाय मज दुरी । धरितां हे थोरी जाणिवेची ॥
पिंडाच्या पाळणें धांवती विकार । मज दावेदार मजमाजी ॥
कैसा करूं घात आपुला आपण । धरूनि गुमान लोकलाज ॥
तुका म्हणे मज दावी तो सोहळा । देखे पाय डोळां तुझे देवा ॥

११३६

जनीं जनार्दन ऐकतों हे मात । कैसा तो वृत्तांत न कळे आम्हां ॥
जन्म जरा मरण कवण भोगी भोग । व्याधी नाना रोग सुखदुःखें ॥
पापपुण्यें शुद्धाशुद्ध आचरणें । हीं कोणाकारणें कवणें केलीं ॥
आम्हां मरण नाश तूं तंव अविनाश । कैसा हा विश्वास साच मानूं ॥
तुका म्हणे तूंचि निवडी हा गुढार । दाखवी साचार तेंचि मज ॥

८५८

काय देह घालूं करवती कर्मेरी । टाकूं या भितरी अग्नीमाजीं ॥
काय सेवूं वन शीत उष्ण तान । साहों कीं मोहन धरूनी बैसों ॥
काय लावूं अंगीं भस्म उधळण । हिंडूं देश कोण खुंट चारी ॥
काय त्यजूं अन्न करूनि उपास । काय करूं नास जीवित्वाचा ॥
तुका म्हणे काय करावा उपाव । ऐसा देईं भाव पांडुरंगा ॥

१८८२

कवणांशीं भांडों कोण माझें साहे । कोण मज आहे तुजविण ॥

१९०६

माझा तुम्ही देवा केला अंगीकार । हें मज साचार कैसें कळे ॥
कां हो कांहीं माझ्या नये अनुभवा । विचारितां देवा आहे तैसा ॥
लौकिकाचा मज लाविसी आभार । शिरोरत्नभार दुःखाचा हा ॥
तुका म्हणे नाहीं पालट अंतरीं । तेथें दिसे हरी ठकाठकी ॥

१२२९

नाहीं मागितला । तुम्हां मान म्यां विठ्ठला ॥
जे हे करविली फजिती । माझी एवढी जना हातीं ॥
नाहीं केला पोट । पुढें घालूनि बोभाट ॥
तुका म्हणे धरूनि हात । नाहीं नेलें दिवाणांत ॥

२९६८

विठ्ठला विठ्ठला । कंठ आळवितां फुटला ॥

११३२

काय कीर्ती करूं लोक दंभ मान । दाखवी चरण तुझे मज ॥
मज आतां ऐसें नको करूं देवा । तुझा दास जावा वांयाविण ॥
होइल थोरपण जाणीवेचा भार । दुरावेन दूर तुझ्या पायीं ॥
अंतरींचा भाव काय कळे लोकां । एक मानी एकां देखोवेखीं ॥
तुका म्हणे तुझे पाय आतुडती । ते मज विपत्ति गोड देवा ॥

५३५

देखोनियां तुझ्या रूपाचा आकार । उभा कटीं कर ठेवूनियां ॥
तेणें माझ्या चित्ता होतें समाधान । वाटतें चरण न सोडावें ॥
मुखें गातों गीत वाजवितों टाळी । नाचतों राउळीं प्रेमसुखें ॥
तुका म्हणे मज तुझ्या नामापुढें । तुच्छ हें बापुडें सकळी काळ ॥

२६९९

मज तो अत्यंत दर्शनाचि आस । जाला तरी हो नाश जीवित्वाचा ॥

३७५४

अद्वैतीं तों माझें नाहीं समाधान । गोड हे चरण सेवा तुझी ॥

१९१७

एवढा संकोच तरि कां व्यालासी । आम्ही कोणापाशीं तोंड वासूं ॥
कोण मज पुसे सिणले भागले । जरी मोकलिलें तुम्ही देवा ॥

कवणाची वाट पाहों कोणीकडे । कोण मज ओढे जीवलग ॥
कोण जाणे माझें जीवींचें साकडें । उगवील कोडें संकटाचें ॥
तुका म्हणे तुम्ही देखिली निश्चिंती । काय माझे चित्तीं पांडुरंगा ॥

३८५२

माझा तो स्वभाव आहे अनावर । तुज देतां भार काय नव्हे ॥
ऐसें कळों आलें मज नारायणा । जागृतीहि स्वप्ना ताळ नाहीं ॥
संपादिला तो हा अवघा बाह्य रंग । तुझा नाहीं संग अभ्यंतरीं ॥
तुका म्हणे सत्त्या नाहीं पाठीपोट । असोनि निधोट काय जाती ॥

५४३

कां रे माझा तुज न ये कळवळा । असोनि जवळा हृदयस्था ॥
अगा नारायणा निष्ठुरा निर्गुणा । केला शोक नेणां कंठस्फोट ॥
कां हें चित्त नाहीं पावलें विश्रांती । इंद्रियांची गति कुंटे चि ना ॥
तुका म्हणे कां रे धरियेला कोप । पाप सरलें नेणों पांडुरंगा ॥

## देवाचें स्थान व स्वरूप

४५३४

यांचे मी जवळी देव तो नेणती । लटिकें मानिती साच खरे ॥
लटिकें तें साच साच तें लटिकें । नेणती लोभिकें आशाबद्ध ॥

४५३५

चित्त तें निर्मळ जैसें नवनीत । जाणिजे अनंत तयामाजी ॥
तयामाजी हरि जाणिजे त्या भावें । आपलें परावें सारिखेंचि ॥
चिंतनें तयाच्या तरती आणीक । जो हें सकळिक देव देखे ॥
देव देखे तो ही देव कसा नव्हे । उरला संदेहे काय त्यासी ॥

४६०५

आहे साच भावें सकळ व्यापक । नाहीं अभाविक लोकां कोठें ॥

४७८

विश्वासाची धन्य जाती । तेथें वस्ती देवाची ॥

४३४

जनीं वनीं हा अवघा देव । वासनेचा हा पुसावा ठाव ।
मग वोळगती वासुदेव । ऐसा मनीं वसूं द्यावा भाव गा ॥

५७८ (नि.)

आनंद अद्वय नित्य निरामय । जे कां नित्य ध्येय योगियांचे ॥
ते हे समचरण साजिरे विटेवरी । पाहा भीमा तीरीं विठ्ठलरूप ॥

१८३४

सगुण की साकार निर्गुण की निराकार । न कळे हा पार वेदां श्रुती॥

३७

जेथें तेथें देखे तुझींच पाउलें । त्रिभुवन संचलें विठ्ठला गा ॥

२६२

केला मातीचा पशुपति । परि मातीसी काय म्हणती ।
शिवपूजा शिवासि पावे । माती मातीमाजी समावे ॥
तैसे पूजिती आम्हा संत । पूजा घेतो भगवंत ॥
आम्ही किंकर संतांचे दास । संतपदवी नको आम्हांस ॥
केला पाषाणाचा विष्णु । परी पाषाण नव्हे विष्णु ॥
विष्णुपूजा विष्णुसि अर्पे । पाषाण राहे पाषाणरूपें ॥
केली कांशाची जगदंबा । परि कांसे नव्हे अंबा ॥
पूजा अंबेची अंबेला घेणें । कांसे राहे कांसेपणें ॥
ब्रह्मानंद पूर्णामाजी । तुका म्हणे केली कांजी ॥
ज्याची पूजा त्याणेंचि घेणें । आम्ही पाषाणरूप रहाणें ॥

३७४७

विश्वीं विश्वंभर । बोले वेदांतींचा सार ॥
जगीं जगदीश । शास्त्रें वदती सावकाश ॥
व्यापिलें हें नारायणें । ऐसीं गर्जतीं पुराणें ॥
जनीं जनार्दन । संत बोलती वचन ॥
सूर्याचिया परी । तुका लोकीं क्रीडा करी ॥

३५४

जीवशिवाचें भातुकें । केलें क्रीडाया कौतुकें ॥
कैंची येथें लोकें । हा आभास अनित्य ॥
विष्णुमय खरें जग । येथें लागतसे लाग ॥
वांटिले विभाग । वर्णधर्म हा खेळ तयाचा ॥

अवघी एकाचीच वीण । तेथें कैंचे भिन्नाभिन्न ॥
वेद्पुरुष नारायण । तेणें केला निवाडा ॥

३१२२

जीव अवघे देव । खोटा नागवी संदेह ॥

४४८२

देहीं असोनियां देव । वृथा फिरतो निदैंव ॥
देव आहे अंतर्यामीं । व्यर्थ हिंडे तीर्थग्रामीं ॥
नाभी मृगाचे कस्तुरी । व्यर्थ हिंडे वनांतरीं ॥
साखरेचें मूळ ऊंस । तैसा देहीं देव दिसे ॥
दुधीं असतां नवनीत । नेणें तयाचें मथित ॥
तुका सांगे मूढ जना । देहीं देव कां पाहाना ॥

४३९७

कां रे दाटोन होतां वेडे । देव आहे तुम्हांपुढें ॥
ज्यासि पाठ नाहीं पोट । करी त्रैलोक्याचा घोंट ॥

४२८८

भक्ताचिया काजा जालासी सगुण । तुज नाहीं गुण रूप नाम ॥

४३६६

म्हणे विठ्ठल पाषाण । त्याच्या तोंडावरि वाहाण ॥

२४७७

उंबरांतील कीटका । हेंचि ब्रह्मांड ऐसें लेखा ॥
ऐसीं उंबरें किती झाडीं । ऐशीं झाडें किती नव खंडीं ॥
हेंचि ब्रह्मांड आम्हांसी । ऐसीं अगणित अंडें कैसी ॥
विराटाचे अंगीं तैसे । मोजू जातां अगणित केंश ॥
ऐशा विराटाच्या कोटी । साठवल्या ज्याच्या पोटीं ॥
तो हा नंदाचा बाळ मुकुंद । तान्हा म्हणवी परमानंद ॥
ऐशीं अगम्य ईश्वरी लीळा । ब्रह्मानंदी गम्य तुकयाला ॥

४५

दुजें खंडें तरी । उरला तो अवघा हरि ॥
आपणाबाहेरी । न लगे ठाव धुंडावा ॥

## द्वेष

४५७५

द्वेषियाचा संग न घडावा कोणा । विष जेवीं प्राणां नाश करी ॥

## देवानें अंगिकार केला

२९९० (नि.)

सोहळा तो जाला । अंगीकार देवें केला ॥
ग्रेर करिती भोजन । पोट पोसाया दुर्जन ॥

## दुःसंग

४२१३

बैसतां चोरांपाशीं तैसी होय बुद्धी । देखतांचि चिंधी मन धांवे ॥
व्यभिचाऱ्यापाशीं वैसतां क्षणभरी । देखतांचि नारी मन धांवे ॥
प्रपंचाचा छंद टाकुनिया गोवा । धरावें केशवा हृदयांत ॥
सांडूनियां देई संसाराची बेडी । कीर्तनाची गोडी धरावी गा ॥
तुका म्हणे तुला सांगतों मी एक । रुक्मिणीनायक मुखीं गावा ॥

## देवावर भार

१६२५

विठ्ठल सुखा विठ्ठल दुःखा । तुकयां मुखा विठ्ठल ।

३७०

घालुनियां भार राहिलों निश्चिती । निरविलें संतीं विठोबासि ॥
लावूनियां हातें कुरवाळिला माथा । सांगितलें चिंता न करावी ॥
कटीं कर सम चरण साजिरे । राहिला भीवरे तीरीं उभा ॥
खुंटले सायास अणिकि या जीवा । धरिले केशवा पाय तुझे ॥
तुज वाटे आतां तें करी अनंता । तुका म्हणे संता लाज माझी ॥

२८८०

काय माझें नेती वाईट म्हणोन । करूं समाधान कशासाठीं ॥
काय मज लोक नेती परलोका । जातां कोणा एका निवारेल ॥
न म्हणे कोणासी उत्तम वाईट । सुखें माझी कूट खावो मागें ॥
सर्व माझा भार असे पांडुरंगा । काय माझें जगासवें काज ॥
तुका म्हणे माझें सर्वही साधन । नामसंकीर्तन विठोबाचें ॥

# देवकृपा

४५०८

सेविलिया रामकृष्ण नारायण । नाहीं त्या बंधन संसाराचें ॥
संसार तें काय तृणवतमय । अग्नि त्यासी खाय क्षणमात्रें ॥
क्षणमात्रें जाळी दोषांचिया रासी । निंद्य उत्तमासी वंद्य करी ॥
करी ब्रिदें साच आपलीं आपण । पतितपावन दिनानाथ ॥
नाथ अनाथाचा पति गोपिकांचा । पुरवी चित्तींचा मनोरथ ॥
चित्तीं जें धरावें तुका म्हणे दासीं । पुरविता होसी मनोरथ ॥

४५६७

नेदी दुःख देखों दासा नारायण । ठेवी निवारून आल्या आधीं ॥
आधीं पुढें शुद्ध करावा मारग । दासांमागें मग सुखरूप ॥
पर्वतासि हात लावला अनंतें । तो जाय वरतें आपेंआप ॥
दिनाचा कृपाळु पतित पावन । हें करी वचन सांच खरें ॥
सांगणें नलगे सुखदुःख दासा । तुका म्हणे ऐसा कृपावंत ॥

४५७६

नाहीं नाश हरि आठवितां मुखें । जोडतील सुखें सकळ ही ॥
सकळही सुखें वोळलीं अंतरीं । मग त्या बाहेरी काय काज ॥

८७३

माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव । आपणचि देव होय गुरु ॥
पढियें देहभावें पुरवितो वासना । अंतीं तें आपणापाशीं न्यावें ॥
मागें पुढें उभा राहे सांभाळीत । आलिया आघात निवारावे ।
योगक्षेम त्याचें जाणें जडभारी । वाट दावी करीं धरूनियां ॥
तुका म्हणे नाहीं विश्वास ज्या मनीं । पाहावें पुराणीं विचारून ॥

२७९५

आडलिया जना होसी सहाकारी । अंधळियाकरीं काठी तूंचि ॥
आडिले गांजिले पीडिले संसारीं । त्यांचा तूं कैवारी नारायणा ॥
तुका म्हणे तुझे कृपे पार नाहीं । माझे विठाबाई जननीये ॥

२१५१

पाळिलों पोसिलों जन्मजन्मांतरीं । वागविलों करी धरूनिया ॥
आतां काय माझा धडेल अव्हेर । मागें बहु दूर वागविलें ॥

नेदी वारा अंगीं लागो आघाताचा । घेतला ठायींचा भार माथां ॥
तुका म्हणे बोल करितों आवडी । अविट ते चि गोडी अंतरींची ॥

१०००

न पुसतें कोणी कोठेंही असतां । समाधान चित्ताचिया सुखें ॥
तुका म्हणे जन अव्हेरितें मज । तरी केशीराज सांभाळितां ॥

२१३०

याचिया आधारें राहिलों निश्चिंत । ठेवूनियां चित्त पायीं सुखें ॥
माझें सुखदुःख जाणे हित फार । घातलासे भार पांडुरंगा ॥
कृपेचीं पोसणीं ठायींचीं अंखिलीं । म्हणऊनि लागली यास चिंता
मन राखे हातीं घेउनियां काठी । इंद्रियें तापटीं फांकों नेदी ॥
तुका म्हणे यासी अवघड नाहीं । शरणागता कांहीं रक्षावया ॥

१७१२

हरिच्या दासां भये । ऐसें बोलों तें ही नये ॥
राहोनियां आड । उभा देव पुरवी कोड ॥
हरिच्या दासां चिंता । अघटित हे वार्ता ॥
खावें ल्यावें द्यावें । तुका म्हणे पुरवावे ॥

८२४

राजा चाले तेथें वैभव सांगातें । हें काय लागतें सांगावें त्या ॥
कोणी कोणा येथें न मनी जी फुका । कृपेविण एका देवाचिया ॥
श्रृंगारिलें नाहीं तगोंयेत वरि । उमटे लौकरि जैसे तैसें ॥
तुका म्हणे घरीं वसे नारायण । कृपेची ते खुण साम्या येते ॥

२०००

जेथें जातों तेथें तूं माझा सांगातीं । चालविसी हातीं धरूनियां ॥
चालों वाटे आम्ही तुझाचि आधार । चालविसी भार सवें माझा ॥
बोलों जातां बरळ करिसी तें नीट । नेली लाज धीट केलों देवा ॥
अवघे जन मज जाले लोकपाळ । सोइरे सकळ प्राणसखे ॥
तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें । जालें तुझें सुख अंतर्बाहीं ॥

## देवप्राप्तीची खूण

३४४६

देवाची ते खूण आला ज्याच्या घरा । त्याच्या पडे चिरा मनुष्यपणा

देवाची ते खूण करावे वाटोळें । आपणा वेगळें कोणी नाहीं ॥
देवाची ते खूण गुंतों नेदी आशा । ममतेच्या पाशा शिवों नेदी ॥
देवाची ते खूण गुंतों नेदी वाचा । लागों असत्याचा मळ नेदी ॥
देवाची ते खूण तोडी मायाजाळ । आणि हें सकळ जग हरी ॥
पहा देवें तेंचि वळकाविलें स्थळ । तुकयापें सकळ चिन्हें त्याचीं ॥

३०५१

देव भक्तालागीं करूं नेदी संसार । अंगे वारावार करोनि ठेवी ॥
भाग्य द्यावें तरी अंगीं भरे ताठा । म्हणोनि करंटा करोनि ठेवी ॥
स्त्री द्यावी गुणवंती नसती गुंते आशा । या लागीं कर्कशा पाठी लावी ॥
तुका म्हणे मज प्रचित आली देखा । आणीक या लोकां काय सांगों ॥

९५३

वासनेच्या मुखीं अदळूनि भीतें । निर्वाहापुरतें कारण तें ॥
या नांवें अंतरा आला नारायण । चित्त समाधान खुण त्याची ॥
सर्वकाळ हाचि करणें विचार । विवेकीं सादर आत्मत्वाचे ॥
तुका म्हणे जों जों भजनासी वळे । अंग तों तों कळे सन्निधता ॥

## दोष

२६५२

दोष ऐशा नांवें देहाचा आदर । विटलें अंतर अहंभावें ॥

१४६५

याचि नांवें दोष । राहे अंतरीं किल्मिष ॥

## धर्म

२३१२

धर्म तयासी घडे रे ज्याचे स्वाधीन भाज ।

३१६

विधीनें सेवन । विषयत्यागातें समान ॥
मुख्य धर्म देव चित्तीं । आदि अवसान अंतीं ॥
बहु अतिशय खोटा । तर्कें होती बहु वाटा ॥
तुका म्हणे भावें । कृपा करीजेते देवें ॥

१२९८

आज्ञा पाळावी हा धर्म । जाणते हो जाणा वर्म ॥
तुका म्हणे वृत्ति । अविट हे सहज स्थिति ॥

१७११

## धीर, अधीर

धीर तो कारण । साह्य होतो नारायण ॥
तुका म्हणे हरि । दासां रक्षितो निर्धारी ॥

१४४६

अधीरासी नाहीं चालों जातां मान । दुर्लभ दर्शन धीर त्याचें ॥

## ध्यानाची फलश्रुती

४०७७

ध्यानीं ध्यातां पंढरिराया । मनासहित पालटे काया ॥
तेथें बोला कैंची उरी । माझें मीपण जाला हरि ॥
चित्तचैतन्यीं पडतां मिठी । दिसे हरिरूप अवघी सृष्टि ॥
तुका म्हणे सांगों काय । एकाएकीं हरिवृत्तिमय ॥

## नष्टबुद्धी

१४४६

तुका म्हणे नाहीं आणिकांसी बोल । वांया जाय मोल बुद्धीपाशीं ॥

## नामाचें सामर्थ्य

२५०२

जाली होती काया । बहु मळिण देवराया ॥
तुमच्या उजळिलीं नामें । चित्त प्रक्षाळिलें प्रेमें ॥

२५०४

प्राणिया एक बीजमंत्र उच्चारीं । प्रतिदिनीं रामकृष्ण म्हण कां मुरारी
हेंचि साधन रे तुज सर्व सिद्धींचें । नाम उच्चारीं पां गोपाळाचे वाचे ॥
उपास पारणें न लगे वनसेवन । न लगे धूम्रपान पंचाअग्नतापन ॥
फुकाचें मुखाचें कांहीं न वेचें भांडार । कोटी यज्ञांपरिस तुका म्हणे हें सार ॥

४१९

नामाचें चिंतन । तेथें धांवते आपण ॥

४५१

हे हरि नामाची आंबिली । जगा पोटभरी केली ॥
विश्रांति कल्पतरूची साउली । सकळां वर्णां सेवितां भली ॥
म्हणा हरहर महादेव ॥

८०१

असो आतां ऐसा धंदा । तुज गोविंदा आठवूं ॥
रक्षितां तूं होसी जरी । तरि काय येरीं करावें ॥
काया वाचा मन पायीं । राहे ठायीं करूं तें ॥
तुका म्हणे गाइन गीतीं । रूप चित्तीं धरूनियां ॥

६६३

विठ्ठल भीमातीरवासी । विठ्ठल पंढरीनिवासी ।
विठ्ठल पुंडलिकापासीं । कृपादानाविसीं उदार ॥
विठ्ठल स्मरणा कोंवळा । विठ्ठल गौरवीं आगळा ।
आधार ब्रह्मांडा सकळा । विठ्ठल लीळाविग्रही ॥
उभा चि परी न मनी सीण । नाहीं उद्धरितां भिन्न ।
समर्थांचे घरीं एक अन्न । आर्तभूता क्षणोक्षणा सांभाळी ।
रुचीचे प्रकार । आणिताती आदरें ॥
कोठेंही न पडे अंतर । थोरां थोर धाकुट्यां धाकुटा ॥
करितां वळ धरितां नये । झोंबतां डोळे मनेंच होय ।
आपुल्या उद्देशाची सोय । जाणे हृदयनिवासी ॥
पान्हा तरी आल्या अंतर तेथें । तों नाहीं भरिलें रितें ।
करितों सेवन आइतें । तुका म्हणे चित्तें चित्त मेळवूनी ॥

६११

विठ्ठल आमचें जीवन । आगमनिगमाचें स्थान ।
विठ्ठल सिद्धीचें साधन । विठ्ठल ध्यान विसावा ॥
विठ्ठल कुळीचें दैवत । विठ्ठल वित्त गोत चित्त ।
विठ्ठल पुण्य पुरुषार्थ । आवडे मात विठ्ठलाची ॥
विठ्ठल विस्तारला जनीं । सप्तही पाताळें भरूनी ।
विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं । विठ्ठल मुनिमानसीं ॥

विठ्ठल जीवाचा जिव्हाळा । विठ्ठल कृपेचा कोंवळा ।
विठ्ठल प्रेमाचा पुतळा । लावियेलें चाळा विश्व विठ्ठलें ॥
विठ्ठल बाप माय चुलता । विठ्ठल भगिनी आणि भ्राता ।
विठ्ठलेंविण चाड नाहीं गोता । तुका म्हणे आतां नाहीं दुसरें ॥

६४५

बीज आणि फळ हरीचें नाम । सकळ पुण्य सकळ धर्म ।
सकळा कलांचें हें वर्म । निवारी श्रम सकळही ॥
न लगे सांडावा आश्रम । उपजले कुळींचे धर्म ।
आणीक न करावे श्रम । एक पुरे नाम विठोबाचें ॥
वेदपुरुष नारायण । योगियांचें ब्रह्म शून्य ।
मुक्ता आत्मा परिपूर्ण । तुका म्हणे सगुण भोळ्या आम्हां ॥

६५७

चांगलें नाम गोमटें रूप । निवती डोळे हरती ताप ।
विठ्ठल विठ्ठल हाचि जप । प्रगट स्वल्प अति सार ॥
शस्त्र हें निर्वाणींचा बाण । निकट समय अवसान ।
कोठें योजेल दश दान । खंडी नारायण दुःख चिंतनें ॥
सकळ श्रेष्ठांचें मत । पावे सिद्धी पाववी अनंत ।
म्हणोनि व्हावें शरणागत । आहे उचित एवढेंचि ॥
म्हणोनि रुसलों संसारा । सर्प विखार हा पांढरा ।
तुजशीं अंतर रे दातारा । याचि दावेदारानिमित्त ॥
येणें मज भोगविल्या खाणी । नसतां छंद लाविला मनीं ।
माजलों मी माझे भ्रमणीं । जाली बोडणी विटंबना ॥
पावलों केलियाचा दंड । खाणी भोगविल्या उदंड ।
आतां केला पाहिजे खंड । तुका दंडवत घाली देवा ॥

६६४

ताप हें हरण श्रीमुख । हरी भवरोगा ऐसें दुःख ।
अवलोकितां उपजे सुख । उभें सन्मुख दृष्टीपुढें ॥
न पुरे डोळियांची धणी । सखोल कृपेचीच खाणी ।
स्तवितां न पुरे वेदवाणी । तो हा समचरणी कृपानिधी ॥

रामकृष्णध्यान वामननारसिंहीं । उग्र आणि सौम्य कांहींच नाहीं ।
सांपडे भरलीये वाही । भाव शुद्ध पाहीं याचें भातुकें ॥
गुणगंभीर चतुर सुजाण । शूर धीर उदार नारायण ।
व्यापक तरी त्रिभुवन । मनमोहन लावण्य हें ॥
ठाण हें साजिरें सुंदर ।अविनाश अविकार ॥
अनंत आणि अपार । तो हा कटीं कर धरिता हे ॥
जयाची वाणी सुमनमाळा । परमामृत जिव्हाळा ।
अनंता अंगीं अनंत कळा । तुका जवळा चरणसेवक ॥

अनुक्रम ९८०७३ विभाग ... क्र. ... नो. दि. २३/७/५८ ग्रंथ

३४१२

न करी पठन घोष अक्षरांचा । बीजमंत्र आमुचा पांडुरंग ॥
सर्वकाळ नामचिंतन मानसीं । समाधान मनासी समाधि हे ॥
न करीं भ्रमण न रिघें कपाटीं । जाईन तेथें दाटी वैष्णवांची ॥
अनु नेणें कांहीं न वजे तपासी । नाचे दिंडीपाशीं जागरणीं ॥
उपवास व्रत न करीं पारणें । रामकृष्ण म्हणे नारायण ॥
आणिकांची सेवा स्तुती नेणें वाणूं । तुका म्हणे आणु दुजें नाहीं ॥

३७५५

हेंचि माझें तप हेंचि माझें दान । हेंचि अनुष्ठान नाम तुझें ॥
हेंचि माझें तीर्थ हेंचि माझें व्रत । सत्य हें सुकृत नाम तुझें ॥
हाचि माझा धर्म हेंचि माझें कर्म । हाचि नित्यनेम नाम तुझें ॥
हाचि माझा योग हाचि माझा यज्ञ । हेंचि जपध्यान नाम तुझें ॥
हेंचि माझें ज्ञान श्रवण मनन । हेंचि निजध्यासन नाम तुझें ॥
हाचि कुळाचार हाचि कुळधर्म । हाचि नित्यनेम नाम तुझें ॥
हा माझा आचार हा माझा विचार । हा माझा निर्धार नाम तुझें ॥
तुका म्हणे दुजे सांगायासि नाहीं । नामेंविण कांहीं धनवित्त ॥

२९८६

पाहों ग्रंथ तरी आयुष्य नाहीं हातीं । नाहीं ऐशी मति अर्थ कळे ॥
होईल तें हो या विठोबाच्या नांवें । आचरलें भावें जीवीं धरूं ॥

२१५३

माझें अंतरींचें तोचि जाणे एक । वैकुंठनायक पांडुरंग ॥
जीवभाव त्याचे ठेवियेला पायीं । मज चिंता नाहीं कवणेविशी ॥

सुखसमारंभें संतसमागमें । गाऊं वाचे नाम विठोबाचें ॥
गातां पुण्य होय आइकतां लाभ । संसारबंद तुटतील ॥
तुका म्हणे जीव तयासी विकिला । आणीक विठ्ठलाविण नेणें ॥

७४०

तुझे थोर थोर । भक्त करिती विचार ॥
जपतपादि साधनें । मज चिंतवेना मनें ॥
करुणावचनें । म्यां भाकावीं तुम्हां दीनें ॥

३४३९

आतां तुझें नाम गात असे गीतीं । म्हणोनी मानिती लोक मज ॥
अन्न वस्त्र चिंता नाहीं या पोटाची । वारिली देहाची थोर पीडा ॥
सज्जन संबंधी तुटली उपाधी । रोकडी या बंदीं सुटलोंसे ॥
घ्यावा द्यावा कोणें करावा सायास । गेले आशापाश वारोनियां ॥
तुका म्हणे तुज कळेल तें आतां । करा जी अनंता मायबापा ॥

१५८५ (नि.)

कायें करूनी करी धंदा । चित्त गोविंदा तुझे पायीं ॥
ऐशा संकल्पाची संधि । माझे बुद्धि धीर देवा ॥
कुटुंबाचा तुम्हा भार । मज व्यवहार निमित्त ॥
तुका म्हणे करितां काम । हृदयीं नाम धरीन ॥

२९५६

मज हंसतील लोक । परि मी गाईन निःशंक ॥
तुझे नामीं मी निर्लज्ज । काय जनासवें काज ॥
तुका म्हणे माझी विनंति । तुम्ही परिसा कमळापती ॥

४०९१

रात्रंदिवस आम्हां युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ॥
जीवाही आगोज पडती आघात । येऊनियां नित्य नित्य करी ॥
तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळें । अवघीयांचें काळें केलें तोंड ॥

१५२३

सांडोनियां दों अक्षरां । काय करूं हा पसारा ॥
विधिनिषेधाचा भारा । तेणें दातारा नातुडसी ॥

म्हणोनि बोबड्या उत्तरीं । वाचे जपे निरंतरीं ॥
नाम तुझें हरी । भवसागरीं तारूं तें ॥
सर्वमय ऐसें वेदांचें वचन । श्रुति गर्जती पुराणें ॥
नाहीं आणीक ध्यान । रे साधन मज चाड ॥
शेवटीं ब्रह्मार्पण । याचि मंत्राचें कारण ॥
काना मात्रा वांयाविण । तुका म्हणे बिंदुलीं ॥

२४५८

नामसंकीर्तन साधन पैं सोपें । जळतील पापें जन्मांतरें ॥
न लगे सायास जावें वनांतरा । सुखें येतो घरा नारायण ॥
ठायींच बैसोनि करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ॥
रामकृष्ण हरि विठ्ठल केशवा । मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥
याविण असतां आणीक साधन । वाहातसें आण विठोबाची ॥
तुका म्हणे सोपें आहे सर्वांहूनी । शाहाणा तो धणी घेतो येथें ॥

१२११

म्हणोनि गोड सर्वभावें । आंघोळी न लगे तोंड धुवावें ॥
अर्थचाड जीवें । न लगे भ्यावे संसारा ॥
कर्मा तव न पुरे संसारिक । धर्म तंव फळदायक ।
नाम विठ्ठलाचें एक । नाशी दुःख भवाचें ॥
न लगे सांडणें मांडणें । आगम निगमाचें देखणें ।
अवघे तुका म्हणे । विठ्ठलनामें आटलें ॥

७२८

तुटे भवरोग । संचित क्रियमाण भोग ॥
ऐसें विठोबाचें नाम । उच्चारितां खंडे जन्म ॥
वसों न सके पाप । पळे त्रिविध तो ताप ॥
तुका म्हणे माया । होय दासी लागे पायां ॥

२२९५

मुखीं नाम हातीं मोक्ष । ऐसी साक्ष बहुतांसी ॥
भस्म दंड नलगे काठी । तीर्थां आटी भ्रमण ॥

१६९४

आवडी विठ्ठल गाईजे एकांतीं । अलभ्य ते येती लाभ घरा ॥

आणीका अंतरीं न द्यावी वसति । करावी हे शांती वासनेची ॥
तुका म्हणे बाण हाचि निर्वाणींचा । वाउगी हे वाचा वेचूं नये ॥

३६३६

सत्य आठवितां देव । जातो भेंव पळोनि ॥
न लगे कांहीं करणें चिंता । धरी सत्ता सर्व तो ॥
भावें भाव राहे पायीं । देव तें संनिध ॥
तुका म्हणे कृष्णनामें । शीतळ प्रेम सर्वांसी ॥

१६४६

मारगीं चालतां पाऊलापाउलीं । चिंतावी माउली पांडुरंग ॥
सर्व सुख लागे घेऊनिया पाठी । आवडीचा कंठीं रस ओती ॥
पीतांबरें छाया करी लोभापर । पाहे तें उत्तर आवडीचें ॥
तुका म्हणे हेंचि करावें जीवन । वाचे नारायण तानभूक ॥

२९४९

तुका म्हणे नाम घेतां वेळोवेळा । होतील सकळा शीतळा नाडी ॥

४००९

संसारीं असतां हरिनाम घेसी । तरीच उद्धरसी पूर्वजेंसी ॥

३८२७

नामधारकासी नाहीं वर्णावर्ण । लोखंड प्रमाण नाना जात ॥
तये नावेसंगे ब्राह्मण तरती । केवीं ते बुडती अनामिक ॥

४१५२

तुका म्हणे चित्तीं चिंतिलें जें होतें । तें होय आपैतें नामें याच्या ॥

८७१

काय विरक्ति कळे आम्हां । जाणों एका नामा विठोबाच्या ॥
नाचों सुखें वैष्णवमेळीं । टाळघोळीं आनंदें ॥
शांति क्षमा दया मी काय जाणें । गोविंद कीर्तनेंवांचूनियां ॥
कासया उदास असों देहावरी । अमृतसागरीं बुडोनियां ॥
कासया एकांत सेवूं तया वना । आनंद तो जनामाजी असे ॥
तुका म्हणे आम्हां ऐसा भरवसा । विठ्ठल सरसा चालतसे ॥

## निस्पृह

२७९३

कांहीं न मागे कोणासी । तो च्चि आवडे देवासी ॥
देव तयासी म्हणावें । त्याचे चरणीं लीन व्हावें ॥
भूतदया ज्याचे मनीं । त्याचे घरीं चक्रपाणी ॥
नाहीं नाहीं त्या समान । तुका म्हणे मी जमान ॥

## निंदा

४५७५

करितां आइके निंदा या संतांची । तया होती तेचि अधःपात ॥
पतन उद्धार संगाचा महिमा । त्यजावें अधमा संत सेवीं ॥

३१५१

स्तुती अथवा निंदा करावी देवाची ।

४२२०

एक ते गाढव मनुष्याचे वेष । हालविती पुस पुढें दाढी ॥
निंदा हें भोजन जेवण तयासी । जोडी घरीं रासी पातकांच्या ॥
तुका म्हणे सुखें बैसोनियां खाती । कुंभपाकीं होती नर्कवासी ॥

४२०९

निंदक तो परउपकारी । काय वर्णूं त्याची थोरी ।
जो रजकाहुनि भला परि । सर्व गुणें आगळा ॥
नेघे मोल धुतो फुका । पाप वरच्यावरि देखा ।
करीतसे साधका । शुद्ध सरतें तिहीं लोकीं ॥
मुखसंवदणी सांगातें । अवघें सांठविलें तेथें ।
जिव्हा साबण निरुतें । दोष काढी जन्माचे ॥
तया ठाव यमपुरीं । वास करणें अघोरीं ।
त्यासी दंडण करी । तुका म्हणे न्हाणी ते ॥

## नेमाचें महत्त्व

१४८४

तुका म्हणे कांहीं नाहीं नेमाविण । मोकळा तो सीण दुःख पावे ॥

## नरस्तुति

२७७

आणिकांची स्तुती आम्हां ब्रह्महत्या । एकावांचूनि त्या पांडुरंगा ॥

## नर्कवास-स्वर्गवास

१०२७

संतांचा संग तोचि स्वर्गवास । नर्क तो उदास अनर्गळा ॥

## नुसते शब्द, तंत्र मंत्र व्यर्थ

४३२९

नाहीं शब्दाधीन वर्म आहे दुरी । नव्हे तंत्रीं मंत्रीं अनुभव तो ॥

## परमेश्वराचें सामर्थ्य

४५३९

दावी तुका म्हणे देव ज्या आपणा । पालटे तें क्षणामाजी एका ॥

४५६२

कवणाचें चाले तुका म्हणे बळ । जयासी गोपाळ साह्य जाला ॥

४१४

आंधळ्यासी डोळे । देते पांगुळासी पाय ॥
वांजा पुत्र फळे । नवस पुरविते विठाई ॥

२७९५

आडलिया जना होसी सहाकारी । अंधळिया करीं काठी तूंचि ॥
आडिले गांजिले पीडिले संसारीं । त्यांचा तूं कैवारी नारायणा ॥

२९

त्याचें सुख नाहीं आलें अनुभवा । कठिण हें जिवा तोंचिवरी ॥
मागिलांचें दुःख लागों नेदी अंगा । अंतर हें संगा नेदी पुढें ॥
तुका म्हणे सर्वविशीं हा संपन्न । जाणती महिमान श्रुति ऐसें ॥

२४८६

तुज करितां नव्हे ऐसें कांहीं नाहीं । डोंगराची राई रंक राणा ॥
अशुभाचें शुभ करितां तुज कांहीं । अवघड नाहीं पांडुरंगा ॥
तुका म्हणे माझे दोष ते काई । सरता तुझे पायीं जालों देवा ॥

१८६०

जन पूजी याचा मज कां आभार । हा तुम्ही विचार जाणा देवा ॥
पत्र कोण मानी वंदितील सिक्का । गौरव सेवका त्याचिमुळें ॥

३३७९

करितां तुज होय डोंगराची राई । न लगतां कांहीं पाल्या पालें ॥

१६१४

देव राखे त्या मारील कोण । न मोडे कांटा हिंडतां वन ॥
न जळे न बुडे नव्हे कांहीं । विष लेंही अमृत पाहीं ॥
न चुके वाट न पडे फंदीं । नव्हे कधीं यमबाधा ॥
तुका म्हणे नारायण । येतां गोळ्या वारी बाण ॥

२९५०

आपुलिया बळें नाहीं मी बोलत । सखा भगवंत वाचा त्याची ॥
साळुंकी मंजूळ बोलतसे वाणी । शिकविता धणी वेगळाची ॥
काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परि त्या विश्वंभरें बोलविलें ॥
तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा । चालवी पांगळा पायांविण ॥

१५०९

सत्यसंकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ॥
येथें अलंकार शोभती सकळ । भावबळें फळ इच्छेचें तें ॥
अंतरींचें बीज जाणे कळवळा । व्यापक सकळां ब्रह्मांडाचा ॥
तुका म्हणे नाहीं चालत तांतडी । प्राप्तकाळ घडी आल्याविण ॥

१६२८

आलें देवाचिया मना । तेथें कोणाचें चालेना ॥
तुका म्हणे उगेचि राहा । होईल तें सहज पाहा ॥

२२८७

तुका म्हणे देव साहे जाल्यावरी । असांग चि करी सर्व सांग ॥

३९२९

चाले हें शरीर कोणाचिये सत्ते । कोण बोलवितें हरीविण ॥
देखवी दाखवी एक नारायण । तयाचें भजन चुकों नका ॥
मानसाची देव चालवी अहंता । मीचि एक कर्ता म्हणोनियां ॥

वृक्षाचेंही पान हाले त्याची सत्ता । राहिली अहंता मग कोठें ॥
तुका म्हणे विठो भरला सबाहीं । तया उणें कांहीं चराचरीं ॥

४०८९

जरि हा हो कृपा करिल नारायण । तरी हेंचि ज्ञान ब्रह्म होय ॥
कोठोनियां कांहीं न लगे आणावें । न लगे कोठें जावें तरावया ॥
जरी देव कांहीं धरिल पैं चित्तीं । तरि हे चि होती दिव्य चक्षु ॥
तुका म्हणे देव दावील आपणा । तरि जीवपणा ठाव नाहीं ॥

१७५१

चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्र हे न खाती सर्प तया ॥
विष तें अमृत आघात तें हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ॥
दुःख तें देईल सर्व सुख फळ । होतील सीतळ अग्निज्वाळा ॥
आवडेल जीवां जीवाचिये परी । सकळां अंतरीं एक भाव ॥
तुका म्हणे कृपा केली नारायणें । जाणिजेतें येणें अनुभवें ॥

३४४८

न करावी चिंता । भय न धरावें सर्वथा ॥
दासां साहे नारायण । होय रक्षिता आपण ॥
न लगे परिहार । कांहीं योजावें उत्तर ॥
न धरावी शंका । नये बोलों म्हणे तुका ॥

२३१५

अशक्य तों तुम्हां नाहीं नारायणा । निर्जीवा चेतना आणावया ॥

३२८१ (नि.)

नव्हती माझे बोल । अवघें करितो विठ्ठल ॥

## परमेश्वराचा धांवा

४७०

तुझें दास्य करूं आणिका मागों खावया ।
धिग् जालें जिणें माझें पंढरीराया ॥
काय गा विठोबा तुज म्हणावें ।
थोराच्या दैवें गोड शुभ अशुभ ॥
संसाराचा धाक निरंतर आम्हांसी ।
मरण भलें परि काय अवकळा तैसी ॥

तुझे शरणागत शरण जाऊं आणिकांसी ।
तुका म्हणे कवणा लाज हें कां नेणसी ॥

## परउपकार

४५०

शक्ति वेचावया पर उपकारा ।

२२८५

पर उपकारें काया वाचा मन । वेचे सुदर्शन रक्षी तया ॥

## परमहंस

७५८ (नि.)

परमहंस तरी जाणे सहज वर्म । तेथें यातीधर्म कुळ नाहीं ॥
केलें वर्म जो चाले या विरहित । तो जाणा पतित श्रुतिकाते ॥

## पराधीन

२३१२

पराधीनासि आहे घात रे थोर जाण संबंधीं !

३१३१

पंचभूतांचिये सांपडलों संदी । घातलोंसे बंदी अहंकारें ॥
आपल्या आपण बांधविला गळा । नेणंचि निराळा असतां हो ॥
कासया हा सत्य लेखिला संसार । कां हे केले चार माझें माझें ॥
कां नाहीं शरण गेलों नारायणा । कां नाहीं वासना आवरिली ॥
किंचित सुखाचा धरिला अभिलाष । तेणें बहु नास केला पुढें ॥
तुका म्हणे आतां देह देऊं बळी । करूनि सांडूं होळी संचिताची ॥

## परधन, धन, धनवंत, धनी

४५०

परधनीं बाटो नेदी मन ॥

१०६७

धनी ज्या पाइका मानितो आपण । तया भितें जन सकळीक ॥

११११

धना गुंतलें चित्त माझें मुरारी । मन घेउनी हिंडवी दारोदारीं ।
मरे हिंडतां न पुरे यासि कांहीं । मही ठेंगणी परी तें तृप्त नाहीं ॥

२१६३

धनासीं च धन । करी आपण जतन ॥

३२१३

धनें वित्तें कुळें । अवघियानें ते आगळे ॥

२७५८

करूनि जतन । कोणा कामा आलें धन ॥

३८३६

धन मेळवूनि कोटी । सवें नये रे लंगोटी ।

१६४१

परद्रव्य परनारीचा अभिलाष । तेथूनि हारास सर्वभाग्या ॥

२८८७

तुका म्हणे द्रव्य मेळविलें मागें । हें तों कोणासंगें आलें नाहीं ॥

२८५५

परद्रव्य परनारी । अभिलाषूनि नाक धरी ॥
जळो तयाचा आचार । व्यर्थ भार वाहे खर ॥
सोंवळ्याची स्फीति । क्रोधें विटाळला चित्तीं ॥
तुका म्हणे सोंग । दावी बाहेरील रंग ॥

२७९९

धनवंता घरीं । करी धनाचि चाकरी ॥
होय बैसल्या व्यापार । न लगे सांडावें चि घर ॥
रानीं वनीं द्वीपीं । असती तीं होतीं सोपीं ॥
तुका म्हणे मोल । देतां कांहीं नव्हे खोल ॥

३१३९

धनवंत एक बहिर अंधळे ॥ शुभ्र कुष्ठ काळे भोग अंगीं ।
प्रारब्धाची गति न कळे विचित्र । आहे हातीं सूत्र विठोबाचें ॥
आणीक रोगांचीं नांवें घेऊं किती । अखंड असती जडोनियां ॥
तुका म्हणे नष्ट संचिताचें दान । पावे खातां पण सुख नेदी ॥

४०२९

स्त्रिया धन वा हें खोटें । नागवले मोठे मोठे ॥
म्हणोनि सांडा दोन्ही । सुख पावाल निदानीं ।
सर्व दुःखासी कारण । हींच दोन्हीचीं प्रमाण ॥

३२०९

परद्रव्य परकांता । नातळे जयाचिया चित्ता ॥
आणि कर्मी तो तत्वता । बांधला न वजाय ॥
ऐसा अनुभव रोकडा । विश्वासीतो जीवा जोडा ॥
एकांत त्या पुढां । अवघा करी उकल ॥

## स्त्री-परस्त्री-सिंदळी

६१

पराविया नारी माउलीसमान ।

८८५

स्त्री पुत्रादिकीं राहिला आदर । विषयीं पडिभर अतिशय ॥
आतां सोडवणें धांवा नारायणा । मज हे वासना अनावर ॥

३१४२

स्त्रिया पुत्र कलत्र हें तंव मायावंत । शेवटीचा अंत नाहीं कोणी ॥
यमाचिये हातीं बांधोनियां देती । भूषणें हीं घेती काढोनियां ॥
ऐसिया चोरांचा कैसा हा विश्वास । धरिली तुझी कास तुका म्हणे ॥

४२६८

दासीचा जो संग करी । त्याचे पूर्वज नरकाद्वारीं ॥
ऐसे सांगो जातां जना । नये कोणाचिया मना ॥
वरें विचारूनि पाहे । तुज अंतीं कोण आहे ॥
तुका म्हणे रांडलेका । अंतीं जासिल यमलोका ॥

४२२५

पतिव्रतेची कीर्ती वाखाणितां । सिंदळीच्या माथां तिडिक उठे ।
आमुचें तें आहे सहज बोलणें । नाहीं विचारून केलें कोणी ॥
अंगें उणें त्याच्या वैसे टाळक्यांत । तेणें ठिणग्या बहुत गाळीतसे ॥
तुका म्हणे आम्ही काय करणें त्यासी । ढका खचंदासी लागतसे ॥

२८५८

जातीची शिंदळी । तिला कोण वंशावळी ॥
आपघर ना बापघर । चित्तीं मनीं व्यभिचार ॥
सेजे असोनियां धणी । परद्वार मना आणी ॥
तुका म्हणे असल जाती । जातीसाठीं खाती माती ॥

३९२६

पतिव्रता ऐसी जगामध्यें मात । भोगी पाच सात अंधारीं ते ॥
भ्रतारासी लेखी श्वानाचे समान । परपुरुषीं जाण संभ्रम तो ॥
तुका म्हणे तिच्या दोषा नाहीं पार । भोगील अघोर कुंभीपाक ॥

३९२७

सिंदळीसी नाहीं पोराची पैं आस । राहे बीज त्यास काय करी ॥
अथवा सेतीं बीज पेरिलें भाजोन । सारा देइल कोण काका त्याचा ॥
तुका म्हणे नाहीं खायाची ते चाड । तरि कां लिगाड करुनी घेतो

२७१९ (नि.)

सिंदळीचें चित्त परपुरुषावरी । पति चुरमुरी रात्रंदिवस ।
ऐसी ते वोंगळी जाय वो नरका । तिच्या दोषा देखा पति जाय ।
आपण बुडती पति बुडविती । दोन्ही कुळें नेती अधःपाता ॥
तुका म्हणे तिची न करावी संगति । होईल फजिती मागें पुढें ॥

५२३

स्त्रियांचा तो संग नको नारायणा । काष्ठा या पाषाणा मृत्तिकेच्या
नाठवे हा देव न घडे भजन । लांचावलें मन आवरे ना ॥
दृष्टिमुखें मरण इंद्रियांच्या द्वारें । लावण्य तें खरें दुःखमूळ ॥
तुका म्हणे जरी अग्नि जाला साधु । परी पावे बाधू संघट्टणें ॥

१६१७

परस्त्रीतें म्हणतां माता । चित्त लाजवितें चित्ता ॥
काय बोलोनिया तोंडें । मनामाजीं कानकोंडें ॥
धर्मधारिष्ट गोष्टी सांगे । उष्ट्या हातें नुडवी काग ॥
जें जें कर्म वसे अंगीं । तें तें आठवे प्रसंगीं ॥
बोले तैसा चाले । तुका म्हणे तो अमोल ॥

४०२९

स्त्रिया धन बा हें खोटें । नागवले मोठे मोठे ॥
म्हणोनि सांडा दोनी । सुख पावाल निदानीं ॥
सर्व दुःखासी कारण । हींच दोन्हीची प्रमाण ॥
आशा सर्वस्वें सांडावी । तेणें निजपदवी पावावी ॥
देह लोभें नाडला । घाला यमाचा पडला ॥
तुका म्हणे निरापेक्षा । कांहीं न धरावी अपेक्षा ॥

## परमार्थाला लौकिकाचे वाकडे

२५७७

लौकिकासाठीं या पसाऱ्याचा गोवा । काहीं नाहीं देवा लागो येत ॥
ठेवावा माथा तो नुचलावा पायीं । ठायीं चिये ठायीं हालों नये ॥
ढवळिल्या मनें वितळिलें रूप । नांव ऐसें पाप उपाधीचें ॥
तुका म्हणे देव प्रीतीनें कवळी । ठेवील जवळी उठवूनि ॥

## पंडित

१६२३

पंडित तोचि एक भला । नित्य भजे जो विठ्ठला ।
अवघे सम ब्रह्म पाहे । सर्वांभूतीं विठ्ठल आहे ॥
रिता नाहीं कोणी ठाव । सर्वांभूतीं वासुदेव ॥
तुका म्हणे तोचि दास । त्या देखिल्या जाती दोष ॥

४३९२

जालासि पंडित पुराण सांगसी । परि तूं नेणसी मी हें कोण ॥
गाढवभरी पोथ्या उलथिशी पानें । परि गुरुगम्य खुणें नेणशी बापा ॥
तुका कुणबियाचा नेणें शास्त्रमत । एक पंढरीनाथ विसंबेना ॥

## परमेश्वरप्राप्तीची खूण

९५३

वासनेच्या मुखीं अदळूनि भीतें । निर्वाहापुरतें कारण तें ॥
या नांवें अंतरा आला नारायण । चित्तसमाधान खुण त्याची ॥
सर्वकाळ हाचि करणें विचार । विवेकी सादर आत्मत्वाचे ॥
तुका म्हणे जों जों भजनासी वळे । अंग तों तों कळे सन्निधता ॥

## परमेश्वराची प्रेरणा

३३९३

माझ्या मुखें बोलवितो हरि । सकळां अंतरीं नारायण ॥
न करावा द्वेष भूतांचा मत्सर । हा तंव विचार जाणो आम्ही ॥
तुका म्हणे दोष नाहीं या विचारें । हिताचीं उत्तरें शिकवितां ॥

## पांडुरंगाची भरंवशानें भेट

३७४०

करणें न करणें वारलें जेथें । जातो तेणें पंथें संतसंगें ॥
तुका म्हणे तुम्ही चला याचि वाटे । भरवशानें भेटे पांडुरंग ॥

## पाप-पापी

२३१२

परपीडा परनिंदा रे खरें पाप तयाचें ॥

१०२७

पाप तें परपीडा ।

२८२

आणिकांच्या घातें । ज्यांचीं निवतील चित्तें ॥
तेचि ओळखावे पापी । निरयवासी शीघ्र कोपी ॥
कान पसरोनी । ऐके वदे दुष्ट वाणी ॥
तुका म्हणे भांडा । धीर नाहीं ज्याच्या तोंडा ॥

९३

देव अंतरे तें पाप ।

२६४

पाप त्याचें नांव न विचारितां नीत । भलतें चि उन्मत्त करी सदा ॥

२४८

सर्प विंचू दिसे । धन अभाग्या कोळसे ॥
आला डोळ्यांसि कवळ । तेणें मळलें उजळ ॥
अंगाचे भोंवडी । भोय झाड फिरती धोंडी ॥
तुका म्हणे नाड । पाप टाके हिता आड ॥

४१८६

पापाचिया मुळें । जालें सत्याचें वाटोळें ॥
दोष जाले बळिवंत । नाहीं ऐसी जाली नीत ॥
मेघ पडों भीती । पिकें सांडियेली क्षिती ॥
तुका म्हणे कांहीं । वेदा वीर्य शक्ति नाहीं ॥

१४०७

संदेह तें पाप कैसें नव्हे ॥

१२९८

उपाधि तें अवघें पाप ।

४०२७

पापी तो नाठवी आपुल्या संचिता । ठेवी भगवंता वरी बोल ॥
भेइना करितां पापाचे डोंगर । दुर्जन पामर दुराचारी ॥
नाठवी तो खळ आपुली करणी । देवासी निंदोनि बोलतसे ॥
तुका म्हणे त्याच्या तोंडा लागो काटी । नाहीं जगजेठी जया चित्तीं ॥

४०२२

कांहीं दुसरा विचार । नलगे करावाचि फार ॥
सेट्या ना चौधरी । पांडेपण वाहे शिरीं ॥
पाप न लगे धुंडावें । पाहिजे तरी तेथें जावें ॥
जकातीचा धंदा । तेथें पाप वसे सदा ॥
गाई म्हैसी हेड । तुप विक्री महा द्वाड ॥
तुका म्हणे पाहीं । तेथें पुण्या रीघ नाहीं ॥

१४६५

मना अंगीं पुण्य पाप ।

## पारखी

३०९

एक तटस्थ मानसीं । एक सहजचि आळसी ॥
दोन्ही दिसती सारिखी । वर्म जाणे तो पारखी ॥
एक ध्यानीं करिती जप । एक बैसुनि घेती झोप ॥
एकां सर्वस्वाचा त्याग । एका पोटासाठीं जोग ॥
एकां भक्ति पोटासाठीं । एकां देवासवें गांठी ॥
वर्म पोटीं एका । फळें दोन म्हणे तुका ॥

## पांगुळ

४२३

पांगुळ जालों देवा नाहीं हात ना पाय ।
बैसलों जयावरी सैराट तें जाय ॥

खेटितां कुंप कांटी । खुंट दरडी न पाहे ।
आधार नाहीं मज कोणी । बाप ना माये ॥
दाते हो दान करा । जातें पंढरपुरा ।
न्या मज तेथवरी । अखमाचा सोयरा ॥
हिंडतां गव्हानें गा । शिणलों दारोदारीं ।
न मिळेचि दाता कोणी । जन्मदुःखातें वारी ॥
कीर्ति हे संतां मुखीं । तोचि दाखवा हरी ।
पांगळां पाय देतो । नांदे पंढरपुरीं ॥
या पोटाकारणें गा । जालों पांगीला जना ।
न सरेचि बापमाय । भीक नाहीं खंडणा ।
पुढारा म्हणती एक । तया नाहीं करुणा ।
श्वान हें लागे पाठीं । आशा बहु दारुणा ॥
काय मी चुकलों गा । मागें नेणवे कांहीं ।
न कळेचि पापपुण्य । तेथें आठव नाहीं ।
मी माजी भुललों गा । दीप पतंगासोयी ॥
द्या मज जीवदान । संत महानुभाव कांहीं ॥
दुरोनि आलों मी गा । दुःख जालें दारुण ।
यावया येथवरी । होतें हेंचि कारण ॥
दुर्लभ भेटी तुम्हां । पायीं जाले दरुषन ।
विनवितो तुका संतां । दोन्ही कर जोडुन ॥

४२४

देश वेष नव्हे माझा । सहज फिरत आलों ।
करूं सत्ता कवणावरी । कोठें स्थिर राहिलों ।
पाय डोळे म्हणतां माझे । तींहीं कैसा मोकलिलों ।
परदेशी नाहीं कोणी । अंध पांगुळ जालों ॥
आतां माझी करी चिंता । दान देई भगवंता ।
पाठीं पोटीं नाहीं कोणी । निरवीं सज्जन संता ।
चालतां वाट पुढें । भय वाटतें चित्तीं ।
बहुत जन गेलीं । नाहीं आलीं मागुतीं ॥

न देखें काय जाले । कान तरी ऐकती ।
बैसलों संधिभागीं । तुज धरूनि चित्तीं ।
भाकितों करुणा गा । जैसा सांडिला ठाव ।
न भरें पोट कधीं । नाहीं निश्चळ पाव ॥
हिंडतां भागलों गा । लक्ष चौऱ्यांशीं गांव ।
धरूनि राहिलों गा । हाचि वसता ठाव ।
भरवसा काय आतां । कोण आणि अवचिता ।
तैसीच जाली कीर्ति । तया मज बहुतां ॥
म्हणउनि मारी हांका । सोयी पावे पुण्यवंता ।
लागली भूक थोरी । तूंचि कृपाळु दाता ।
संचित सांडवले । कांहीं होतें जवळी ।
वित्त गोत पुत माया । तुटली हे लागावळी ॥
निष्काम जालों देवा । होतें माझें कपाळीं ।
तुका म्हणे तूंचि आतां । माझा सर्वस्वें बळी ॥

## पुण्य

४५०

पुण्य तें असे गातां नाचतां बहु फार ।
पुन्हा बोलीला संसार नाहीं नाहीं सत्यत्वें ॥

२३१२

पुण्य तें जाणा रे भाइनो परउपकाराचें ।

३६५२

आर्तभूतां द्यावें दान । खरें पुण्य त्या नांवें ॥

१४६५

मना अंगीं पुण्यपाप । शुभ उत्तम संकल्प ॥

३३७४

यासी कोणी म्हणे निंदेचीं उत्तरें । नागवला खरें तोचि एक ।
आड वाटे जातां लावी नीट सोई । धर्मनीत तेही ऐसी आहे ॥
नाइकतां सुखें करावें ताडण । पाप नाहीं पुण्य असे फार ॥
जन्म व्याधि फार चुकतील दुःखें । खंडावा हा सुखें मान त्याचा ॥
तुका म्हणे निंब दिलियावांचून । अंतरींचा सीण कैसा जाय ॥

१६३८

ब्रह्मरसगोडी तयांसि फावली । वासना निमाली सकळ ज्यांची ॥
नाहीं त्यां विटाळ अखंड सोंवळी । उपाधीवेगळी जाणिवेच्या ॥
मन हें निश्चळ जालें एके ठायीं । तयां उणें काई निजसुखा ॥
तींचि पुण्यवंतें परउपकारी । प्रबोधी त्या नारीनरलोकां ॥
तुका म्हणे त्यांचे पायीं पायपोस । होऊनियां वास करिन तेथें ॥

२९२१

हारपल्याची नका चित्तीं । धरूं खंती वांयाच ॥
पावले तें म्हणा देवा । सहज सेवा या नांवें ॥
होणार तें तें भोग घडे । लाभ जोडे संकल्पें ॥
तुका म्हणे मोकळें मन । अवघें पुण्य या नांवें ॥

## पूर्वजन्म

२३८१

जन्मांतरिचा परीट न्हावी । जात ठेवी त्यानें ते ॥
वाखर जैसा चरचरी । तोंड करी सव दणी ॥
पूर्व जन्म शिखा सूत्र । मळमूत्र अंतरीं ॥
तुका म्हणे करिती निंदा । धुवट धंदा पुढिलांचा ॥

## पुत्र

२२९०

नेदावा हा पुत्र उत्तम याती पोसणा ॥

## प्रारब्ध

३५२८

आहे तें सकळ प्रारब्धा हातीं । यावें काकुलती यासी आतां ॥
ऐसा माझ्या मनें सांगितला भाव । तोंवरीच देव दुजा नाहीं ॥
अवघियांची जेव्हां सारावी करकर । भाववळें थार धरूं येसी ॥
तुका म्हणे तुज ठेवावें पूजून । आणीक ते गुण नाहीं येथें ॥

३२०१

जालिया दर्शन करीन मी सेवा । आणीकही देवा न लगे दुजें ॥
प्रारब्धा अधीन अन्न आच्छादन । स्थिर करोनि मन ठेवीं पायीं ॥

येगा येगा येगा कृपाळुवा हरी । निववीं अभ्यंतरीं देउनि भेटी ॥
आसावलें मन जीवनाचे ओढी । नामरूपें गोडी लावियेली ॥
काय तुम्हांपाशीं नाहीं भांडवल । माझे मिथ्या बोल जाती ऐसे ॥
काय लोखंडाचे पाहे गुण दोष । सिवोनि परीस सोनें करी ॥
तुका म्हणे माझें अवघें असो द्यावें । आपुलें करावें ब्रीद साच ॥

३८५६

देह तंव आहे प्रारब्धा अधीन । याचा मी कां सीण वाहूं भार ॥
सरो माझा काळ तुझिया चिंतनें । कायावाचामनें इच्छीतसें ॥
लाभ तो न दिसे याहूनि दुसरा । आणिक दातारा येणें जन्में ॥
तुका म्हणे आलों सोसीत संकटें । मी माझें वोखटें आहे देवा ॥

३५४७

देह प्रारब्धा शिरीं । असोन करी उद्वेग ।
धांव घालीं नारायणा । माझ्या मना जागवीं ॥
ऐसी चुकोनियां वर्में । पीडा भ्रमें पावलों ॥
तुका म्हणे कैंचा भोग । नव्हे रोग अंगींचा ।

१४०६

प्रारब्धा हातीं जन । सुख सीण पावतसे ॥

१४१५

सातापांचांचें गोठलें । प्रारब्धें आकारलें ।
आतां हें संचलें । असो भोगा सांभाळी ॥

२९४

प्रारब्ध क्रियमाण । भक्तां संचित नाहीं जाण ॥
अवघा देवचि जाला पाहीं । भरोनियां अंतर्बाहीं ॥
सत्त्व रज तम बाधा । नव्हे हरिभक्तांसी कदा ॥
खाय बोले करी । अवघा त्यांच्या अंगें हरी ॥
देवभक्तपण । तुका म्हणे नाहीं भिन्न ॥

१२१०

अन्न तापलिया कायाचि होमें । तापत्रयें संतप्त होती ॥
संचित क्रियमाण प्रारब्ध तेथें । न चुके संसारस्थिति ।
राहाटघटिका जैसी फिरतांचि राहिली । भरली जाती एके रितीं ॥

२८१९

कैं वाहावें जीवन । कैं पलंगीं शयन ॥
जैसी जैसी वेळ पडे । तैसें तैसें होणें घडे ॥
कैं भोज्य नाना परी । कैं कोरड्या भाकरी ॥
कैं वसावें वहनीं । कैं पायीं अन्हवाणी ॥
कैं उत्तम प्रावणें । कैं वसनें तीं जीर्णें ॥
कैं सकळ संपत्ती । कैं भोगणें विपत्ती ॥
कैं सज्जनाशीं संग । कैं दुर्जनाशीं योग ।
तुका म्हणे जाण । सुखदुःख तें समान ॥

२६८

आचरतां कर्म । भरे पोट राहे धर्म ॥
सत्या देव साहे । ऐसें करूनियां पाहे ॥
अन्न मान धन । हें तों प्रारब्धा अधीन ॥
तुका म्हणे सोस । दुःख आतां पुढें नास ॥

१४९९

जेणें नाहीं केलें आपुलें स्वहित । पुढिलांचा घात इच्छीतसे ॥
संचितासी जाय मिळोनियां खोडी । पतनाचे ओढीवरी हांव ॥
बांधलें गांठी तें लागलें भोगावें । ऐसियासि देवें काय कीजे ॥
तुका म्हणे जया गांवा जाणे जया । पुसोनियां तया वाट चाले ॥

१६२४

ऐका पंडितजन । तुमचे वंदितों चरण ॥
नका करूं नरस्तुति । माझी परिसा हे विनंति ॥
अन्न आच्छादन । हें तों प्रारब्धा आधीन ॥
तुका म्हणे वाणी । सुखें वेंचा नारायणीं ॥

१६३४

भार घालीं देवा । न लगे देश डोई घ्यावा ॥
देह प्रारब्धा अधीन । सोसें अधिक वाढे शीण ॥
व्यवसाय निमित्त । फळ देतसे संचित ॥
तुका म्हणे फिरे । भोंवडीनें दम जिरे ॥

३२९

नवसें कन्यापुत्र होती । तरि कां करणें लागे पती ॥
जाणे हा विचार । स्वामी तुकयाचा दातार ॥
वैद्य वाचविती जीवा । तरी कोण ध्यातें देवा ॥

२८७

कुंभ अवघा एक आवा । पाकीं एकी गुफे डावा ॥
ऐसे भिन्न भिन्न साटे । केले प्रारब्धानें वांटे ॥
हिरे दगड एक खाणी । कैचें विजातीसीं पाणी ॥
तुका म्हणे शिरीं । एक एकाची पायरी ॥

३१३९

धनवंत एक बहिरे अंधळे । शुभ्र कुष्ठ काळे भोग अंगीं ॥
प्रारब्धाची गति न कळे विचित्र । आहे हातीं सूत्र विठोबाचे ॥
आणीक रोगांचीं नांवें घेऊं किती । अखंड असती जडोनियां ॥
तुका म्हणे नष्ट संचिताचें दान । पावे खातां पण सुख नेदी ॥

२३९७

भोग तो न घडे संचितावांचूनि । करावें तें मनीं समाधान ॥
म्हणऊनि मनीं मानूं नये खेद । म्हणावा गोविंद वेळोवेळां ॥
आणिकां रुसावें न लगे बहुतां । आपुल्या संचितावांचूनियां ॥
तुका म्हणे भार घातलियावरी । होईल कैवारी नारायण ॥

९६९

प्रारब्ध कांहीं न पालटे सोसें । तृष्णेचें हें पिसें वांयांवीण ॥

२०४७

परिमळें काष्ठ ताजवां तुळविलें । आणीक नांवांचीं थोडीं ।
एक तीं कांतिवें उभविलीं ढवळारें । एकाचिया कुड मेडी ॥
एक दीनरूप आणिती मोळिया । एक ते बांधोन माडी ।
अवघियां बाजार एकचि जाला । माविकलीं आपुल्या पाडीं ॥
गुण तो सार रूपमध्यकार । अवगुण तो फार पीडितसे ।
एक गुणें आगळे असती । अमोल्य नांवांचे खडे ॥
एक समर्थ दुर्बळा घरीं । फार मोलाचे थोडे ।

एक झगझग करिती वाळवंटीं । कोणी न पाहाती तयांकडे ।
सभाग्यसंपन्न आपुलाले घरीं । मायेक दैन्य बापुडें ॥
एक नामें रूपें सारिख्या असती । अनेक प्रकार याती ।
ज्याच्चिया संचितें जैसे आले पुढें । तयाची तैसी च गति ॥
एक उंचपदीं वैसोनि सुखें । दास्य करवी एका हातीं ।
तुका म्हणे कां मानिती सुख । चुकलिया वांया खंतीं ॥

२८४९

प्रारब्धेंचि जोडे धन । प्रारब्धेंचि वाढे मान ॥
सोस करिसी वांया । भज मना पंढरिराया ॥
प्रारब्धेंचि होय सुख । प्रारब्धेंचि पावे दुःख ॥
प्रारब्धेंचि भरे पोट । तुका करीना बोभाट ॥

२९२१

होणार तें तें भोगें घडे । लाभ जोडे संकल्पें ॥

## भगवन्तास प्रार्थना

२८६

माया करुणा हे करिते बहुत । किती सोसू या जनांचे आघात ।
न पुरे अवसरु हें चि नित्यानित्य । तूं चि सोडवी करूनि स्थिर चित्त वो ॥

४७६

पतित पतित । परी मी त्रिवाचा पतित ॥
परी तूं आपुलिया सत्ता । मज करावे सरता ॥
नाहीं चित्तशुद्धि । स्थिर पायांपाशीं बुद्धि ॥
अपराधाचा केलों । तुका म्हणे किती बोलों ॥

४६२

नव्हे नरनारी संवसारीं अंतरलों ।
निर्लज्ज निष्काम जना वेगळेचि ठेलों ॥
चाल रघुराया ने आपुल्या गांवा ।
तुजविण आम्हां कोण सोयरा सांगाती ॥
जनवाद लोकनिंद्य पिशुनाचे चेरे ।
साहूं तुजसाठीं अंतरलीं सहोदरें ॥

बहुता पाठीं निरोप हाटीं पाठविला तुज ।
तुका म्हणे आतां सांडुनि लौकिक लाज ॥

४२८

भगवंता तुजकारणें मेलों जीता ची कैसी ।
निष्काम बुद्धी ठेली चळण नाहीं तयासी ॥
न चलती हात पाय दृष्टी फिरली कैसी ।
जाणतां न देखो गा क्षर आणि अक्षरासी ॥
विठोबा दान देगा तुझ्या सारिखें नामा ।
कीर्ति हे वाखाणिली थोर वाढविली सीमा ॥
भुक्ति मुक्ति तूंचि एक होसि सिद्धीचा दाता ।
म्हणोनि सांठवली शोक भय लज्जा चिंता ॥
सर्वस्वें त्याग केला धांव घातली आतां ।
कृपादान देई देवा येउनि सामोरा आतां ॥
संसारसागरु गा भवदुःखाचें मूळ ।
जनवाद अंथरुण माजी केले इंगळ ।
इंद्रियें वज्रघातें तपे उष्ण वरी जाळ ।
सोसिलें काय करूं दुर्भर हे चांडाळ ॥
तिहीं लोकीं तुझें नाम वृक्ष पल्लव शाखा ।
वेंधलों वरि खोडा भाव धरूनि टेका ॥
जाणवी नरनारी जागो धरम लोकां ।
पावती पुण्यवंत सोई आमुच्यिे हाका ॥
नाठवे आपपर आतां काय वा करूं ।
सारिखा सोइसवा हारपला विचारु ।
घातला योगक्षेम तुज आपुला भारु ।
तुकया शरणागता नेई अभयकरु ॥

६४६

श्री अनंता मधुसूदना । पद्मनाभा नारायणा ।
जगव्यापका जनार्दना । आनंदघना अविनाशा ॥

सकळदेवा आदिदेवा । कृपाळुवा जी केशवा ।
महामहानुभा । सदाशिवा सहजरूपा ॥
चक्रधरा विश्वंभरा । गरुडध्वजा करुणाकरा ।
सहस्रपादा सकस्रकरा । क्षीरसागरा शेषशयना ॥
कमलनयना कमलापती । कामिनीमोहना मदनमूर्ती ।
भवतारका धरित्या क्षिती । वामनमूर्ती त्रिविक्रमा ॥
अगा ये सगुणा निर्गुणा । जगज्जनित्या जगज्जीवना ।
वसुदेव देवकीनंदना । बाळरांगणा बाळकृष्णा ॥
तुका आला लोटांगणीं । मज ठाव द्यावा जी चरणीं ।
हेचि करीतसे विनवणी । भवबंधनीं सोडवावें ॥

६१६

अगा ए सावळ्या सगुणा । गुणनिधिनाम नारायणा ।
आमची परिसा विज्ञापना । सांभाळी दीना आपुलिया ॥
बहु या उदराचे कष्ट । आम्हांसि केलें कर्मभ्रष्ट ।
तुमची चुकविली वाट । करीं वटवट या निमित्यें ॥
जालों पांगिला जनासी । संसाराची आंदणी दासी ।
न कळे कधीं सोडविसी । दृढपाशीं बहु बांधलों ॥
येथें तों नये आठव कांहीं । विसावा तो क्षण एक नाहीं ।
पडिलों आणिके प्रवाहीं । हित तों कांहीं दिसेचि ना ॥
जीवित्व वेचिलें वियोगें । हिंडतां प्रवास वाउगें ।
कांहीं व्याधि पीडा रोगें । केलिया भोगें तडातोडी ॥
माझा मीच जालों शत्रु । कैचा पुत्र दारा कैचा मित्रु ।
कासया घातला पसरु । अहो जगद्गुरु तुका म्हणे ॥

६३०

देवा तूं आमचा कृपाळ । भक्ति प्रतिपाळ दीनवत्सल ।
माय तूं माउली स्नेहाळ । भार सकळ चालविसी ॥
तुज लागली सकळ चिंता । राखणें लागे वाकडे जातां ।
पुढती निरविसी संतां । नव्हे विसंबतां धीर तुज ॥

आम्हां भय चिंता नाहीं धाक। जन्म मरण कांहीं एक।
जाला इहलोकीं परलोक। आलें सकळैक वैकुंठ ॥
न कळे दिवस कीं राती। अखंड लागलीसे ज्योती।
आनंदलहरीची गती। वर्णूं कीती तया सुखा ॥
तुझिया नामाचीं भूषणें। तीं ये मज लेवविलीं लेणें।
तुका म्हणे तुझियान गुणें। काय तें उणें एक आम्हां ॥

६२७

देवा तूं कृपा करुणासिंधू। होसी मायबाप आमचा बंधु।
जीवनसिद्धि साधनसिंधु। तोडिसी भवबंधु काळपाश ॥
शरणागता वज्रपंजर। अभयदाता तूं उदार।
सकळां देवा तूं अगोचर। होसी अविकार अविनाश ॥
भागली स्तुति करितां फार। तेथें मी काय तें गव्हार।
जाणावया तुझा हा विचार। नको अंतर देऊं आतां ॥
नेणें भाव परि म्हणवीं तुझा। नेणें भक्ति परि करितों पूजा।
आपुल्या नामाचिया काजा। तुज केशीराजा लागे धांवणें।
तुझिया बळें पंढरीनाथा। जालों निर्भर तुटली व्यथा।
घातला भार तुझिया माथां। न भी सर्वथा तुका म्हणे ॥

६३५

ऐसी हे गर्जवूं वैखरी। केशव मुकुंद मुरारी।
राम कृष्ण नामें बरीं। हरी हरी दोष सकळ ॥
जनार्दना जगजीवना। विराटस्वरूपा वामना।
महदादि मधुसूदना। भवबंधना तोडितिया ॥
चक्रपाणि गदाधरा। असुरमर्दना वीर्यवीरा।
सकळ मुगुटमणि शूरा। अहो दातारा जगदानीया ॥
मदनमूर्ती मनमोहना। गोपाळ गोपिका रमणा।
नटं नाट्य कौशल्य कान्हा। अहो संपन्ना सर्वगुणें ॥
गुणवंता आणि निर्गुणा। सर्वसाक्षी आणि सर्व जाणा।
करोनि अकर्ता आपणा। नेदी अभिमाना आतळों ॥

कासयानें घडे याची सेवा । काय एक समर्पावें या देवा ।
वश्य तो नव्हे वांचुनि भावा । पाय जीवावेगळे न करी तुका ॥

६६३

विठ्ठल भीमातीरवासी । विठ्ठल पंढरीनिवासी ।
विठ्ठल पुंडलिकापासीं । कृपादानाविसीं उदार ॥
विठ्ठल स्मरणा कोंवळा । विठ्ठल गौरवीं आगळा ।
आधार ब्रह्मांडा सकळा । विठ्ठल लीला विग्रही ॥
उभा चि परी न मनीं सीण । नाहीं उद्धरितां भिन्न ।
समर्थाचे घरीं एक अन्न । आर्तभूता क्षणोक्षणा सांभाळी ॥
रुचीचे प्रकार । आणिताती आदरें ।
कोठें ही न पडे अंतर । थोरां थोर धाकुट्यां धाकुटा ॥
करितां बळ धरितां नये । झोंबतां डोळे मनेंच होय ।
आपुल्या उद्देशाची सोय । जाणे हृदयनिवासी ॥
पान्हा तरी आल्या अंतर तेथें । तों नाहीं भरिलें रितें ।
करितों सेवन आइतें । तुका म्हणे चित्तें चित्त मेळवूनी ॥

६११

विठ्ठल आमचें जीवन । आगम निगमाचें स्थान ।
विठ्ठल सिद्धीचें साधन । विठ्ठल ध्यान विसावा ॥
विठ्ठल कुळींचें दैवत । विठ्ठल वित्त गोत चित्त ।
विठ्ठल पुण्य पुरुषार्थ । आवडे मात विठ्ठलाची ॥
विठ्ठल विस्तारला जनीं । सप्त ही पाताळें भरूनी ।
विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं । विठ्ठल मुनिमानसीं ॥
विठ्ठल जीवाचा जिव्हाळा । विठ्ठल कृपेचा कोंवळा ।
विठ्ठल प्रेमाचा पुतळा । लाविय़ेलें चाळा विश्व विठ्ठलें ॥
विठ्ठल बाप माय चुलता । विठ्ठल भगिनी आणि भ्राता ।
विठ्ठलें विण चाड नाहीं गोता । तुका म्हणे आतां नाहीं दुसरें —

६४२

तुळसीमाळा घालुनी कंठीं । उभा विटेवरि जगजेठी ।
अवलोकोनि पुंडलीका दृष्टी । असे भीमातटीं पंढरीराय ॥

भुक्ति मुक्ति जयाच्या कामारी । रिद्धि सिद्धि वोळगती द्वारीं ।
सुदर्शन घरटी करी । काळ कांपे दुरी धाकें तया ॥
जगज्जननी असे वाम भागीं । भीमकी शोभली अर्धांगी ।
जैसी विद्युल्लता झमके मेघीं । दुरुषणें भंगी महा दोष ॥
सुखसागर परमानंदु । गोपी गोपाळां गोधनां छंदु ।
पक्षि श्वापदां जयाचा वेधु । वाहे गोविंदु पांवा छंदें ॥
मुखमंडित चतुर्भुजा । मनमोहन गरुडध्वजा ।
तुका म्हणे स्वामी माझा । पावे भक्तिकाजा लवलाहीं ॥

६३९

मज ते हांसतील संत । जींहीं देखिलेती मूर्तिमंत ।
म्हणोनि उद्वेगलें चित्त । आहा च भक्त ऐसा दिसें ॥
ध्यानीं म्या वर्णिवेति कैसे । पुढें एकीं स्तुति केली असे ।
तेथूनि जीव निघत नसे । ऐसिये आसे लागलोंसे ॥
कासया पाडिला जी धडा । उगाचि वेडा आणि वांकडा ।
आम्हां लेंकरासि पीडा । एक मागें जोडा दुसऱ्याचा ॥
सांगा कोणाचा अन्याय । ऐसें मी धरीतसे पाय ।
तूं तंव सम चि सकळां माय । काय अन्याय एक माझा ॥
नये हा जरी कारणा । तरी कां व्यालेति नारायणा ।
वचन द्यावें जी वचना । मज अज्ञाना समजावीं ॥
बहुत दिवस केला बोभाट । पाहातां श्रमलों ते वाट ।
तुका म्हणे विस्तारलें ताट । काय वीट आला नेणों स्वामी ॥

६२०

तूंचि अनाथाचा दाता । दुःख मोह नासावया चिंता ।
शरण आलों तुज आतां । तारी कृपावंता मायबापा ॥
संतसंगति देई चरणसेवा । जेणें तुझा विसर न पडावा ।
हाच भाव माझिया जीवा । पुरवी देवा मनोरथ ॥
मज भाव प्रेम देईं कीर्ती । गुण नाम वर्णावया स्तुती ।
विघ्नां सोडवूनि हातीं । विनंती माझी परिसावी हे ॥

आणीक कांहीं नाहीं मागणें । सुख संपत्ति राज्य चाड धन ।
सांकडें न पडे तुज जेणें । दुजें भक्तीविण मायबाप ॥
जोडोनियां कर पायीं ठेवी.माथा ॥ तुका विनवी पंढरिनाथा ।
रंगीं वोडवावी रंगकथा । पुरवी व्यथा मायबापा ॥

६३७

तुझिया पार नाहीं गुणां । माझी अल्प मति नारायणा ।
भवतारका जी सुजाणा । एक विज्ञापना पायांपाशीं ॥
काय जाणावें म्यां दीनें । तुझिये भक्तींचीं लक्षणें ।
धड तें तोंड धोऊं नेणें । परि चिंतनें काळ सारीं ॥
न लवीं आणीक कांहीं पिसें । माझिया मना वायां जाय ऐसे ।
चालवी आपुल्या प्रकाशें । हातीं सरिसें धरोनियां ॥
तुज समर्पिली काया । जीवें भावें पंढरीराया ।
सांभाळीं सम विषम डाया । करी छाया कृपेची ॥
चतुर तरी चतुरां राव । जाणता तरी जीवांचा जीव ।
न्यून तो कोण एक ठाव । आरुष भाव परि माझा ॥
होतें तें माझें भांडवल । पायांपें निवेदिले बोल ।
आदरा ऐसें पाविजे मोल । तुका म्हणे साच फोल तूं जाणसी॥

६४३

हातींचें न संडावें देवें । शरण आलों जीवें भावें ।
आपुलें ऐसें म्हणावें । करितों जीवें निंबलोण ॥
बैसतां संतांचे पंगती । कळों आलें कमळापती ।
आपुलीं कोणीच नव्हती । निश्चय चित्तीं दृढ जाला ॥
येती तुझिया भजना आड । दाविती प्रपंचाचें कोड ।
कनिष्ठीं रुचि ठेऊनि गोड । देखत नाड कळतसे ॥
मरती मेलीं नेणों किती । तो चि लाभ तयाचे संगती ।
म्हणोनि येतों काकुलती । धीर तो चित्तीं दृढ द्यावा ॥
सुखें निंदोत हे जन । न करी तयांशीं वचन ।
आदिपिता तूं नारायण । जोडी चरण तुमचे तें ॥

आपलें आपण न करूं हित । करू हें प्रमाण संचित ।
तरी मी नष्टचि पतित । तुका म्हणे मज संत हांसती ॥

६३१

न पवे सन्निध वाटते चिंता । वरि या बहुतांची सत्ता ।
नुगवे पडत जातो गुंता । कर्मा बळिवंता सांपडलों ॥
बहु भार पडियेला शिरीं । मी हें माझें मजवरी ।
उघड्या नागविलों चोरीं । घरिच्या घरीं जाण जाणतां ॥
तुज मागणें इतुलें आतां । मज या निरवावें संतां ।
जाला कंठस्फोट आळवितां । उदास आतां न करावें ॥
अति हा निकट समय । मग म्यां करावें तें काय ।
दिवस गेलिया ठाकईल छाय । उरईल हाय रातिकाळीं ॥
होईल संचिताची सत्ता । अंगा येईल पराधीनता ।
ठाव तो न दिसे लपतां । बहुत चिंता प्रवर्तली ॥
ऐसी या संकटाची संधी । धांव घालावी कृपानिधी ।
तुका म्हणे माझी बळबुद्धी । सकळ सिद्धी पाय तुझे ॥

६१५

सर्व सुखाचिया आशा जन्म गेला । क्षण मुक्ती यत्न नाहीं केला
हिंडतां दिशा सीण पावला । माया वेष्टिला जीव माझा ॥
माझें स्वहित नेणती कोणी । कांहीं न करितां मजवांचुनी ।
सज्जन तव सुखमांडणी । नेणती कोणी आदि अंत ॥
काय सांगों गर्भींची यातना । मज भोगितां नारायणा ।
मांस मळमूत्र जाणा । तुज क्षणक्षणा ध्यात असे ॥
मज चालतां प्रयाणकाळीं । असतां न दिसती जवळी ।
मृत्तिके मृत्तिका कवळी । एकले मेळीं संचिताचे ॥
आतां मज ऐसें करी गा देवा । कांहीं घडे तुझी चरणसेवा ।
तुका विनवीतसे केशवा । चालवी दावा संसारें ॥

६४९

तरि म्यां आळवावें कोणा । कोण हे पुरवील वासना ।
तुज वांचून नारायणा । लावी स्तना कृपावंतें ॥

आपुला न विचारी सिण । न धरीं अंगसंगें भिन्न ।
अंगीकारिलें राखे दीन । देई जीवदान आवडीचें ॥
माझिया मनासि हे आस । नित्य सेवावा ब्रम्हरस ।
अखंड चरणींचा वास । पुरवी आस याचकाची ॥
माझिया संचिताचा ठेवा । तेणें हे वाट दाविली देवा ।
एवढ्या आदराचा हेवा । मागें सेवादान आवडीनें ॥
आळवीन करुणावचनीं । आणीक गोड न लगे मनीं ।
निद्रा जागृती आणि स्वप्नीं । धरिलें ध्यानीं मनीं रूप ॥
आतां भेट न भेटतां आहे । किंवा नाहीं ऐसें विचारूनि पाहे ।
लागला झरा अखंड आहे । तुका म्हणे साहे केलें अंतरीं ॥

६२८

कोण सुख धरोनि संसारीं । राहो सांग मज बा हरी ।
अवघ्या नाशिवंता परी । थिता दुरी अंतरसी ॥
प्रथम केला गर्भीवास । काय ते सांगावे सायास ।
दुःख भोगिलें नव ही मास । आलों जन्मास येथवरी ॥
बाळपण गेलें नेणतां । तारुण्यदशे विषयव्यथा ।
वृद्धपणीं प्रवर्तली चिंता । मरें मागुता जन्म धरी ॥
क्षण एक तोही नाहीं विसावा । लक्ष चौऱ्याशीं घेतल्या धांवा ।
भोवंडिती पाठीं लागल्या हांवा । लागो आगी नांवा माझ्या मीपणा ॥
आतां पुरे ऐसी भरोवरी । रंक होऊनि राहेन द्वारीं ।
तुझा दास मी दीन कामारी । तुका म्हणे करी कृपा आतां ॥

६४८

माझा तंव खुंटला उपाव । जेणें तुझे आतुडती पाय ।
करूं भक्ती तरि नाहीं भाव । नाहीं हातीं जीव कवणे विशीं ॥
धर्म करू तरि नाहीं चित्त । दान देऊं तरि नाहीं वित्त ।
नेणें पुजों ब्राह्मण अतीत । नाहीं भूतदया पोटा हातीं ॥
नेणें गुरुदास्य संतसेवन । जप तप अनुष्ठान ।
नव्हे वैराग्य वनसेवन । नव्हे दमन इंद्रियांसि ॥
तीर्थ करूं तरि मन नये सवें । व्रत करूं तरी विधि नेणें स्वभावें ।

देव जरि आहे म्हणों मजसवें । तरि आप परावें न वंचे ॥
म्हणोनि जालों शरणागत । तुझा दास मी अंकित ।
यास कांहीं नलगे संचित । जालों निश्चित तुका म्हणे ॥

६२४

न बोलसी तेंही कळिलें देवा । लाजसी आपुलिया नांवा ।
तुज मी नाहीं घालीत गोवा । भीड केशवा कासयाची ॥
उतरीं आपुला हा पार । मजशीं बोलोनि उत्तर ।
माझा तुज नव्हे अंगीकार । मग विचार करीन मी ॥
दात्या आणि मागत्यासी । धर्मनीति तरी बोलिली ऐसी ।
यथा न शक्ति टाकेल तैसी । बाधी दोघांसी विन्मुखता ॥
म्हणोनि करितों मी आस । तुझिया वचनाची वास ।
धीर हा करूनि सायास । न टळे नेमास आपुलिया ॥
तुझें म्यां घेतल्यावांचून । न वजें एथूनि वचन ।
हाचि माझा नेम सत्य जाण । आहे नाहीं म्हण तुका म्हणे ॥

६३४

पुत्र पत्नी सहोदर । मायबाप गोताचा पसर ।
मिळतां काष्ठें लोटतां पूर । आदळीं दूर होती खनाळीं ॥
म्हणोनि नासावें अज्ञान । इतुलें करी कृपादान ।
कृपाळु तूं जनार्दन । धरूनि चरण तुका विनवी ॥

६१३

मी तंव अनाथ अपराधी । कर्महीन मतिमंद बुद्धी ।
तुज म्यां आठविलें नाहीं कधीं । वाचे कृपानिधी मायबापा ॥
नाहीं ऐकिलें गाईलें गीत । धरिली लाज सांडिलें हित ।
नावडे पुराण बैसले संत । केली बहुत परनिंदा ॥
केला करविला नाहीं उपकार । नाहीं दया आली पीडितां पर ।
करूं नये तो केला व्यापार । वाहिला भार कुटुंबाचा ॥
नाहीं केलें तीर्थांचें भ्रमण । पाळिला पिंड करचरण ।
नाहीं संतसेवा घडलें दान । पूजावलोकन मूर्तीचें ॥

असंगसंग घडले अन्याय । बहुत अधर्म उपाय ।
न कळे हित करावें तें । काय नये बोलूं आठवूं तें ॥
आप आपण्या घातकर । शत्रु जालों मी दावेदार ।
तूं तव कृपेचा सागर । उतरीं पार तुका म्हणे ॥

६१८

जेणें हा जीव दिला दान । तयाचें करीन चिंतन ।
जगजीवन नारायण । गाईन गुण तयाचे ॥
जो या उभा भीवरेच्या तिरीं । कट धरूनियां करीं ।
पाऊलें समचि साजिरीं । अंतरीं धरोनि राहेन ॥
जो या असुरांचा काळ । भक्तजन प्रतिपाळ ।
खेळे ही लाघवें सकळ । तयाच्या भाळ पायांवरी ॥
जो या गोपाळांच्या मेळीं । खेळु खेळे वनमाळी ।
रसातळा नेला बळी । राहे पाताळीं स्वामी माझा ॥
जो हा लावण्य पुतळा । जयाचे अंगीं सकळ कळा ।
जयाचे गळा वैजयंती माळा । तया वेळोवेळां दंडवत ॥
जयाचें नाम पाप नासी । लक्ष्मी ऐसी जयाची दासी ।
तो हा तेजःपुंज रासी । सर्व भावें त्यासि तुका शरण ॥

६२६

आतां तुज कळेल तें करीं । तारिसी तरि तारी मारी ।
जवळी अथवा दुरी धरी । घालीं संसारीं अथवा नको ॥
शरण आलों नेणतपणें । भाव आणि भक्ति कांहींच नेणें ।
मतिमंद सर्वज्ञानें । बहु रंक उणें रंकाहुनी ॥
मन स्थिर नाहीं माझिये हातीं । इंद्रियें धांवतां नावरतीं ।
सकळ खुंटलिया युक्ती । शांति निवृत्ति जवळी नाहीं ॥
सकळ निवेदिला भाव । तुझिये पायीं ठेविला जीव ।
आतां करी कळे तो उपाव । तूं चि सर्व ठाव माझा देवा ॥
राहिलों धरून विश्वास । आधार नेटी तुझी कास ।
आणिक नेणें मी सायास । तुका म्हणे यास तुझें उचित ॥

६१७

आतां मज धरवावी शुद्धि । येथुनि परतवावी बुद्धि ।
घ्यावें सोडवुनि कृपानिधि । सांपडलों संधीं काळचक्रीं ॥
करिसील तरि नव्हे काई । राईचा डोंगर पर्वत राई ।
आपुले करुणेची खाई । करीं वो आई मजवरी ॥
मागील काळ अज्ञानपणें । सरला स्वभावें त्या गुणें ।
नेणें आयुष्य जालें उणें । पुढील पेणें अंतरलें ॥
आतां मज वाटतसे भय । दिवसें दिवस चालत जाय ।
येथें म्या येउनि केलें काय । नाहीं तुझे पाय आठविले ॥
करूनि अपराध क्षमा । होतील केले पुरुषोत्तमा ।
आपुले नामीं घ्यावा प्रेमा । सोडवी भ्रमा पासुनिया ॥
हृदय वसो तुमच्या गुणीं । ठाव हा पायांपे चरणीं ।
करूं हा रस सेवन वाणी । फिटे तों धणी तुका म्हणे ॥

६१४

आतां पावेन सकळ सुखें । खादलें कदा तें नखें ।
अवघे सरलें पारिखें । सकळ देखे माहियरें ॥
जवळी विठ्ठल रखुमाई । बहिणी बंधु बाप आई ।
सकळ गोताचीच साई । पारिखें काईं ऐसें नेणिजे ॥
जगदाकारीं जाली सत्ता । वारोनी गेली पराधीनता ।
अवघें आपुलेंचि आतां । लाज आणि चिन्ता दुऱ्हावली ॥
वावरे इच्छा वसे घरीं । आपुले सत्तेचे माहेरीं ।
करवी तैसें आपण करीं । भीड न धरी चुकल्याची ॥
सोसिला होता सासुरवास । बहुतांचा बहुत दिवस ।
बहु कामें पुरविला सोस । आतां उदास आपुल्यातें ॥
करिती कवतुक लाडें । मज बोलविती कोडें ।
मायबाप उत्तरें गोडें । बोले बोबडे पुढें तुका ॥

६२५

बहुत जाचलों संसारें । मोहमाया जाळाच्या विखारें ।
त्रिगुण येतील लहरें । तेणें दुःखें थोरें आक्रंदलों ॥

आणीक दुःखें सांगों मी किती । सकळ संसार स्थिती ।
न साहे पाषाण फुटती । भय चित्तीं कांप भरलासे ॥
आतां मज न साहवे सर्वथा । संसार गंधीची हे वार्ता ।
जालों वेडा असोनि जाणता । पावें अनंता तुका म्हणे ॥

१११३०

नमो विष्णु विश्वरूपा मायबापा । अपरा अमुपा पांडुरंगा ।
विनवितों रंक दास मी सेवक । वचन तें एक आइकावें ॥
तुझी स्तुति वेद करितां भागला । निवांत चि ठेला नेति नेति ।
ऋषि मुनि बहु सिद्ध कविजन । वर्णितां ते गुण न सरती ॥
तुका म्हणे तेथें काय माझी वाणी । जे तुझी वाखाणी कीर्ती देवा ॥

१८३४

सगुण कीं साकार निर्गुण कीं निराकार । न कळे हा पार वेदां श्रुतीं ।
तो आम्ही भावें केलासी लहान । ठेवूनियां नांवें पाचारितों ॥

३६३०

माझे माथां तुझा हात । तुझे पायीं माझें चित्त ॥
ऐसी पडियेली गांठी । शरीरसंबंधाची मिठी ॥

२८५२

माता कापी गळा । तेथें कोण राखी बाळा ॥
हें कां नेणा नारायणा । मज चाळवितां दीना ॥
नागवी धावणें । तेथें साह्य व्हावें कोणें ॥
राजा सर्व हरी । तेथें दुजा कोण वारी ॥
तुझ्या केल्याविण । नव्हे स्थिर वश जन ॥
तुका म्हणे हरी । सूत्र तुम्हां हातीं दोरी ॥

३

सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती । रखुमाईच्या पती सोयरिया ॥
गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देई मज प्रेम सर्व काळ ॥
विठो माउलिये हाचि वर देई । संचरोनि राहीं हृदयामाजीं ॥
तुका म्हणे कांहीं न मागें आणीक । तुझे पायीं सुख सर्व आहे ॥

८१८

नाम आठवितां सद्गदित कंठीं । प्रेम वाटे पोटीं ऐसे करी ॥
रोमांच जीवन आनंदाश्रु नेत्रीं । अष्टांग ही गात्रीं प्रेम तुझें ॥
सर्वही शरीर वेचो या कीर्तनीं । गाऊं निशिदिनीं नाम तुझें ॥
तुका म्हणे दुजें न करी कल्पांतीं । सर्वदा विश्रांति संतां पाईं ॥

३९१०

तुका म्हणे तुझा न पडावा विसर । दुःखाचे डोंगर जाले तरी ॥

२९३०

नाहीं तुज कांहीं मागत संपत्ती । आठवण चित्तीं असो द्यावी ॥

३६५५

जेणें माझें चित्त राहे तुझ्या पायीं । अखंड तें देईं प्रेमसुख ॥
देहभाव राख दीन करूनियां । जनाचारी वांयां जाय तैसा ॥
द्रव्य दारा नको मानाची आवडी । कवणे विशीं गोडी प्रपंचाची ॥

४११३

नरनारी बाळें अवघा नारायण । ऐसें माझें मन करी देवा ॥
न यो कामक्रोध द्वेष निंदा द्वंद । अवघा गोविंद निःसंदेह ॥
असावें म्यां सदा विषयीं विरक्त । काया वाचा चित्त तुझे पायीं ॥
करोनियां साह्य पुरवी मनोरथ । व्हावें कृपावंत तुका म्हणे ॥

१७८०

आतां काढाकाढी करी बा पंढरीराया । नाहीं तरी वांयां गेलों दास ॥
जाणतां बैसलों दगडाचे नावे । तिचा धर्म घ्यावे प्राण हाचि ॥
मनाचा स्वभाव इंद्रियांचे ओढी । पतनाचे जोडी वरी हांव ॥
तुका म्हणे जाली अंधळ्याची परी । आतां मज हरी वाट दावी ॥

४०४२

आम्हां वैष्णवांचा कुळधर्म कुळींचा । विश्वास नामाचा एका भावें ॥
तरीच हरिचे दास म्हणवितां श्लाघीजे । निर्वासना कीजे चित्त आधीं ॥
गाऊं नाचूं प्रेमें आनंदें कीर्तनीं । भुक्ति मुक्ति दोन्ही न मगों तुज ॥
तुका म्हणे देवा ऐसी यांची सेवा । द्यावी जी केशवा जन्मोजन्मीं ॥

२८६३

नको देऊं देवा पोटीं हें संतान । मायाजाळें जाण नाठवसी ॥
नको देऊं देवा द्रव्य आणि भाग्य । तो एक उद्वेग होय जीवा ॥
तुका म्हणे करीं फकिराचे परी । रात्र दिवस हरि येईल घरा ॥

३४४४

नको मज ताठा नको अभिमान । तुजवांचूनि क्षीण होतो जीव ॥
दुर्धर हे माया न होय सुटका । वैकुंठनायका सोडवी मज ॥
तुका म्हणे तुझें जालिया दर्षण । मग निवारण होइल सर्व ॥

१५८५

मागणें तें एक तुजप्रति आहे । देशी तरि पाहें पांडुरंगा ॥
या संतांसी निरवीं हें मज देई । आणिक दुजें कांहीं न मगें तुज ॥
तुका म्हणे आतां उदार होईं । मज ठेवीं पायीं संतांचिया ॥

२४३४

येणें मुखें तुझे वर्णी गुण नाम । तेंचि मज प्रेम देईं देवा ॥
डोळे भरूनियां पाहे तुझें मुख । तेंचि मज सुख देईं देवा ॥
कान भरोनियां ऐके तुझी कीर्ति । ते मज विश्रांती देईं देवा ॥
वाहे रंगीं टाळी नाचेन उदास । हें देईं हातांस पायां बळ ॥
तुका म्हणे माझा सकळ देहभाव । आणीक नको ठाव चिंतूं यासी ॥

३२८४


आतां केशीराजा हे चि विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसे ॥
देह असो माझा भलतिये ठायीं । चित्त तुझ्या पायीं असो द्यावें ॥
काळाचें खंडण घडावें चिंतन । धनमानजन विन्मुख तो ॥
कफवातपित्त देहअवसानीं । ठेवावीं वारूनि दुरितें हीं ॥
सावध तो माझीं इंद्रियें सकळें । दिलीं एका वेळे हाक आधीं ॥
तुका म्हणे तूं या सकळांचा जनिता । येथें ऐकतां सकळासी ॥

१९९६

देवा आतां ऐसा करी उपकार । देहाचा विसर पाडी मज ॥



अभंगांच्या वह्या ज्या डोहांत बुडविल्या तोच हा इंद्रायणीचा डोह.



श्री क्षेत्र देहूचा देखावा : 'धन्य देहूगांव । पुण्यभूमी ठाव' असें या क्षेत्राचें वर्णन महाराजांनीं केलें आहे.

२६३९

नरस्तुति आणि कथेचा विकरा । हें नको दातारा घडों देऊं ॥
ऐसिये कृपेची भाकितों करुणा । आहेसि तूं राणा उदाराचा ॥
पराविया नारी आणि परधना । नको देऊं मनावरी येऊं ॥
भूतांचा मत्सर आणि संतनिंदा । हें नको गोविंदा घडूं देऊं ॥
देह अभिमान नको देऊं शरीरीं । चढों कांहीं परी एक देऊं ॥
तुका म्हणे तुझ्या पायांचा विसर । नको वारंवार पडों देऊं ॥

१७८२

तुझें नाम मुखीं न घेतां आवडी । जिव्हा तेचि घडी झडो माझी ॥
हें मज देईं हें मज देईं । आणिक दुजें कांहीं न मगें तुज ॥
वहिर कान तुझी कीर्ती नाइकतां । पाय न देखतां जात डोळे ॥
मना तुझें ध्यान नाहीं नित्य काळ । धिग ते चांडाळ जळो जळो ॥
हातपाय तेणें पंथें न चलतां । जावे ते अनंता गळोनियां ॥
तुजवीण जिणें नाहीं मज चाड । तुका म्हणे गोड नाम तुझें ॥

३०६८

दुर्बुद्धि ते मना । कदा नुपजो नारायणा ॥
आतां ऐसे करी । तुझे पाय चित्तीं धरी ॥
उपजला भावो । तुमचे कृपे सिद्धी जावो ॥
तुका म्हणे आतां । लाभ नाहीं या परता ॥

२८१५

माझे पाय तुझी डोई । ऐसें करि गा भाक देईं ॥
पाहतां तंव उफराटें । घडे तरी भाग्य मोठें ॥

७२२

नसे तरी मनीं नसो । परी वाचे तरी वसो ॥
देह पडो या चिंतनें । विठ्ठलनाम संकीर्तनें ॥
दंभस्थिति भलत्या भावें । मज हरिजन म्हणावें ॥
तुका म्हणे काळें तरी । मज सांभाळील हरी ॥

२७८

तान्हेल्याची धणी । फिरे गंगा नव्हे उणी ॥
माझे मनोरथ सिद्धी । पाववावे कृपानिधी ॥

तूं तों उदाराचा राणा । माझी अल्पचि वासना ॥
कृपादृष्टीं पाहे । तु म्हणे होईं साहे ॥

२३०६

हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥
गुण गाईन आवडी । हे चि माझी सर्व जोडी ॥
नलगे मुक्ति आणि संपदा । संतसंग देई सदा ॥
तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हासी ॥

४०६७

जन्मोजन्मीं दास । व्हावें हे चि माझी आस ॥
पंढरीचा वारकरी । वारी चुकों नेदी हरी ॥
संत समागम । अंगीं स्थिरावलें प्रेम ॥
स्नान चंद्रभागे । तुका म्हणे हें चि मागें ॥

२०८१

आतां माझ्या भावा । अंतराय नको देवा ॥
आलें भागा तें करितों । तुझें नाम उच्चारितों ॥
दृढ माझें मन । येथें राखावें बांधोन ॥
तुका म्हणे वाटे । नको फुटो देऊं फांटे ॥

१७९७

परिस काय धातु परिस काय धातु । फेडितो निभ्रांतु लोह-पांगु ॥
कल्पतरु कोड पुरवितो रोकडा । चिंतामणि खडा चिंतिलें तें ॥
चंदनाच्या वासें नसतां चंदन । होती काष्ठ आन वृक्षयाती ॥
काय त्याचें उणें जालें त्यासी देतां । विचारी अनंता तुका म्हणे ॥

३३०१

जालिया दर्शन करीन मी सेवा । आणीक ही देवा न लगे दुजें ॥
प्रारब्धा अधीन अन्न आच्छादन । स्थिर करोनि मन ठेवीं पायीं ॥
येगा येगा येगा कृपाळुवा हरी । विनवीं अभ्यंतरीं देउनि भेटी ॥

३३७९

तुझा दास मज म्हणती अंकित । अवघे सकळिक लहान थोर ॥
हें चि आतां लागे करावें जतन । तुझें थोरपण तुज देवा ॥

होऊनी निर्भर राहिलों निश्चिंत । पावन पतित नाम तुझें ॥
करितां तुज होय डोंगराची राई । न लगतां कांहीं पात्या पातें ॥
तुका म्हणे तुज काय ते आशंका । तारितां मशका मज दीना ॥

२४६८

ऐसें भाग्य कई लाहाता होईन । अवघे देखें जन ब्रह्मरूप ॥
मग तया सुखा अंत नाहीं पार । आनंदें सागर हेलावती ॥
शांति क्षमा दया मूर्तिमंत अंगीं । परावृत्त संगीं कामादिकां ॥
विवेकासहित वैराग्याचें बळ । धगधगितो ज्वाळ अग्नि जैसा ॥
भक्ति नवविधा भावशुद्ध वरी । अलंकारावरी मुगुटमणि ॥
तुका म्हणे माझी पुरवीं वासना । कोण नारायणा तुजविण ॥

३३४०

सत्य तूं सत्य तूं सत्य तूं विठ्ठला । कां गा हा दाविला जगद्वाकार ॥
सांभाळी आपुली हाक देतो माया । आम्हांसी कां भयाभीत केलें ॥
रूप नाहीं त्यासी ठेवियेलें नाम । लटकाचि श्रम वाढविला ॥

१०२२

नको ब्रम्हज्ञान आत्मस्थितिभाव । मी भक्त तूं देव ऐसें करी ॥

१०१९

इतुलें करी देवा ऐके हे गोष्टी । सर्व समदृष्टी तुज देखें ॥
इतुलें करी देवा विनवितों तुज । संतांचे चरणरज वंदी माथां ॥
इतुलें करी देवा ऐके हे मात । हृदयीं पंढरीनाथ दिवसरात्रीं ॥
भलतिया भावें तारी पंढरीनाथा । तुका म्हणे आतां शरण आलों ॥

३१२७

घालिती पव्हया । वाटे अनाथाच्या दया ॥
तैसे कां हे नये करूं । पांडुरंगा आम्हां तारूं ॥
रोगियासी काढा । देऊनि वारितील पीडा ॥
बुडत्यासाठीं उडी । घालितील कां हे जोडी ॥
सारितील कांटे । पुढें मागिलांचे वाटे ॥
तुका म्हणे भार । घेती भागल्यांचा फार ॥

७६८

आयुष्य गेलें वांयांविण । थोर झाली नागवण ॥
आतां धांवे धांवे तरी । काय पाहातोसि हरी ॥
माझे तुझे याचि गती । दिवस गेले तोंडीं माती ॥
मन वाव घेऊं नेदी । बुडवूं पाहे भवनदी ॥
पडिला विषयाचा घाला । तेणें नागविलें मला ॥
शरण आलों आतां धांवें । तुका म्हणे मज पावें ॥

२९७१

प्रपंच वोसरो । चित्त तुझे पायीं मुरो ॥
ऐसे करि गा पांडुरंगा । शुद्ध रंगवावें रंगा ॥
पुरे पुरे आतां । नको दुजि याची सत्ता ॥
लटिकें तें फेडा । तुका म्हणे जाय पीडा ॥

३३७१

माझें चित्त तुझे पायीं । राहे ऐसें करी कांहीं ।
धरोनियां बाहीं । भव तारीं दातारा ॥
चतुरा तूं शिरोमणि । गुणलावण्याची खाणी ।
मुगुट सकळां मणि । तूंचि धन्य विठोबा ॥
करी तिमिराचा नाश । दीप होऊनि प्रकाश ।
तोडी आशापाश । करीं वास हृदयीं ॥
पाहे गुंतलों नेणतां । तुज असो माझी चिंता ।
तुका ठेवी माथा । पायीं आतां राखावें ॥

४०५२

काय करूं आतां या मना । न संडी विषयवासना ।
प्रार्थितां ही राहेना । आदरें पतना नेऊं पाहे ॥
आतां धावे धावे गा श्रीहरी । गेलों वांया नाहीं तरी ।
न दिसे कोणी आवरी । आणीक दुजा तयासी ।
न राहे एके ठायीं एकी घडी । चित्त तडतडा तोडी ।
भरलें विषय भोंवडीं । घालूं पाहे उडी भव डोहीं ॥
आशा तृष्णा कल्पना पापिणी । घात मांडला माझा यांणीं ।
तुका म्हणे चक्रपाणी । काय अजोनि पाहातोसी ॥

१८३७

अधिक कोंडितां चरफडी । भलतीकडे घाली उडी ॥
काय करूं या मना आतां । कां विसरतें पंढरीनाथा ॥
करी संसाराची चिंता । वेळोवेळां मागुती ॥
भजन नावडे श्रवण । धांवे विषय अवलोकून ॥
बहुत चंचळ चपळ । जातां येतां न लगे वेळ ॥
किती राखों दोनी काळ । निजलिया जागे वेळ ॥
मज राखे आतां । तुका म्हणे पंढरिनाथा ॥

२२१५

काय करूं जी दातारा । कांहीं न पुरे संसारा ॥
जाली माकडाची परी । येतो तळा जातों वरी ॥
घालीं भलते ठायीं हात । होती शिव्या बैस लात ॥
आदि अंतीं तुका । सांगे न कळे झाला चुका ॥

९५०

माझ्या मुखावाटा नयो हें वचन । व्हावें हें संतान द्रव्य कोणां ॥
फुकाचा विभाग पतन दुःखासी । दोहींमुळें त्यासी तेंचि साधे ॥
नाइकावी निंदा स्तुति माझ्या कानें । सादर या मनें होऊनिया ॥
तुका म्हणे देव असाध्य यामुळें । आशा मोहजाळें गुंतलिया ॥

३८८३

सर्वकाळ डोळां बैसो नारायण । नयो अभिमान आड मध्यें ॥
धाड पडो तुझ्या थोरपणावरी । वाचे नरहरि उच्चारीना ।
जळो अंतरींचें सर्व जाणपण । विवाद वचन अहंतेचें ॥
सकळां चरणीं गळित माझा जीव । तुका म्हणे भाव एकविध ॥

५४७

न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो ॥
ऐसी माझी वाचा मज उपदेशी । आणीक लोकांसी हेंचि सांगे ॥
विटंबो शरीर होत कां विपत्ति । परि राहो चित्तीं नारायण ॥
तुका म्हणे नासिवंत हें सकळ । आठवे गोपाळ तें चि हित ॥

५४९

जरी माझी कोणी कापितील मान । तरी नको आन वदों जिव्हे ॥
सकळां इंद्रियां हे माझी विनंती । नको होऊं परतीं पांडुरंगा ॥
आणिकांची मात नाइकावी कानीं । आणीक नयनीं न पाहावें ॥
चित्ता तुवां पायीं रहावे अखंडित । होऊनी निश्चित एकविध ॥
चला पाय हात हेंचि काम करा । माझ्या नमस्कारा विठोबाच्या ॥
तुका म्हणे तुम्हां भय काय करी । आमुचा कैवारी नारायण ॥

४७०

तुझें दास्य करूं आणिका मागों खावया ।
धिग् जालें जिणें माझें पंढरीराया ॥
काय गा विठोबा तुज म्हणावें ।
थोराच्या दैवें गोड शुभ अशुभ ॥
संसाराचा धाक निरंतर आम्हांसी ।
मरण भले परि काय अवकळा तैसी ॥
तुझे शरणागत शरण जाऊं आणिकांसी ।
तुका म्हणे कवणा लाज हे कां नेणसी ॥

२२४७

मी अवगुणी अन्यायी किती म्हणोन सांगों काई ।
आतां मज पायीं ठाव देईं विठ्ठले ॥
पुरे पुरे हा संसार । कर्म बळिवंत दुस्तर ।
राहों नेदी स्थिर एके ठायीं निश्चळ ॥
अनेक बुद्धीचे तरंग क्षणाक्षणां पालटती रंग ।
धरूं जातां संग तंव तो होतो बाधक ॥
तुका म्हणे आतां अवघी तोडी माझी चिंता ।
येऊनि पंढरिनाथा वास करी हृदयीं ॥

३९८७

देवाचिये पायीं वेचों सर्व शक्ती । होतील विपत्ति ज्या ज्या कांहीं ॥
नेघे माझी वाचा पुढें कांहीं वाव । आणि दुजे भाव बोलायाचे ॥
मनाची वांटणी चित्ताचा विक्षेप । राहो हा अनुताप आहे तैसा ॥
तुका म्हणे घेईं विठ्ठलाचा छंद । आनंदाचा कंद विस्तारेल ॥

४३४९

किडा अन्नाचें माणुस । त्याचा म्हणविल्या दास ॥
तेंही त्यासी उपेक्षीना । बोल आपुला सांडीना ॥
तो तूं नराचा नरेंद्र । तुजपासूनि इंद्रचंद्र ॥
तुका म्हणे विश्वंभर । तुज वर्णी फणीवर ॥

४४५६

तुझें म्हणों आम्हां । मग उणें पुरुषोत्तमा ॥
ऐसा धर्म काय । अमृतानें मृत्यु होत ॥
कल्पवृक्षातळीं । गांठी बांधलिया झोळी ॥
तुका म्हणे परिस । सांपडल्या उपवास ॥

४४३८

पाप ताप माझे गुणदोष निवारीं । कृष्णा विष्णु हरी नारायणा ॥
काम क्रोध वैरी घालोनि बाहेरी । तूं राहे अंतरीं पांडुरंगा ॥
करिशील तरी नव्हे कांइ एक । निर्मिलें त्रैलोक्य हेळामात्रें ॥
समर्थासि काय आम्हीं शिकवावें । तुका म्हणे यावें पांडुरंगा ॥

४४३५

बहु जन्मां शेवटीं स्वामी तुझी भेटी । बहु मोह पोटीं थोर जाला ।
बहु पुरें पाहिलीं बहु दिशा शोधिली । बहु चिंता वाहिली दुर्भराची ॥
बहु काळ गेले अनुचित केलें । बहु नाहीं गाइलें नाम तुझें ॥
ऐसा मी अपराधी अगा कृपानिधी । बहु संतां संनिधि ठेवीं तुका ॥

४४३३

पक्षीयाचे घरीं नाहीं सामुगरी । त्यांची चिंता करी नारायण ॥
अजगर जनावर वारुळांत राहे । त्याजकडे पाहे पांडुरंग ॥
चातक हा पक्षी नेघे भूमिजळ । त्यासाठीं घननीळ नित्य वर्षे ॥
तुका म्हणे आम्ही पिप्पलिकांची जात । पुरवी मनोरथ पांडुरंगा ॥

४४६६

नको विद्या वयसा आयुष्य फारसें । नाहीं मज पिसें मुक्तीचें ही ।
रामकृष्ण म्हणतां जावो माझा प्राण । हेंचि कृपादान मागतसे ॥
नको धन मान न वाढो संतान । मुखीं नारायण प्राण जावा ॥
तुका म्हणे दीन काकुलती येतों । तुज निरवितों पांडुरंगा ॥

४४५७

कोरडिया गोष्टी नावडती मना । नाहीं ब्रह्मज्ञानाविण चाड ।
दाखवीं आपुलें सगुण रूपडें । वंदिन मी कोडें पाय तुझे ॥
न लगे तो मोक्ष मज सायुज्यता । नावडे हे वार्ता शून्याकारी ॥
तुका म्हणे चाड धरीन श्रीमुखें । येशिल कवतुकें जवळीक ॥

४०१३

रामकृष्ण गोविंद नारायण हरी । केशवा मुरारी पांडुरंगा ॥
लक्ष्मीनिवासा पाहे दिनबंधु । तुझा लागो छंदु सदा मज ॥
तुझे नामीं प्रेम देईं अखंडित । नेणें तप व्रत दान कांहीं ॥
तुका म्हणे माझें हेंचि गा मागणें । अखंड ही गाणें नाम तुझें ॥

४४७३

तुझें नाम माझें मुखीं असो देवा । विनवितों राघवा दास तुझा ॥
तुझ्या नामबळें तरले पतित । म्हणोनि माझें चित्त तुझे पायीं ॥
तुका म्हणे तुझें नाम हें सादर । गातां निरंतर सुख वाटे ॥

४४३२

कासयासि व्यर्थ घातलें संसारीं । होतें तैसे जरी तुझे चित्तीं ॥
तुझिये भेटीची थोर असे आस । दिसोनी निरास आली मज ॥
आतां काय जिणें जालें निरर्थक । वैकुंठनायक भेटे चि ना ॥
आडलासि काय कृपेच्या सागरा । रुकमादेवीवरा सोइरिया ॥
तुका म्हणे देईं चरणाची सेवा। नुपेक्षीं केशवा मायबापा ॥

४४०९

पापाची वासना नको दावूं डोळां । त्याहूनि अंधळा बराच मी ॥
निंदेचें श्रवण नको माझे कानीं । बधिर करोनि ठेवीं देवा ॥
अपवित्र वाणी नको माझ्या मुखा । त्याजहुनि मुका बराच मी ॥
नको मज कधीं परस्त्रीसंगति । जनांतून माती उठतां भली ॥
तुका म्हणे मज अवघ्याचा कांटाळा । तूं एक गोपाळा आवडसी ॥

४४१५

माझें कोण आहे तुजविण देवा । मुकुंदा केशवा नारायणा ॥
वाट पाहतसे कृपेच्या सागरा । गोपी मनोहरा पांडुरंगा ॥

साच करी हरी आपुली ब्रिदावळी । कृपेनें सांभाळी महाराजा ॥
क्षमा करी सर्व अपराध माझा । लडिवाळ मी तुझा पांडुरंगा ॥
साह्य होसी तरी जाती साही वैरी । मग सुखें अंतरी ध्यान तुझें ॥
कृपा करोनि देईं दया क्षमा शांती । तेणें तुझी भक्ति लाभईल ॥
माझें हें सामर्थ्य नव्हे नारायणा । जरी कांहीं करुणा येइल तुज ॥
तुका म्हणे मज कैसें आपंगा जी । आपुलेसें करा जी पांडुरंगा ॥

४१८२

चित्त गुंतलें प्रपंचें । जालें वेडें ममतेचें ॥
आतां सोडवीं पांडुरंगा । आलें निवारी तें आंगा ॥
गुंतली चावटी । नामीं रूपीं जाली तुटी ॥
तुका म्हणे चाली । पुढें वाट खोळंबली ॥

४२९४

ऐसा सर्व भाव तुज निरोपिला । तूं मज एकला सर्व भावें ॥
अंतरींची कां हे नेणसील गोष्टी । परि सुखासाठीं बोलविसी ॥
सर्व माझा भार तुज चालविणें । तेथें म्यां बोलणें काय एक ॥
स्वभावें स्वहित हिताचें कारण । कौतुक करून निवडिसी ॥
तुका म्हणे तूं हें जाणसी गा देवा । आमुच्या स्वभावा अंतरींच्या

४४२१

काम क्रोध आड पडले पर्वत । राहिला अनंत पलीकडे ॥
नुलंघवे मज न सांपडे वाट । दुस्तर हा घाट वैरियांचा ॥
आतां कैंचा मज सखा नारायण । गेला अंतरोन पांडुरंग ॥
तुका म्हणे व्यर्थ मोलाचें शरीर । गेले हा विचार कळों आला ॥

४१२७

माझा घातपात अथवा हित फार । अवघा विचार तुझ्या हातीं ॥
ठेवुनि जीव भाव तुझ्या ठायीं चित्त । राहिलों निवांत पांडुरंगा ॥
चित्ताचा चाळक बुद्धीचा जनिता । काय नाहीं सत्ता तुझे हातीं
तुका म्हणे काय करिसी तें पाहीन । ठेविसी राहीन सुखें तेथें ॥

४२८९

प्रगट व्हावे हे अज्ञानवासना । माझी नारायणा हीन बुद्धि ।
खाणीवाणी होसी काष्ठी तूं पाषाणीं । जंतु जीवाजनीं प्रसिद्ध हा

ज्ञानहीन तुज पाहे अल्पमति । लहान हा चित्तीं धरोनियां ॥
परि तूं कृपाळ होसी देवराणा । ब्रिदें तुझीं जना प्रसिद्ध हें ॥
उतावीळ बहु भक्तांचिया काजा । होसी केशीराजा तुका म्हणे ॥

४४०५

शेवटींची विनंती । ऐका ऐका कमळापती ॥
काया वाचा मन । चरणीं असे समर्पण ॥
जीवपरमात्मा ऐक्यासि । सदा वसो हृदयेंसी ॥
तुका म्हणे देवा । कंठीं वसावे केशवा ॥

४११६

जालों आतां दास । माझी पुरवी हे आस ॥
पंढरीचा वारकरी । वारी चुकों नेदी हरी ॥
संत समागम । अंगीं भरोनिया प्रेम ॥
चंद्रभागे स्नान । तुका म्हणे हेंचि दान ॥

९५०

माझ्या मुखावाटा नयो हें वचन । व्हावें हें संतान द्रव्य कोणां ॥
फुकाचा विभाग पतन दुःखासी । दोहींमुळें त्यासी तेंचि साधे ॥
नाइकावी निंदा स्तुति माझ्या कानें । सादर या मनें होऊनियां ॥
तुका म्हणे देव असाध्य यामुळें । आशा मोहजाळें गुंतलिया ॥

४११७

यासाठीं करितों निष्ठुर भाषण । आहेसी तूं जाण सर्वदाता ॥
ऐसें दुःख कोण आहे निवारिता । तों मी जाऊं आतां शरण त्यासी ॥

४०९०

पांडुरंगा कृपाळुवा दयावंता । धरिसील सत्ता सकळही ॥
कां जी आम्हांवरी आणिकांची सत्ता । तुम्हासी असतां जवळीक ॥

३८६२

आतां मी अनन्य येथें अधिकारी । होइन कोणे परी नेणें देवा ॥
पुराणींचा अर्थ ऐकतां मानस । होतो कासावीस जीव माझा ॥
इंद्रियांचे आम्ही पांगिलों अंकित । त्यांच्या संगें चित्त रंगलें तें ॥
एकाचेंही जेथें न घडे दमन ॥ अवघीं नेमून कैसीं राखों ॥
तुका म्हणे जरी मोकलिसी आतां । तरी मी अनंता वांया गेलों ॥

## पूजा

१७ (नि.)

विसरलों वरी देहाची भावना । तेचि नारायणा सर्वपूजा ॥

३८५४

देवाची पूजा हें भूताचें पाळण । मत्सर तो सीण वहुतांचा ॥
रुसावे फुगावें आपुलियावरि । उरला तो हरि सकळही ॥

७१

करावी ते पूजा मनेंचि उत्तम । लौकिकाचें काम काय असे ॥
कळावें तयासी कळे अंतरींचें । कारण तें साचें साचा अंगीं ॥

७३५

मनोमय पूजा । हेचि पढिये केशीराजा ॥

४१०५

अज्ञानाची पूजा कामिक भावना । तयाचिया ध्याना देव कैचा ॥

२२६१

स्वामिकाज गुरुभक्ति । पितृवचन सेवा पति ॥
हेचि विष्णूची महापूजा । अनुभाव पाहीं दुजा ॥

१७२९

कासियानें पूजा करूं केशीराजा । हाचि संदेह माझा फेडी आतां ॥
उदकें न्हाणूं तरी स्वरूप तें तुझें । तेथें काय माझें वेचे देवा ॥
गंधाचा सुगंध पुष्पाचा परिमळ । तेथें मी दुर्बळ काय करूं ॥
फळदाणा तूंच तांबोल अक्षता । तरी काय आतां वाहों तुज ॥
वाहूं दक्षिणा जरी धातु नारायण । ब्रम्ह तेंचि अन्न दुजें काई ॥
गातां तो ओंकार टाळी नादेश्वर । नाचावया थार नाहीं कोठें ॥
तुका म्हणे मज अवघें तुझें नाम । धूप दीप रामकृष्ण हरि ॥

१७८५

कवणा पाषाणासी धरूनि भाव । कवणावरि भाव ठेवूं आतां ॥
म्हणऊनि निश्चित राहिलों मनीं । तूंचि सर्वां खाणीं देखोनियां ॥
कवणाचें कारण न लगेचि कांहीं । सर्वां सर्वांठायीं तूं मज एक ॥
काया वाचा मन ठेविलें तुझ्या पायीं । आतां उरलें काई न दिसे देवा ।

जळें जळ काय धोविलें एक । कवण ते पातक हरलें तेथें ॥
पापपुण्य हे वासना सकळ । ते तुज समूळ समर्पिली ॥
पितर स्वरूपी तूंचि जनार्दन । सव्य तें कवण अपसव्य ॥
तुका म्हणे जीत पिंड तुम्हां हातीं । देऊनि निश्चिंती मानियेली ॥

७५०

हेचि तुझी पूजा । आतां करीन केशीराजा ॥
अवघीं तुझीं पदें । नमस्कारीन अभेदें ॥
न वर्जित दिशा । जाय तेथेंचि सरिसा ॥
नव्हे एकदेशी । तुका म्हणे गुण दोषी ॥

४१३९

पुण्यपापा ठाव नाहीं सुखदुःखा । हानि लाभ शंका नासलिया ॥
जितां मरण आलें आपपर गेलें । मूळ छेदियेलें संसाराचें ॥
अधिकार जाती वर्णधर्मयाती । ठाव नाहीं सत्य असत्यासीं ॥
जन वन भिन्न अचेत चळण । नाहीं दुजेपण ठाव यासी ॥
तुका म्हणे देह वाइलें विठ्ठलीं । तेव्हांच घडली सर्व पूजा ॥

४६

कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचें ॥

२७३६

पूजा ते अबोला चित्ताच्या प्रकारीं । भाव विश्वंभरीं समर्पावा ॥

७२१

जें जें जेथें पात्रे । तें तें समर्पावें सेवे ॥
सहजपूजा याचि नांवें । गळित अभिमानें व्हावें ॥

२६२

केला मातीचा पशुपति । परि मातीसी काय म्हणती ॥
शिवपूजा शिवासी पावे । माती मातीमाजी समावे ॥
तसे पूजिती आम्हां संत । पूजा घेतो भगवंत ॥
आम्ही किंकर संतांचे दास । संत पदवी नको आम्हांस ॥
केला पाषाणाचा विष्णु । परी पाषाण नव्हे विष्णु ॥
विष्णुपूजा विष्णुसि अर्पे । पाषाण राहे पाषाणरूपें ॥

केली काशाची जगदंबा । परि कांसे नव्हे अंबा ॥
पूजा अंबेचि अंबेला घेणें । कांसे राहे कांसेपणें ॥
ब्रम्हानंद पूर्णामाजीं । तुका म्हणे केली कांजी ॥
ज्याची पूजा त्याणेंचि घेणें । आम्ही पाषाणरूप राहणें ॥

१२९८

अंतरींचें ध्यान । मुख्य या नांवें पूजन ॥

५०४

शब्दांचीं रत्नें करुनि अलंकार । तेणें विश्वंभर पूजियेला ॥
भावाचे उपचार करूनि भोजन । तेणें नारायण जेवविला ॥
संसारा हातीं दिलें आंचवण । मुखशुद्धी मन समर्पिला ॥
रंगलीं इंद्रियें सुरंग तांबूल । माथां तुलसीदल समर्पिलें ॥
एकभावदीप करूनि निरांजन । देऊनि आसन देहाचें या ॥
न बोलोनि तुका करी चरणसेवा । निजविलें देवा माजघरीं ॥

## पुण्यक्षेत्र आणि पाप

१३८५

अन्यत्रींचे तीर्थीं नासे । तीर्थीं वसे वज्रलेप ॥

## प्रपंच परमार्थाची गफलत

४०९८

प्रपंच परमार्थ संपादोनि दोन्ही । एकही निदानीं न घडे त्यासी ॥
दोहीं पेंवावरी ठेवूं जातां हात । शेवटीं अपघात शरीराचा ॥
तुका म्हणे तया दोहींकडे धका । शेवटीं तो नरकामाजी पडे ।

## प्रेमाची खूण

३५७२

प्रेम नये सांगतां बोलतां दावितां । अनुभव चित्ता चित्त जाणे ॥

## ब्रम्हचि तो

१२३५

तुका म्हणे गेल्या षडऊर्मी अंगें । सांडूनियां मग ब्रम्हचि तो ॥

## ब्रम्हचारी

१३६७

नव्हे ब्रम्हचर्य बाइलेच्या त्यागें । वैराग्य वाउगें देशत्यागें ॥
काम वाढे भय वासनेच्या द्वारें । सांडावें तें धीरें आचावाचे ॥
कांपवूनि टिरी शूरत्वाची मात । केले वाताहात उचित काळें ॥
तुका म्हणे करी जिव्हेसी विटाळ । लटिकयाची मळ स्तुति होतां ॥

१४८४

ब्रह्मचारी धर्म घोकावे अक्षर ।

## बायल्या

२९७७

बाइल तरी ऐसी व्हावी । नरकीं गोवी अनिवार ॥
घडो नेदी तीर्थयात्रा । केला कुतरा हातसोंका ॥
आपुलीच करवी सेवा । पुजवी देवासारिखें ॥
तुका म्हणे गाढव पशु । केला नाश आयुष्या ॥

२९७८

बाइले अधीन होय ज्याचें जिणें । तयाच्या अवलोकनें पडिजे द्वाड ॥
कासया ते जंत जिताती संसारीं । माकडाच्या परी गोरोड्यांच्या ॥
बाइलेच्या मना येईल तें खरें । अभागी तें पुरें बाइलेचें ॥
तुका म्हणे मेंग्या गाढवाचें जिणें । कुतऱ्याचें खाणें लगवगा ॥

३०६

धिग् जीणें तो बाईले अधीन । परलोक मान नाहीं दोन्ही ॥
धिग् जिणें ज्याचें लोभावरी मन । अतीत पूजन घडेंच्चिना ॥
धिग् जिणें आळस निद्रा जया फार । अमित आहार अघोरिया ॥
धिग जिणें नाहीं विवेक वैराग्य । झुरे मानालागीं साधुपणा ॥
तुका म्हणे धिग् ऐसे जाले लोक । निंदक वादक नरका जाती ॥

३६

मुखें बोळंव दावी मोहा । माझें दुःख नेणा पहा ॥
आवडीचा मारिला वेडा । होय होय कैसा म्हणे भिडा ॥

निपट मज न चले अन्न । पायली गहूं सांजा तीन ॥
गेले वारीं तुम्ही आणिली साकर । सातदी गेली साडेदहा शेर ॥
अखंड मज पोटाची व्यथा । दुधभात साकर तूप पथ्या ॥
दो पाहरा मज लहरी येती । शुद्ध नाहीं पडे सुपती ।
नीज न ये वाली फुलें । जवळीं न साहती मुलें ॥
अंगीं चंदन लावितें भाळीं । सदा शूळ माझे कपाळीं ॥
हाड गळोनि आलें मांस । माझें दुःख तुम्हां नेणवे कैसें ॥
तुका म्हणे जिता गाढव केला । मेलियावरी नरका नेला

४२४४

भ्रतारेंसी भार्या बोले गुज गोष्टी । मज ऐसी कष्टी नाहीं दुजी ॥
अखंड तुमचें धंद्यावरी मन । माझें तों हेळण करिती सर्व ॥
जोडितसां तुम्ही खाती हेरे चोरे । माझी तंव पोरें हळहळिती ॥
तुमची व्याली माझे डाईं हो पेटली । सदा दुष्ट बोली सोसवेना ॥
दुष्ट वृत्ति नंदुली सदा द्वेष करी । नांदों मी संसारीं कोण्या सुखें ॥
भावा दीर कांहीं धड हा न बोले । नांदों कोणां खालें कैसी आतां ॥
माझ्या अंगसंगें तुम्हांसी विश्रांति । मग धडगति नाहीं तुमची ॥
टाकतें टमकतें जीव मुठी धरूनि । परि तुम्ही अजूनि न धरा लाज ॥
वेगळें निघतां संसार करीन । नाहीं तरी प्राण देते आतां ।
तुका म्हणे जाला कामाचा अंकित । सांगे मनोगत तैसा वर्ते ॥

४२४५

कामाचा अंकित कांतेतें प्रार्थित । तूं कां हो दुश्चित्त निरंतर ॥
माझीं मायबापें बंधु हो बहिण । तुज करी सीण त्यागीन मी ॥
त्यांचें जरि तोंड पाहेन मागुता । तरि मज हत्या घडो तुझी ॥
सकाळ उठोन वेगळा निघेन । वाहातों तुझी आण निश्चयेसी ॥
वेगळें निघतां घडीन दोरे चुडा । तूं तंव माझा जोडा जन्माचा कीं ॥
ताईत सांकळी गळांचि दुलडी । बाजुबंद जोडी हातसर ॥
वेणीचे जे नग सर्व ही करीन । नको धरूं सीण मनीं कांहीं ॥
नेसावया साडी सेलारी चुनडी । अंगीची कांचोळी जाळिया फुलें ॥
तुका म्हणे केला रांडेनें गाढव । मनासवें धांव घेतलीसे ॥

१२३७

एका पुरुषा दोघी नारी । पाप वसे त्याचे घरीं ॥
पाप न लगे धुंडावें । लागेल तेणें तेथें जावें ॥
कांहीं दुसरा विचार । न लगे करावाचि फार ॥
असत्य जे वाणी । तेथें पापाचीच खाणी ॥
सत्य बोले मुखें । तेथें उचंबळती सुखें ॥
तुका म्हणे दोन्ही । जवळीच लाभहानी ॥

## बीज

२२९०

बीज न पेरावें खडकीं । ओल नाहीं ज्याचे बुडखीं ।
थीतां ठके सेखीं । पाठी लागे दिवाण ॥

१४६५

बीजा ऐसीं फळें । उत्तम कां अमंगळें ॥

## बुरा

२३१२

बुरा धन नष्ट मेळवी परद्वार जो करी ॥

## बळि

२३१२

बळियाढा तो चि जाणारे भक्ति दृढ शरीरीं ॥

## भर्तृहरी

१७२१

काय केलें जळचरीं । ढीवर त्यांच्या घातावरी ।
हा तो ठायींचा विचार । आहे याति वैराकार ॥
श्वापदातें वधी । निरपराधें पारधी ।
तुका म्हणे खळ । संतां पीडिती चांडाळ ॥

१८२७

कामातुरा भय लाज ना विचार । शरीर असार तृण तुल्य ॥

१५३०

पाणिपात्र दिगंबरा । हस्त करा सारिखे ॥
आवश्यक देव मनीं । चिंतनींच सादर ॥
भिक्षा कामधेनु ऐशी । अवकाशीं शयन ॥
पांघरोनि तुका दिशा । केला वास अलक्षीं ॥

४२८२

मणि पडिला दाढेसी मकर तोंडीं । सुखें हस्तेंचि काढवेल प्रौढीं ।
परि मूर्खाचें चित्त बोधवेना । दुधें कूर्मींच्या पाळवेल सेना ॥
सकळ पृथ्वी हिंडतां कदाचित । ससीसिंगाची प्राप्त होय तेथें ।
अति प्रयत्नें गाळितां वाळुवेतें । दिव्य तेलाची प्राप्त होय तेथें ॥
अति क्रोधें खवळला फणी पाहीं । धरूं येतो मस्तकीं पुष्पप्रायी ।
पहा ब्रम्हानंदें चि एकीं हेळा । महापातकी तो तुका मुक्त केला ॥

## भला

२११२

भला तोचि एक जाणा रे गयावर्जन करी ॥

## भाग्यवंत

२११४

भाग्यवंत म्हणों तयां । शरण गेले पंढरिराया ॥

## भूपाळी

३८३८ (नि.)

जोडुनियां कर चरणीं ठेविला माथा ।
परिसावी विनंति माझी पंढरीनाथा ॥
असो नसो भाव आलों तुझिया ठाया ।
कृपादृष्टीं पाहे मजकडे पंढरीनाथा ॥
अखंडित असावें ऐसे वाटतें पायीं ।
साहोनी संकोच ठाव थोडासा देईं ॥
तुका म्हणे आम्ही तुझीं वेडीं वांकुडीं ।
नामें भवपाश हस्तें आपुल्या तोडी ॥

## भूतभविष्य

१०७९

भूत भविष्य कळों यावें वर्तमान । हें तों भाग्यहीन त्यांची जोडी ॥
आम्ही विष्णुदासीं देव ध्यावा चित्तें । होणार तें होतें प्रारब्धें ॥
जगरूढीसाठीं घातलें दुकान । जातो नारायण अंतरोनी ॥
तुका म्हणे हा हो प्रपंच गाढा । थोरली ते पीडा रिद्धि सिद्धी ॥

१५०१

सांगों जाणती शकुन । भूत भविष्य वर्तमान ॥
त्यांचा आम्हासी कंटाळा । पाहों नावडती डोळां ॥
रिद्धि सिद्धींचे साधक । वाचासिद्ध होती एक ॥
तुका म्हणे जाती । पुण्य क्षयें अधोगति ॥

## भाव

४५२५

तुळसीदळ भावेंसहित देवापाणी । फार तें त्याहुनी क्षीरसागरा ॥

४००८

अंगसंगें असे कर्मसाक्ष देव ॥ जैसा ज्याचा भाव तैसा राहे ॥

४५८६

नारायण जोडे एकविध भावें । तुका म्हणे जीवें जाणे लागे ॥

४५९२

यासि कळावया एक भक्ति भाव । दुजा नाहीं ठाव धांडोळिता ॥
धांडोळितां श्रुति राहिल्या निश्चित । तो करी संकेत गोपीसवें ॥

४५९६

चिंतलें पावलीं जयां कृष्ण भेटी । एरवीं ते आटी वांयांविण ॥
वासना धरिती कृष्णाविणें कांहीं । सीण केला तिहीं साधनांचा ॥
न चुकती भोग तपें दानें व्रतें । एका त्या अनंतें वांचूनियां ॥

४६०५

आहे साच भावें सकळ व्यापक । नाहीं अभाविक लोकां कोठें ॥

४१६

तुका म्हणे घ्यावा भाव । फिटेल मनिचा संदेह ।
आणीक न लगे ठाव । कांहीं कोठें हिंडावें ॥

४१९

नामाचें चिंतन । तेथें धांवते आपण ।
न विचारितां हीण । भाव देखे जयाचा ॥

४३४

जनीं वनीं हा अवघा देव । वासनेचा हा पुसावा ठाव ।
मग वोळगती वासुदेव । ऐसा मनीं वसू द्यावा भाव गा ॥

३३२६

जिकडे पाहे तिकडे देव । ऐसा भाव दे कांहीं ॥

१२२०

नाहीं नास तें सुख दिले तयास । जाले जे उदास सर्व भावें ॥

९७३

तुका म्हणे आम्ही भावहीन जीव । म्हणउनी देव दुरे दुरी ॥

१०१०

भाव हा कठीण वज्र हें भेदवे । परि न छेदवे मायाजाळ ॥

१२९६

पृथक मी सांगों किती । धर्म नीती सकळां ॥
अवधियाचा एक ठाव । शुद्ध भाव विठ्ठलीं ॥
क्षरा अक्षराचा भाग । करा लाग पंढरीये ॥
तुका म्हणे आगमींचे । मथिलें साचें नवनीत ॥

३८१२

कांहीं न लगे एक भावचि कारण ॥ तुका म्हणे आण विठ्ठलाची ॥

३८८९

नित्य उठोनियां खायाचीच चिंता । आपुल्या तूं हिता नाठवीसी ॥
तुका म्हणे भाव धरून राहे चित्तीं । तरि तो श्रीपति उपेक्षीना ॥

९४९

आठवे देव तो करावा उपाव । येर तजीं वाव खटपटा ॥
होई वा जागा होई वा जागा । वाउगा कां गा सिणसील ॥
जाणिवेच्या भारें भवाचिये डोहीं । बुडसी तों कांहीं निघेसि ना ॥
तुका म्हणे देवा पावसील भावें । जाणतां तें ठावें कांहीं नव्हे ॥

३४२

अन्नाच्या परिमळें जरि जाय भूक । तरि कां हे पाक घरोघरीं ॥
आपुलालें तुम्ही करा रे स्वहित । वाचे स्मरा नित्य राम राम ॥
देखोनि जीवन जरि जाय तान । तरि कां सांठवण घरोघरीं ॥
देखोनियां छाया सुख न पवीजे । जंव न बैसीजे तया तळीं ॥
हित तरी होय गातां आईकतां । जरि राहें चित्ता दृढ भाव ॥
तुका म्हणे होसी भावें चि तूं मुक्त । काय करिसी युक्त जाणिवेची ॥

७४८

भाव तैसें फळ । न चले देवापाशीं बळ ॥

१५०७

सोंगें छंदें कांहीं । देव जोडे ऐसे नाहीं ॥
सारा अवघें गाबाळ । डोळ्या आडील पडळ ॥
शुद्ध भावाविण । जो जो केला तो तो सीण ॥
तुका म्हणे कळे । परि होताती अंधळे ॥

३३५८

अनुभवावांचून सोंग संपादणें । नव्हे हें करणें स्वहिताचें ॥
तैसा नको भुलों बाहिरल्या रंगें । हित तेंचि वेगें करूनि घेई ॥
बहुरूपीं रूपें नटला नारायण । सोंग संपादून जैसा तैसा ।
पाषाणाचें नांव ठेवियेलें देव । आणिका तारी भाव परि तो तैसा ॥
कनक झाड म्हूण वंदियेलें माथां । परि तें अर्था न मिळे माजी ॥
तुका म्हणे त्याचा भाव तारी त्यास । अहंभावीं नास तोचि पावे ॥

२१०४

जाणे अंतरिंचा भाव । तो चि करितो उपाव ॥
न लगे सांगावें मागावें । जीवें भावें अनुसरावें ॥
अविनाश घ्यावे । फळ धीर धरोनि ॥
बाळा न मागतां भोजन । माता घाली पाचारून ॥
तुका म्हणे तरी । एकी लंघियेले गिरी ॥

३८८४

मधुरा उत्तरासवें नाहीं चाड । अंतरंगीं वाड भाव असो ।
प्राणा वेगळा न करी नारायण । मग नसो ज्ञान मूर्ख बरा ।

जनानिंदा होय तो बरा विचार । थोरवीचा भार कामा नये ॥
तुका म्हणे चित्तीं भाव निष्ठावंत । दया क्षमा शांत सर्वां भूतीं ॥

२२७०

पाषाण देव पाषाण पायरी । पूजा एकावरी पाय ठेवी ॥
सार तो भाव सार तो भाव । अनुभवी देव तेचि जाले ॥

२८२९

शिळा जया देव । तैसा फळे त्याचा भाव ॥

१३५०

तुका म्हणे भाव । त्याचा तोचि जाणां देव ॥

५८५

भाव देवाचे उचित । भाव तोचि भगवंत ॥

७३१

चहूं आश्रमांचे धर्म । न राखतां जोडे कर्म ॥
तैसी नव्हे भोळी सेवा । एक भावचि कारण देवा ॥
तपें इंद्रियां आघांत । क्षणें एका वाताहात ॥
मंत्र चळे थोडा । तरि धडचि होय वेडा ॥
व्रतें करितां सांग । तरी एक चुकतां भंग ॥
धर्म सत्त्वचि कारण । नाहीं तरी केला सिण ॥
भूतदयेसि आघात । उंचनीच वाताहात ॥
तुका म्हणे दुजें । विधि निषेधाचें ओझें ॥

४५०१

ग्रासोग्रासीं भाव । तरी देहींच जेवी देव ॥
धरी स्मरण तें सार । नाहीं दुरी तें अंतर ॥
भोगितां तूं भावें । देव जेऊं बैसे सवें ॥
तुज पावो देवा । भावें अंतरींची सेवा ॥
गुंतला साधनीं । देव नाहीं त्रिभुवनीं ॥
तुका म्हणे हातीं । न धरितां गमाविती ॥

१३२३

जैसा भाव तैसें फळ । स्वाती तोय एक जळ ॥
पाहे सांगे आणि जेवी । अंतर महदंतर तेवी ॥

१४५८

ठेवा जाणीव गुंडून । येथें भावचि प्रमाण ॥
एका अनुसरल्या काज । अवघें जाणे पंढरिराज ॥
तर्क वितर्कासी । वाव न लगे सायासीं ॥
तुका म्हणे भावेंविण । अवघा बोलती तो सीण ॥

४१७९

मनीं भाव असे कांहीं । तेथें देव येती पाहीं ॥

## भक्त

४५१०

नाहीं भक्त दुजे तिहीं त्रिभुवनीं । एका चक्रपाणी वांचूनियां ॥

४५२५

देवा भक्त जिवाहुनि आवडती । सकळहि प्रीति त्यांच्या ठायीं ॥

४५३८

जिहीं हरि संग केला संवसारीं । तुका म्हणे खरी खेप त्यांची ॥

४५७२

सुखें तया दीस न कळे हे राती । अखंड या ज्योती गोविंदाची ॥
चिंतनेंचि धालीं न लगे अन्नपाणी । तुका म्हणे मनीं समाधान ॥

६५३

हरि तैसे हरीचे दास । नाहीं तयां भय मोह चिंता आस ॥
होउनि राहाती उदास । बळकट कांस भक्तीची ॥
धरूनि पाय त्यजिलें जन । न लगे मान मृत्तिकाधन ।
कंठीं नाम अमृताचें पान । न लगे आन ऐसें जालें ॥
वाव तरी उदंडचि पोटीं । धीर सिंधु ऐसे जगजेठी ।
कामक्रोधा न सुटे मिठी । गिन्हे तरी वेठीं राबविती ॥
बळें तरि नागवती काळ । लीन तरि सकळांच्या तळा ।
उदार देहासी सकळा । जाणोनि कळा सर्व नेणते ॥
संसार तो तयांचा दास । मोक्ष तें पाहातसे वास ।
रिद्धिसिद्धि देशवटा त्रास । न शिवती यास वैष्णवजन ॥
जन्ममृत्यु स्वप्नांसारिखें । आप त्यां न दिसे पारखें ।
तुका म्हणे अखंडित सुखें । वाणी वदे मुखें प्रेमामृताची ॥

२०३४

भक्तां समागमें सर्वभावें हरि । सर्व काम करी न सांगतां ।
सांटवला राहे हृदयसंपुष्टीं । बाहेर धाकुटी मूर्ति उभा ॥
मागण्याची वास पाहे मुखाकडे । चिंतिल्या रोकडे मनोरथ ॥
तुका म्हणे जीव भाव देवापायीं । ठेवूनि ते कांहीं न मागती ॥

१३३

हरि तूं निष्ठुर निर्गुण । नाहीं माया बहु कठिण ।
नव्हे तें करिसी आन । कवण नाहीं केलें तें ॥
घेऊनि हरिश्चंद्राचें वैभव । राज्य घोडे भाग्य सर्व ।
पुत्र पत्नी जीव । डोंबा घरीं वोपविलीं ॥
नळा दमयंतीचा योग । विघडिला त्यांचा संग ।
ऐसे जाणें जग । पुराणें हीं बोलतीं ॥
तुज भावें जे भजती । त्यांच्या संसारां हे गति ।
ठाव नाहीं पुढती । तुका म्हणे करिसी तें ॥

४४७२

कामधेनूचे वासरूं । खाया न मिळे काय करूं ॥
ऐसें आम्हां मांडियेलें । विठो त्वां कां सांडियेलें ॥
बैसोनि कल्पद्रुमातळीं । पोटासाटीं तळमळी ॥
तुका म्हणे नारायणा । बरें लोकीं हें दीसेना ॥

१०२२

नको ब्रम्हज्ञान आत्मस्थिति भाव । मी भक्त तूं देव ऐसें करीं ॥

१७८७

देवाचा भक्त तो देवासी गोड । आणिकांसी चाड नाहीं त्याची ॥
कवणाचा सोइरा नव्हेच सांगाती । अवघियां हातीं अंतरला ॥
निष्काम वेडें म्हणती बापुडें । अवघियां सांकडें जाला कैसा ॥

## भक्त आणि देव यांचा अन्योन्य संबंध

१०३८

देवासी अवतार भक्तांसी संसार । दोहींचा विचार एकपणें ।
भक्तांसी सोहळे देवाचिया अंगें । देव त्यांच्या संगें सुख भोगी ॥

देवें भक्तां रूप दिलासे आकार । भक्ती त्याचा पार वाखाणिला ॥
एका अंगीं दोन्हीं जालीं हीं निर्माण । देवभक्तपण स्वामिसेवा ॥
तुका म्हणे येथें नाहीं भिन्नभाव । भक्त तोचि देव देव भक्त ॥

१४३७

निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म । निर्धार हें वर्म चुकों नये ॥
निष्काम निश्चळ विठ्ठलीं विश्वास । पाहों नये वास आणिकांची ॥
तुका म्हणे ऐसा कोणें उपेक्षिला । नाहीं ऐकिला ऐसा कोणीं ॥

## भक्त

१३१४

भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास । गेले आशापाश निवारूनी ॥
विषय तो त्यांचा जाला नारायण । नावडे धन जन माता पिता ॥
निर्वाणी गोविंद असे मागे पुढें । कांहींच सांकडें पडों नेदी ॥
तुका म्हणे सत्य कर्मा व्हावें साह्य । घातलिया भये नर्का जाणे ॥

## भक्ति

६४५

अवघ्या दशा येणें साधती । मुख्य उपासना सगुणभक्ति ।
प्रगटे हृदयांची मूर्ती । भावशुद्धि जाणोनियां ॥

८१०

मनवाचातीत तुझें हें स्वरूप । म्हणोनियां माप भक्ति केलें ॥
भक्तीचिया मापें मोजितों अनंता । इतरानें तत्वता न मोजवे ॥
योग याग तपें देहाचिया योगें । ज्ञानाचिया लागे न सांपडसी ॥
तुका म्हणे आम्ही भोळ्या भावें सेवा । घ्यावी जी केशवा करितों ऐसी ॥

## भक्तीची ऐसी जात

४१५४

भक्ति आम्ही केली सांडुनी उद्वेग । पावलों हें सांग सुख याचें ॥
सुख आम्हां जालें धरितां यांचा संग । पळाले उद्वेग सांडूनिया ॥
तुका म्हणे सुख बहु जालें जिवा । घडली या सेवा विठोबाची ॥

४१६१

मुखीं विठ्ठलाचें नाम । मग कैचा भवकाम ॥
चालतां बोलतां खातां । जेवितां निद्रा करितां ॥

सुखें असो संसारीं । मग जवळीच हरि ॥
मुक्तिवरील भक्ति जाण । अखंड मुखीं नारायण ॥
मग देवभक्त जाला । तुका तुकीं उतरला ॥

२६६६

भक्ती तें नमावें जीवजंतुभूत । शांतवूनि ऊत काम क्रोध ॥

३८८६

भक्तिभावें करी बैसोनि निश्चित । नको गोवूं चित्त प्रपंचासी ॥
एका दृढ करी पंढरीचा राव । मग तुज उपाव पुढिल सुचे ॥

१०२

संसाराचा माथा भार । कांहीं पर न ठेवी ॥
भक्तीची ते जाती ऐसी । सर्वस्वासी मुकावें ॥
भिक्षा आणि वेवसाव । काला करितो गाढव ॥
करुनि वस्ती बाजारीं । म्हणवी कासया निस्पृही ॥
तुका म्हणे होई शूर । किंवा निसुर मजुर ॥

२५०८ (नि.)

झुंझायाच्या गोष्टी ऐकतांचि सुख । करितां हें दुःख थोर आहे ॥
तैसी हरिभक्ति सुळावरिल पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ॥
पिंड पोसिलिया विषयांचा पाइक । वैकुंठनायक कैचा तेथें ॥
तुका म्हणे व्हावे देहासी उदार । रकुमादेवीवर जोडावया ॥

## भक्ताचें वैशिष्ट्य

३०५१

देव भक्तालागीं करूं नेदी संसार । अंगे वारावार करोनि ठेवी ॥
भाग्य द्यावें तरी अंगीं भरे ताठा । म्हणोनि करंटा करुनी ठेवी ।
स्त्री द्यावी गुणवंती नसती गुंते आशा । या लागीं कर्कशा पाठी लावी ॥
तुका म्हणे मज प्रचित आली देखा । आणीक या लोकां काय सांगों ॥

३४४६

देवाची ते खूण आला ज्याच्या घरा । त्याच्या पडे चिरा मनुष्यपणा ॥
देवाची ते खूण करावें वाटोळे । आपणावेगळें कोणी नाहीं ॥
देवाची ते खूण गुंतों नेदी आशा । ममतेच्या पाशा शिवों नेदी ॥

देवाची ते खूण गुंतों नेदी वाचा । लागो असत्याचा मळ नेदी ॥
देवाची ते खूण तोडी मायाजाळ । आणि हें सकळ जग हरी ॥
पहा देवें तेंचि बळकाविलें स्थळ । तुकयाचें सकळ चिन्हें त्याचीं ॥

३०४९

भक्तिप्रेम सुख नेणवे आणिकां । पंडित वाचकां ज्ञानियांसी ॥
आत्मनिष्ठ जरी जाले जीवन्मुक्त । तरी भक्तिसुख दुर्लभ त्यां ॥
तुका म्हणे कृपा करिल नारायण । तरिच हें वर्म पडे ठावें ॥

## भक्तीवीण ब्रह्मज्ञान बापुडें

१४७९

गोड नांवें क्षीर । परी साकरेचा धीर ॥
तैसें जाणा ब्रह्मज्ञान । बापुडें तें भक्तीवीण ॥
रुची नेदी अन्न । ज्यांत नसतां लवण ॥
अंधळ्याचे श्रम । शिकविल्याचें चि नाम ॥
तुका म्हणे तारा ॥ नांवें तंबुऱ्याच्या सारा ॥

१५४१

भक्ति तों कठिण शुळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ॥
जेथें पाहे तेथें देखीचा पर्वत । पायाविण भिंत तांतडीची ॥
कामावलें तरि पाका ओज घडे । रुचि आणि जोडे श्लाघ्यता हे ॥
तुका म्हणे मना पाहिजे अंकुश । नित्य नवा दिस जागृतीचा ॥

१३५६

तुका म्हणे भक्तीसाठीं हरिहर । अरूपीचें क्षर विभाग हें ॥

२८७७

हेचि थोर भक्ति आवडती देवा । संकल्पावी माया संसाराची ॥
ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें । चित्तीं असो द्यावें समाधान ॥
वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ । भोगणें तें फळ संचिताचें ॥
तुका म्हणे घालुं तयावरि भार । वाहूं हा संसार देवापायीं ॥

२१८८

भक्ति तें नमन वैराग्य तो त्याग ॥

२४७९

अनन्य भक्तीचे उपाय ते या विठोवाचे पाय ॥
ध्याइल तो काय जाणे चुकें मारग ॥

४१३५

भक्तीचें तें वर्म जयाचिये हातीं । तया घरीं शांति क्षमा दया ॥
अष्ट महासिद्धी वोळगती द्वारीं । न वजती दुरी दवडितां ॥
तेथें दुष्ट गुण न मिळे निशेष । चैतन्याचा वास जयामाजी ॥
संतुष्ट हें चित्त सदा सर्व काळ । तुटली हळहळ त्रिगुणाची ॥
तुका म्हणे येथें काय तो संदेह । आमचें गौरव आम्ही करूं ॥

४२८८

पहावया तुझा जरि बोले अंत । तरि माझे जात डोळे देवा ॥
भक्तांचिया काजा जालासी सगुण । तुज नाहीं गुण रूप नाम ॥

३९५४

जरि न भरे पोट । तरि सेवूं दरकूट ॥
परि न घलूं तुज भार । हाचि आमुचा निर्धार ॥
तुझें नाम अमोलिक । नेणती हे ब्रम्हादिक ॥
ऐसें नाम तुझें खरें । तुका म्हणे भासे पुरे ॥

## मन-चित्त

११७५

लोभीके चित धन बैठे । कामीन चित काम ।
माता के चित पुत बैठे । तुका के मन राम ॥

१७३७

मन माझें चपळ न राहे निश्चळ । घडी एकी पळ स्थिर नाहीं ॥
आतां तूं उदास नव्हे नारायणा । धांवे मज दीना गांजियेलें ॥
धांव घालीं पुढें इंद्रियांते ओढी । केलें तडातोडी चित्त माझें ॥
तुका म्हणे माझा न चले सायास । राहिलों हे आस धरुनी तुझी ॥

२१४३

नित्य या मनासी करितों विचार । तों हें अनावर विषय लोभी ॥
आतां मज राखें आपुलिया बळें । न देखे हें जाळें उगवतां ॥

सांपडलों गळीं नाहीं त्याची सत्ता । उगळी मागुता घेतला तो ॥
तुका म्हणे मी तों अज्ञान चि आहे । परि तुझी पाहे वाट देवा ॥

३३७१

माझें चित्त तुझे पायीं । राहे ऐसें करी कांहीं ॥
धरोनियां बाहीं । भव तारी दातारा ॥
चतुरा तूं शिरोमणि । गुण लावण्याची खाणी ॥
मुगुट सकळां मणि । तूं चि धन्य विठोबा ॥
करी तिमिराचा नाश । दीप होउनि प्रकाश ।
तोडीं आशापाश । करी वास हृदयीं ॥
पाहे गुंतलों नेणतां । तुज असो माझी चिंता ।
तुका ठेवी माथा । पायीं आतां राखावें ।

४०५३

काय करूं आतां या मना । न संडी विषयांची वासना ।
प्रार्थितां ही राहेना । आदरें पतना नेऊं पाहे ॥
आतां धांवे धावे गा श्रीहरी । गेलों वांया नाहीं तरी ।
न दिसे कोणी आवरी । आणीक दुजा तयासी ॥
न राहे एके ठायीं एकी घडी । चित्त तडतडा तोडी ।
भरले विषय भोवडीं । घालूं पाहे उडी भवडोहीं ॥
आशा तृष्णा कल्पना पापिणी । घात मांडला माझा यांणीं ।
तुका म्हणे चक्रपाणी । काय अजोनि पाहातोसी ॥

१८४४

अनुभवें कळो येतें पांडुरंगा । रुसावें तें कांगा तुम्हांवरी ॥
आवरितां चित्त नावरे दुर्जन । घात करी मन माझें मज ॥
अंतरीं संसार भक्ति बाह्यात्कार । म्हणोनि अंतर तुझ्या पायीं ॥
तुका म्हणे काय करूं नेणे वर्म । आलें तैसें कर्म सोसूं पुढें ॥

१८३७

अधिक कोंडितां चरफडी । भलतीकडे घाली उडी ॥
काय करूं या मना आतां । कां विसरतें पंढरीनाथा ॥
करी संसाराची चिंता । वेळोवेळां मागुती ॥

भजन नावडे श्रवण । धांवे विषय अवलोकून ।
बहुत चंचळ चपळ । जातां येतां न लगे वेळ ॥
किती राखों दोनी काळ । निजलिया जागे वेळ ।
मज राखे आतां । तुका म्हणे पंढरीनाथा ॥

२६७४

दुष्ट आचरण ग्वाही माझें मन । मज ठावे गुण दोष माझे ॥
आतां तुम्ही सर्व जाणा पांडुरंगा । पाहिजे प्रसंगा ऐसें केलें ॥
व्याह्या जांवयांचें पंगती दुर्बळ । वंचिजे तो काळ नव्हे कांहीं ॥
तुका म्हणे आतां जालों शरणागत । पुढील उचित तुम्हां हातीं ॥

३९६३

माझें मन पाहे कसून । चित्त न ढळे तुजपासून ॥
कापुनि देइन शिर । पाहा कृपण कीं उदार ॥
मजवरि घाली घण । परि मी न सोडी चरण ॥
तुका म्हणे अंतीं । तुज वांचूनि नाहीं गति ॥

३६७३

एकविध वृत्ति न राहे अंतरीं । स्मरणीं च हरि विस्मृति हे ।
कैसा हा नवलाव वाटतो अनुभवें । मज माझ्या जीवें साक्षित्वेसी ॥
न राहे निश्चळ जागवितां मन । किती क्षणक्षण सावरावें ॥
तुका म्हणे बहु केले वेवसाव । तेणें रंगें जीव रंगलासे ॥

२६६६

लय लक्षी मन न राहे निश्चळ । मुख्य तेथें बळ आसनाचें ॥
हें तों असाध्य जी सर्वत्र या जना । भले नारायणा आळवितां ॥

७३

नव्हे आराणूक परि मनीं वाहे । होईल त्या साहे पांडुरंग ॥
पंढरीसि जावें उद्वेग मानसीं । धरिल्या पावसी संदेह नाहीं ॥
नसो बळ देह असो पराधीन । परि हें चिंतन टाकों नको ॥
तुका म्हणे देह पडो या चिंतनें । पुढें लागे येणें याजसाठीं ॥

२११९

नका धरूं कोणी । राग वचनाचा मनीं ॥
येथें बहुतांचें हित । शुद्ध करोनि राखा चित्त ॥

नाहीं केली निंदा । आम्हीं दूषिलेसे भेदा ॥
तुका म्हणे मज । येणें विण काय काज ॥

२०४५

जवळी नाहीं चित्त । काय मांडियेलें प्रेत ॥
कैसा पाहे चर्मदृष्टि । दीप स्नेहाच्या शेवटीं ॥
कांतेलेसें श्वान । तैसें दिशा हिंडे मन ॥
त्याचे कानीं हाणे । कोण बोंब तुका म्हणे ॥

२८९५

होऊं नको कांहीं या मना आधीन । नाइकें वचन याचें कांहीं ॥
हटियाचे गोष्टी मोडून टाकावी । सोई ही धरावी विठोबाची ॥
आपुलें आधीन करूनियां ठेवा । नाहीं तरि जीवा घातक हें ॥
तुका म्हणे जाले जे मना आधीन । तयासी बंधन यम करी ॥

९८६

काळ सारावा चिंतनें । एकांतवासीं गंगास्नानें ।
देवाचें पूजन । प्रदक्षणा तुळसीच्या ॥
युक्त आहार विहार । नेम इंद्रियांचा सार ।
नसावी वासर । निद्रा बहु भाषण ॥
परमार्थ महाधन । जोडी देवाचे चरण ।
व्हावया जतन । हे उपाय लाभाचे ॥
देह समर्पिजे देवा । भार कांहींच न घ्यावा ।
होईल आघवा । तुका म्हणे आनंद ॥

३९८२

साधनाचे कष्ट मोटे । भय वाटे थोर हें ॥
मुखें गावें भावें गीत । सर्व हित बैसलिया ॥
दासा नव्हे कर्म दान । तन मन निश्चळ ।
तुका म्हणे आत्म निष्ठा । भागे चेष्टा मनाची ॥

३३६३ (नि.)

करावें चिंतन । तेंचि वरें न भेटून ॥
वरवा अंगीं राहे भाव । तंव तोचि जाणा देव ॥

दर्शनाची उरी । अस्वस्थाचि अंग धरी ॥
तुका म्हणे मन । तेथें सकळ कारण ॥

३८०७

जळो ते जाणीव जळो ते शाहाणीव । राहो माझा भाव विठ्ठलपायीं ॥
जळो तो आचार जळो तो विचार । राहो मन स्थीर विठ्ठलपायीं ॥
जळो हा लौकिक जळो दंभभाव । लागो जीवा ध्यान विठ्ठलाचें ॥
जळो हें शरीर जळो हा संबंध । राहो परमानंद माझ्या कंठीं ॥
तुका म्हणे येथें अवघेंचि होय ! धरी मना सोय विठोबाची ॥

७५६

घेई माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ॥
तुम्ही घ्या रे डोळे सुख । पाहा विठोबाचें मुख ॥
तुम्ही ऐका रे कान । माझ्या विठोबाचे गुण ॥
मना तेथें धांव घेईं । राहे विठोबाचे पायीं ॥
तुका म्हणे जीवा । नको सोडूं या केशवा ॥

२३०९

अधीरा माझ्या मना ऐकें एकी मात । तू कां रे दुश्चित निरंतर ॥
हे चि चिंता काय खावें म्हणऊनि । भले तुजहूनि पक्षिराज ॥
पाहा तें चातक नेघे भूमि जळा । वरुषे उन्हाळा मेघ तया ॥
सकळ यातीमध्यें ठक हा सोनार । त्या घरीं व्यापार झारियाचा ॥
तुका म्हणे जळीं वनीं जीव एक । तयापाशीं लेख काय असे ॥

३५८०

न करी रे मना कांहींच कल्पना । चिंतीं या चरणां विठोबाच्या ॥
येथें सुखाचिया अमुपचि रासी । पुढें कल्पनेसी ठाव नाहीं ॥
सुखाचें ओतिलें साजिरें श्रीमुख । शोक मोह दुःख पाहतां नाहीं ॥
तुका म्हणे येथें होईल विसांवा । तुटतील हांवा पुढलिया ॥

३८१०

देवाचिये पायीं देई मना बुडी । नको धांवो वोढी इंद्रियांचे ॥
सर्व सुखें तेथें होती एक वेळे । न सरती काळें कल्पांतीं ही ॥
जाणें येणें खुंटे धांवे वेरजार । न लगे डोंगर उसंतावे ॥

सांगणें तें तुज इतुलेंचि आतां । मानी धन कांता विषतुल्य ॥
तुका म्हणे तुझे होती उपकार । उतरों हा पार भवसिंधु ॥

१९७५

मना एक करी । म्हणे जाईन पंढरीं ॥
उभा विटेवरी तो । पाहेन सांवळा ॥
करीन सांगसी तें काम । जरी जपसी हें नाम ।
नित्य वाचे राम । हरि कृष्ण गोविंद ।
लागे संतांचिया पायां । कथे उल्हास गावया ।
आलों मागावया । शरण देई उचित ॥
नाचे रंगीं वाहे टाळी । होइ सादर ते काळीं ।
तुका म्हणे मळी । सांडूनियां अंतरीं ॥

४१६५

श्रीराम सखा ऐसा धरी भाव । मीपणाचा ठाव पुसीं मना ॥
शरण निरंतर म्हण तूं गोविंदा । वाचे लावी धंदा नारायण ॥
यापरि सोपान नाहीं रे साधन । वाहातसे आण तुझी मना ॥
नको काहीं करूं अळस अंतरीं । जपे निरंतरीं रघुपती ॥
तुका म्हणे मोठा लाभ नरदेहीं । देहीच विदेही होती नामें ॥

१९६

फजितखोरा मना किती तुज सांगों । नको कोणा लागों मागें मागें ॥
स्नेहवादें दुःख जडलेसे अंगीं । निष्ठुर हें जगीं प्रेमसुख ॥
निंदास्तुति कोणी करो दयामाया । न धरीं चाड या सुखदुःखें ॥
योगिराज कां रे न राहाती बैसोनी । एकिग्रे आसनीं याचि गुणें ॥
तुका म्हणे मना पाहे विचारून । होईं रे कठिण वज्रा ऐसें ॥

३१३०

रिकामें तूं नको मना । राहों क्षणक्षणा ही ॥
वेळोवेळां पारायण । नारायण हें करीं ॥
भ्रमणांच्या मोडी वाटा । न भरे फाटा आडरानें ॥
तुका म्हणे माझ्या जीवें । हेंचि घ्यावें धणीवरी ॥

३२५४

हरिनामवेली पावली विस्तार । फळीं पुष्पीं भार वोल्हावली ।
तेथें माझ्या मना होईं पक्षिराज । साधावया काज तृप्तीचें या ॥
मुळींचिया बीजें दाखविली गोडी । लवकरचि जोडी जालियाची ॥
तुका म्हणे क्षणाक्षणां जातो काळ । गोडी ते रसाळ अंतरेल ॥

८१७

आतां असो मना अभक्तांची कथा । न होईं दुश्चिता हरिनामीं ॥
नये त्याची कदा गोष्टी करूं मात । जिव्हे प्रायश्चित्त त्याच्या नांवें ॥
प्रभातें न घ्यावें नांव माकडाचें । तैसें अभक्ताचें सर्वकाळ ॥
तुका म्हणे आतां आठवूं मंगळ । जेणें सर्व काळ सुखरूप ॥

३७०१

नको घालूं झांसां । मना उपाधि वोळसा ॥
जे जे वाहावे संकल्प । पुण्य तरी तेचि पाप ॥
उपजतो भेव । होतो कासावीस जीव ॥
तुका म्हणे पाहों । होइल तें निवांत राहों ॥

१५५३

करी हें चि काम । मना जपे राम राम ॥
लागो हाचि छंद । मना गोविंद गोविंद ॥
तुका म्हणे मना । मज भीक द्यावी दीना ॥

३९३०

मायारूपें ऐसे मोहिलेसे जन । भोगिती पतन नाना कर्मं ॥
काय याची प्रीती करितां आदर । दुरवितां दूर तें चि भलें ॥
नाना छंद अंगीं बैसती विकार । छळियेले फार तपोनिधि ॥
तुका म्हणे ऐसे सिकवितों तुज । आतां धरी लाज मनापुढें ॥

१८२४

सांगतों या मना तें माझें नाइके । घातावरी टेके चांडाळ हें ॥
म्हणऊनि पाहे तरतें वुडतें । न लाहे पुरतें वळ करूं ॥
काय तें संचित न कळे पाहतां । मतिमंद चिन्ता उपजतें ॥
तुका म्हणे ऐसे वळ नाहीं अंगीं । पाहोनिया वेगीं पार टाकी ॥

२५२७

चित्ता ऐसी नको देऊं आठवण । जेणें देवाचें चरण अंतरें तें ॥
आलिया वचनें रामनामध्वनि । ऐकावीं कानीं ऐसीं गोडें ॥
मत्सराचा ठाव शरीरीं नसावा । लाभें वीण जीवा दुःख देतो ॥
तुका म्हणे राहे अंतर शीतळ । शांतीचें तें बळ क्षमा अंगीं ॥

२८१

मागें नेणपणें घडलें तें क्षमा । आतां देतों सीमा करूनिया ॥
परनारीचें जया घडलें गमन । दावीतो वदन जननीरत ॥
उपदेशावरी मन नाहीं हातीं । तो आम्हां पुढती पाहूं नये ॥
तुका म्हणे साक्षी असो द्यावें मन । घातली ते आण पाळावया ॥

३२२३

शक्ती द्याव्या देवा । नाहीं पार्थिवांची सेवा ॥
मुख्य आहे ऐसा धर्म । जाणते हो जाणा वर्म ॥
मना पोटीं देव । जाणे जैसा तैसा भाव ॥
तुका म्हणे सोसें । लागे लाविल्याचें पिसें ॥

३२७५

चंचळीं चंचळ निश्चळीं निश्चळ । वाजवी खळाळ उदकासी ॥
सोपें वर्म परि मन नाहीं हातीं । हा हा भूत चित्तीं भ्रम गाढा ॥
रविबिंब नाहीं तुटत उदका । छायेची ते नका सरी धरूं ॥
तुका म्हणे भय धरी रज्जूसाटीं । नाहीं साच पोटीं कळलें तों ॥

११२३

गति अधोगति मनाची युक्ति । मन लावी एकांतीं साधुसंगें ॥
जतन करा जतन करा । धांवतें सैरा ओढाळ तें ॥
मान अपमान मनाचें लक्षण । लाविलिया ध्यान तेंचि करी ॥
तुका म्हणे मन उतरी भवसिंधु । मन करी बंधु चौऱ्याशीचा ॥

४०५५

पापाचीं संचितें देहासी दंडणा । तुज नारायणा बोल नाहीं ॥
पेरी कडू जिरें मागे अमृतफळें । अर्का वृक्षा केळें कैसे येती ॥
सुख अथवा दुःख भोग हा देहाचा । नास हा ज्ञानाचा न करावा ॥
तुका म्हणे आतां देवा कां रुसावें । मनासी पुसावें काय केलें ॥

४१५४ (अ)

शास्त्रज्ञ हो ज्ञाते असती बहुत । परि नाहीं चित्त हाता आलें ।
क्षणा एकासाठीं न धरवे धीर । तेणें हा रघुवीर अंतरतो ॥
तोळाभर सोनें रतिभार राई । भेळविल्या पाहीं नास होतो ॥
हरीचे अंकित असती विरळागत । तयासी अच्युत कृपा करी ॥
तुका म्हणे काय घुडवण्या गोष्टी । जंव नाहीं गाठीं चित्त आलें ॥

२७८९

सदा सर्वकाळ अंतरीं कुटिळ । तेणें गळां माळ घालूं नये ॥
ज्यासी नाहीं धर्म दया क्षमा शांति । तेणें अंगीं विभूती लावूं नये ॥
जयासी न कळे भक्तीचें महिमान । तेणें ब्रह्मज्ञान बोलों नये ॥
ज्याचें मन नाहीं लागलें हातासी । तेणें प्रपंचासी टाकूं नये ॥
तुका म्हणे ज्यासी नाहीं हरिभक्ती । तेणें भगवें हातीं धरूं नये ॥

## मानभाव

२९३८

दाढी डोई मुंडी मुंडुनिया सर्व । पांघुरति बरवें वस्त्र काळें ।
उफराटी काठी घेउनियां हातीं । उपदेश देती सर्वत्रासी ॥
चाळवुनी रांडा देउनियां भेष । तुका म्हणे त्यास यम दंडी ॥

## माणसाची कसोटी

४१०३

आपुली कसोटी शुद्ध राखी कारण । आगीनें भूषण अधिक पुट ॥
नाहीं कोणासवें बोलणें लागत । निश्चितीनें चित्त समाधान ॥
लपविलें तेंही ढेकरें उमटे । खोटियाचें खोटें उरफोडी ॥
तुका म्हणे निंदा स्तुति दोन्ही वाव । आपुलाला भाव फळा येतो ॥

## माया निरसन

१३१५

तोंच हीं क्षुल्लकें सखीं सहोदरें । नाहीं विश्वंभरें ओळखी तो ॥
नारायण विश्वंभर विश्वपिता । प्रमाण तो होतां सकळ मिथ्या ॥
रवि नुगवे तों दीपिकांचें काज । प्रकाशें तें तेज सहज लोपे ॥
तुका म्हणे देहसंबंध संचितें । कारुण निरुतें नारायणीं ॥

३००

मृगजळा काय करावा उतार । पावावया पार पैलथडी ॥
खापराचे होन खेळती लेंकुरें । कोण त्या वेव्हारें लाभ हानी ॥
मंगळदायक करिती कुमारी । काय त्यांची खरी सोयरीक ॥
स्वप्नीचें जें सुखदुःख जालें कांहीं । जागृतीं तो नाहीं साच भाव
सारी जालीं मेलीं लटिकें वचन । बद्ध मुक्त शीण तुका म्हणे ॥

## मान

२३१२

मान पावे तो आगळा । मुख्य इंद्रियें राखे ॥

## मायावी प्रेम

४५४६

अंग राखोनियां माय खेद करी । अंतरीचें हरी जाणवले ॥

४५४७

भावनेच्या मुळें अंतरला देव । शिरला संदेह भयें पोटीं ॥
पोटीं होतें मागें जीव द्यावा ऐसें । बोलिल्या सरिसें न करवे ॥
न करवे त्याग या जीवाचा नास । नारायण त्यास अंतरला ॥
अंतरला बहु बोलतां वाउगें । अंतरीच्या त्यागें वीण गोष्टी ॥

## मुक्त

७४२

मुक्त कासया म्हणावे । बंधन तें नाहीं ठावें ॥

१४६०

मुक्त तो आशंका नाहीं जया अंगीं । बद्ध मोहासंगीं लज्जा चिंता

## मूर्ख

४५४१

शिकविले हित नायिके जो कानीं । त्यामागें भल्यांनीं जाऊं नये ॥
नये तेंचि करी श्रेष्ठाचिया मना । मूर्ख एक जाणा तोचि खरा ॥

४४८२

तुका सांगे मूढ जना । देहीं देव कां पाहाना ॥

३९५८

सेकीं हें ना तैसें जालें । बोलणें तितुकें वांया गेलें ॥
स्वयें आपणचि रिता । रडे पुढिलांच्या हिता ॥
सुखसागरीं नेघे वस्ती । अंगीं ज्ञानपणाची मस्ती ॥
तुका म्हणे गाढव लेखा । जेथें भेटेल तेथें ठोका ॥

## मुख्य वेदांताचा निर्णय

२४७९

हरि व्यापक सर्वगत हें तंव मुख्यत्वें वेदांत ।
चिंतनासी चित्त असो द्यावें सावध ॥

## मौन

२९१२

एका म्हणे भलें । आणिका सहजचि निंदिलें ॥
कांहीं न करितां आयास । सहज घडले ते दोष ॥
बरें वाइटाचें । नाहीं मज कांहीं साचें ॥
तुका म्हणे वाणी । खंडोनि राहावें चिंतनीं ॥

## मोक्षसाधन विचार

६५९

काय आम्ही भक्ति करणें कैसी । काय एक वाहावें तुम्हांसी ॥
अवघा भरोनि उरलासी । वाणीं खाणीं रसीं रूपीं गंधीं ॥
कसें करूं इंद्रियां बंधन । पुण्य पापाचें खंडन ।
काय व्रत करूं आचरण । काय तुजविण उरलें तें ॥
काय डोळे झांकुनिया पाहूं । मंत्रजप काय ध्याऊं ।
कवणे ठायीं धरूनि भाव । काय तें वाव तुजविण ॥
काय हिंडो कवण दिशा । कवणे ठायीं पाय ठेवूं कैसा ।
काय तूं नव्हेसि न कळे तैसा । काय मी कैसा पाहों आतां ॥
तुझिया नामाची सकळ । पूजा अर्चन मंत्र माळ ।
धूप दीप नैवेद्य फळतांबूल । घेऊं पुष्पांजुळ तुका म्हणे ॥

२८८०

काय माझे नेती वाईट म्हणोन । करूं समाधान कशा साठीं ॥
काय मज लोक नेती पर लोका । जातां कोणा एका निवारेल ॥
न म्हणे कोणासी उत्तम वाईट । सुखें माझी कूट खावो मागें ॥
सर्व माझा भार असे पांडुरंगा । काय माझें जगासवें काज ॥
तुका म्हणे माझें सर्वही साधन । नामसंकीर्तन विठोबाचें ॥

३३६९

ध्याइन तुझें रूप गाइन तुझें नाम । आणीक न करी काम जिव्हामुखें ॥
पाहिन तुझे पाय ठेविन तेथें डोय । पृथक तें काय न करी मनीं ॥
तुझेचि गुणवाद आइकेन कानीं । आणिकांची वाणी पुरे आतां ॥
करिन सेवा करीं चालेन मी पायीं । आणीक न वजे ठायीं तुजविण ।
तुका म्हणे जीव ठेविला तुझ्या पायीं । आणीक तो काई देऊं कोणा ।

१४३५

आणीक कोणाचा न करी मी संग । जेणें होय भंग माझ्या चित्ता ॥
विठ्ठलावांचूनी आणीक जे वाणी । नाइकें मी कानीं आपुलिया ॥
समाधानासाठीं बोलावी हे मात । परि माझें चित्त नाहीं कोठें ॥
जिवाहूनि मज तेचि आवडती । आवडे ज्या चित्तीं पांडुरंग ॥
तुका म्हणे माझें तोचि जाणे हित । आणिकांच्या चित्त नेदीं बोला ॥

३५८३

हेचि सर्व सुख जपावा विठ्ठल । न दवडावा पळ क्षण वांया ।
हेंचि एक सर्व साधनांचें मूळ । आतुडे गोपाळ येणें पंथें ॥
न लगती कांहीं तपांचिया रासी । करणें वाराणसी नाना तीर्थं ॥
कल्पना हें तिळ देहीं अभिमान । नये नारायण जवळी त्यांच्या ॥
तुका म्हणे नामें देव नेदी भेटी । म्हणे त्याचे होटीं कुष्ठ होय ॥

६४८

माझा तंव खुंटला उपाव । जेणें तुझे आतुडती पाव ।
करू भक्ति तरि नाहीं भाव । नाहीं हातीं जीव कवणेविशीं ।
धर्म करू तरी नाहीं चित्त । दान देऊं तरि नाहीं वित्त ।
नेणें पुजों ब्राह्मण अतीत । नाहीं भूतदया पोटा हातीं ॥

नेणें गुरुदास्य संतसेवन । जप तप अनुष्ठान ॥
नव्हे वैराग्य वनसेवन । नव्हे दमन इंद्रियांसि ॥
तीर्थ करूं तरि मन नये सवें । व्रत करूं तरि विधि नेणें स्वभावें ।
देव जरी आहे म्हणों मजसवें । तरि आपपरावें न वंचे ॥
म्हणोनि जालो शरणागत । तुझा दास मी अंकित ।
यास कांहीं न लगे संचित । जालों निश्चित तुका म्हणे ॥

१३८०

यासी अनुसरल्या काय । घडे ऐसे वांया जाय ॥
तुका म्हणे खळ । होती क्षणेंचि-निर्मळ ॥

२८८०

तुका म्हणे माझें सर्वही साधन । नामसंकीर्तन विठोबाचें ॥

१५४७

न चळे हा मंत्र न म्हणो यातीकुळ । न लगे काळवेळ विचारावी ॥

४२८५

नाहीं बळयोग अभ्यास कराया । न कळे ती क्रिया साधनाची ॥
तुझिये भेटीचें प्रेम अंतरंगीं । नाहीं बळ अंगीं भजनाचें ॥
काय पांडुरंगा करूं बा विचार । झुरतें अंतर भेटावया ॥
तुका म्हणे सांगा वडिलपणें बुद्धि । तुजविण दयानिधी पुसों कोणा ॥

३९३२

कैसी करूं आतां सांग तुझी सेवा । शब्दज्ञानें देवा नाश केला ॥
आतां तुझें वर्म न कळे अनंता । तुज न सांगतां बुडूं पाहे ॥
संध्या स्नान केली आचाराची नासी। काय तयापासीं म्हणती एक ॥
बुडविली भक्ति म्हणती पाषाण। पिंडाचें पाळण स्थापुनियां ॥
न करावी कथा म्हणती एकादशी । भजनाची नासी मांडियेली ॥
न जावें देउळा म्हणती देव घरीं । बुडविलें या परी तुका म्हणे ॥

६७० (नि)

न बोलावें ऐसें जनासी उत्तर । करितो विचार बहु वेळा ॥
कोण पाप आड ठाकतें येऊन । पालटी तो गुण अंतरींचा ॥
संसार हातीं सोडवूनि गळां । हे कां अवकळा येती पुढें ॥
तुका म्हणे सेवे घडे अंतराय । यास करूं काय पांडुरंगा ॥

२६८६

जरा कर्णमूळीं सांगों आली गोष्टी । मृत्याचिये भेटी जवळी आली ॥
आतां माझ्या मना होई सावधान । ॐ पुण्यचि जाण कार्यसिद्धि ॥
शेवटील घडी बुडतां न लगे वेळ । साधावा तो काळ जवळी आला ॥
तुका म्हणे चिन्ती कुळाची देवता । वारावा भोंवता शब्द मिथ्या ॥

५४५

वर्णूं महिमा ऐसी नाहीं मज वाचा । न बोलवे साचा पार तुझा ॥
ठायींची हे काया ठेविली चरणीं । आतां ओवाळूनि काय सांडूं ॥
नाहीं भाव ऐसा करूं तुझी सेवा । जीव वाहूं देवा तोही तुझा ॥
मज माझें कांहीं न दिसे पाहातां । जें तुज अनंता समर्पावें ॥
तुका म्हणे आतां नाहीं मज थार । तुझे उपकार फेडावया ॥

९२२

तरि कां नेणते होते मागे ऋषी । तींही या जनासी दुराविलें ॥
वोळगती जया अष्ट महासिद्धी । ते या जनबुद्धी नातळती ।
कंदमूळें पाला धातूच्या पोषणा । खातील वास राणां तरी केला ॥
लावुनियां नेत्र उगेची बैसले । न बोलत ठेले मौन्य मुद्रे ॥
तुका म्हणे ऐसें करी माझ्या चित्ता । दुरावी अनंता जन दुरी ॥

७२४

न संडवे अन्न । मज न सेववे वन ॥
म्हणउनी नारायणा । कींव भाकितों करुणा ॥
नाहीं अधिकार । कांहीं घोकाया अक्षर ॥
तुका म्हणे थोडें । आयुष्य अवघेंचि कोडें ॥

७१२

होईन भिकारी । पंढरीचा वारकरी ॥
हाचि माझा नेमधर्म । अवघें विठोबाचें नाम ॥
हेंचि माझी उपासना । लागेन संतांच्या चरणा ॥
तुका म्हणे देवा । करीन ते भोळी सेवा ॥

२४६७

तुजविण कोणा । शरण जाऊं नारायणा ॥
ऐसा न देखे मी कोणी । दुजा तिहीं त्रिभुवनीं ॥

पाहिलीं पुराणें । धांडोळिलीं दरुषणें ॥
तुका म्हणे ठायीं । जडून ठेलों तुझ्या पायीं ॥

१०१८

न कळे तत्त्वज्ञान मूढ माझी मती । परि ध्यातों चित्तीं चरणकमळ ॥
आगमाचे भेद मी तों काय जाणें । काळ तो चिंतनें सारीतसें ॥
कांहीं नेणें परि म्हणवितों दास । होइल त्याचा त्यास अभिमान ॥
संसाराची सोय सांडिला मारग । दुराविलें जग एका घायें ॥
मागिल्या लागाचें केलेसें खंडण । एका एकीं मन राखियेलें ॥
तुका म्हणे अगा रखुमादेवीवरा । भक्त करुणाकरा सांभाळावें ॥

४१६७

आतां वाटों नेदीं आपलें हें मन । न सोडी चरण विठोबाचे ।
दुजियाचा संग लागो नेदी वारा । आपुल्या शरीरावरूनिया ॥
यावें जावें आम्ही देवाच सांगातें । मागूनी करीत हेंचि आलों ॥
काय वायां गेलों तो करू उद्वेग । उभा पांडुरंग मागें पुढें ॥
तुका म्हणे प्रेम मागतों आंगळें । येथें भोगूं फळें वैकुंठीचीं ॥

३६३२

माझिये बुद्धीचा खुंटला उपाव । करिसील काय पाहेन तें ॥
सूत्रधारी तूं हें सकळ चाळिता । कासया अनंता भार वाहो ॥
वाहिले संकल्प न पावती सिद्धी । येऊं देह बुद्धीवरि नये ।
तुका म्हणे दुःखी करिती तरंग । चिंतूं पांडुरंग आवरून ॥

९५०

माझ्या मुखावाटा नयो हें वचन । व्हावें हें संतान द्रव्य कोणा ॥
फुकाचा विभाग पतन दुःखासी । दोहीमुळें त्यासी तेंचि साधे ॥
ताइकावी निंदा स्तुति माझ्या कानें । सादर या मनें होऊनियां ॥
तुका म्हणे देव असाध्य यामुळें । आशा मोहजाळें गुंतलिया ॥

९४४

विठो सांपडावया हातीं । ठावी जाली एक गती ॥
न धरी भय चित्तीं । बळ किती तयाचें ॥
लागे आपणचि हातीं । किंव भाकावी काकुलती ॥

करी मग चित्तीं । असेल तें तयाचें ॥
एकलिया भाववळें । कैं सापडे तो काळें ।
वैष्णवांच्या मेळें । उभा ठाके हाकेसी ॥
बांधा माझिया जीवासी । तुका म्हणे प्रेमपाशीं ।
न सोडी तयासी । सर्वस्वासी उदार ॥

४०६९

वेद अनंत बोलिला । अर्थ इतकाचि साधला ॥
विठोवासी शरण जावें । निजनिष्ठा नाम गावें ॥
सकळ शास्त्रांचा विचार । अंतीं इतकाचि निर्धार ॥
अठरा पुराणीं सिद्धांत । तुका म्हणे हाचि हेत ॥

३८८५

झाडा वरपोनि खाऊनियां पाला । आठवी विठ्ठला वेळोवेळां ॥
वल्कलें नेसुनि ठुंगा गुंडाळुनी । सांडी जवळुनी देहभान ॥
लोकमान वमनासमान मानणें । एकांतीं राहणें विठोसाटीं ॥
सहसा करूं नये प्रपंचीं सौजन्य । सेवावें अरण्य एकांतवास ॥
ऐसा हा निर्धार करी जो मनाचा । तुका म्हणे त्याचा पांग फिटे ॥

२६६६

लय लक्षी मन न राहे निश्चळ । मुख्य तेथें वळ आसनाचें ॥
हें तों असाध्य जी सर्वत्र या जना । भलें नारायणां आळवितां ॥
कामनेचा त्याग वैराग्य या नांव । कुटुंब ते सर्व विषयजात ॥
कर्म उसंतावें चालत पाउलीं । होय जों राहिली देहबुद्धि ॥
भक्ती तें नमावें जीवजंतुभूत । शांतवूनि ऊत कामक्रोध ॥
तुका म्हणे साध्य साधन अवघडें । देतां हें सांकडें देह बळी ॥

९९९

नव्हे आराणूक परि मनीं वाहे । होईल त्या साहे पांडुरंग ।
पंढरीसि जात्रें उद्वेग मानसीं । धरिल्या पावसी संदेह नाहीं ॥
नसो बळ देह असो पराधीन । परि हें चिंतन टाकों नको ॥
तुका म्हणे देह पडो या चिंतनें । पुढें लागे येणें याजसाठीं ॥

२४६२

आपुलिया आंगें तोडी मायाजाळ । ऐसे नाहीं वळ कोणापाशीं ।
रांडापोरें त्याग करी कुटुंबाचा । नावरे हे वाचा आणि मन ॥
हर्षामर्ष जों हे नाहीं जों जिराले । तोंवरी हे केले चार त्यांनीं ॥
मुक्त जालों ऐसें बोलों जाये मुखें । तुका म्हणे दुःखें बांधला तो ॥

२८४६

साधकाची दशा उदास असावी । उपाधी नसावी अंतर्बाही ॥
लोलुपता काय निद्रेतें जिणावें । भोजन करावें परिमित ॥
एकांतीं लोकांतीं स्त्रियांशीं वचन । प्राणगेल्या जाण बोलों नये ॥
संग सज्जनाचा उच्चार नामाचा । घोष कीर्तनाचा अहर्निशीं ।
तुका म्हणे ऐशा साधनीं जो राहे । तोचि ज्ञान लाहे गुरुकृपा ॥

१४८६

निर्वाहापुरतें अन्न आच्छादन । आश्रमासी स्थान कोंपी गुहा ॥
कोठेंही चित्तासी नसावें बंधन । हृदयीं नारायण साठवावा ॥
नये बोलों फार बैसों जनामधीं । सावधान बुद्धी इंद्रियें दमी ॥
तुका म्हणे घडी घडीनें साधावी । त्रिगुणांची गोवी उगवूनि ॥

२७७०

सर्वस्वा मुकावें तेणें हरि जिंकावे । अर्थ प्राण जीवें देहत्याग ॥
मोह ममता माया चाड नाहीं चिंता । विषयकंदु वेथा जाळूनियां ॥
लोकलज्जा दंभ आणि अहंकार । करूनि मत्सर देशधडी ॥
शांति क्षमा दया सखिया विनउनी । मूळ चक्रपाणी धाडी त्यांसी ॥
तुका म्हणे याती अक्षरें अभिमान । सांडोनियां शरण रिघे संतां ॥

३३२५

करूनियां शुद्ध मन । नारायण स्मरावा ॥
तरीच हा तरिजे सिंधु । भवबंधू तोडोनियां ॥
तेथें सरे शुद्ध साचें । अंतरीचें बीज तें ॥
तुका म्हणे लवणकळी । पडतां जळीं तें होय ॥

१७३३

बैसोनि निवांत शुद्ध करी चित्त । तया सुखा अंत पार नाहीं ॥
येऊनि अंतरीं राहील गोपाळ । सायासाचें फळ बैसलिया ॥

राम कृष्ण हरि मुकुंद मुरारि । मंत्र हा उच्चारीं वेळोवेळां ॥
तुका म्हणे ऐसें देईन मी दिव्य । जरी होइल भाव एकविध ॥

२८६६

नये वांटूं मन । कांहीं न देखावें भिन्न ॥
पाय विठोबाचे चित्तीं । असो द्यावे दिवसराती ॥
नये काकुळती । कोणा यावें हरिभक्ती ॥
तुका म्हणे साई । करील कृपेची विठाई ।

१४१६

न लगे देशकाळ । मंत्रविधानें सकळ ॥
मनेंचि निश्चळ । करूनि करुणा भाकावी ॥
येतो बैसलिया ठाया । आसनें व्यापी देवराया ॥
निर्मळ ते काया । अधिष्ठान तयाचें ॥
कल्पनेचा साक्षी । तरि आदरेंचि लक्षी ॥
आवडीनें भक्षी । कोरडें धान्य भरभरां ॥
घेणें तरि भाव । लक्षी दासांचा उपाव ॥
तुका म्हणे जीव । जीवी मेळविल अनंत ॥

२२६८

काय धोविलें बाहेरी मन मळलें अंतरीं ।
गादलें जन्मवरी असत्यकांटे काटलें ॥
सांडी व्यापार दंभाचा शुद्ध करीं रे मन वाचा ।
तुझिया चित्ताचा तूंच ग्वाही आपुला ॥
पाप पुण्य विटाळ देहीं भरितां न विचारिसी कांहीं ।
काय चाचपसी मही जी अखंड सोंवळी ॥
कामक्रोधा वेगळा ऐसा होईं कां सोवळा ॥
तुका म्हणे कळा गुंडुन ठेवीं कुसरी ॥

१२०८

न मानावें तैसें गुरूचें वचन । जेणें नारायण अंतरे तें ॥
देव जोडे ते करावे अधर्म । अंतरे तें कर्म नाचरावें ॥

१४२८

निर्वैर होणें साधनाचें मूळ । येर ते विल्हाळ सांडी भांडी ॥
नाहीं चालों येत सोंग संपादणी । निवडे अवसानीं शुद्धाशुद्ध ॥
त्यागा नांव तरी निर्विषयवासना । कार्य कारणांपुरते विधि ॥
तुका म्हणे राहे चिंतनीं आवडी । येणें नावें जोडी सत्यत्वेशीं ॥

९१७

धाई अंतरिच्या सुखें । काय बडबड वाचा मुखें ॥
विधिनिषेध उरफोडी । जंव नाहीं अनुभवगोडी ॥
वाढे तळमळ उभयता । नाहीं देखिलें अनुभविता ॥
अपुल्या मतें पिसें । परि तें आहे जैसेंतैसें ॥
साधनाची सिद्धि । मौन करा स्थिर बुद्धी ॥
तुका म्हणे वादें । वांयां गेलीं ब्रह्मवृंदें ॥

४११२

देखीचें तें ज्ञान करावें तें काई । अनुभव नाहीं आपणासी ॥
इंद्रियांचे गोडी ठकलीं बहुतें । सोडितां मागुतें आवरेना ॥
युक्तीचा आहार नीतीचा वेव्हार । वैराग्य तें सार तरावया ॥
नाव रेवाळितां घाला घाली वारा । तैसा तो पसारा अहंतेचा ॥
तुका म्हणे बुद्धि आपुले अधीन । करी नारायण आतुडे तो ॥

१७९४

लापनिक शब्दें नातुडे हा देव । मनिंचे गुह्य भाव शुद्ध बोला ॥
अंतरिचा भेद जाणे परमानंद । जयासी संवाद करणें लागे ॥
तुका म्हणे जरी आपुलें स्वहित । तरी करीं चित्त शुद्ध भावें ॥

२९३२ (नि.)

पाठवील ठाया । पांडुरंग चिंतिलिया ॥
त्यासी चिंतीलिया मनी । चिन्ता करी गंवसणी ॥
पावावया कळा । अंगीं असावें हें बळ ॥
तुका म्हणे तई । सिद्धि बोळंगती पायी ॥

३८८४

मधुरा उत्तरासवें नाहीं चाडा । अंतरंगीं वाड भाव असो ॥
प्राणा वेगळा न करी नारायण । मग नसो ज्ञान मूर्ख बरा ॥
जननिंदा होय तो बरा विचार । थोरवीचा भार कामा नये ॥
तुका म्हणे चित्तीं भाव निष्ठावंत । दया क्षमा शांत सर्वांभूतीं ॥

५७५

साधनें तरी हींच दोन्ही । जरी कोणी साधील ॥
परद्रव्य परनारी । याचा धरी विटाळ ॥
देवभाग्यें घरा येती । संपत्ती त्या सकळा ॥
तुका म्हणे तें शरीर । गृह भांडार देवाचें ॥

९८९

विटाळ तो परद्रव्य परनारी । येथुनि जो दुरी तो सोंवळा ॥
गद्यें पद्यें कांहीं न धरावी उपाधी । स्वाधीनचि बुद्धि करुनी ठेवा ॥
विचाराचें कांहीं करावें स्वहित । पापपुण्यां चीत भांडवल ॥
तुका म्हणे न लगे जावें वनांतरा । विश्व विश्वंभरा सारिखेंचि ॥

२४९१

सांडूनियां सर्व लौकिकाची लाज । आळवा यदुराज भक्तिभावें ।
पाहूनिया झाडें वरवडूनि पाला । खाऊनि विठ्ठला आळवावें ॥
वेंचूनिया चिंध्या भरूनिया धागा । गुंडाळूनि ढुंगा आळवावें ॥
तुका म्हणे ऐसें मांडिल्या निर्वाण । तया नारायण उपेक्षिना ॥

२४३९

भावें गावें गीत । शुद्ध करूनियां चित्त ॥
तुज व्हावा आहे देवा । तरि हा सुलभ उपाव ॥
आणिकांचे कानीं । गुण दोष मना नाणीं ॥
मस्तक ठेंगणा । करी संतांच्या चरणा ॥
वेची तें वचन । जेणें राहे समाधान ॥
तुका म्हणे फार । थोडा तरी पर-उपकार ॥

२३९६

आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूं नये ॥
मग तो कृपा-सिंधू निवारी सांकडें । येरे तें वापुडें काय रंक ॥
भयाचिये पोटीं दुःखाचिया रासी । शरण देवासी जातां भलें ॥
तुका म्हणे नव्हे काय त्या करितां । चिंतावा तो आतां विश्वंभर ॥

२३९८

निर्वैर व्हावें भूतांसवें । साधन बरवें हेंचि एक ॥
तरीच अंगीकार करिल नारायण । बडबड तो सीण येणें वीण ॥
सोइरें पिशुन समानचि घडे । चित्त पर ओढे उपकारी ॥
तुका म्हणे चित्त जालिया निर्मळ । तरिच सकळ केलें होय ॥

३०७४

थोर ती गळाली पाहिजे अहंता । उपदेश घेतां सुख वाटे ॥
व्यर्थ भराभर केलें पाठांतर । जोंवरी अंतर शुद्ध नाहीं ॥
घोडें काय थोडें वागवितें ओझें । भावेंवीण तैसे पाठांतर ॥
तुका म्हणे धरा निष्टावंत भाव । जरी पंढरीराव पाहिजे तो ॥

१८४९

हालवूनि खुंट । आधीं करावा वळकट ॥
मग तयाच्या आधारें । करणें अवघेंचि बरें ॥
सुख दुःख साहे । हर्षा मर्षा भंगा नये ॥
तुका म्हणे जीत्रें । आधीं मरोनि राहावें ॥

२९१

मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धींचें कारण ।
मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ॥
मनें प्रतिमा स्थापिली । मनें मना पूजा केली ।
मनें इच्छा पुरविली । मन माउली सकळांची ।
मन गुरु आणि शिष्य । करी आपुलेंचि दास्य ।
प्रसन्न आपआपणास । गति अथवा अधोगति ॥
साधक वाचक पंडित । श्रोते वक्ते ऐका मात ।
नाहीं नाहीं आनुदैवत । तुका म्हणे दुसरें ॥

९८६

काळ सारावा चिंतनें । एकांतवासीं गंगास्नानें ।
देवाचें पूजन । प्रदक्षणा तुळसीच्या ॥
युक्त आहार विहार । नेम इंद्रियांचा सार ।
नसावी वासर । निद्रा बहु भाषण ॥
परमार्थ महाधन । जोडी देवाचे चरण ।
व्हावया जतन । हे उपाय लाभाचे ॥
देह समर्पिजे देवा । भार कांहींच न घ्यावा ।
होईल आघवा । तुका म्हणे आनंद ॥

७२०

करावें चिंतन । तेंचि वरें न भेटून ॥
बरवा अंगीं राहे भाव । तग तोचि जाणा देव ॥
दर्शनाची उरी । अवस्थाचि अंग धरी ।
तुका म्हणे मन । तेथें सकळ कारण ॥

३९८२

साधनाचे कष्ट मोटे । भय वाटे थोर हे ॥
मुखें गावें भावें गीत । सर्व हित वैसलिया ॥
दासा नव्हे कर्म दान । तन मन निश्चळ ॥
तुका म्हणे आत्मनिष्ठा । भागे चेष्टा मनाची ॥

४०७७

ध्यानीं ध्याता पंढरिराया । मनासहित पालटे काया ॥
तेथें बोला कैंची उरी । माझें मीपण जाला हरी ॥
चित्तचैतन्यीं पडतां मिठी । दिसे हरिरूप अवघी सृष्टि ॥
तुका म्हणे सांगो काय । एकाएकीं हरिवृत्तिमय ॥

२४८७

आतां नव्हे गोड कांहीं करितां संसार । आणीक संचार जाला माजी ।
ब्रम्हरसें गेलें भरूनिया अंग । आधील तो रंग पालटला ॥
रसनेचिये रुची कंठीं नारायण । बसोनियां मन निवविलें ॥
तुका म्हणे आतां बैसलों ठाकणीं । इच्छेची ते धणी पुरईल ॥

३१८२

विचारिलें आधीं आपुल्या मानसीं । वांचों येथें कैसी कोण्या द्वारें ॥
तंव जाला साह्य हृदयनिवासी । बुद्धि दिली ऐसी नास नाहीं ॥
उद्वेगाचे होतों पडिलों समुद्रीं । कोणे रीती तरी पाविजेल ॥
तुका म्हणे दुःखें आला आयुर्भाव । जाला बहु जीव कासावीस ॥

२९४९

हेचि भेटी साच रूपाचा आठव । विसावला जीव आवडीपें ॥
सुखाचें भातुकें करावें जतन । सेविल्या ताहान भूक जाय ॥
दुरील जवळी आपण चि होतें । कवळिलें चित्तें जिवांपासीं ॥
तुका म्हणे नाम घेतों वेळोवेळां । होतील सकळा शीतळा नाडी ॥

११०

थोडें आहे थोडें आहे । चित्त साहे जालिया ॥
हर्षामर्ष नाहीं अंगीं । पांडुरंगीं सरलें तें ॥
अवघ्या साधनांचें सार । न लगे फार शोधावें ।
तुका म्हणे लटिकें पाहें ॥ सांडी देह अभिमान ॥

३९५५

सर्वस्वाची साटी । तरिच देवासवें गांठी ॥
नाहीं तरी जया तैसा । भोग भोगवील इच्छा ॥
द्यावें तेंचि घ्यावें । म्हणउनि जीवें जावें ॥
तुका म्हणे उरी । मागें नुरवितां बरी ॥

९५३

वासनेच्या मुखीं अदळूनि भीतें । निर्वाहापुरतें कारण तें ॥
या नांवें अंतरा आला नारायण । चित्त समाधान खुण त्याची ॥
सर्वकाळ हाचि करणें विचार । विवेकीं सादर आत्मत्वाचे ॥
तुका म्हणे जों जों भजनासी वळे । अंग तों तों कळे सन्निधता ॥

१२९३

देह आणि देहसंबंधें निंदावीं । इतरें वंदावीं श्वानशूकरें ॥
येणें नांवें जाला मी माझ्याचा झाडा । मोहा नांवें खोडा गर्भवास ॥

गृह आणि वित्त स्वदेशा विटावें । इतरा भेटावें श्वापद झाडा ॥
तुका म्हणे मी हें माझें न यो वाचे । येणें नावें साचे साधुजन ॥

२३२५

नाहीं देवापाशीं मोक्षाचें गांठोळें । आणूनि निराळें द्यावें हातीं ॥
इंद्रियांचा जय साधुनियां मन । निर्विषय कारण असे तेथें ॥
उपास पारणीं अक्षरांची आटी । सत्कर्मा शेवटीं असें फळ ॥
आदरें संकल्प वारीं अतिशय । सहज तें काय दुःख जाण ॥
स्वप्नींच्या घायें विवळसी वांया । रडे रडतियासवें मिथ्या ॥
तुका म्हणे फळ आहे मूळापाशीं । शरण देवासीं जाय वेगीं ॥

४४२४

कैसी करूं तुझी सेवा । ऐसें सांगावें जी देवा ।
कैसा आणूं अनुभवा । होशी ठावा कैशापरी ॥
धर्मभ्रष्ट माझें मन । नेणें जप तप अनुष्ठान ।
नाहीं इंद्रियांसि दमन । नव्हे मन एकविध ॥
नेणें यातीचा आचार । नेणें भक्तीचा विचार ।
मज नाहीं संतांचा आधार । नाहीं स्थिर बुद्धि माझी ॥
न सुटे मायाजाळ । नाहीं वैराग्याचें बळ ।
न जिंकवती सबळ । कामक्रोध शरीरीं ॥
आतां राख कैसें तरि । मज नुपेक्षावें हरि ।
तुझी ब्रीदें चराचरीं । तैसी साच करीं तुका म्हणे ॥

३९८७

देवाचिये पायीं वेचों सर्व शक्ती । होतील विपत्ति ज्या ज्या कांहीं ॥
नेघे माझी वाचा पुढें कांहीं वाव । आणि दुजे भाव बोलायाचे ॥
मनाची वांटणी चित्ताचा विक्षेप । राहो हा अनुताप आहे तैसा ॥
तुका म्हणे घेईं विठ्ठलाचा छंद । आनंदाचा कंद विस्तारेल ॥

४०९३

माझिया जीवाचा मज निरधार । न करी उत्तर जनासवें ॥
आपुलें कारण साधों जी विचार । करावा हा धीर धरूनियां ॥

काय कराविया आणिका या युक्ती । काय नव्हे भक्ति विठोबाची ॥
एक पुढें गेले वाट दावूनियां । मारग तो वांयां कोण सांडी ॥
तुका म्हणे माझी विठोबासी चिंता । भेईना सर्वथा न घडे तें ॥

२३१२

उपाय साधन आइका कोण गति अवगति ।
दृढ बैसोनि सादर तुम्ही धरावे चित्तीं ॥

१०२१

जाणावें तें काय नेणावें तें काय । ध्यावे तुझे पाय हेंचि सार ॥
करावें तें काय न करावें तें काय । ध्यावे तुझे पाय हेंचि सार ॥
बोलावें तें काय न बोलावें तें काय । ध्यावे तुझे पाय हेंचि सार ॥
जावें तें कोठें न जावें तें आतां । बरवें आठवितां नाम तुझें ॥
तुका म्हणे तूं करिसी तें सोपें । पुण्यें होती पापें आमुच्या मतें ॥

## यो यच्छ्रद्धः स एव सः

२५ (नि.)

जैसा मनोरथ जये चित्तीं काम । तैसा मेघःश्याम पुरवितो ॥

४५३४

तद्भावना तैसें भविष्य तयाचें । फळ देतां साचें मीच एक ॥

२०९४

आवडीचें दान देतो नारायण । बाहे उभारोन राहिलासे ॥
जें जयासी रुचे तें करी समोर । सर्वज्ञ उदार मायबाप ॥
ठायीं पडिलिया तेंचि लागे खावें । ठायींचेंचि घ्यावें विचारूनि ॥
बीज पेरूनिया तेंचि घ्यावें फळ । डोरलींस केळ कैंचे लागे ॥
तुका म्हणे देवा कांहीं बोल नाहीं । तुझा तूंचि पाहीं शत्रु सखा ॥

१७५८

तुका म्हणे जे जैसें करिती । ते पावती तैसींच फळें ॥

२८६७ (नि.)

सिंदळा साल्याचा नाहीं हा विश्वास । बाईल तो त्यास न विसंबे ॥
दुष्ट बुद्धि चोरी करी निरंतर । तो म्हणे इतर लोक तैसे ॥
तुका म्हणे जया चित्तीं जे वासना । तयाची भावना तयापरी ॥

२३७९

जया चित्तीं जैसा भाव । तयां जवळि तैसा देव ॥

२८२९

शिळा जया देव । तैसा फळे त्याचा भाव ॥

२३२८

ज्याचें जया ध्यान । तेंचि होय त्याचें मन ॥

# 'जीवनरहस्या'ची सूचि

## (पहिल्या भागांतील)

संग्राहक : श्री. विद्याधर भोरटके, बी. एस्. सी, मुंबई


| विषय | पान नं. | विषय | पान नं. |
|---|---|---|---|
| अधोगति | २ | आत्मस्थिति | १४–१८ |
| अधमासी अधम | ४ | आत्मचरित्र | २८ |
| अधीर–धीर | ५ | आशाबद्ध | ६–८ |
| अनाचारी | ४ | ओव्या | २१–२७ |
| अनुताप | ३ | आंधळा | ११–१४ |
| अवतार | १ | ओंगळ | १४ |
| अविश्वास | २ | आरती | ४७ |
| अनहित | ४ | आचारांचें बंधन | ४७ |
| अपमान | ३ | आयुष्याची इतिकर्तव्यता | ४७–४८ |
| अनेकत्वीं एकत्व | ४ | आत्महत्या | ४७ |
| अनुभव | ५ | आश्रमी | ४७ |
| अभ्यास | ४,५ | ईश्वराचें वास्तव्य | ४८ |
| अभागी | ५ | उदार | ४८ |
| अज्ञानी | ३ | उधळ | ४८ |
| अद्वैत | ६ | उपाधी | ४९ |
| अंतरंग | ६ | उदकीं वह्या राखिल्या | ३३-३४ |
| अंधळेपणा | ५ | उपदेश | ४९–७३ |
| अहंता | १,२ | उपदेश व अनुभव यांतील भेद | ४९ |
| आई | १९,२० | ऊन पाणी घातलें | ३६ |
| आचारी | १४ | एकरूपता | ७३–७६ |
| आत्मविचार | १८,१९ | एकादशी-सोमवार | ७६–७७ |
| आत्मविश्वास | १० | एकासी एक कामा नये | ७७–७८ |
| आत्मसमर्पण | ८,९,१० | | |

| विषय | पान नं. | विषय | पान नं. |
|---|---|---|---|
| एकाविण एक कामा नये | ७७ | जिजाईचें कठोर भाषण | ३६,३७ |
| कडू | ७८ | तामसदान | ९८ |
| कथा | ८०–८६ | तेथें देवाची वसति | १०२ |
| कलियुग | ७८–८० | तुटीचा व्यापार | ९८ |
| कर्म | ७८ | त्याग | ९८–१०२ |
| कवित्व करणेविषयीं दृष्टांत | ३३ | दया | १०२ |
| | | दाता | १०३ |
| कीर्तनप्रसंगीं पडलेला परचक्राचा वेढा | ४१,४२ | देवापाशीं मागणें | १०९–११२ |
| | | देवभेटीची तळमळ | ११२–११५ |
| काम-क्रोध | ८६,८७ | देवकृपा | ११९,१२० |
| कूट—अभंग | ८७,८८ | देव प्राप्तीची खूण | १२०–१२१ |
| कृपण | ७८ | देवाचें स्थान व स्वरूप | ११५–११७ |
| गुज | ८८ | देवावर भार | ११८ |
| गुरु-शिष्य | ८८ | देवानें अंगीकार केला | ११८,४२ |
| गोड | ८८ | दुष्ट लोक | १०४–१०८ |
| गोडी | ८८ | दुर्लभ पाय विठोबाचे | १०४ |
| घातपात | ८८ | दुःख | १०३–१०४ |
| चोरटा मुलगा | ८९ | दुःसंग | ११८ |
| चांगलेपण | ८८ | दोष | १२१ |
| चिंतन | ८८ | दंभ | १०२ |
| छळामुळें प्रपंचाचा वीट | ३१ | द्रव्यव्यय | १०४ |
| छळाचा परिणाम वैराग्य | ३१,३२ | द्वेष | ११८ |
| जनरीत | ९२–९६ | धर्म | १२१–१२२ |
| जनहिताची तळमळ | ९० | धरणे करी ब्राह्मणास उपदेश | ३५ |
| जनवैचित्र्य | ९६,९७ | धीर—अधीर | १२२ |
| जन्मसाफल्य | ९०–९२ | ध्यानाची फलश्रुति | १२२ |
| जन्मभूमीचें वर्णन | २८,२९ | नरस्तुति | १३० |
| जाणता | ९८ | नर्कवास—स्वर्गवास | १३० |

| विषय | पान नं. |
|---|---|
| नष्टबुद्धि | १२२ |
| नामाचें सामर्थ्य | १२२–१२८ |
| निराकार विठोबा भेटला | ४४,४५ |
| निःस्पृह | १२९ |
| निंदा | १२९ |
| नुसते शब्द, तंत्र, मंत्र व्यर्थ | १३० |
| नेमाचें महत्त्व | १२९ |
| परधन, धन, धनवंत, धनी | १३३-१३५ |
| परमहंस | १३३ |
| परउपकार | १३३ |
| परमेश्वराचा धांवा | १३२–१३३ |
| परमेश्वराचें सामर्थ्य | १३०–१३२ |
| परमेश्वर प्राप्तीची खूण | १३७ |
| परमेश्वराची प्रेरणा | १३७ |
| परमार्थाला लौकिकाचें वाकडें | १३७ |
| पराधीन | १३३ |
| पाप–पापी | १३८–१३९ |
| पारखी | १३९ |
| परस्त्री | १३५–१३६ |
| पुत्र | १४२ |
| पुण्य | १४१,१४२ |
| पुण्यक्षेत्र आणि पाप | १७३ |
| पूजा | १७१–१७३ |
| पूर्वजन्म | १४२ |
| पंडित | १३७ |
| पांडुरंगाची भरंवशानें भेट | १३८ |
| पांगुळ | १३९–१४१ |
| प्रपंच परमार्थाची गफलत | १७३ |

| विषय | पान नं. |
|---|---|
| प्रारब्ध | १४३–१४६ |
| प्रेमाची खूण | १७३ |
| बळि | १७६ |
| बायल्या | १७४–१७६ |
| बीज | १७६ |
| बुरा | १७६ |
| ब्रह्मचारी | १७४ |
| ब्रह्मचि तो | १७३ |
| भर्तृहरि | १७६ |
| भगवन्तास प्रार्थना | १४६–१७० |
| भला | १७७ |
| भक्त आणि देव यांचा अन्योन्य संबंध | १८३,१८४ |
| भक्त | १८२–१८६ |
| भक्ताचे वैशिष्ट | १८५,१८६ |
| भक्ति | १८६ |
| भक्तीची ऐसी जात | १८४,१८५ |
| भक्तीवीण ब्रह्मज्ञान बापुडे | १८६,१८७ |
| भाव | १७८–१८२ |
| भाग्यवंत | १७७ |
| भूपाळी | १७७ |
| भूतभविष्य | १७८ |
| महाराजांचें प्रयाण | ४५,४६ |
| महाराज कृतकृत्य झाले | ४३ |
| महाराजांचा जिजाईस उपदेश | ३७-३९ |
| महाराजांना पाहून पक्षी उडाले | ३५ |
| मन-चित्त | १८७–१९५ |
| मानभाव | १९५ |

| विषय | पान नं. |
| --- | --- |
| माणसाची कसोटी | १९५ |
| माया-निरसन | १९५,१९६ |
| मान | १९६ |
| मायाची प्रेम | १९६ |
| मुक्त | १९६ |
| मुख्य वेदांताचा निर्णय | १९७ |
| मूर्ख | १९६,१९७ |
| मोक्षसाधन विचार | १९७–२०८ |
| मौन | १९७ |
| मंत्रप्राप्ति | ३२ |
| यो यच्छ्रद्धः स एव सः | २११ |
| लोहगांवीं कीर्तनांत मेलेलें मूल जिवंत होणेविषयीं प्रार्थना | ३६ |
| लोहगांवीं महाराजांच्या अंगावर ऊन पाणी घातलें | ३६ |
| शिवाजीस पत्र | ३९–४१ |
| शेववटची विनंती | ४५ |
| सगुण साक्षात्कार | ४३–४४ |
| समाजानें केलेला छळ | ३०–३१ |
| संसाराची दुर्दशा | २९,३० |
| स्त्री-परस्त्री-सिंदळी | १३५,१३६ |
| ज्ञानेश्वर स्तवन | ३४,३५ |

REFBK-0008070
REFBK-0008070